

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार १३ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०+४




अहमदाबाद विमान अपघाताचा अहवाल आला


## विमानाचा इंधन स्विच बंद, पायलटने तो पुन्हा चालू केला पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एअर इंडियाच्या फ्लाइट AI-१७१ चा प्राथमिक तपास अहवाल आला आहे. AAIB म्हणजेच विमान अपघात तपास ब्युरोने १२ जुलै रोजी १५ पानांचा अहवाल सार्वजनिक केला.सुरुवातीच्या निकालांवरून असे दिसून आले आहे की, जेटच्या दोन्ही इंजिनमधील इंधन प्रवाह नियंत्रित करणारे स्विच निकामी झाले होते, ज्यामुळे टेकऑफनंतर काही वेळातच इंजिन बंद पडले आणि विमानाचा जोर कमी झाला. पायलटने ते पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. कॉकपिट रेकॉर्डिंगमध्ये असे दिसून आले आहे की एका पायलटने दुस-याला विचारले, 'तुम्ही स्विच बंद केला आहे का?' दुस-याने उत्तर दिले, 'नाही.' अहवालात असेही उघड झाले आहे की उड्डाणापूर्वी, एका फ्लाइट सेन्सरमध्ये समस्या होती, जी दुरुस्त करण्यात आली होती.

मेडिकल हॉस्टेलवर झालेल्या विमान अपघातात एकूण २७० जणांचा मृत्यू झाला. यामध्ये २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. भारतीय वंशाचा फक्त एक ब्रिटिश प्रवासी वाचला. बोईंग ७८७-८ च्या इतिहासातील हा पहिलाच अपघात होता. या अपघातात संपूर्ण विमान उद्ध्वस्त झाले. अपघातस्थळी विमानाचे विविध भाग विखुरलेले आढळले.विमानाच्या कॉकपिटमध्ये थ्रस्ट लीव्हर्सजवळ इंधन नियंत्रण स्विचेस असतात. ते इंजिनला इंधन पुरवठा नियंत्रित करतात. त्याचे मुख्य कार्य म्हणजे इंजिनला इंधन पुरवठा सुरू करणे ('चालवण्याची' स्थिती) किंवा थांबवणे ('कटऑफ' स्थिती).प्रत्येक इंजिनसाठी एक वेगळा इंधन नियंत्रण स्विच असतो. उदाहरणार्थ, बोईंग ७८७ मध्ये दोन इंजिन असतात, म्हणून दोन स्विच असतील - एक डाव्या इंजिनसाठी, एक उजव्या इंजिनसाठी.

**धावण्याची स्थिती:** जेव्हा स्विच 'रन' मध्ये असतो, तेव्हा इंधन झडप उघडते आणि इंजिनला इंधन पुरवठा सुरू होतो. यामुळे इंजिन चालू राहते आणि विमानाला जोर मिळतो.



**कटऑफ स्थिती:** जेव्हा स्विच 'कटऑफ' वर हलवला जातो, तेव्हा इंधन व्हॉल्व्ह बंद होतो आणि इंजिनला इंधन पुरवठा थांबतो. यामुळे इंजिन ताबडतोब बंद होते. इंधन नियंत्रण स्विचेस स्प्रिंग-लोडेड असतात आणि त्यांना स्थितीत ठेवण्यासाठी एक डिटेंट (एक प्रकारचा लॉक) असतो.

**स्विच हलविण्यासाठी तीन पाय-या आवश्यक आहेत** - पकडणे, डिटेंटमधून बाहेर काढणे आणि सोडणे. हा सामान्य स्विच नाही जो चुकून दाबला जाउ शकतो. १२ जून २०२५ चा दिवस. एअर इंडियाचे ए७८७-८ विमान दिल्लीहून अहमदाबाद विमानतळावर आले. विमान सकाळी ११:१७ वाजता उतरले आणि बे ३४ वर पार्क केले गेले. टेक लॉगमध्ये 'STAB POS XDCR' स्थिती संदेशासाठी क्रूने पायलट डिफेक्ट रिपोर्ट (PDR) दाखल केला होता. हा एक सेन्सर आहे जो विमानाच्या क्षैतिज स्टॅबिलायझरची (पिच नियंत्रित करणारा शेपटीचा भाग) स्थिती मोजतो. जर काही बिघाड असेल, तर हा स्टेटस मेसेज टेक लॉगमध्ये रेकॉर्ड केला जातो, जसे या प्रकरणात घडले. त्याचे काम फ्लाइट कंट्रोल सिस्टमला स्टॅबिलायझरची योग्य स्थिती सांगणे आहे, जेणेकरून विमानाची स्थिरता आणि नियंत्रण राखले जाईल. फॉल्ट आयसोलेशन मॅन्युअलनुसार त्याची दुरुस्ती करण्यात आली आणि दुपारी १२:१० वाजता विमान उड्डाणासाठी सोडण्यात आले.

### 'पक्षपाती अहवाल'

**विमान अपघाताच्या तपासावर पायलट असोशिएनने व्यक्त केली चिंता**

महिन्यापूर्वी अहमदाबाद येथे एअर इंडियाचे एआय-१७१ ड्रिमलायनर बोईंग हे विमान कोसळले होते. आज विमान अपघात तपास ब्युरोने (AAIB) अपघाताप्रकरणी प्राथमिक तपास अहवाल प्रसिद्ध केला. १५ पानी अहवालात कॉकपिटमध्ये दोन पायलट्समध्ये विसंवाद झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. यावरून आता एअरलाइन पायलट्स असोसिएशन ऑफ इंडिया (ALPA) ने सदर अहवालावर चिंता व्यक्त केली. अहमदाबादमधील अपघातासाठी पायलटला जबाबदार होते, असे गृहित धरल्याचे सदर अहवालातून दिसून येत आहे, असे असोसिएशनने म्हटले आहे.एअरलाइन पायलट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सॅम थॉमस यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, तपासाचा एकंदर सूर आणि दिशा वैमानिकांच्या चुकीकडे पक्षपातीपणा दर्शवते. आम्ही या अनुमानाला स्पष्टपणे नाकारतो आणि निष्पक्ष, तथ्य-आधारित चौकशीचा आग्रह करत आहोत.

### एअर इंडियाचे विमान पायलटने जाणूनबुजून क्रॅश केले असावे

गेल्या महिन्यात अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता, ज्यामध्ये २४१ जणांना जीव गमवावा लागला होता. अशात भारतातील एका आघाडीच्या विमान सुरक्षा तज्ज्ञाने अशी शक्यता वर्तवली आहे की, एअर इंडिया फ्लाइट १७१ चा अपघात हा जाणीवपूर्वक मानवी कृतीचा परिणाम असू शकतो, ज्यामुळे पहिल्यांदाच पायलटमुळे अपघात झाला असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.भारतातील आघाडीच्या विमान वाहतूक तज्ज्ञांपैकी एक असलेले कॅप्टन मोहन रंगनाथन यांनी फ्युएल कटऑफ स्विचेस आणि कॉकपिट ऑडिओच्या क्रमाकडे लक्ष वेधले असून, हा अपघात कॉकपिटमध्ये जाणीवपूर्वक केलेल्या कृतींमुळे झाला असावा, असे म्हटले आहे. एनडीटीव्हीशी बोलताना कॅप्टन मोहन रंगनाथन यांना विचारण्यात आले की, एखाद्या वैमानिकाने जाणूनबुजून फ्युएल बंद केले असावे का? कारण त्याला माहीत होते की असे केल्याने अपघात होउ शकतो. तेव्हा कॅप्टन रंगनाथन म्हणाले, अगदी नक्कीच.

### अंतिम निष्कर्ष काढू नका

**केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

एअर इंडिया विमान अपघातानंतर विमान अपघात तपास ब्युरो (AAIB) या संस्थेकडून आज प्राथमिक अहवाल जाहीर करण्यात आला आहे. या अहवालावर नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, एएआयबीने चांगला तपास केला. १२ जून रोजी अपघात झाल्यानंतर १३ जून रोजी ब्लॅक बॉक्स शोधला. ब्लॅक बॉक्समधील माहिती संकलित करणे, त्याचे विश्लेषण करणे आणि सर्व पुराव्यांचा अभ्यास करून एका महिन्यात प्राथमिक अहवाल सादर करण्यात आला आहे. हा अंतिम अहवाल नाही. त्यामुळे आज काही अधिक बोलता येणार नाही. कॉकपिटमध्ये वैमानिकांमध्ये झालेल्या संवादाबद्दल बोलताना ते म्हणाले, एका पायलटने दुस-या पायलटला म्हटले की, इंधन पुरवठा करणारा स्विच तू बंद केलास का? दुस-या पायलटने उत्तर देताना म्हटले, मी बंद केले नाही या संवादावरून कोणताही अंतिम निष्कर्ष काढला जाउ शकत नाही. शेवटी हे यंत्र आहे.

## भारतीय न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याची नितांत गरज-सरन्यायाधीश



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी एक महत्वाचं विधान केलं आहे. भारतीय न्यायव्यवस्थेसमोर मोठी आव्हाने असून न्यायव्यवस्थेत सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता असल्याचं मत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केलं आहे. सरन्यायाधीश गवई हे शनिवारी हैदराबाद येथील नालसर लॉ युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी गवई यांनी न्यायव्यवस्थेच्या स्थितीबद्दलही चिंता व्यक्त केली आहे.भारताची कायदेशीर व्यवस्था मोठ्या आव्हानांना तोंड देत आहे. त्यामुळे तिचं निराकरण करण्याचं अत्यंत गरजेचं आहे. यामध्ये दशकांपर्यंत चालणा-या खटल्यांचा देखील समावेश आहे. आता मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की आपल्या न्यायव्यवस्थेत सुधारणांची नितांत आवश्यकता आहे. पण तरीही मी भविष्याबद्दल आशावादी आहे की माझे सहकारी नागरिक आव्हानांना तोंड देतील आणि सुधारणा घडवून आणतील, असं सरन्यायाधीश भूषण गवई यांनी म्हटलं आहे. काही खटल्यांमध्ये विलंब होउन ते कधीकधी दशकांपर्यंत चालतात. आपण अशा प्रकारचे काही प्रकरण पाहिलेले आहे की जिथे एखाद्या व्यक्तीने वर्षानुवर्षे तुरुंगात कैदी म्हणून घालवल्यानंतर त्याला निर्दोष ठरवण्यात आलेलं आहे, असं सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले आहेत. तसेच भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी येणा-या पिढीवर त्यांनी विश्वासही व्यक्त केला आहे. दरम्यान, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबावर आर्थिक भार टाकण्याऐवजी शिष्यवृत्तीवर विदेशात पुढील शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केलं. आई-वडिलांवर अवलंबून न राहता स्कॉलरशिपच्या माध्यमातून शिक्षण घेण्याचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच यावेळी त्यांनी कायदेतज्ज्ञांना प्रभावाच्या आधारावर नव्हे तर प्रामाणिकपणाच्या आधारावर मार्गदर्शक निवडण्याचं आवाहन केलं. या दीक्षांत समारंभाला तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश पीएस नरसिंहा आणि तेलंगणा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सुजॉय पॉल यांच्यासह आदी दिग्गज उपस्थित होते.

### बौद्ध मठावर हवाई हल्ला; 23 जण ठार

***सागाइंग /वृत्तसंस्था***-म्यानमारच्या सागाइंग भागातील एका मठावर लष्कराकडून हवाई हल्ला करण्यात आला. यात कमीत कमी २३ लोकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये ४ लहान बालकांचाही समावेश आहे. हा हल्ला लिं ता लू गावात झाला. हे ठिकाण मंडाले शहरापासून ३५ किलोमीटर अंतरावर आहे, जे लष्करविरोधी कारवायांचा बालेकिल्ला मानले जाते. म्यानमारमध्ये सध्या लष्कराची राजवट आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये आंग सान सू की यांच्या लोकशाही सरकारला हटवून लष्कराने सत्ता हातात घेतली होती. त्यामुळे देशात लोकशाही समर्थक आणि लष्कर समर्थक यांच्यात संघर्ष सुरु आहे.

### जयंत पाटील यांचा 'राष्ट्रवादी'च्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा





दिला आहे. त्यांनी पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची मागणी काही दिवसांपूर्वी केली होती. तसेच ही जबाबदारी नव्या तरुण चेह-याकडे देण्याची विनंती त्यांनी केली होती. दरम्यान प्रदेशाध्यक्ष पदावर शशिकांत शिंदे यांची निवड होणार आहे. ते मंगळवारी (दि. १५) पदाची सूत्रे स्वीकारणार असल्याची माहिती समोर आली आहे.जयंत पाटील पक्षातील मोठे नेते होते. ते सांगलीच्या वाळवा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने सलग निवडून येत आहेत. शरद पवारांचे ते अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय मानले जातात. शरद पवारांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यावेळी पहिल्यांदा राजीनामा मागे घेण्याची विनंती पाटील यांनी केली होती. तुमच्या नावावर केवळ आम्ही राजकारण करत आलो आहोत,असे सांगताना पाटील भावूक झाले होते. दरम्यान, ते काही दिवसांपासून पक्षात नाराज असल्याच्या चर्चा समोर येत होत्या. त्यांनी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्तकरण्याची मागणी केली होती.



### इगा स्वियातेक विम्बल्डनची नवी सम्राज्ञी!

■ *तिने अमांडा अनिसिमोव्हाला रडवले!*

■ ***1988 नंतर पहिल्यांदाच असे घडले***

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऑल इंग्लंड क्लबच्या ग्रास कोर्टवर रंगलेल्या विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात इगा स्वियातेक हिने अमांडा अनिसिमोव्हा हिला ६-०, ६-० अशा फरकाने पराभूत करत विम्बल्डनचे पहिले वहिले जेतेपद पटकावले आहे. या जेतेपदासह इगा स्वियातेक ही विम्बल्डन स्पर्धा जिंकणारी पोलंडची पहिली महिला टेनिसपटू ठरलीये. ग्रँडस्लॅमच्या आतापर्यंतच्या इतिहासात दुस-यांदा महिला एकेरीतील फायनलची लढत सर्वात कमी वेळेसह ६-०, ६-० अशा स्कोअर लाइनसह संपली. याआधी १९८८ मध्ये फ्रेंच ओपन स्पर्धेत स्टेफी ग्राफ हिने नताशा झ्वेरेव्हा हिला अशा फरकाने पराभूत केले होते. ३४ मिनिटांत सामन्याचा निकाल लागला होता. विम्बल्डनमध्ये अमेरिकन अमांडा हिच्यावर लाजिरवाण्या पराभवाची नामुष्की ओढावली. सलग दोन सेटमध्ये हतबल ठरल्यावर कोर्टवर मॅच खेळतानाच अमांडा अनिसिमोव्हाला अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. मॅचनंतरही ती ढसाढसा रडल्याचे पाहायला मिळाले.

### बंगालच्या उपसागरातून चक्रीवादळ पुढे सरकले

**नागपूर/प्रतिनिधी :** भारतात यंदा पूर्व मोसमी पावसापासून तर मोसमी पावसापर्यंत एकूणच पद्धती खूपच बदललेली आहे. त्यामुळे पावसाचा नेमका अंदाज घेणे कठीण होत आहे. महाराष्ट्रात आणि विशेषकरुन विदर्भात या आठवड्याच्या



सुरुवातीला तब्बल चार दिवस पावसाने कहर केला आणि पुरसदृश्य स्थिती निर्माण झाली. पूर्व आणि पश्चिम राज्यांमध्ये तर सातत्याने पाउस सुरू आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरातून येणारे चक्रीवादळ महाराष्ट्रात पोहचत असून पावसाचा जोर वाढण्याचे संकेत आहेत. (पान २ वर)

## 75 वर्षांचा नियम RSSला लागू करायचा असेल, म्हणून भागवत तसे म्हणाले असतील-शंकराचार्य

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग येत असून, दुसरीकडे बिहार निवडणुका आणि अन्य मुद्द्यांवरून राष्ट्रीय पातळीवरील राजकीय वातावरण तापताना पाहायला मिळत आहे. पंतप्रधान मोदी यांनी ७५ व्या वर्षी निवृत्त होण्यावरून काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष भाजपावर टीका करत आहेत. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाणा साधत आहेत. एका कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक यांनी सांगितलेल्या एका आठवणीचा संबंध पंतप्रधान मोदी यांच्या निवृत्तीशी जोडला जात आहे. यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, याबाबत शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी वेगळेच मत मांडले आहे. चातुर्मास सुरू झाला असून, या निमित्ताने शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती मुंबईत आहेत. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती



म्हणाले की, काँग्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीच स्वप्ने पडतात. काही झाले तरी पंतप्रधान नरेंद्र मोदीच दिसतात. मोहन भागवत हेही ७५ वर्षांचे होत आहेत. कदाचित मोहन भागवत स्वतः विषयीच बोलत असतील. आता त्यांनाही शांततेने जीवन जगावेसे वाटत असेल. आत्मचिंतन करावेसे वाटत असेल. मोहन भागवत बोलले, याचा संबंध पंतप्रधान मोदी यांच्याशी का जोडला जात आहे. ७५ वर्षांचा नियम भाजपाने पक्षांतर्गत बाबतीत ठरवला आहे, आता तो नियम राष्ट्रीय स्वयंसेवक संघात मोहन भागवत यांना लागू करायचा असेल. असा विचार का करत नाही. प्रत्येक गोष्टीत पंतप्रधान मोदी यांच्याशी जोडायची गरज नाही. मोहन भागवत यांनी पंतप्रधान मोदी यांचे नाव घेतले नाही, तरी तुम्ही संबंध का जोडत आहात, असा सवाल शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केला आहे.

**जुने लोक खुर्च्या सोडतील, तेव्हाच नवीन चेह-यांना संधी मिळेल**

मोहन भागवत यांचा असा विचार असू शकतो की, ७५ वर्षांचा नियम चांगला आहे. भाजपाने सुरू केला आहे. आता आपण हा नियम राष्ट्रीय स्वयंसेवक संघात लागू करावा. संघातही नवीन (पान २ वर)

## शिक्षण क्षेत्रात 'मालपाणी'शिवाय काहीच होत नाही; नितीन गडकरी स्पष्टच बोलले

**नागपूर/प्रतिनिधी :** शिक्षण विभागात भ्रष्टाचार पसरला आहे, अधिकारी मालपाणी (पैसे) मागतात आणि नंतर तुरुंगात जातात, असे परखत मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.नागपूर सहोदया स्कूल कॉम्प्लेक्स या संस्थेतर्फे बेसा येथील पलोटी स्कूलमध्ये शनिवारी आयोजित प्रादेशिक प्राचार्य परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी फादर जोसेफ, संस्थेच्या अध्यक्ष भारती बिजवे, सचिव वंदना बिसेन, दि साउथ पब्लिक स्कूलच्या प्राचार्य मृणालिनी दस्तुरे उपस्थित होत्या. गडकरी पुढे म्हणाले, शिक्षण विभागात शिक्षकांच्या नियुक्तीसाठी लाच द्यावी लागते. शिक्षण विभागाचे अधिकारी जे काही करतात ते मला माहिती आहे. प्रथम ते पैसे मागतात आणि नंतर तेच अधिकारी तुरुंगात जातात. लोक मला अनेकदा विचारतात की इतक्या




भ्रष्ट व्यवस्थेत रस्ते कसे बांधले जातात? तेव्हा सांगतो की काही लोक समस्यांना संधींमध्ये बदलतात आणि काही लोक संधींना समस्यांमध्ये बदलतात. अधिका-यांना जबाबदा-यांची जाणीव करण्याच्या मुद्यावर गडकरी म्हणाले, जेव्हा तुम्हाला नोकरी मिळते तेव्हा तुमची परीक्षा असते. मी विचारतो की, तुम्ही गाढवाला घोडा बनवू शकता की नाही? असे म्हणू नका की हे गाढव आहे, ते सुधारता येत नाही. ते सुधारता येत नाही, म्हणूनच तर तुम्हाला बोलावण्यात आले आहे. प्राचार्यपद म्हणजे नेतृत्वाची परीक्षा आहे. उत्तम शिक्षण देणारे शिक्षक आपल्या संस्थेत असावेत आणि सामूहिक प्रयत्नांतून उत्तम विद्यार्थी घडावेत, ही जबाबदारी प्राचार्यांवर असते. चांगली पिढी घडविण्यासाठी शिक्षण हे सर्वोत्तम साधन आहे. त्यामुळे आज शिक्षणावर होत (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# 'सरकार ची कलम शेतकरी हितासाठी चालली नाही, तर आम्हाला तलवार चालवावी लागेल!'





यवतमाळ/प्रतिनिधीः-

राज्य सरकारच्या बेपर्वा आणि शेतकरीद्रोही धोरणांना कंटाळून बच्चू कडू यांनी 'तुमची कलम (लेखणी) जर शेतकऱ्यांच्या हितासाठी चालली नाही, तर आम्हाला तलवार चालवावी लागेल' असा थेट आणि संतप्त इशारा दिला आहे. वसंत नगर येथे सभा पार पडली.

त्यांच्या 'सातबारा कोरा कोरा' यात्रेला आता 'छावा संघटने'चा ठाम, जाहीर आणि लढाऊ पाठिंबा मिळाला असून, या आंदोलनाला नवसंजीवनी मिळाली आहे.

**'शासन झोपलंय, आम्ही उठलोय!'** - शेतकरी मरतोय, हमीभाव नाही, सातबारा कर्जमुक्त नाही, दिव्यांग, मेंढपाळ, मच्छीमार उपेक्षितच. सत्ताधाऱ्यांच्या लेखण्या केवळ कागदावरून धावत आहेत, जमिनीवर नव्हे. 'शासनाच्या लेखणीला जर शेतकऱ्याच्या अश्रूंशी काही देणं-घेणं नसेल,तर आम्हालाही आता तलवार चालवण्याची वेळ येईल!'असे ते म्हणाले.

**छावा संघटनेचा ठाम निर्धार-** छावा संघटनेनेही स्पष्ट शब्दांत पाठिंबा जाहीर करत म्हटलं कि, 'हे केवळ आंदोलन नाही, ही अस्मितेची लढाई आहे! सरकारला जर शेतकऱ्यांचा वेदना ऐकू येत नसेल, तर आम्ही त्यांच्या दारात आवाज घुमवू!'

**अंबोडा होणार निर्णायक रणभूमी-** राज्यातील शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार आणि वंचित घटक १४ जुलैला अंबोडा येथे एकवटणार आहेत. अंबोड्याची सभा ही केवळ घोषणा नव्हे, तर संघर्षाची सुरुवात आणि शेतकऱ्यांच्या न्यायासाठीचा अंतिम हुंकार ठरणार आहे.

'लेखण्या थांबल्या, तर तलवारी उठतात!' – ही वेळ आता दूर नाही. शासनाने जर वेळीच जागं होऊन निर्णय घेतले नाहीत, तर रस्त्यावरच उत्तर दिलं जाईल!'असेही सांगण्यात आले.



शेतकरी रुमणे घेऊन हजर आहेत.आता शेतकरी लुटीच्या हिशोब घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, अशा भूमिकेत आहेत.

# बच्चू कडूंचा थेट इशारा; छावा संघटनेचा 'सातबारा कोरा कोरा' यात्रेला जाहीर पाठिंबा

## 'मरता येत नाही म्हणून जगतोय!'



## - अंबोड्यात संतप्त शेतकऱ्यांचा एल्गार
## - बच्चू कडूंच्या हाकेला प्रचंड प्रतिसाद

यवतमाळ/प्रतिनिधीः-

राज्य शासनाच्या शेतकरीद्रोही धोरणांना कंटाळून, 'सातबारा कोरा कोरा' यात्रेच्या निमित्ताने बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी आता लाठीकाठ्यांसह अंबोड्यावर धडकणार आहेत.

'मरता येत नाही म्हणून जगतोय' – ही व्यथा आता आरोळी झाली आहे! सातबारा कोरा झाला नाही, शेतमालाला हमीभाव नाही, आत्महत्या थांबत नाहीत आता पुरे! आता हिशोब मागायचाच!

शासन फक्त आश्वासन देतं, सातबारा कोरा कधी होणार? मेंढपाळांच्या किती पिढ्या रानावनात गारद होणार? मच्छीमार बांधवांना न्याय कधी मिळणार? दिव्यांगांना दिलेला शब्द कधी पाळणार? सहा हजारांचा पगार कधी सुरू होणार? हे प्रश्न रस्त्यावर उतरले आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग बांधव अंबोडा गाठत आहेत. राग आहे, तळमळ आहे, पण आता कृतीसाठी स्फोटक निर्धार आहे!

**बच्चू कडू यांचं थेट आव्हान** – 'शेतकऱ्यांनो आणि शेतमजुरांनो, फसवणुकीचा हिशोब घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने अंबोड्यावर या! सरकारला आता झोपेतून उठवायचं आहे!' अंबोड्याची सभा निर्णायक आहे. ही सभा केवळ संतापाची अभिव्यक्ती नाही, ही भविष्याची नांदी ठरणार आहे. या आंदोलनाच्या रुपाने शेतकऱ्यांचा आवाज केवळ विदर्भ नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र हादरवणार आहे! ? हा लढा आपल्या हक्काचा आहे, मुला बाळांच्या भविष्याचा आहे. आपल्या फसवणुकीचा हिशोब मागायला लाठ्या-काठ्या आणि रुमणे घेऊन या!

## १ व १० वरिल उर्वरित

### क्षुल्लक वादातून मित्राचा चाकूने

यांच्यात बाचाबाची झाली. दरम्यान बंटी पवार याने आपल्या खिशातून चाकू काढून तो शिवा फुलवानी याच्या हातात दिला आणि शिवा फुलवानी याने राजकुमार सुंदरानी यांच्या मांडीवर चाकूने वार केले आणि दोघेही दुचाकी वाहनाने तेथून पळून गेले. प्रचंड रक्तस्त्राव झाल्यामुळे राजकुमार सुंदरानी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती काही नागरिकांनी नांदगाव पेठ पोलिसांना दिली. नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहचले. त्याठिकाणी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला राजकुमार सुंदरानी यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केला.याबाबत कुटुंबियांना माहिती देण्यात आली. नतर राजकुमार सुंदरानी यांचे मोठे बंधू प्रकाश सुंदरानी यांनी बार समोरील सीसीटीव्ही फुटेज बघून नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींचा कसून शोध सुरू आहे.

### दारुची वाहतूक करणाऱ्या

अपघाताची नोंद घेण्यात आली आहे.अपघात घडल्यानंतर वाहनामधील विदेशी दारु साठा नष्ट झाला तर इतर मुद्देमाल हा घटनास्थळावरुन ग्रामस्थांनी लुटला. सावंगी पोलिसांनी मृतकासह तिघांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सावंगी पोलीस करीत आहे.

### शहरात रात्रभर पोलिसांचे

धाड टाकली. यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. २० पेक्षा अधिक ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त गणेश शिंदे यांनी रात्रभर ऑन रोड राहून कार्यवाही केली. माहितीनुसार पोलीस आयुक्त अरविंद चौधरी यांनी शहरातील गुन्हेगार, अवैध दारू आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर वचक निर्माण करण्याचे उद्देशाने शुक्रवारी सायंकाळी अचानक कॉबिंक ऑपरेशन चालविण्याचे आदेश दिले. सर्व पोलिस ठाणे क्षेत्रात हे अभियान चालविण्यात आले. राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत दोन प्रोहीबिशन, नागपूरी गेट पोलीस ठाणे हद्दीत शस्त्र अधिनियम अन्वये एक-एक, कोतवाली प्रोहीबिशन एक, शस्त्र अधिनियम एक-एक, बडनेरा मध्ये पोलीस कायद्याचे एक, नांदगाव पेठ मध्ये कलम ३१० अंतर्गत ६ आरोपींना पकडण्यात आले. गुन्हे शाखा युनिट एकने शस्त्र अधिनियम,प्रोहीबिशन आणि जुगार ॲक्टनुसार एक-एक कारवाई केली. गुन्हे शाखा युनिट दोन ने प्रोहीबिशन ३, वाहतूक शाखा गाडगे नगर आणि फ्रेजरपुरा येथे ड्रंक अँड ड्राईव्ह चे पाच प्रकरण दाखल करून २ आरोपींना पकडण्यात आले. गृह विभागाच्या निर्देशानुसार अचानक कॉबिंग ऑपरेशन चालविण्यात आले. यामुळे खळबळ उडाली होती.

### पिसाळलेल्या माकडाच्या हल्ल्यात

गर्दी जमा झाली होती. या घटने संदर्भात वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. सदर रेस्क्यू पथकाला जखमी अवस्थेत असलेल्या पिल्ल्याला नेण्यासाठी वारंवार संपर्क साधला असता त्यांनी येण्यास टाळाटाळ केली. या नंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना या घटनेसंदर्भात माहिती मिळताच त्यांनी तात्काळ जलद गतीने या घटने संदर्भात चक्र फिरवले.त्यावेळी रेस्क्यू पथकाचे अधिकारी आले आणि जखमी झालेल्या पिल्लू पुढील उपचारा करता ताब्यात घेतले.मृत्युमुखी पडलेल्या मादी माकडावर अंतिम संस्कार पार पडला.यावेळी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी वर्षा हरणे, रेस्क्यू टीमचे अधिकारी मंगेश धंदर, वनरक्षक फिरोज खान ,तालुक्यातील वनरक्षक वाहने, वैशाली , राठोड वनमजूर, विलास पंडित, पोलीस पाटील, सरपंच मोहम्मद रिजवान यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. .

### ऑटोमधून बॅटऱ्या चोरून

घेऊन वाहन सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र दोन्ही वाहन सुरू न झाल्याने त्यांनी चावरे यांना बोलावले. वाहनांची तपासणी केल्यानंतर समजले की दोन्ही ऑटोमधील बॅटऱ्या चोरीला गेल्या होत्या. राजापेठ पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, या चोरीमध्ये आकाश सोपान काळे (वय ३१, रा. नवाथे गल्ली क्र. ५) व साहिल संतोष बोरकर (वय २४, रा. दरोगा प्लॉट) या दोघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या दोन बॅटऱ्यासह ४० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, पोलिस अमलदार सागर सरदार, पवन तिवारी, पंकज यादव, दिनेश भिसे, सूरज मेश्राम, अंकुश काळे, वकील शेख व अमोल खंडेझोड यांनी परिश्रम घेतले.

### बोरनदी दरोड्यातील सहा

आली होती.याप्रकरणी फिर्यादी सिद्धांतच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलीसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(१)(२) प्रमाणे गुन्ह्याची नोंद करून गुन्ह्यातील आरोपींची ओळख पटवण्यासाठी विशेष पथक तयार केले. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, आणि सहाय्यक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच डीबी पथकाने तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला.अखेर एक महिन्यानंतर पोलिसांना घटनेतील आरोपींचा छडा लागला. यामध्ये आरोपी शारीक खान आबीद खान (वय २२, रा. फातेमा नगर, लालखडी), शेख अयान शेख नसिर (वय २०, रा. लालखडी), मोहम्मद शोएब उर्फ भल्ला मोहम्मद आरिफ (वय १९, रा. यास्मीन नगर), अयान खान आसिफ खान (वय १९, रा. यास्मीन नगर), शेख शरजील उर्फ राज शेख इरफान (वय १९, रा. यास्मीन नगर), शहर व जिल्हा ग्रामीण मधून तडीपार असलेला आरोपी शेख अरबाज शेख मुजीब (वय २२, रा. लालखडी) या सहा आरोपिंना अटक करण्यात आली. तपासादरम्यान या सर्वांनी गुन्ह्याची कबुली दिली असून या गुन्ह्यातील अन्य चार आरोपी अद्याप फरार आहेत आणि त्यांचा शोध सुरू आहे. सदर कारवाईमध्ये ठाणेदार दहातोंडे यांच्यासह पोउपनि वाणी, वाकडे, पोहेकाँ राजा राऊत, पोशि राजीक खान, निलेश साविकार, वैभव तिखीले, राजा सय्यद, संजय नेहारे, चालक पोका वैभव धुरंदर यांनी परिश्रम घेतले.पोलिसांनी केलेल्या या मोठ्या कारवाईने गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण झाली असून बोरनदी परिसरात मॉर्निंग,इविनिंग वॉक करणाऱ्या नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच करवाईमधील पोलीस कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अखेर मालखेड रेल्वे येथील

त्यांची कानउघाडणी केली. सदर अंडरब्रिजमधील साचलेले पाणी काढण्याबाबत तातडीने उपाययोजना करून रेल्वे गेट सुरु करणेबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच कोणतीही कार्यवाही न झाल्यास दि. १३ जुलै २०२५ रोजी रेल्वे रुळावर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

त्या अनुषंगाने दि.१२ जुलै २०२५ रोजी सुशांत कुमार डिव्हिजनल इंजिनियर , नागपूर रजनीश कुमार , सहायक डिव्हिजनल इंजिनियर वर्धा, अनिल महाजन सिनियर सेक्शन इंजिनियर , वर्धा , श्री दीपक राऊत एसएससी ट्रॅक चांदुर रेल्वे या रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी खा.बळवंत वानखडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात पार्डी , वडगाव जिरे , मालखेड येथील नागरिकांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. सदर बैठकीत अंडरब्रिज खालील पाणी ४ पंप लावून तात्काळ काढ़ण्याबाबत कार्यवाही सुरु करणार असून रेल्वे प्रशासनाचे ४ कर्मचारी २४ तास अंडरब्रिजवर नागरिकांच्या सोयीसाठी हजर राहणार आहेत. तसेच अशा आपत्कालीन स्थितीसाठी मालखेड येथील रेल्वे गेट उघडण्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव पाठवून याबाबत कार्यवाही करणार असून याच रेल्वेगेट वर रेल्वे ओव्हर ब्रिज बांधकामाचा देखील प्रस्ताव सादर करणार असल्याचे रेल्वे विभागाच्या अधिका-यांनी सांगितले.

या बैठकीस शैलेश गवई महासचिव जि. काँग्रेस कमेटी , अमरावती गिरीश चौधरी (संस्थापक जाणता युवा संघटना), नबी इंधलेकर माजी सरपंच इंधला व जिल्हाध्यक्ष सरपंच संघटना, रक्षणा सरदार ग्रामपंचायत सदस्य,संजय नितनवरे सरपंच भानखेडा खुर्द, ब्राह्मणे सरपंच वडगाव जिरे, चदणे,ग्रामपंचायत सदस्य , राजू पिसे माजी सदस्य पारडी, पारडी गावातील १ ते १२ पर्यंतचे सर्व विद्यार्थी, गावकरी मंडळी,शेतकरी, शेतमजूर आदि प्रमाणात उपस्थित होते.

### जन्म-मृत्यू दाखल्यांचे वितरण

किरीट सोमय्या यांनी अंजनगाव सुर्जी तहसीलमध्ये बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना बनावट जन्म व मृत्यू दाखले दिल्याचा आरोप केला होता. त्यानंतर तत्कालीक जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने तपास समिती स्थापन करण्यात आली होती. तपासादरम्यान जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांतील दाखल्यांची सखोल चौकशी करण्यात आली. या चौकशीत कोणत्याही विदेशी नागरिकाला अशा प्रकारचा दाखला देण्यात आल्याचे आढळून आले नाही. त्यानंतर सर्व तहसीलदारांनी शासनाकडे याबाबत लेखी अहवाल सादर केला होता. तरीही, खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने जन्म व मृत्यू दाखल्यांच्या वितरणावर तात्पुरती स्थगिती आणली होती. यामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिक, विशेषतः विद्यार्थी, यांना शिक्षण व इतर आवश्यक कामांसाठी दाखल्यांची गरज असतानाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

आता महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबईच्या आदेशानुसार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी करण्यात आलेला स्थगन आदेश रद्द करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, सर्व तहसीलदार व संबंधित अधिकारी यांनी शासनाच्या नियमांचे पालन करून सखोल तपासणी केल्यानंतर दाखले जारी करावेत. तसेच यासंबंधी केलेल्या कारवाईचा अहवाल तात्काळ सादर करावा.

या निर्णयामुळे अचलपूर, परतवाडा, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणीसह अमरावती जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### अपुऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे

त्यामुळे गुणवत्ता घसरते.रिक्त जागा तात्काळ भराव्यात.नवीन पदे निर्माण करावीत.गुणवत्ता टिकवण्यासाठी कंत्राटी शिक्षकांऐवजी कायम शिक्षक नियुक्त करावेत. तसेच शाळांतील लिपिक, वरिष्ठ लिपिक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक आणि शिपाई, यांचीही संख्या अपुरी असल्यामुळे शाळेच्या दैनंदिन व्यवस्थापनात अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांना वेळेवर शैक्षणिक सुविधा, स्वच्छता व इतर सुविधा मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

पालकांनी याबाबत शाळा प्रशासन व शिक्षण विभागाकडे वेळोवेळी तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कुठलीच ठोस कारवाई झाली नसल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे शाळांमध्ये रिक्त पदे तात्काळ भरून विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

### अमरावती महानगरपालिका

आहे. ज्यांचे नाव अंतिम मतदार सूची मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे, त्यानुसार या निवडणुकीमध्ये अमरावती महानगरपालिका क्षेत्रातून ६ लाख ८० हजार मतदार आपल्या मताधिकाराचा वापर करणार आहे. मनपा क्षेत्रातील २२ प्रभागांमधून उभे असणाऱ्या उमेदवारांमधून ८७ नगरसेवक निवडून येणार आहे. ७०० मतदान केंद्रांवर वोटिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. १५० वोटिंग मशीन लागणार आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये अमरावती क्षेत्रामध्ये एकूण ६ लाख ६० हजार मतदार नोंदणीकृत होते. या मतदारांनी आपले नाव मतदार यादी मध्ये नोंदणीकृत केले आहे. गेल्या सात आठ महिन्यादरम्यान मनपा क्षेत्रात २० हजार नवीन मतदार वाढले आहे. त्यानुसार या निवडणुकी मध्ये १ जुलै २०२५ पर्यंतची मतदार यादी अपडेट करण्याचे निर्देश व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मध्ये देण्यात आले. तसेच या ऑनलाईन बैठकीमध्ये वर्ष २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये ५ लाख ४० हजार मतदार होते.त्यावेळी ६३५ डायरेक्ट युनिट लावण्यात आले होते. या निवडणुकीत ६ लाख ८० हजारांच्या जवळपास मतदार आहे. एका ईव्हीएम वर ८०० मतदार आपले कर्तव्य वाजवू शकतात. यामुळे ८५० इलेक्ट्रिक वोटिंग मशीन लागणार आहे. निवडणूक आयोगाने मतदार यादी अपडेट करण्याच्या सोबतच मतदान केंद्रांवर आवश्यक ईव्हीएम मशीन संख्येची तपासणी करून काम सुरू करण्याचे सांगीतले आहे. निवडणुकीच्या दृष्टीने इमारत व अन्य गोष्टीकडे लक्ष देऊन कार्य करा. मनुष्यबळाची कमतरता भासणार नाही यासाठी वेळोवेळी आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीमध्ये मनपायुक्त सौम्य शर्मा यांच्या सोबत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, श्वेता वासनकर, निवडणूक विभागाचे अक्षय निलंगे उपस्थित होते.

### लोतवाडा-मुंडगाव मार्गावर

रस्त्यावर टाकली तर काही शेतकऱ्यांनी बल्ल्या उभ्या करूण दोरी बांधून रस्त्यावर मोठमोठे बाभूळीचे काटे टाकले. ते काटे जर चिखलात मिसळून शेतकरी किंवा शेतमजूर यांना पायात रुतले तर संपूर्ण पावसाळा भर घरीच बसावे लागेल. प्रसंगी वाद होऊन अनुचित प्रकार घडू शकतो. तहसिलदार यांनी या रस्त्याची मोजणी करून हा रस्ता जेवढा फुट रुंदी असेल तेवढेच शेतकऱ्यांनी रस्त्यावर केलेले काट्यांचे व पिकाचे अतिक्रमण काढून लोतवाडा येथील शेतकरी व शेतमजूर यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

### जिल्ह्यातील ३५० परमिट रूम व

आणि रेस्टॉरंट बंद राहणार आहे. शासनाच्या या निर्णयाचा व्यापाराला फटका बसत आहे. यामुळे राज्यातील अकराशे बार सोमवारी बंद राहणार आहे. शासनाने बारा वर्षांपूर्वी लावलेला अन्याकारक वॅट आणि त्यामध्ये केलेल्या वृद्धीमुळे पूर्वीपासूनच बार व्यवसायीक यांच्यावर संकट कोसळले आहे. आता लायसन्स नुतनीकरण वार्षिक शुल्क मध्ये १५ टक्के आणि वॅटमध्ये ५ टक्के वृद्धी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. दारूवर दीड पट वाढ करण्यात आलेली आहे. यामुळे बार व्यवसायिकांवर अन्याय होत आहे. राज्यभरात २० हजार बार आहे. यामध्ये सात लाख कर्मचारी काम करतात. किराणा, भाजीपाला, मटन, डे रिपोर्टर व इतर सप्लाय करणारे सहा लाख कुटुंब यावर अवलंबित आहे. तेरा लाख कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर निर्भर आहे. शासनाच्या नवीन निर्णयामुळे परमिट रूम बंद होण्याच्या मार्गावर पोहचले आहे. दर वाढ लवकरात लवकर रद्द करण्याच्या मागणीसाठी १४ ला बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने आमचे म्हणणे ऐकून घ्यावे व अतिशय संकटात आलेल्या व्यवसायाला सुधारण्यासाठी योग्य निर्णय घ्यावे अशी विनंती महाराष्ट्रातील सर्व असोसिएशन तर्फे करण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील सर्व बार व त्यांचे कर्मचारी सहभागी राहतील,अशी माहिती देण्यात आली.

पत्रकार परिषदेला नितीन मोहोड यांच्यासह संजय मानकर, जयंत वाकोडे, अनिल तरडेजा, मदन जयस्वाल, संजय छाबडा, दिगंबर गुल्हाने, विनोद रहाटे, सतपाल सिंग अरोरा, विनोद भगत, राजू मुले, सूर्यकांत जयस्वाल, आकाश शिरभाते, आशिष बेतारीया, रोहित खुराना, प्रशिक पाटोकार, ज्ञानेश्वर ठाकरे आदि उपस्थित होते.

### कुंभारवाडात तरुणाने घेतला

त्यानंतर आज शनिवारी १२ जुलैला सकाळी जेव्हा उमेशची वहिनी झोपेतून उठली तर तिला मूर्ती बनविण्याच्या जागी उमेश फासावर लटकताना दिसला. याची माहिती तिने तत्काळ पती सतिशला दिली. माहिती मिळताच शेजाऱ्यांच्या मदतीने त्याला खाली उतरविले. आणि पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला..

### ७५ वर्षांचा नियम RSSला लागू करायचा

तरुण मंडळी येत आहेत. तरुण मंडळींनाही जबाबदा-या मिळायला हव्यात. जुने लोक जेव्हा नवीन लोकांना संधी देतील, आपल्या खुर्च्या रिकाम्या करतील, तेव्हाच हे शक्य होईल. त्यामुळे मोहन भागवत राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठी असा काहीतरी विचार करत असतील. पुढे जाउन अशा प्रकारचा निर्णय घेउ शकतात. असाही कयास लावायला हवा. परंतु, पंतप्रधान मोदी यांच्याशी याचा संबंध का जोडला जात आहे, ही बाब समजण्यापलीकडील आहे, असे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले आहे. दरम्यान, नरेंद्र मोदी यांच्यानंतर राहुल गांधी हे पंतप्रधानपदासाठी दुसरे चेहरे आहेत, असे काँग्रेसकडून म्हटले जात आहे. यावर बोलताना शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले की, काँग्रेस पक्षाकडून राहुल गांधी यांचा चेहरा एक पर्याय म्हणून पुढे केला जात असेल, तर यापेक्षा चुकीचे दुसरे काही असू शकत नाही. पक्ष आपल्या नेत्याला दुस-या स्थानी ठेवत आहे. प्रत्येक पक्ष आपल्या नेत्याला क्रमांक एकवर ठेवत असतो. काँग्रेस पक्षाची वैचारिक दिवाळखोरी यावरूनच दिसून येते, असा खोचक टोला शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी लगावला.

### शिक्षण क्षेत्रात 'मालपाणी'शिवाय काहीच

असलेली गुंतवणूक भविष्यातील भारत घडविण्यासाठी आहे. आज तुम्ही काय शिकवणार त्यावर सारे काही अवलंबून आहे. कुठल्याही क्षेत्रात नेमके कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे. पण ते एका दिवसातील काम नाही. ती एक प्रक्रिया आहे. चांगले कौशल्य आणि गुणवत्तेवर कुणाचे स्वामित्व हक्क नाही. जीवनमूल्य बाजारात विकत मिळत नाहीत. त्यामुळे उद्याचा सुसंस्कृत माणूस घडविण्यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर द्यावा लागेल. प्रामाणिकपणा, विश्वासार्हता, सहकार्य, समन्वय आणि गुणवत्ता या सूत्रांचा अवलंब देखील तेवढाच महत्त्वाचा आहे.

### बंगालच्या उपसागरातून चक्रीवादळ

अनेक राज्यांमध्ये सतत पाउस पडत आहे. बंगालच्या उपसागरातून निर्माण होणारे चक्रवाती वातावरण झारखंड छत्तीसगड मार्गे महाराष्ट्रात पोहोचत असून, त्यामुळे आज, शनिवारी, देशभरातच मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्याचवेळी अरबी समुद्रातून ६५ किलोमीटर वेगाने वारे येत आहेत. त्यामुळे एकत्रितपणे एक हंगामी प्रणाली तयार होत आहे. पश्चिम बंगालच्या विस्तीर्ण गंगेच्या मैदानावर कमी दाबाचे क्षेत्र आहे, जे झारखंड आणि दक्षिण छत्तीसगडकडे जाईल. त्यानंतर, येत्या २४ तासांत, ही प्रणाली पश्चिमेकडे सरकेल आणि मध्य प्रदेशात पोहोचेल. या काळात, या राज्यांमध्ये मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. या प्रणालीशी संबंधित चक्रवाती परिस्थिती पश्चिम बंगाल, झारखंड आणि आसपासच्या भागात पसरली आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ रविवार, १३ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# ऑपरेशन प्रहार : ३० जूनपर्यंत पन्नास लाखांच्या वर मुद्देमाल जप्त

## एसपी चांडक यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यावर कारवायांचा सपाटा

■ समीर ठाकूर ■

**अकोला : गत जून महिन्यात जिल्हा पोलिस अधीक्षक पदाची सूत्रे हाती घेताच एसपी अर्चित चांडक यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे शटर बंद करण्यासाठी राबविलेल्या ऑपरेशन प्रहार या मोहिमेत जिल्हा पोलिस दलाने ३० जून पर्यंत २९६ केसेस करीत तब्बल ५० लाखांच्या वर मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई केली आहे. परिणामी एसपी चांडक यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलिस दलाने अवैध धंद्यावर कारवायांचा सपाटा लावला असून अनेक धंद्याचे शटर बंद केले आहे.**





मागील काही महिन्यांपासून अवैध धंदेवाईकानी मोठ्या प्रमाणात आपले बस्तान मांडले होते. अनेक वर्दळीच्या ठिकाणी खुलेआम सुरू असलेल्या या अवैध धंद्यांवर पोलिसांचे कुठल्याही प्रकारचे नियंत्रण असल्याचे दिसून येत होते. मात्र जून महिन्यात जिल्हा पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे हाती घेताच एसपी अर्चित चांडक यांनी क्राइम मीटिंग घेत जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत जिल्ह्यात सुरू असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्याचे निर्देश यावेळी सर्वच पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना दिले. तर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचा नायनाट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार या नावाने मोहीम सुरू केली. त्या मोहिमे अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या अनेक अवैध धंद्यावर कारवायांचा सपाटा लावण्यात आला. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्या इसमांवर, जुगार खेळणाऱ्यांवर, अवैध दारू प्रकरणी, NDPS कायद्या अंतर्गत, अवैध शस्त्र बाळगणे, EC ॲक्ट अंतर्गत विविध कारवाया करीत केसेस करण्यात आल्या. या कारवाईत तब्बल ५० लाखांच्या घरात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदरच्या कारवाया या ३० जून पर्यंत करण्यात आलेल्या आहेत. या कारवाया प्रभावी आणि परिणाम कारक सुद्धा ठरल्या असून अनेक ठिकाणी सुरू असलेले लहान - मोठे अवैध यामुळे कुलूप बंद झाले आहे. तर या कारवायांमुळे सार्वजनिक ठिकाणी असुरक्षित भावनेने वावरणारे नागरिकांनी सुद्धा मोकळा श्वास घेतला आहे. आगामी काळात सुद्धा ऑपरेशन प्रहार अंतर्गत कारवाया निरंतर सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### विशेष नाकाबंदी मोहीम

जिल्ह्यात दर आठवड्याला प्रमुख पॉईंट वर विशेष नाकाबंदी मोहीम राबविण्यात येत असून यामध्ये अनेक बेशिस्त वाहन चालक, दारूची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर तसेच मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाया करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी बेशिस्त वाहन चालकांकडून मोठ्या प्रमाणात दंड वसुलण्यात सुद्धा पोलिस प्रशासनाला यश मिळाले आहे.

✦ अकोला पोलीसांकडून 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विविध कारवाया!
✦ जुगार प्रकरणी १४३ केसेस एकूण १८.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त !
✦ अवैध दारू प्रकरणी १२१ केसेस एकूण ७.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त!
✦ NDPS कायद्यांतर्गत ६ गुन्हे दाखल! १२.९४ लाखांचा मुद्देमाल जप्त!
✦ अवैध शस्त्र प्रकरणी २२ गुन्हे दाखल ४२.४ हजारांचा मुद्देमाल जप्त!
✦ EC कायद्यांतर्गत ४ केसेस २.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त!

### तक्रारदारांना सन्मानाची वागणूक

एसपी अर्चित चांडक यांनी पदभार घेतल्यापासून त्यांच्याकडे विविध प्रकारच्या समस्या घेऊन अनेक नागरिक येत आहेत. या समस्यांना मार्गी लावत सोबतच तक्रारदारांना सन्मानाची वागणूक एसपी अर्चित चांडक यांच्याकडून मिळत असल्याची अनेक तक्रारदार व्यक्त करीत असून एसपी चांडक यांच्या कार्यपद्धतीवर अनेक जणांनी समाधान व्यक्त केले आहे.

# अकोटसाठी बायपास रस्त्याच्या प्रस्तावाला तात्विक मान्यता

## खा. अनुप धोत्रे यांनी ना. गडकरी यांचे मानले आभार



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोट शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग 161A ला NH 204 शी जोडणारा बायपास रस्ता प्रस्तावित करण्याची विनंती खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. या विनंतीला तात्विक मान्यता देत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश ना. गडकरी यांनी दिले आहेत. या निर्णयाबद्दल खा. अनुप धोत्रे यांनी ना. गडकरी यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत.अकोला-अकोट-बैतूल कॉरिडॉर (NH 161A) हा आंतर-जिल्हा व आंतर-राज्य महत्त्वाचा दळणवळण मार्ग असून यावरील वाहतुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या या महामार्गामुळे अकोट शहरातील अंतर्गत रस्त्यांवर मोठा ताण निर्माण होत असून त्यामुळे अपघातांची शक्यता व नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेऊन खा. धोत्रे यांनी आपले सहकारी आमदार प्रकाश भारसाकळे आणि अकोटकरांची मागणी लक्षात घेऊन अकोट शहराच्या बाहेरून NH204 शी जोडणाऱ्या बायपास रस्त्याचा प्रस्ताव सादर केला होता. या मार्गामुळे मध्यप्रदेश, अकोट, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि मराठवाडा यांना थेट दळणवळण सुविधा प्राप्त होणार आहे. खा. अनुप धोत्रे यांनी सांगितले की, 'हा प्रस्ताव केवळ वाहतूक सोयीपुरता मर्यादित नसून, या बायपास मार्गामुळे प्रादेशिक विकासाला गती मिळणार आहे. भविष्यातील पायाभूत सुविधा, औद्योगिक व व्यापारी संधी यासाठी देखील ही जोडणी महत्त्वाची ठरेल.' या निर्णयामुळे अकोट शहरातील वाहतुकीचा ताण कमी होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी लवकरच सुरु होईल आणि दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, असा विश्वास खा. धोत्रे यांनी व्यक्त केला.

# अतिक्रमित घरकुल लाभार्थी वाऱ्यावर; गावठाण हद्दीतील विहीर खाजगी सातबारावर!

## ग्राम पंचायत आणि महसूल विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष; अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा लढा उभारण्याचा इशारा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आजही हजारो गोरगरीब कुटुंबे स्वतःची अधिकृत जागा नसल्यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण क्षेत्रात मोडक्या-तोडक्या झोपड्यांमध्ये अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहतात. शासनाने अशा गरजू कुटुंबांना हक्काचे घर मिळावे यासाठी विविध घरकुल योजना राबविल्या आहेत. मात्र, स्वतःच्या जागेचा पुरावा नसल्याने आवश्यक असलेला ८-अ दाखला 'अतिक्रमित' म्हणून नाकारला जातो आणि परिणामी अनेकांना या योजनेपासून वंचित राहावे लागते.

दुसरीकडे, गावठाण हद्दीतील अनधिकृत विहिरी खाजगी सात-बारावर नोंदविल्या जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे अतिक्रमित घरकुल लाभार्थी वाऱ्यावर आहेत, तर अनधिकृत विहिरी खाजगी मालकी म्हणून नोंदविल्या जात आहेत, अशी तिखट प्रतिक्रिया नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

या प्रकरणी अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार निर्मूलन समितीने आवाज उठविला आहे.



समितीचे जिल्हा उपाध्यक्ष ए.के. देशमुख म्हणाले की, गावठाण हद्दीतील विहिरीची नोंद खाजगी सात-बारावर करणे हे सरळ कायद्याचे उल्लंघन आहे. अशा विहिरी ग्राम पंचायतने महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने ताब्यात घ्याव्यात, जेणेकरून त्या विहिरीची नोंद गाव नकाशा व गावठाण नकाशात होईल. परिणामी, विहिरी सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध होऊन गावकऱ्यांना पाण्याच्या टंचाईत मोठा दिलासा मिळेल.


'गावठाण हद्दीतील विहिरीची नोंद गाव नकाशा व गावठाण नकाशात असायला हवी. जर ती विहीर अतिक्रमित असेल, तर ती खाजगी सात-बारावर नोंदवणे कायदेशीर नाही. याची जबाबदारी ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्यावर आहे. मात्र, राजकारणामुळे या प्रकरणावर पांघरून घातले जात आहे. आमच्याकडे गाव नकाशा, गावठाण नकाशे आणि संबंधित सरकारी मोजणीचे पुरावे उपलब्ध आहेत. या आधारावर आम्ही जनहितासाठी न्यायलढा उभारणार आहोत.'

**ए.के. देशमुख,** जिल्हा उपाध्यक्ष, अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार निर्मूलन समिती, वाशिम.

मात्र, ग्राम पंचायत व महसूल विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या दुर्लक्षामुळे काही लोक गावठाण हद्दीत घुसखोरी करून विहिरीवर बेकायदेशीरपणे मालकी हक्क गाजवतात आणि महसूल कायद्यांना धाब्यावर बसवतात.

समितीने लवकरच या विरोधात मोठा लढा उभारण्याचा इशारा दिला आहे. तसेच, या प्रकाराबाबत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित मंडळ अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्याचे आवाहन ही केले आहे, जेणेकरून गावातील सामान्य नागरिकांना न्याय मिळू शकेल.

# विकासकामांमध्ये विलंब न करता गुणवत्तेची हमी देत जलद गतीने पूर्ण करावीत - जिल्हाधिकारी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात सुरू असलेल्या विकासकामांमध्ये अनावश्यक विलंब न होता, गुणवत्ता अबाधित ठेवत ती कामे जलद गतीने पूर्ण व्हावीत. असे निर्देश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिले. जिल्ह्यातील विविध यंत्रणांचा प्रशासकीय समन्वय व जनहिताच्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आज दि.११ जुलै रोजी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांची उपस्थिती होती.

यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, रोहयो उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर , उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) दादासाहेब दराडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुढे बोलतांना म्हणाल्या, अपूर्ण विकासकामे तात्काळ पूर्ण करावीत. पावसाळ्यापूर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबवाव्यात. महावितरण,मेडा,जिल्हा नियोजन, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जीवन प्राधिकरण, जलसंधारण विभाग, तहसीलदार, समृध्दी महामार्ग, जिल्हा शल्यचिकित्सक ,रोहयो, उपप्रादेशिक परिवहन विभाग,महाराजस्व अभियान , ई ऑफीस प्रणाली, वाशिम शहरातील नाट्य सभागृह, एमआयडीसी, पोहरादेवी विकास आराखडा,आयुष आदी विभागांशी निगडीत कामकाजाची माहिती घेत निर्देश दिले. बैठकीत प्रत्येक विभागाने चालू योजनांची सद्यस्थिती, प्रगती अहवाल, व अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सादर केल्या. त्यावर जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी सखोल चर्चा करत स्पष्ट सूचना दिल्या की, , पावसाळ्यापूर्व उपाययोजना, रोजगार हमी योजनेतील कामांची गती, शालेय शिक्षणातील दर्जा आणि आरोग्य व्यवस्थेतील कमतरता यावरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. काही योजनांत निधी वितरण, निविदा प्रक्रिया आणि प्रशासकीय मंजुरीमध्ये होणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी विविध विभाग प्रमुखांनी विविध कामकाजाची सद्यस्थिती सादर केली. काही अडचणी, निधीची मागणी, व आवश्यक सहयोग यावरही चर्चा झाली. शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधत 'जनहित हेच सर्वोच्च' या उद्देशाने काम करण्याचे आवाहन केले.

# उद्यापासून स्काऊट गाईड शिक्षकांचे दोन दिवसीय तालुका निहाय उद्बोधन वर्गाचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय वाशिम व शिक्षण विभाग जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने स्काऊट गाईड शिक्षकांचे दोन दिवसीय तालुकास्तरीय उद्बोधन वर्गाचे आयोजन प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी करण्यात आले आहे.

त्यानुसार वाशिम तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक १४ ते १५ जुलै या दरम्यान सौ. सुशीलाताई जाधव माध्यमिक विद्यालय सोनखास रोड वाशीम येथे, मालेगाव तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक १७ ते १८ जुलै या दरम्यान ना ना मुंदडा विद्यालय मालेगाव येथे, रिसोड तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक २२ ते २३ जुलै या दरम्यान, शासकीय निवासी शाळा सवड तालुका रिसोड येथे, मंगरूळपीर तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक २४ ते २५ जुलै २०२५ या दरम्यान जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय मंगरूळपीर येथे, कारंजा तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक ०५ ते ०६ ऑगस्ट या दरम्यान विद्याभारती इंग्लिश स्कूल कारंजा येथे तर मानोरा तालुक्याचे उद्बोधन वर्ग दिनांक ७ ते ८ ऑगस्ट २०२५ या दरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा विठोली ता मनोरा येथे आयोजित करण्यात आले आहे.

या तालुकास्तरीय दोन दिवसीय उद्बोधन वर्गामध्ये स्काऊट गाईड चा प्रवेश व प्रथम सोपान चा अभ्यासक्रम कृतीयुक्त पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर पथ संचालन, सेवा प्रकल्प, समुदाय विकास कार्यक्रम, सर्वधर्मीय प्रार्थना सभा, खरी कमाई सेवा महोत्सव, राज्य व राष्ट्रपती पुरस्कार इत्यादी बाबत देखील सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या उद्बोधन वर्गास मार्गदर्शक म्हणून जिल्हा संघटक के एल पवार, श्रीमती मनीषा ढोके, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट डॉ. मुरलीधर जाधव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड श्रीमती इंदिरा राणे, श्रीमती संध्या नेरकर, स्काऊट मास्टर विष्णू बोबडे, रमेश घुगे, जनार्धन बोरकर, सुभाष बलखंडे, मंगेश महाजन, गजानन गाठेकर, सचिन सतरकर, रामेश्वर सर्जेराव, प्रमोद राठोड, बबन आघाव, भागवत घुगे, संदीप ढोरे, गुलाब उचित, रमेश घुगे निलेश मिसाळ इत्यादींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# ब्राम्हणवाडा येथे अवैध दारू विक्री करणाऱ्यावर कार्यवाही करावी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगाव तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथे अवैध रित्या दारू विक्री सुरू आहे.ही अवैध रित्या दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी.म्हणून ब्राह्मणवाडा येथील महीलांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मालेगाव पोलीस स्टेशन येथे निवेदनाद्वारे दि.९ जुलै रोजी मागणी केली आहे.

परंतु अद्याप पर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.म्हणून दि. ११ जुलै रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांना सोबत घेऊन काही महीलांनी उत्पादन व शुल्क विभाग वाशीम चे अधिक्षक यांना निवेदन देवून अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई ची मागणी केली आहे. पुढे निवेदनात असे नमूद केले आहे की, एवढेच काय तर दारू शिवाय जुगार,मटका असे अवैध धंदे भर रस्त्यावर सुरू आहेत.त्यामुळे येथील महीलांचे संसार उद्धवस्त होण्याची भीती निर्माण झाली आहे.आणि याच रस्त्याने शाळेतील मुले मुली जात असल्याने त्यांना देखील त्रास होत आहे.म्हणून ह्या सर्व बाबी लक्षात घेऊन संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थीांचा सत्कार

**वाशीम :** पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आलेली आहे . महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे व माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी व इयत्ता आठवी साठी पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची आयोजन दरवर्षी करण्यात येते .या परिक्षेला स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीम येथील विद्यार्थी प्रविष्ट झाले होते . यामध्ये इयत्ता पाचवीतील मोक्षदा चांदजकर, रिधीका मोरे, आयुष सुरटकर, प्रांजल



ठाणे, यांनी गुणवत्ता यादीत येऊन दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे .आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्राचार्य मीना उबगडे ,शिक्षक अभिजीत मुकुंदराव जोशी यांना दिले आहे .

# गुरु म्हणजे अंधकाराकडून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ- प्रा. मंजुषा देशमुख

**रिसोड :** स्थानिक रिसोड येथील भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे गुरुपौर्णिमा साजरी करत असताना प्रथमतः प्राचार्या मंजुषा सु. देशमुख व पर्यवेक्षक सुनील डाहाळके व विचार मंचावरील मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर उत्कृष्ट्यरित्या गुरुपौर्णिमेनिमित्त नाट्य सादरीकरण करत गीत ,पोवाडे यांच्या माध्यमातून गुरूंची महती गायली.


## जाहीरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार तुळशिराम मारोती ढवळे रा कंझरा ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे कंझरा येथील सर्वे क्र/गट क्र २७१ मधील क्षेत्र ७.२६ हे आर पैकी ३.४४ आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये साधे कुळ मारोती साधा स न १९-५१५२ प्रमाणे या नावाचे कुळ दर्शविलेले आहे.

सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे. सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/ हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून ( कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून ) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक - २६/०५/२०२५

शिक्का

तहसिलदार,
मंगरुळपीर


# विमाशींचे धरणे आंदोलनाला भक्कम प्रतिसाद

■ प्रतिनिधी | कारंजा ■

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विजाभज आश्रम शाळा, आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या / समस्या शासनाकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहे त्यामध्ये जुनी पेन्शन योजना मिळणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या परंतु टप्प्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना १९८२ची जुनी पेन्शन योजना मिळणे, १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता निर्गमित करणे, शासकीय कर्मचाऱ्या प्रमाणे शिक्षकांना १०२०३० कालबद्ध पदोन्नती मिळणे, १४ नोव्हेंबर २०२४ च्या शासन निर्णया .प्रमाणे टप्पा वाढ देणे, नगरपरिषद मधील २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना कोणतीही पेन्शन योजना नसल्यामुळे त्यांना त्याकरिता त्वरित आदेश काढणे, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार



थांबवणे, आदिवासी विभागाचा काम नाही वेतन नाही हा ८ जून २०१६ चा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, नक्षलग्रस्त तसेच आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एक स्तर पदोन्नती व वाढीव

घरभाडे भत्ता लागू करण्यात यावा, सर्व भत्ते सातव्या वेतन आयोगानुसार लागू करण्यात यावे, न्यायालयीन निर्णयानुसार आदिवासी विकास व विभाग अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना मान्यता दिनांका पासून त्यांचे थकीत वेतन/ मानधन देण्यात यावे. या व इतर अनेक महत्वपूर्ण मागण्यांचा शासन गांभीर्याने विचार करायला तयार नाही. या मागण्या मान्य करून घेण्यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे माजी आमदार तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस व्ही. यु. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात तथाविदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले व संघटनेचे प्रांतीयअध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात विदर्भ माध्यमिक

## प्रलंबित मागण्या व समस्यांबाबत शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

शिक्षक संघाच्या वतीने दिनांक शुक्रवारी दि. ११ जुलै रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा वाशीमच्या वतीने दुपारी ३ ते ५ वाजे दरम्यान वाशीम माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे/ निदर्शन आंदोलन करण्यात आले. ह्या धरणे आंदोलनात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या सर्व जिल्हा, तालुका, शहर पदाधिकाऱ्यांनी तसेच सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विजाभज आश्रम शाळा,आदिवासी आश्रम शाळेच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, जिल्हा कार्यवाह कुलदीप बदर जिल्हाध्यक्ष वाळले,कार्याध्यक्ष रूपेश मूंदडा, दीलीप सह प्रा. मंगेश मोरे, सतिष जामोदकर,किशोर गवळी सर्व उपाध्यक्ष, सहसचिव पि.टी. शिदे,, कोषाध्यक्ष गजानन इढोळे, जिल्हा संघटक प्रा. संतोष राठोड, मंगरूळपीर तालुका अध्यक्ष योगेश काळे, मानोरा तालुका अध्यक्ष मंगेश आंबेकर, रिसोड तालुका अध्यक्ष किशोर सदार, रिसोड तालुका संघटक शशीकांत मिसाळ, मालेगाव तालुका संघटक न.चि. ढवळे, प्रांतीक सदस्य जनार्धन शिंदे, माजी सचीव गोविंद चतरकर, माजी जिल्हाध्यक्ष प्रा. वसंतरावजी अवचार, कु दिव्या प्र. उमाळे, आर. के. घुगे, ए. पी. बोंद्रे, शरद गोटे, संजय तांबोर, गणेश काकडे, रवि हजारे हनुमान धाडवे, रघुनाथ आ. चौधरी, वसुदेव प. भगत, के. बी. लांडगे, रामचंद्र काळबांडे, या. मो. गुडदे, प्रशांत कवर, दिगंबर गुळदे, पि, व्ही. म्हातारमारे, व्ही. डी. भड, एस.एम. किन्हीकर आदींची उपस्थिति होती.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२८ ■ रविवार, १३ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून होणार जिल्ह्याची मोतीबिंदू मुक्ततेकडे वाटचाल

-जिल्ह्यात एक पाऊल मोतीबिंदू रुग्ण रहीत मोहिम
-रुग्ण शोधण्यासाठी आठही तालुक्यात विशेष शिबिर

### -२२ जुलै रोजी अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ -रुग्णांची होणार मोफत तपासणी व शस्त्रक्रिया

**वर्धा जनमाध्यम :** वयाच्या विशिष्ट टप्प्यावर आल्यानंतर नागरिकांमध्ये मोतीबिंदू आजार होतो. रुग्णांना डोळ्यांनी अस्पष्ट दिसते, यामुळे दैनंदिन जीवनात नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांचा शोध घेऊन मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून आगामी काळात जिल्ह्याची मोतिबिंदू मुक्ततेकडे वाटचाल होणार आहे. या मोहिमेबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमत्र्यांनी आढावा घेतला.



मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र अंतर्गत एक पाऊल मोतिबिंदू रहीत या संकल्पनेतून निरामय वर्धा अभियानाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला पालकमंत्र्यांसह आ. राजेश बकाने, आ. सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले, आयएमए संघटनेचे पदाधिकारी, खाजगी डॉक्टरांसह उपविभागीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी यांची उपस्थिती होती.

मोतिबिंदू रुग्ण शोध मोहीम राबविण्यासाठी आशा सेविकांची मदत घेण्यात यावी. एकही रुग्ण नोंदणी शिवाय राहू नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात यावी. मोतिबिंदू रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया मोहीम जिल्ह्यात राबविण्यासाठी सुक्ष्म नियोजनाची गरज असून यासाठी आयएमए व खाजगी डॉक्टरांचे सहकार्य अपेक्षित आहे. तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिक्षक यांनी आपआपल्या तालुक्यातील रुग्णांची माहिती कालमर्यादेत संकलित करुन रुग्णांच्या इतर आजारांची तपासणी करुन जिल्हास्तरावर पाठवावी. इतर व्याधी असणारे व फक्त मोतीबिंदू असणारे रुग्णांचे वर्गीकरण करण्यात यावे, अशा सूचना पालकमंत्री डॉ. भोयर केल्या.

मोतिबिंदू, दंत रुग्ण व ईतर आजारांच्या रुग्णांसाठी सर्व तालुकास्तरावर प्रत्येकी एक याप्रमाणे ८ विशेष शिबिरे घेतली जाणार आहे. जिल्हास्तरावर चरखा सभागृह वर्धा येथे दि.२२ जुलै रोजी अभियानाचा शुभारंभ व वर्धा तालुकास्तरीय शिबिर होईल. त्यानंतर प्रत्येक तालुक्यात दि. १४ ऑगस्ट पर्यंत शिबिरे घेऊन रुग्णांची तपासणी केली जातील. तपासणीत शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांवर पुढे जिल्हा सामान्य रुग्णालय, सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालय व सावंगी मेघे येथील विनोबा भावे रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जातील. रुग्ण तपासणी व शस्त्रक्रियेचे उत्तम नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

तालुकास्तरीय शिबिरांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्णांना सहभागी करून घेण्यासाठी गावपातळीवर ग्रामपंचायत, आशा, अंगणवाडी सेविका यांच्याद्वारे व विविध माध्यमातून जनजागृती करण्यात यावी. शिबिरामधे येणाऱ्या रुग्णांना वाहतूक सुविधा तसेच शिबिराच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. सहभागी रुग्णांची गावस्तरावर नोंदणी करण्यात यावी. जास्तीज जास्त नागरिकांना या विनामुल्य तपासणी शिबिर व शस्त्रक्रियेचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकांनी नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. शस्त्रक्रियांसाठी वर्धेतील तीन रुग्णालयांसह मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून जिल्ह्याबाहेरील धर्मादाय रुग्णालयांची देखील मदत घेता येईल. यासाठी नियोजन करण्यात यावे. शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चश्मा देण्यासाठी नियोजन करावे, जास्तीत जास्त रुग्णांना चश्मा उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाची मदत घेण्यात यावी, असे ते म्हणाले.

आमदार राजेश बकाने म्हणाले, एकावेळी किती रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रिया करता येईल, याबाबत नियोजन करुन रुग्णांना दिनांक देण्यात यावी. शस्त्रक्रिया चांगल्या दर्जाची झाली पाहिजे. रुग्णाचे समाधान होईपर्यंत आरोग्य विभागाने समन्वय ठेवावा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. आमदार सुमित वानखेडे म्हणाले, जिल्ह्यात शस्त्रक्रियेची क्षमता लक्षात घेऊन नियोजन करण्यात यावे, यासाठी खाजगी रुग्णालयांची मदत सुध्दा घेण्यात यावी. रुग्णांची संख्या वाढल्यास जिल्ह्याबाहेरील रुग्णालयांची मदत देखील घेता येईल का? यासाठी प्रयत्न करावे, असे ते म्हणाले. बैठकीत जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी नियोजनाबाबत माहिती दिली.

## दारुची वाहतूक करणाऱ्या वाहनाचा अपघात, वाहन चालकाचा मृत्यू



**वर्धा जनमाध्यम :** अवैध मार्गाने दारुची भरधाव वेगाने वाहतूक करताना चारचाकी वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि थेट वाहनाने पलटी घेतली.या भीषण अपघातात वाहन चालकाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी असल्याची घटना वर्धा पुलगाव मार्गावरील धोत्रा मार्गावर पहाटेच्या सुमारास घडली.

अमरावती जिल्ह्यातील एका बार मधून अवैध पद्धतीने दारुची वाहतूक एम एक ४९ ए टी ०४५३ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनामधून वाहन चालक योगेश दिवाकर पेटकर वय (३०) रा सावंगी मेघे व त्याचे दोन सहकारी रोशन व इम्रान हे दोघे होते. शनिवारी पहाटे ३,१५ वाजताच्या सुमारास भरधाव वेगाने वाहन चालवीत असताना, मृतक योगेशचे वाहना वरील नियंत्रण सुटले आणि थेट वाहनाने पलटी घेतली. या अपघातात योगेशचा घटनास्थळी मृत्यू झाला तर दोघे किरकोळ जखमी झाले असल्याची घटना वर्धा पुलगाव मार्गावरील धोत्रा येथील कृष्णगिरी मंदिर जवळ घडली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता,मृतकाचे दोन्ही सहकारी घटनास्थळा वरून पसार झाले होते.याप्रकरणी सावंगी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद घेण्यात आली आहे.अपघात घडल्यानंतर वाहना मधील विदेशी दारु साठा नष्ट झाला तर इतर मुद्देमाल हा घटनास्थळा वरुन ग्रामस्थांनी त्याचा आनंद लुटला. सावंगी पोलिसांनी मृतका सह तिघांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सावंगी पोलीस करीत आहे.

## म. गांधी आयुर्वेद रुग्णालयात नवी आरोग्य सुविधा
## जुनाट व्रणांवरील उपचार विभाग कार्यान्वित

**वर्धा जनमाध्यम** - सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्रात जुनाट जखम व व्रण असणाऱ्या रुग्णांची विशेष तपासणी आणि उपचारांकरिता नवीन सुसज्ज विभाग कार्यान्वित करण्यात आला. या विभागाचे उद्?घाटन गुरूपौर्णिमेला दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले.



या नवनिर्मित विभागामध्ये जुनाट जखम न भरणे, जुनाट न भरणारे व्रण असणे, भाजल्यामुळे व्रण न भरता तसाच राहणे, जखमांमध्ये कीड पडणे, दुर्गंध येणे, मधुमेहामुळे पाय सुजणे, अशा आरोग्यविषयक समस्यांनी त्रस्त रुग्णांना दर्जेदार व आधुनिक तंत्रज्ञानासोबतच पारंपरिक आयुर्वेद पद्धतीने उपचार उपलब्ध होतील.

विभागात आयुर्वेद पद्धतीने ड्रेसिंग, संसर्ग नियंत्रण, जळूद्वारे रक्तशुद्धी चिकित्सा (लिच थेरपी), त्वचारोपण कर्म, क्षार कर्म, सिरावेध उपचार, व्रणबस्ती कर्म, आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया अशा विविध सुविधा रुग्णांना प्राप्त होतील, असा विश्वास आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भरत राठी यांनी व्यक्त केला.

अशा प्रकारचे जुनाट व्रण चिकित्सा केंद्र प्रथमच कार्यान्वित होत असल्याने कुलगुरू डॉ. वाघमारे यांनी मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली कुचेवार, शल्यतंत्र विभाग प्रमुख डॉ. शीतल आसुटकर, उपअधिष्ठाता डॉ. गौरव सावरकर, उपअधीक्षक डॉ. ऋषिकेश ठाकरे यांचे अभिनंदन केले.

## डॉ.शांतीलाल कोचर 'गोल्डी' यांना 'विद्या-वाचस्पति' मानद पदवीने सन्मानित

**हिंगणघाट जनमाध्यम :** सुप्रसिद्ध ओजस्वी कवी आणि समाजसेवक डॉ. शांतीलाल मेघराज कोचर 'गोल्डी' यांना नुकताच दिल्लीत काशी हिंदी विद्यापीठाद्वारे 'विद्या-वाचस्पति' (मानद डॉक्टरेट) या प्रतिष्ठित पदवीने सन्मानित करण्यात आले. साहित्य आणि समाजसेवा क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या विशेष समारंभात देशभरातील एकूण ३५ मान्यवरांना ही प्रतिष्ठित पदवी मिळाली.



डॉ. कोचर यांना ही पदवी विशेषतः हिंदी साहित्यासाठी त्यांची अविस्मरणीय सेवा, सखोल सारस्वत साधना, शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांचे अटूट समर्पण, सर्वधर्म समभावाचे प्रतीक म्हणून त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि एक ज्येष्ठ समाजसेवक म्हणून त्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्याती यासाठी देण्यात आली आहे. 'परिवर्तन योगेश सनातन संस्कार-संस्कृती प्रतीक संस्था' च्या प्रस्तावावरून काशी हिंदी विद्यापीठाने डॉ. कोचर यांना राजभाषा हिंदी प्रती असलेले त्यांचे समर्पण, शेतकऱ्यांचे उत्थान, सर्वधर्म समभाव आणि व्यापक समाजसेवेसाठी या मानद पदवीने सन्मानित केले.

## चहा कॅन्टीन मध्ये गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीला अटक

-दोन किलो गांजा जप्त

**वर्धा जनमाध्यम :** कारंजा (घा) राष्ट्रीय महामार्गावर एका चहाच्या दुकानात अवैध पध्दतीने गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीला ५२ हजार ५८० रुपये किमतीचा २ किलो ६२९ ग्रॅम गांजा जप्त करीत आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष केंद्रित करिता असताना, अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर कारंजा जवळील नारा टी पॉईंट जवळ एका चहाच्या दुकानात गांजा अमली पदार्थांची अवैध पद्धतीने विक्री केली जात असल्याची माहिती मिळताच धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये आरोपी गोपाल विठ्ठलराव चाफले वय (४४) रा खरडीपुरा कारंजा (घा) याचे चहा व नाश्ताचे हॉटेल असून,त्या मध्ये आरोपी गांजाची विक्री करीत असल्याचे दिसून आले. याप्रकरणी ५२ हजार ५८० रुपये किमतीचा २ किलो ६२९ ग्रॅम गांजा दिसून आला.दोन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपीचा जावई हा त्याला विक्री करण्यासाठी गांजा आणून देत असल्याचे सांगण्यात आले. मेहुण्याला ताब्यात घेतले तर जावई फरार असून,त्याचा शोध घेतला जात आहेत.ही कारवाई पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पो.उपनि. सलाम कुरेशी, पो.अं. नरेंद्र पाराशर, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित, अक्षय राऊत, दिनेश बोथकर, मिथुन जिचकार, अभिषेक नाईक सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वर्धा, फॉरेन्सिक विभागाचे अनिल साटोणे, अजित धंदरे, मंगेश धामंदे यांनी केली.

## अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा- खा.काळे

### संसद सदस्य रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील वाहनामुळे होणारे रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी करुन पर्यायाने होणारी जिवीत हानी टाळण्यासाठी मार्गावरील वारंवार होणाऱ्या अपघात प्रवणस्थळ निश्चित करुन उपाययोजना करण्यासोबतच शाळांपरीसरातील रस्त्यावर गतीरोधक लावण्यात यावे, अशा सूचना खासदार अमर काळे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात संसद सदस्य रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक समितीचे अध्यक्ष तथा खासदार श्री.काळे यांच्या अध्यक्षेखाली घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे, जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता महेश मोकलकर तसेच राष्ट्रीय महामार्ग, सामान्य रुग्णालय, वाहतुक शाखेचे पोलिस निरिक्षक आदी उपस्थित होते. बऱ्याच रस्त्यावर प्लास्टीक फायबरचे गतिरोधक असून या गतिरोधकामुळे अपघाताची शक्यता असते. त्यामुळे असे गतिरोधक काढून डांबरीकरणाचे गतिरोधक लावावे. त्याचबरोबर शाळालगत असलेल्या रस्त्यावर गतिरोधक लावण्याची मागणी केल्यास संबंधित विभागाच्या अखत्यारित्या असलेल्या विभागांनी गतिरोधक लावून घ्यावे. प्रत्येक टोलनाक्यावर असलेल्या रुग्णवाहिका सुस्थितीत ठेवून अपघातग्रस्तांना वेळेत उपचार उपलब्ध करुन द्यावा. यासाठी कारंजासह अन्य ट्रामा केअर मध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्या, अशा सूचना खासदार अमर काळे यांनी दिल्यात.

आष्टी येथे महामार्गालगत असलेल्या हुतात्मा महाविद्यालयात विरुध्द दिशेने गावातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात संख्या असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविद्यालयासमोर मार्गावर स्काय वॉक मार्ग तयार करण्याच्या सूचनाही यावेळी श्री. काळे यांनी दिल्या. रस्त्यावर येणाऱ्या वन्यप्राण्यांमुळे होणारे अपघात कमी करण्यासाठी वन विभागाच्या समन्वयाने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या. तळेगाव येथून आष्टीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने आवश्यक उपाययोजना करण्याचेही यावेळी खासदार म्हणाले.

## गरजू लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ प्राधान्याने द्या-खा.काळे

### -जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा

**वर्धा जनमाध्यम :** सर्वासाठी घरे उपलब्ध व्हावी यासाठी प्रधानमंत्री आवास योजना केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. जिल्ह्यातील काही भागांमध्ये पट्ट्यामुळे घरकुल योजनेचा लाभ मिळण्यास लाभार्थ्यांना अडचणी निर्माण होत आहे. यासाठी प्रशासनाने पट्ट्यांचा प्रश्न मार्गी लावून गरजू लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ प्राधान्याने द्यावा, अशा सूचना खासदार अमर काळे यांनी केल्या.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा खासदार श्री.काळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, अपर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक सुरज गोहाड यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्ते व पुले खचून गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यास अडचण होत आहे. बांधकाम विभागाने दुरुस्तीची कामे तातडीने करावी. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाला मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. याबाबत नागरिकांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहे. त्यामुळे वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाने लक्ष देणे गरजेचे असून तात्काळ याबाबत उपाययोजना कराव्यात, अशा सूचना खा. काळे यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात नुकतीच आदिवासी समाजाच्या विद्यार्थीनीने आत्महत्या केल्याची घटना प्रसार माध्यमांमध्ये आली. या कुटुंबाला शासनातर्फे सर्वोतोपरी मदत मिळवून द्यावी. एकात्मिक आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ठक्कर बाप्पा योजनेचा निधी योग्य मार्गाने खर्च होणे आवश्यक आहे. हा निधी योग्य मार्गाने खर्च झाला की नाही ते तपासावे यामध्ये तफावत आढळून आल्यास संबंधित कंत्राटदरांचे देयके अदा करू नयेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जलजीवन मिशन योजनेंतर्गत प्रत्येकाला नळाद्वारे शुद्ध पाणी उपलब्ध करुन देणाऱ्या या मिशनची कामे गुणवत्तापूर्वक व कालमर्यादेत पुर्ण करा. शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांना मिळण्यासाठी सर्व विभागांनी योजनांची जनजागृती करुन लाभ देण्याचा प्रयत्न करावा. केंद्र व राज्य शासनमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा निधी वेळेत खर्च करण्याची कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी केंद्र शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या रोजगार हमी योजना, ग्राम सडक योजना, स्वच्छ भारत मिशन, पेयजल कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान, बाल विकास योजना, आवास योजना, ग्राम ज्योती योजना, प्रधानमंत्री कृषि सिंचन व पीक विमा योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, उज्वला योजना, जिवनोन्नती अभियान, शालेय पोषण आहार, राष्ट्रीय आरोग्य अभियानासह विविध योजनांचा आढावा देखील यावेळी घेण्यात आला.

## नारायण कांबळे यांचे निधन

**देवळी :** गौळ येथील सामाजिक कार्यकर्ते पद्माकर कांबळे यांचे वडील नारायण झिबलजी कांबळे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी शनिवार दि. १२ जुलै रोजी दुपारी ४.१५ वाजता बुद्धिवासी झाले. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे,आज दि १३ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजता.त्यांच्या निवासस्थान वरून अंत्ययात्रा निघणार आहे.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N ६ ९ १ ८ ० ० ६ वरील माझे नाव FAIZ UMER ABDUL HAFIZ SHAIKH असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील नाव FAIZ UMEIR ABDUL HAFIZ SHAIKH हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

पत्ता :-
महादेवपुरा वर्धा, ४४२००१

### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर K ५ ४ २ २ ५ ० ९ वरील माझे नाव ZIYAAN KHAN असे नाव होते.माझ्या आधार कार्ड वरील ZIYAAN SHER KHAN नाव हे नाव नमूद आहे. वरील नाव पासपोर्ट वर नमूद करावे.

पत्ता:
म्हसाळा वर्धा,४४२००१

### जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अरविंद भानुदास लोखंडे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा वडाळा पैकु, प. ह. नं. १३ ब. न. नं. ४५९ ता. चिमूर व जि. चंद्रपूर येथील नगर परिषद च्या हद्दीतील घर/मालमत्ता कं. १८३१ शेत सर्वे कं. जुना ८/२ व नविन ३/३ मधील प्लॉट कं. ४/१ ज्याची एकूण आराजी १२७.८१ चौ. मी. इतकी असुन त्याची

**चतुःर्सिमा :-**
पुर्वेसः प्लॉट नं. ४ पैकी भाग,
पश्चिमेसः याच लेआऊट मधील मंजुर झालेल्या नकाशा प्रमाणे रोड,
उत्तरेसः चिमूर ते पिंपळनेरी रोड,
दक्षिणेसः प्लॉट कं. १० ची जागा,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २९,३०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

### जाहीर नोटीस

माझे ग्राहक श्री रॉबर्ट नारायणराव खैरे हे मौझा वर्धा मौज क्रमांक ८५ ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. ३३/१ घ ३५/१ ख , ३४/१ क शीट क्रमांक . ५० अँड नगर भूमापन क्रमांक ६९२२ (Udapa B No. २०४) क्षेत्रफळ ५५.२२ sq.mt. त्यावर बांधलेले मकान वॉर्ड क्रमांक ०८ अँड झोन क्रमांक . ०२, घर क्रमांक ओल्ड ०८-१११ अँड नव ०८०००१२२ चे मालक आहेत सादर प्लॉटची चतुरसीम - पूर्वेस- श्री. भांदककर यांचे घर पश्चिमेस- श्री.पेटकर चे घर उत्तरेस - १० ft रोड दक्षिणेस - श्री . जावंधिया चे प्लॉट Shri. राजू उर्फ राजेंद्र बाबाराव चाफले यांनी सादर मालमत्ता माझ्या पक्षकाराला दिनांक ०५/०८/२०२४ दस्त क्रमांक अन्वय ३२४०/२०२४ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे. माझ्या पक्षकाराकडून मूळलिंक विक्री पत्र दिनांक १०/०७/१९७८ दस्त क्रमांक ३२७४ /१९७८ हरविलेले आहे . आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने सादर मालमत्ता विकण्याचा सौदा श्री. वैभव रामराव खडसे ह्यांच्यासोबत दिनांक ०९/०६/२०२५ केलेला आहे . सौ . वर्षा विनोद फुलझेले ह्यांनी The Indusind Bank. कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड. आर.आर.तिवारी**
**रामनगर वर्धा**
**मो. ९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मिसिंग लिंक प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार-मुख्यमंत्री




## मुख्यमंत्र्यांकडून मुंबई – पुणे एक्सप्रेस वेच्या मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी

**पुणे/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार आहे. या प्रकल्पतील एक बोगदा देशातील सर्वात लांब बोगदा असून या प्रकल्पामुळे पुणे-मुंबई प्रवासाचा वेळ अर्धा तासाने कमी होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुंबई -पुणे द्रुतगती महामार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पच्या कामाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार बाळा भेगडे, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पुणे विभागीय आयुक्त ड?. चंद्रकांत पुलकुंडवार, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सह व्यवस्थापकीय संचालक मनुज जिंदल, राजेश पाटील मुख्य अभियंता राजेश निघोट, अधीक्षक अभियंता राहुल वसईकर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई- पुणे या महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे हे अंतर कमी होणार असल्याने प्रवाशांना याचा फायदा होणार आहे. महामार्गावरील घाट असलेला भाग या प्रकल्पामुळे टाळता येणार असून घाटमार्गामुळे होणारा वाहतूक अडथळा दूर होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर या महामार्गावर आरामदायी प्रवास होणार आहे. मिसिंग लिंक प्रकल्पांतर्गत एकूण तीन बोगदे असून एक बोगदा ९ किलोमीटर लांब व २३ मीटर रुंदचा असून देशातल्या सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे. या अगोदर समृद्धी महामार्गावरील बोगद्याचा विक्रम या बोगद्यामुळे मागे पडेल. प्रकल्पांतर्गत अतिशय उंच पूल बांधण्यात येत असून याची उंची १८५ मीटर आहे. देशामध्ये आत्तापर्यंत एवढा उंच पूल कुठल्याच ठिकाणी बांधला गेला नाही. हा देखील एक विक्रम होणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळच्यावतीने या प्रकल्पाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. या प्रकल्पाचे एकूण ९४ टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत प्रकल्पाचे काम करणारे अभियंते आणि कामगारांचे कौतुक केले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्प हा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बांधण्यात येत असून, हा प्रकल्प गेम चेंजर ठरणार आहे. येथील वातावरण व हवेच्या दाबाची स्थिती पाहता अतिशय कठीण परिस्थितीमध्ये अनेक अभियंते काम करीत आहेत. हा प्रकल्प सुरू झाल्यावर मुंबई-पुणे दरम्यानचा प्रवास अर्ध्या तासाने कमी होणार असून या घाट भागातील वाहतुकीची समस्या पूर्णपणे सुटण्यास आणि अपघात टाळण्यास मदत होणार आहे. महामार्गावरील या प्रकल्पामुळे वेळेसोबतच इंधनाचीही बचत होईल, प्रदूषणही कमी होईल. देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासाला या प्रकल्पामुळे चालना मिळणार असून सर्वसामान्य नागरिकांना व राज्यातल्या जनतेला हा प्रकल्प दिलासादायक ठरेल अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक श्री गायकवाड यांनी प्रकल्पाविषयी माहिती दिली.

# खोतकरांच्या पीएविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल

## एकनाथ शिंदेंचे आमदार अडचणीत?

**मुंबई/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार आणि विधिमंडळ अंदाज समितीचे प्रमुख अर्जुन खोतकर त्यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत. गेले महिनाभर चर्चेत असलेल्या वादग्रस्त १.८४ कोटी रुपयांची रोकड कुणाची? यावरून आता आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.खोतकर यांच्या स्वीय सहाय्यकाविरोधात



धुळे पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. विधिमंडळ अंदाज समितीचा धुळे दौरा चांगलाच गाजतो आहे. दौ-यात समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांचे पीए अनिल पाटील यांच्या कक्षात १.८४ कोटी रुपयांची रोकड सापडली होती.याबाबत आता अनिल पाटील आणि वाहनचालक राजकुमार मोगले यांच्याविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या प्रकरणात शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनीही उडी घेतली आहे. संजय शिरसाट यांच्या व्हीडीओत पैशाने भरलेली बॅग आढळली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना भास्कर जाधव यांनी शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या नेत्यांवर गंभीर आरोप केले.आमदार अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक अनिल पाटील यांच्या धुळे येथील गुलमोहर विश्रामगृहातील कक्ष क्रमांक १०२ मध्ये सापडलेले पैसे पीएचे नसून ते ज्या आमदाराकडे काम करतात त्या आमदारांचे आहेत. साडेपाच कोटी रुपये जमा करण्यात आले होते. त्यातील शिल्लक १.८४ कोटी त्या आमदारांच्या वाट्याचे होते, असे भास्कर जाधव यांनी पत्रकारांना सांगितले. दरम्यान शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे माजी आमदार अनिल गोटे यांच्या याचिकेनुसार न्यायालयाने या प्रकरणात खंडणीचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार काल दिवसभर पोलिसांची धावपळ सुरू होती. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यामध्ये अनिल पाटील आणि राजकुमार मोगले यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याने त्यांना लवकरच अटक होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांवर मंत्रालयातील यंत्रणा आणि राजकीय दबाव होता. त्यामुळेच पोलिसांनी दोन महिने तपासाचे नाटक केले. त्यानंतर या प्रकरणात एनसी दाखल करण्याचा हास्यास्पद प्रकार झाला. यामध्ये गृहखात्याची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे, असे माजी आमदार गोटे म्हणाले. या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पोलिसांत गुन्हा दाखल झाल्याने संबंधित रोकड कोणाकडून मिळाली याची माहिती पीए अनिल पाटील यांना द्यावी लागणार आहे. ती कोणासाठी होती याचाही तपास होईल. त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप न झाल्यास आमदार खोतकर यांच्यापर्यंत पोलिस पोहोचतात का? याची आता प्रतीक्षा आहे. शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे तीन आमदार विविध कारणांमुळे वादात सापडले आहेत. मंत्री संजय शिरसाट यांच्या व्हीडीओत पैशाने भरलेली बॅग होती. हा व्हीडीओ समाज माध्यम आणि वृत्तवाहिन्यांवर प्रसारित झाला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे पक्षाच्या अडचणी आणि डोकेदुखी कमी होण्याची चिन्हे नाहीत.

# दोन 'संजय'मुळे पक्षाची प्रतिमा डळमळीत

## ◆ शिंदेंनी कडक शब्दांत सुनावले ◆

**मुंबइ/प्रतिनिधी-** संपत्तीत वाढ झाल्याबद्दल प्राप्तिकर विभागाच्या नोटिशीपाठोपाठ बॅगेत नोटांची बंडले असल्याची चित्रफीत समोर



आल्याने सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासात केलेली मारहाण आणि शिरसाट यांच्यावर दररोज होणारे आरोप या दोन संजयच्या प्रतापामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची डोकेदुखी वाढली आहे. दोन्ही प्रकरणानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संजय शिरसाट आणि संजय गायकवाड यांच्यावर तीव्र नाराज आहेत. एकनाथ शिंदे यांनी गायकवाड आणि शिरसाट यांचे कडक शब्दांत कान टोचल्याची माहिती एका मराठी वृत्तवाहिनीने दिली आहे. मंत्री आणि आमदार यांचे बेशिस्त वक्तव्य आणि वागणुकीमुळे पक्षाची प्रतिमा डागाळत आहे. त्यामुळे असा बेशिस्तपणा खपवून घेणार नाही, अशी सक्त ताकीदच एकनाथ शिंदे यांनी गायकवाड आणि शिरसाट यांना दिल्याचे सांगितले जात आहे. आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमध्ये निष्कृष्ट जेवण मिळाल्याने आमदार संजय गायकवाड यांनी कर्मचा-याला मारहाण केली होती. जनमताच्या रेट्यामुळे आमदार गायकवाड यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्या दररोज भानगडी समोर येत आहे. शिवसेना ( ठाकरे गट ) खासदार संजय राउत यांनी शिरसाट यांची एक चित्रफीत समोर आणली आहे. त्यात शिरसाट हे बनियानवर सिगारेट ओढत बसले आहेत. त्यांच्यासमोर असलेल्या बॅगेत नोटांची बंडले दिसत आहेत. ही चित्रफीत आपली असल्याचे शिरसाट यांनी मान्य केले. पण, बॅगेत कपडे असल्याचा दावा शिरसाट यांनी केला आहे. संजय शिरसाट आणि संजय गायकवाड यांच्या उद्योगांमुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांची चांगलीच अडचण झाली आहे. पक्षप्रमुख म्हणून आमदारांवर वचक निर्माण करण्यात शिंदे अपयशी ठरले आहेत. एकूणच शिंदे यांची हतबलताच समोर येत आहे.

# रोहित पवारांविरोधात ईडीने दाखल केले आरोपपत्र

**मुंबई :**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार आणि शरद पवारांचे नातू रोहित पवार यांच्याविरोधात मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायदा २००२ अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. हा पवार कुटुंबाला मोठा




धक्का मानला जात आहे. बारामती अॅग्रो कंपनीने कन्नड सहकारी साखर कारखाना खरेदीमध्ये मनी लाँड्रिंग केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी रोहित पवारांच्या बाराममी अॅग्रो कंपनीची आतापर्यंत ५० कोटी रुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. जानेवारी २०२३ मध्ये ईडीने बारामती अॅग्रोच्या विविध ठिकाणांवर छापे टाकले होते. आता या प्रकरणात ईडीने पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे.आमदार रोहित पवारांनी आरोपपत्रावर म्हटले आहे की, कोणाचे काही ऐकले नाही म्हणून माझ्यावर ईडीची कारवाई होत आहे. आता न्यायालयात लढाई आहे तिथे दूध का दूध आणि पानी का पानी होईल. सत्यमेव जयते. अशी पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर केली आहे. पुढे रोहित पवार म्हणाले, कुणाचं आणि काय ऐकलं नाही म्हणून माझ्याविरोधात ईडीने कारवाई केली हे जगजाहीर आहे, याबाबत अधिक सांगण्याची गरज नाही. ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी, त्यांनी केवळ आलेल्या आदेशाचे पालन केले आणि आता आरोपपत्रही दाखल केले. म्हणजेच तपास पूर्ण झाला असून ज्याची आपण वाट बघत होतो त्या निर्णयाचा चेंडू आता न्यायव्यवस्थेच्या कोर्टात आहे. कारण न्यायदेवतेवर माझा पूर्ण विश्वास असून यामध्ये दूध का दूध आणि पानी का पानी होईलच! विचारांसाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी माझी तयारी आहे. महाराष्ट्राने लाचारीला आणि फितुरीला कधीही थारा दिला नाही आणि संघर्षालाच डोक्यावर घेतलंय, हा इतिहास आहे! सत्यमेव जयते. जय संविधान.

# वाहनचालकांनी नियमभंग केल्यास टायरमध्ये घालून मारा!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पोलिसांना सूचना

**बारामती/प्रतिनिधी :** वाहनचालकांनी नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांना टायरमध्ये घालून मारा. संबंधित वाहनचालक कोणत्याही मोठ्या व्यक्तीचा मुलगा किंवा नातेवाईक असला, तरी त्याला सोडू नका. अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पोलिसांना दिल्या. मोकाट जनावरे आणि गाढवे फिरताना आढळल्यास मालकांवर गुन्हे दाखल करा, असा आदेशही पवार यांनी प्रशासनाला दिला.बारामती येथे वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन करण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच जनावरे आणि गाढवे मोकाट फिरताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर बारामतीत सावित्री हॉस्पिटलच्या उद्घाटनाप्रसंगी उपमुख्यमंत्री पवार यांनी पोलीस आणि स्थानिक प्रशासनाला या सूचना केल्या.

***मोकाट जनावरे आणि गाढवे फिरताना आढळल्यास मालकांवर गुन्हे दाखल करा, असा आदेशही पवार यांनी प्रशासनाला दिला.***



उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, मोटरसायकलवरील काही तरुण नियमाचे उल्लंघन करताना दिसतात. असे तरुण किंवा व्यक्ती मोठ्या व्यक्तीच्या कुटुंबातील असली, तरी त्याला सोडू नका. त्यांना टायरमध्ये घालून झोडा. संबंधितांना दहा पिढ्या आठवल्या पाहिजेत. नियम कोणीही तोडू नका. मी किंवा माझ्या नातेवाईकांना नियम सारखाच आहे.बारामतीत मोकाट जनावरे आणि गाढवे फिरताना आढळतात. यापुढे मोकाट जनावरे आणि गाढवे आढळल्यास मालकांविरूद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील. असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

**हे वागणं बरं नव्हं-** आईसारखे कुणीही नसते. मी बारामतीत येतो तेव्हा आईला भेटतो. आईशी अतिशय आपलेपणाने वागा. शेवटपर्यंत आई-वडिलांना विसरू नका. अलिकडे नवी पिढी आई-वडिलांकडे बघत नाही, हे वागणं बरं नव्हं अशी टीपण्णी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

# देशातील सर्वोत्तम 'ऑफ शोअर एअरपोर्ट' मुंबईत उभारणार-मुख्यमंत्री

■ हवाई वाहतूक मंत्रालय लवकरच उडान यात्री कॅफे सुरू करणार- केंद्रीय नागरी हवाई मंत्री के.राममोहन नायडू

■ राज्यात 30 जिल्ह्यात विमानवाहतूक सुविधा वाढवणार



**मुंबई/प्रतिनिधी :**भारताला मेरीटाईम पॉवर बनवणारे वाढवण बंदर जसे देशातील सर्वोत्तम 'ऑफ शोअर पोर्ट' होणार आहे त्याचप्रमाणे सर्वोत्तम 'ऑफ शोअर एअरपोर्ट' मुंबईत उभारणार असून जे मुंबईतील तिसरे एअरपोर्ट असेल. याचे काम लवकरच सुरू होईल. राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये विमानतळ आणि धावपट्टीची सुविधा आहे आगामी कालावधीत ३० जिल्ह्यामध्ये या सुविधा वाढवत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल ताज लँडस एंड बांद्रा येथे केंद्रीय नागरी हवाई मंत्रालय मार्फत आयोजित वेस्टर्न रीजन मिनिस्टर कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय नागरी हवाई मंत्री के.राममोहन नायडू, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, गोव्याचे पर्यटन मंत्री रोहन कुंटे, गुजरातचे नागरी हवाई मंत्री बलवंत सिंग राजपूत, मध्य प्रदेशचे परिवहन मंत्री उदय प्रताप सिंग, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचे सचिव समिर कुमार सिन्हा उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगात सर्वात वेगाने विकसित होत असलेली अर्थव्यवस्था आहे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे.भारताला विकासाकडे नेणा-या रोबोस्ट एव्हिएशन इकोसिस्टीमची अत्यंत आवश्यकता आहे. काही वर्षापर्यंत विमानसेवा हा फक्त केंद्रांचाच विषय आहे अशी स्थिती होती पण आता परिस्थिती बदलली आहे. जे राज्य विमान वाहतूक हा विषय प्राधान्याने बघणार नाही ती प्रगतीत मागे पडतील अशी स्थिती असल्याने हा विषय महत्वाचा ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,राज्यात ग्रीन फील्ड आणि ग्राऊंड फिल्ड विमान वाहतुकीला पूरक अश्या सर्व सुविधा तयार करत आहोत.यासाठी मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. लवकरच भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनेल. या प्रगतीच्या वाटेमध्ये विमान वाहतुकीचा मोठा वाटा असेल. राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये एअरपोर्ट आणि धावपट्टीची सुविधा आहे. या सुविधा आगामी कालावधीत ३० जिल्ह्यांमध्ये वाढवण्यात येणार आहेत. धावपट्ट्या अजून अपग्रेड करण्यात येत आहेत. विमातळ व रात्री विमान उतरवण्याची सुविधा उद्योजकांना व गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करत असते. गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यामध्ये नवीन एअरपोर्ट बनवणार आहोत त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला आहे. गडचिरोलीमध्ये दीड लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे यामध्ये वाढ होउन ती दहा लाख कोटी पर्यंत वाढेल असा विश्वास आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई एअरपोर्टचे काम ९० च्या दशकामध्ये सुरू झाले. या कामाला विविध परवानगींची आवश्यकता होती. या विविध परवानगी घेण्यासाठी पंधरा वर्षे लागली, त्या सात परवानग्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एकाचवेळी दिल्या. नवी मुंबई एअरपोर्ट लवकर सुरू करत आहोत. हे एअरपोर्ट आणि अटल सेतूमुळे प्रगतीला खूप मोठ्या प्रमाणात हातभार लागणार आहे. मुंबईपेक्षा तिपटीने मोठी असलेली मुंबई या परिसरात वसणार आहे. २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन ड?लर इकॉनॉमी राज्य बनवणार आहे. एमएमआर प्रदेश व वाढवण बंदर परिसर येथेच १.५ ट्रिलियन अर्थव्यवस्था उभी राहण्याची क्षमता निर्माण होईल. महाराष्ट्रात विमानक्षेत्रातील उद्योजकांचे स्वागत आहे. दहिसर येथील रडारचे स्थलांतर करावे, जेणेकरून येथील परिसरातील अनेक वर्षे प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील. त्याचप्रमाणे डीएननगर येथील ट्रान्समिशन टॉवर स्थलांतरीत करावेत अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी

## संक्षिप्त

# पंढरपूर वारीतून एसटीला कोट्यवधींचे उत्पन्न

## महामंडळाला पावला विठुराया! सरनाईकांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या वारीसाठी एसटी महामंडळाकडून विशेष बस सोडण्यात आल्या. विठ्ठलाच्या सेवेमुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे. ९ लाख ७१ हजार भाविकांनी



एसटीने प्रवास केला. त्यामुळे महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, संभाजीनगरसह राज्यातील प्रत्येक एसटी विभागातून वारीसाठी स्पेशल एसटी बसेसची सोय करण्यात आली होती. त्यामधून कोट्यवधींचे उत्पन्न मिळाल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. आषाढी यात्रेनिमित्त एसटी महामंडळाकडून ५२०० जादा बसेस पंढरपूरसाठी पाठवण्यात आल्या होत्या. त्या माध्यमातून एसटीने तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण करून त्यांना विठ्ठल दर्शन घडविले. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळाले, अशी माहिती परिवहन मंत्री, एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक-प्रवासी येत असतात. या भाविक-प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने तब्बल ५ हजार २०० जादा बसेस सोडल्या होत्या. ३ ते १० जुलै दरम्यान या बसेसनी २१ हजार ४९९ फे-या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली आहे. यातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. जे मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त आहे. २०२४ साली आषाढी यात्रेचे एकूण उत्पन्न २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये इतके होते.

# टोल नाक्यावर गोळीबार; कर्मचारी जखमी

**छत्रपती संभाजीनगर :**मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर असलेल्या एका टोल नाक्यावर एका कर्मचा-याने दुस-या कर्मचा-यावर गोळीबार केला. यात पोटात गोळी लागून कर्मचारी जखमी झाला आहे. छत्रपती संभाजीनगरपासून जवळच



असलेल्या सावंगी येथे ही घटना घडली. छत्रपती संभाजीनगरपासून जाणा-या समृद्धी महामार्गावर सावंगी येथे टोल नाका आहे. शुक्रवारी रात्री ही घटना घडली. रात्री टोल नाक्यावर दोन कर्मचा-यांचा वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेला. त्यानंतर एका कर्मचा-याने थेट पिस्तूलच काढले आणि दुस-या कर्मचा-यावर गोळीबार केला.गोळीबारात दुस-या कर्मचा-याच्या पोटात गोळी घुसली. तो रक्तबंबाळ झाला. त्याला तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोळीबारात जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव भारत घाटगे असे आहे.माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनेची माहिती घेतली. गोळीबार करणारा व्यक्ती फरार असून, त्याचा शोध सुरू करण्यात आला आहे. टोल नाक्यावरील कर्मचा-यांकडे कंपनीकडून पिस्तूल दिले जात नाही. मग या कर्मचा-याकडे पिस्तूल आले कोठून आणि कोणत्या उद्देशाने तो पिस्तूल जवळ बाळगत होता. यापूर्वी त्याने पिस्तुलाचा धाक दाखवून काही गुन्हे केले आहेत का? असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाले आहेत.

# दुबार पेरणीचे संकट

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण ५० टक्के असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पिकांना पाणी कमी पडल्यामुळे कीड लागली असल्याने दुबार पेरणीचे संकट अनेक शेतक-यांवर ओढवले आहे. तर मराठवाड्यातील अनेक प्रकल्पांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असल्याने बळिराजा पावसाची वाट पाहत आहे.दरम्यान, पावसाळा सुरू झाला असून, मराठवाड्यासाठी कही खुशी कही गम अशी परिस्थिती आहे. एकीकडे नाशिक भागात झालेल्या चांगल्या पावसामुळे जुलै महिन्यातच जायकवाडी धरण ७३ टक्क्यांपेक्षा जास्त भरले असताना



इतर प्रकल्प मात्र अद्याप निम्म्याहून कमी तर काही प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा शिल्लक राहिला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात पावसाचे प्रमाण अवघे ५० टक्के इतके असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. रिमझिम पावसामध्ये पेरण्या केलेल्या पिकांची वाढ खुंटलेली दिसून येत आहे. मागील आठ दिवसांपासून ढगाळ वातावरण आणि रिमझिम पाउस असल्याने पिकांवर मोठ्या प्रमाणावर रोग पसरले आहेत. त्यामुळे शेतक-यांचा फवारणीचा किंवा दुबार पेरणीचा खर्च वाढला आहे. शेतकरी मोठ्या पावसाच्या अपेक्षेने आता आभाळाकडे पाहू लागला आहे. मराठवाड्यात पावसाने अद्याप जोर धरलेला नाही. मात्र, नाशिक जिल्ह्यात पावसाने जून महिन्यात दमदार हजेरी लावली अन् जायकवाडीच्या दिशेने पाणी झेपावले. मागील २५ वर्षांत पहिल्यांदाच जायकवाडी प्रकल्पात जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पाणी दाखल झाले आहे. मिळालेल्या आकडेवारीनुसार, शनिवार सकाळपर्यंत ७३.१८ टक्के जलसाठा झाला आहे. सद्यस्थितीत जवळपास २० हजार क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. मागील वर्षी १२ जुलै रोजी धरणात अवघे ४ टक्के पाणी शिल्लक राहिले होते. आशिया खंडातील सर्वांत मोठे धरण अशी ओळख असलेले धरण म्हणून जायकवाडी परिचित आहे. पाण्याचा ओघ असाच राहिला तर महिन्याच्या शेवटपर्यंत धरण ९० टक्क्यांपेक्षा अधिक भरल्यास धरणाचे दरवाजे उघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# माजी सरपंचाचा तरुणावर कोयत्याने हल्ला

**बीड :** जिल्ह्यात मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. अशातच बीडमधून आणखी एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. एका माजी सरपंचाने तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केला आहे. डोक्यावर कोयत्याने सपासप वार केले असून, शेतरस्त्याच्या वादातून ही घटना घडल्याची माहिती उघड झाली आहे. या प्रकरणानंतर पोलिसांनी माजी सरपंचावर कारवाई करत न्यायालयात हजर केले. गोरख काशीद असे हल्ला करणा-या व्यक्तीचे नाव आहे. तो साक्षाळ पिंपरीचा माजी सरपंच आहे. तर, प्रकाश काशीद असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार, शेतरस्त्याच्या वादातून प्रकाश आणि गोरख यांच्यात वाद सुरू होता. घटनेच्या दिवशी वाद विकोपाला गेला. यानंतर गोरख यांना राग अनावर झाला. त्यांनी प्रकाश याच्या डोक्यावर धारदार कोयत्याने वार केला .रक्तबंबाळ झाल्यानंतर प्रकाश खाली कोसळला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर माजी सरपंचाविरोधात बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाईला सुरुवात केली. त्यांनी माजी सरपंच गोरख काशीद याला अटक केली. पोलिसांनी अटक केल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## जनसुरक्षा विधेयक

विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत जनसुरक्षा विधेयक सादर केले. अर्थात हे सुधारित विधेयक सभागृहात येणार याची विरोधकांनाही कल्पना होती. हे विधेयक सादर केल्यानंतर सत्ताधारी व विरोधकांकडून यावर बराच वेळ विधानसभेत चर्चा झाली. महायुतीकडे सभागृहात स्पष्ट बहुमत असल्याने चर्चेनंतर हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. यानंतर हे विधेयक आता विधान परिषदेत सादर करण्यात येईल. विधान परिषदेत याला मंजुरी मिळाल्यानंतर ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात येईल. राज्यपालांनी यावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. महाराष्ट्रातील नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आणण्याचा निर्धार महायुती सरकारने केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील मार्च २०२६ पर्यंत भारतातून नक्षलवाद संपुष्टात आणणार असल्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारकडून तसे प्रयत्नही सुरू झाले आहेत. महाराष्ट्रातही मोदी-शहा यांच्या निर्देशानुसारच वाटचाल करणारे महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. त्यामुळे अमित शहा यांच्या घोषणापूर्तीसाठी महाराष्ट कोठेही कमी पडू नये यासाठीच महायुती सरकारकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. जनसुरक्षा विधेयक हा त्याचाच एक भाग असल्याचे सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्रात पूर्वी चार जिल्ह्यांपुरताच माओवादाने प्रभावित झालेल्या नक्षलवादी चळवळीचा उपद्रव दिसत होता. पण मागील काही काळापासून राज्य सरकारने शेजारील राज्यांच्या मदतीने केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली नक्षलवादविरोधी अभियान सुरू केल्याने महाराष्ट्रात माओवादी चळवळीचा प्रभाव कमी होत चालला आहे. आता राज्यात केवळ दोन जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या हालचाली व कारवाया सीमित राहिल्या आहेत; परंतु या दोन जिल्ह्यांतूनच नाही, तर राज्यातूनच माओवाद संपुष्टात आणण्यासाठी महायुती सरकारने आक्रमक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. माओवादी संबंधित संघटना वरवर पाहता लोकहिताचा आव आणत लोकशाही वाचविण्यासाठी आपण कार्यरत असल्याचा दावा करत असतात. प्रत्यक्षात त्यांचे कार्य व वाटचाल ही कायदा व सुव्यवस्थेला आवाहन निर्माण करणारी असल्याचे अनेक घटनांमध्ये स्पष्ट झालेले आहे. या संघटना भारतीय संविधानाला व लोकशाहीलाही मानत नसल्याचे उघड झाले आहे. आपली भूमिका राबविण्यासाठी चुकीचा प्रचार करून हिसेंला खतपाणी घालण्याचे कार्य गेल्या काही वर्षांमध्ये या संस्थांकडून करण्यात येत आहे. विधानसभेत सरकारने मांडलेले जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले असले तरी सरकारने विधेयकात विरोधकांच्या सूचनांचाही आदर करत काही ठिकाणी लवचिक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. सामाजिक संघटनांनी सुरुवातीपासूनच जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना विरोध दर्शवला होता. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र असून अजामीनपात्र आहेत. संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही. संघटनेचा एकही सदस्य बेकायदेशीर कृत्य करत असल्यास तोपर्यंत संघटना अस्तित्वात असल्याचे मानले जाणार आहे. या कायद्याच्या कार्यवाहीस कोणत्याही न्यायालयास मनाई हुकूम देता येणार नाही. तसेच जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाणार होता. मात्र, यातील काही तरतुदींमध्ये आता बदल करण्यात आला आहे. जनसुरक्षा विधेयकातील काही कठोर तरतुदींमध्ये बदल करण्यात आला असून, हे विधेयक सौम्य करण्यात आले आहे. मूळ विधेयकात व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध अशी तरतूद होती, याऐवजी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना, असा बदल करण्यात आला आहे. यामुळे सरकारला सरसकट कोणाच्याही विरोधात अटकेची कारवाई करता येणार नाही. सरकारच्या या भूमिकेचे आता राज्यातील सामाजिक संस्था आणि संघटनांनीदेखील स्वागत केले आहे. जनसुरक्षा विधेयकामुळे माओवादाशी संबंधिताची दुकानदारी बंद होऊन त्यांच्या हालचालींना टाळे लागणार असल्याने विधेयकाबाबत अपप्रचारच जनसामान्यांमध्ये पसरविण्याचे काम संबंधितांकडून सुरू झाले होते. हे विधेयक आल्यावर डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधित लोकांना अटक केली जाईल, त्यांच्यावर दडपशाही आणि बळाचा वापर केला जाईल, अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली होती. तसे समाजव्यवस्थेमध्ये पसरविण्याचे कामही सुरू झाले होते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असे काही होणार नसल्याची ग्वाही विधानसभेत दिल्याने विरोधकांच्या अपप्रचारातील हवाच निघून गेली आहे. हा कायदा कुणाला त्रास देण्यासाठी नाही, तर जे लोक आपल्याच देशातील लोकांना ब्रेनवॉश करून चिथावणी देत आहेत. त्यांच्यावर आळा घालण्यासाठी मांडण्यात आला आहे. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने चालणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षांचा आणि त्यातील नेत्यांचा आम्हाला आदरच आहे, असे सांगत फडणवीसांनी विधेयक मांडण्यामागील राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. फडणवीसांनी सभागृहात या विधेयकाबाबत डाव्यांच्या मनामध्ये असलेले गैरसमज हटविण्याचे काम केले आहे. या कायद्याबद्दल एक गैरसमज आहे की, जर डाव्या संघटनांचे आंदोलन झाले, डाव्या विद्यार्थी संघटनांचे आंदोलन झाले, तर हा कायदा लागू होईल. सर्वांना लोकशाही मार्गाने विरोध करण्याचा अधिकार आहे व जर या आंदोलनावेळी हिंसा झाली, तर अशा वेळी हा कायदा लागू होणार नसल्याचेही त्यांनी राज्य सरकारच्यावतीने स्पष्ट केले आहे. जनसुरक्षा विधेयकामुळे राज्यातील माओवाद कायमचा संपुष्टात येणार असल्याचा दावा केला जात आहे. जनसुरक्षा विधेयकाचे जनसामान्यांकडून स्वागत करण्यात आले असून राज्य सरकारकडूनही विधेयक सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठीच असल्याचा दावा केला जात आहे. महाविकास आघाडीकडून या विधेयकाला विरोध करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असल्या तरी सभागृहातील संख्याबळामुळे विधान परिषदेतही जनसुरक्षा विधेयक मंजूर होण्यास फारसे अडथळे येतील, असे दिसत नाही.

## अहमदाबाद विमान अपघात

# 'फ्यूएल स्विच कट-ऑफ मोडवर'

गुजरातमधील अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातामागचे कारण उघड करणारा प्राथमिक अहवाल (प्रिलीमिनरी रिपोर्ट) जाहीर करण्यात आला आहे. हा रिपोर्ट कोणत्याही अंतिम निष्कर्षापर्यंत येत नाही. मात्र, त्यामधून पायलट्सच्या त्यावेळच्या संभाषणाचे तपशील पुरवलेले आहेत. या अपघातामध्ये एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता. त्यापैकी २४१ जण हे विमानातील प्रवासी होते. १२ जून रोजी अहमदाबादमधून उड्डाण केल्यानंतर लंडनला जाणारे बोईंग ७८७-८ ड्रीमलायनर विमान कोसळले होते. आता या अपघातामागचे संभाव्य कारण समोर आले आहे. आंतरराष्ट्रीय नागरी उड्डयन संघटनेच्या (ICAO) नियमांनुसार, अपघाताची चौकशी करणाऱ्या राज्यांना अपघाताच्या ३० दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल सादर करणे हे बंधनकारक असते. या अहवालामध्ये प्रारंभिक निष्कर्षांची माहिती दिली जाते. अपघातापूर्वीच्या काही क्षणांमध्ये कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, 'विमानाचं इंजिन का कटऑफ केले?' असे एक पायलट दुसऱ्या पायलटला विचारताना ऐकू येते, असे या रिपोर्टमधील एका निष्कर्षात असे म्हटले आहे. मात्र, कोणता आवाज कोणत्या पायलटचा आहे, हे या अहवालात स्पष्ट केलेले नाही. दोन्ही इंजिन्सच्या फ्यूएलचे स्विचेस हे 'कट-ऑफ' मोडवर करण्यात आले होते, असे या अहवालात म्हटले आहे.

### अहवालातील काही प्रमुख निष्कर्ष

विमानाने सुमारे ०८:०८:४२ UTC वाजता १८० नॉट्स IAS चा वेग (नोंद झालेला कमाल वेग) गाठला होता आणि त्यानंतर लगेचच, इंजिन १ आणि इंजिन २ चे फ्यूएल कटऑफ स्विचेस (इंधनाचे स्विच) अगदी ०१ सेकंदाच्या अंतराने एकामागून एक RUN वरून CUTOFF मोडमध्ये गेले. या दोन्ही इंजिन्सना इंधन पुरवठा बंद झाल्यामुळे इंजिन N1 आणि N2 ला टेक-ऑफसाठी लागणारा इंधन पुरवठा कमी पडू लागला. कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, एक पायलट दुसऱ्याला विचारताना ऐकू येत आहे की, त्याने इंधन पुरवठा का बंद केला. त्यावर दुसऱ्या पायलटने पहिल्या पायलटला उत्तर दिलें की 'त्याने असे काहीही केलेले नाही.' थोडक्यात, या रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की,




फ्लाइट रेकॉर्डरमधील डेटानुसार, दोन्ही फ्यूएल कंट्रोल स्विचेस हे सामान्यतः जमिनीवर असताना इंजिन चालू किंवा बंद करण्यासाठी वापरले जातात. मात्र, अपघाताच्या अगदी काही क्षण आधी, म्हणजेच टेकऑफनंतर हे स्विचेस लगेचच 'रन'वरून 'कटऑफ' स्थितीत हलवले गेले होते. त्यानंतर स्विचेस त्यांच्या सामान्य इनफ्लाइट स्थितीत परत आणले गेले, ज्यामुळे इंजिन पुन्हा कार्यान्वित होण्याची प्रक्रिया आपोआप सुरू होईल. अहवालानुसार, विमान क्रॅश झाले तेव्हा एक इंजिन पुन्हा कार्यान्वित होण्याच्या प्रक्रियेत होते, तर दुसरे इंजिन पुन्हा कार्यान्वित झाले होते,



मात्र, त्याला उड्डाणासाठी हवा तेवढा उर्जेचा जोर प्राप्त झालेला नव्हता. या अहवालाबाबत बोलताना नागरी विमान वाहतूक खात्याचे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलंय की, ' हा प्राथमिक अहवाल आहे. याच्या आधारे आपण कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकत नाही. यापूर्वी असे अपघात झाले तर ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवावा लागायचा. आता आपणच वेगाने हे पूर्ण तपासू शकतो. एआयबी ही स्वतंत्र बॉडी आहे. त्यात मंत्रालयातच काही हस्तक्षेप नसतो. पायलटच्या संभाषणाच्या आधारे काही निष्कर्ष काढता येणार नाही. कारण ते अत्यंत तोकडे संभाषण आहे. पुढची तपासणी आवश्यक आहे. त्या अहवाल.

### प्रत्येक सेकंदाला काय घडत गेले?

१५ पानांच्या या प्राथमिक अहवालात एअर इंडियाच्या या विमानामध्ये उड्डाण झाल्यानंतरच्या काही सेकंदातच काय घडले होते, याची माहिती देण्यात आली आहे. २६० जणांचा मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या एअर इंडिया फ्लाईट १७१ या विमानाच्या अपघातामागचे संभाव्य कारण या प्राथमिक अहवालातून मांडण्यात आले आहे. एअर ॲक्सीडेंट इन्व्हेस्टीगेशन ब्यूरोच्या या अहवालामधून पायलट्सच्या संभाषणाकडे अधिक ठामपणे लक्ष वेधण्यात आले आहे. थोडक्यात, हा रिपोर्ट कोणत्याही अंतिम निष्कर्षापर्यंत येत नाही. परंतु, त्यामधून पायलट्सच्या संभाषणाबद्दलचेच अधिक तपशील पुरवले गेलेले आहेत. अहवालानुसार, 'विमानाने दुपारी १ वाजून ३८ मिनिट आणि ४२ सेकंदांनंतर १८० नॉट्सचा मॅक्सिमम रेकॉर्ड केलेला एअरस्पीड गाठला आणि त्यानंतर लगेचच, इंजिन १ आणि इंजिन २ साठी इंधन कट-ऑफ स्विच एका सेकंदाच्या अंतराने 'रन' पोझिशनवरून 'कट-ऑफ' पोझिशनवर हलवले गेले.'



### विमान अपघातफोटो स्त्रोत

कॉकपिटच्या व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये, एक पायलट दुसऱ्याला विचारत आहे की त्यानं 'कटऑफ' का केले? दुसऱ्या वैमानिकाने असे म्हटले आहे की 'त्याने असें केलेले नाही.' खरे तर, दोन्ही फ्यूएल कंट्रोल स्विचेस हे सामान्यतः जमिनीवर असताना इंजिन चालू किंवा बंद करण्यासाठी वापरले जातात. मात्र, अपघाताच्या अगदी काही क्षण आधी, म्हणजेच टेकऑफनंतर हे स्विचेस लगेचच 'रन'वरून 'कटऑफ' स्थितीत हलवले गेले होते. यामुळे दोन्ही इंजिनांकडून विमान उड्डाणासाठी पुरवला जाणारा उर्जेचा जोर कमी झाला. मात्र, कोणता आवाज कोणत्या पायलटचा आहे, हे या अहवालात स्पष्ट केलेलं नाही. विमानाने उड्डाण केलं तेव्हा सह-वैमानिक विमान चालवत होता, तर कॅप्टन निरीक्षण करत होता. सुमारे १० सेकंदांनंतर, इंजिन १ चा इंधन कट-ऑफ स्विच 'कट ऑफ' वरून 'रन' वर गेला. त्यानंतर चार सेकंदांनंतर, इंजिन २ चा इंधन कट-ऑफ स्विच देखील 'कट ऑफ' वरून 'रन' वर गेला.' आता १ वाजून ३८ मिनिट आणि ५६ सेकंद झाले होते. वाजून ३९ मिनि आणि ५ सेकं म्हणजेच न सेकंदांनंतर, एक पायलटने जमिनीव असलेल्या हवा वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना 'मेडे, मेडे, मेडे' असा संदेश पाठवला. त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही आणि थोड्याच वेळात त्यांनी विमानाचा अपघात होताना पाहिले. जेव्हा इंजिन्सनी काम करणे थांबवले, तेव्हा रॅम एअर टर्बाइन - एक लहान प्रोपेलरसारखे उपकरण - आपोआप सक्रिय झाले. ते इमर्जन्सी हायड्रॉलिक पॉवर प्रदान करते. अहवालात असंही म्हटले आहे की, 'विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये असे दिसून आले आहे की विमानाने उड्डाण सुरू केल्यानंतर लगेचच रॅम एअर टर्बाइन (RAT) सक्रिय झाले होते कारण विमान वर येऊ लागले होते. उड्डाण मार्गावर कोणत्याही मोठ्या पक्ष्यांच्या हालचालीबाबतची माहिती मिळालेली नाही. विमानतळावरील धावपट्टीची सीमा ओलांडण्यापूर्वीच विमानाने गाठलेली उंची उतरणीला लागलेली होती.

### 'पायलट आणि क्रू उड्डाणासाठी फिट होते'

एअर इंडियाच्या या विमानात उड्डाणासाठी जाण्यापूर्वी पायलट आणि क्रू ची तपासणी करण्यात आली होती. उड्डाणासाठी ते फिट आहेत का, हे तपासण्यासाठी ही तपासणी करतात. अहवालानुसार, दोन्ही पायलट मुंबईचे होते आणि उड्डाणाच्या एका दिवसापूर्वीच अहमदाबादला पोहोचले होते. त्यामुळे त्यांना पुरेसा आराम मिळालेला होता. पायलट आणि क्रूची स्थानिक वेळेनुसार ०६:२५ वाजता ब्रीथ ॲनलायझर टेस्टही झाली होती. त्यात ते 'फ्लाइट ऑपरेट करण्यासाठी फिट' असल्याचे आढळले होते. या अहवालानुसार, अपघातग्रस्त विमानात इंधन भरण्यासाठी ज्या टाक्यांचा वापर करण्यात आला होता, त्यातून घेतलेले इंधनाचे नमुने 'समाधानकारक' असल्याचे आढळले आहे. एव्हिएशन तज्ज्ञांनी बीबीसीला यापूर्वी सांगितले होते की, इंधनाच्या संदर्भातील काहीतरी गोंधळ हे अपघाताचे संभाव्य कारण असू शकते. इंधनात गडबड असल्यास किंवा अडथळा निर्माण झाल्यास दोन्ही इंजिन निकामी होऊ शकतात, असंही ते म्हणाले होते. विमानाचे इंजिन्स अतिशय अचूक फ्युएल मीटरिंग सिस्टीमवर अवलंबून असतात. ही सिस्टीम ब्लॉक झाली तर इंधन पुरवठा थांबू शकतो आणि इंजिन्स बंद होऊ शकतात. या अहवालात असंही म्हटले आहे की, एपीयू फिल्टर आणि डाव्या विंगच्या रिफ्युएल/जेटीसन वॉल्व्ह मधून 'अतिशय अल्प प्रमाणात' इंधनाचे नमुने गोळा करण्यात आले आहेत. या अहवालानुसार, 'हे नमुने अशा प्रयोगशाळेत तपासले जातील ज्याठिकाणी एवढ्या कमी प्रमाणातील नमुन्यांची तपासणी करणे शक्य असेल.

### चौकशीसाठी संपूर्ण सहकार्य : एअर इंडिया

एअर इंडियानंही या अहवालानंतर निवेदन जाहीर केले आहे. या अपघातातील पीडित कुटुंबांबरोबर असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसंच तपास यंत्रणांना पूर्ण सहकार्य करणार असल्याचंही कंपनीने म्हटले आहे. अहवालातील कोणत्याही तपशिलाबाबत मात्र या निवेदनात एअर इंडियाने काहीही म्हटले नाही. 'एअर इंडिया १७१ अपघातातील पीडित कुटुंबांसोबत आहे. आम्ही शोकमग्न असून शक्य ती सर्व मदत करण्यास कटिबद्ध आहोत. १२ जुलै २०२५ रोजी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (AAIB) कडून प्रसिद्ध झालेला प्राथमिक अहवाल आम्हाला मिळाला आहे,' असे निवेदनात म्हटले आहे. एअर इंडिया सर्व संबंधित संस्था, नियामक संस्थांच्या साथीने काम करत आहे. AAIB आणि इतर अधिकाऱ्यांना आम्ही तपासात संपूर्ण सहकार्य करत राहू. तपास अजूनही सुरू असल्यामुळे आम्ही कोणत्याही विशिष्ट तपशिलावर भाष्य करू शकत नाही. सर्व प्रश्नांसाठी संपर्क करण्याचा सल्ला आम्ही देत आहोत, असंही एअर इंडियाने निवेदनात पुढे म्हटले आहे. या अहवालातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आतापर्यंत बोईंग ड्रीमलाइनर ७८७ किंवा त्यामध्ये वापरण्यात आलेल्या GE GENx-1B इंजिन ऑपरेटरसाठी कोणत्याही प्रकारची ॲडव्हायजरी (दिशानिर्देश) जारी करण्यात आलेली नाही. तांत्रिक बिघाडाची शक्यता सध्या नाकारली आहे. पण हा प्राथमिक अहवाल असल्याने तपशीलवार माहिती मिळेपर्यंत वाट पाहावी लागेल.

### पण तरीही, अहवालातील काही बाबी अत्यंत धक्कादायक आहेत.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे : दोन्ही फ्युएल कंट्रोल स्विच 'रन' स्थितीतून 'कट-ऑफ' स्थितीत बदले गेले होते. पण तरीही, ही तांत्रिक चूक होती का? सॉफ्टवेअरशी संबंधित काही समस्या होती का? की ही मानवी चूक होती?, अशा प्रश्नांची उत्तरे अद्यापही अनुत्तरित आहेत. एअर इंडियाचं फ्लाइट १७१ हे विमान १२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनकडे निघाले असताना विमानाने उड्डाण घेल्यानंतर काही वेळातच ते कोसळले होते. या अपघातात २४२ पैकी २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. इतर मृतांसह अपघातातील बळींचा आकडा २६० वर पोहोचला. हे विमान कोसळल्यानंतर एक दाट वस्तीच्या भागात पडले त्यामुळे त्याठिकाणीही काही जणांचा मृत्यू झाला होता. अपघात झालेलं विमान बोईंगचं ७८७-८ ड्रिमलायनर विमान होते. कोसळण्यापूर्वी विमानातून एअर ट्रॅफिक कंट्रोलला 'मे डे' सिग्नल देण्यात आला होता. हे विमान बायरामजी जीजीभाईय मेडिकल कॉलेज आणि सिव्हिल हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या हॉस्टेलवर कोसळले होते. या दुर्घटनेत विमानातील फक्त एका प्रवाशाचा जीव वाचला होता. ब्रिटनचे रहिवासी असलेले विश्वासकुमार रमेश हे यातून बचावले होते. आपण यातून कसे वाचलो, यावर अजूनही मलाच विश्वास बसत नसल्याचे त्यांनी अपघातानंतर सांगितले होते. या विमान दुर्घटनेत मृत्यू



## चीनने आखलेले सारे मेगाप्लॅन्स भारतासाठी धोकेदायकच.!

चीन, तिबेटच्या यारलुंग येथे असणाऱ्या त्सांगपो नदीवर जगातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प उभारत असून त्याकरिता तिथे १३७ अब्ज डॉलर्स खर्च करून बंधारा बांधत आहे. आजवरच्या सर्वात मोठ्या थ्री गोर्जेस डॅम, ज्यामधून २२२५० मेगावॅट वीज निर्मिती केली जाते त्याहून हा बंधारा तिप्पट मोठा असल्याचे म्हटले जात आहे. बंधारा पूर्ण झाल्यानंतर चीन त्यातून ६०००० मेगावॅट ऊर्जा उत्पन्न केली करू शकतो. या बंधाऱ्याच्या माध्यमातून चीन पाणी थांबवू शकतो तसेच पाणी सोडूही शकतो. चीनने पाणी रोखल्यास भारतातील नद्या कोरड्या पडू शकतात अन् अचानक पाणी सोडल्यास पुराचे धोके निर्माण होऊन सियांग पट्टा नष्ट होऊ शकतो. म्हणूनच हा महाकाय बंधारा भारतासाठी वॉटर बॉम्ब ठरू शकतो. या बंधाऱ्यासमीप एका भुयाराची निर्मिती केली जाणार असून भूकंप, भूस्खलन झाल्यास त्यापासून बचाव करणे अशक्य होईल अशा शक्यता व्यक्त केल्या जात आहेत. या बंधाऱ्यामुळे हिमालयाचा संवेदनशील भाग देखील प्रभावित होण्याच्या शक्यता वर्तविल्या जात आहेत. अरुणाचल प्रदेशच्या सीमाभागाशी चीनचा सीमाभाग जोडला गेला असल्याने अरुणाचल व इतर सीमावर्ती भूभागासाठी धोका निर्माण होऊ शकतो. यारलुंग येथील त्सांगपो नदी जी जगातील सर्वात मोठ्या नद्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते ती नदी अरुणाचल प्रदेशात येऊन मिळाल्यावर ब्रम्हपुत्रा या नावाने ओळखली जाते. चीनने या जलविद्युत प्रकल्पासाठी कोठल्याही प्रकारचे करार केलेले नाहीत. भारताशी यासंबंधी काही करार होऊ शकेल असे वाटत नाही. अशा परिस्थितीत अमेरिकन सत्ता देखील भारताच्या पाठीशी उभी राहण्याची शक्यता वाटत नाही. चीनच्या या मेगा प्रकल्पामुळे सीमाभागात हवामान बदल आणि जैवविविधतेचे प्रश्न उपस्थित होणार आहेत.म्हणूनच भारताने चीनशी फक्त पाण्याच्या मुद्द्यावर अवलंबून न राहता आपले स्वतंत्र धोरण आखले पाहिजे.

**राजन पांजरी,** जोगेश्वरी.

## युवा वर्गामध्ये ह्रदयविकारांचा वाढता आजार चिंताजनक!

पुर्वी ह्रदयविकाराचे आजार (हार्डअटॅक) याबाबत एक वयोमर्यादा होती साधारणतः वयाच्या ६० वर्षांनंतर या आजारांचे प्रमाण जास्त रहायचे.परंतु गेल्या काही वर्षांत ३० ते ५० वर्षे वयोगटामध्ये हृदयविकाराच्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक व्यक्तींची रहानिमानाची, खानपानाची,मादक द्रव्ये व अन्य व्यसन यामुळे दिनचर्येच्या शैलीमध्ये मोठ्या प्रमाणात बदलाव आल्याचे दिसून येते.पंजाब मधील फिरोजपुर मधील गुरूहर सहाय या मैदानावर २९ जून २०२५ रविवारला हरजीत सिंह नामक युवा क्रिकेट खेळाडू बैटींग करतांना छक्का मारला व अचानक हार्ट अटैक आला व तो तिथेच पडला आणि त्याचा मृत्यू झाला ही धक्कादायक बाब आहे.यामुळे सर्वांचेच ह्रदय हळूहळून आले व खेळाडूंमध्ये शोककळा पसरली.यापुर्वीही मुंबईमध्ये जून २०२४ मध्ये क्रिकेट मैचच्या दरम्यान राम गणेश तेवर नामक खेळाडूने छक्का मारल्या बरोबर हृदयविकाराचा झटका आला व क्रिकेट खेळतांना अशीच ह्रदयद्रावक घटना घडली व या ४२ वर्षीय या खेळाडूचा मृत्यू झाला.ह्रदयविकाराच्या मृत्यूचे अनेक कारणे असू शकतात मादक द्रव्ये सेवन करणे, धुम्रपान, तंबाखू, गुटका,मद्य सेवन यांचाही ह्रदयविकारावर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम होतो व पुढे चालून मृत्यूचे कारण बनत असते.त्याचप्रणाणे मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर, वाढता तनाव,अनियमित जीवनशैली, दिनचर्येत फास्ट फूडचे वाढते प्रमाण,आहाराची ढासळती गुणवत्ता,वेळोवेळी आरोग्याची काळजी न घेणे व व्यायामाचे कमी प्रमाण,वाढते लठ्ठपणा,इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम युवावर्गामध्ये होत असल्याने ह्रदयविकाराच्या आजारांचाधोका वाढतो आहे. युवावर्गामध्ये ह्रदयविकाराच्या आजारांमध्ये भर टाकली(बीपी व शुगर)डायबिटीजने हाई ब्लड शुगरचा सरळ प्रभाव ह्रदयविकाराच्या आजारांवर होतो.या आजारांचे मुख्य कारण म्हणजे मसालेदार पदार्थ,ऑयली फूड,फास्ट फूड,अती कोल्ड्रिंक्स घेणे आणि मिठाई यामुळे डायबिटीजचे प्रमाण वाढुन सरळ ह्रदयविकारांचे आजार होत आहे किंवा होवू शकतात.सोबतच सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे सुध्दा ह्रदयविकाराचे आजार दिसून येतात.आपण पाहिले की सध्याच्या परिस्थितीत अनेक अभिनेता,गायक, हास्य कलाकार आणि निर्देशक याचा ह्रदयविकाराच्या आजारांनी मृत्यू झाल्याचे आपण पाहिले.यात वयोमर्यादा ३०,४०,५० वर्षे अशा प्रमाणे कमी वयोमर्यादा आहे.या वयात ह्रदयविकाराच्या आजारांने मृत्यू (हार्डअटॅक) होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक, गंभीर व धक्कादायक आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर

# वाळू तस्कर झाले कष्टकरी, जिल्हा प्रशासन झाले भ्रष्टाचारी!

## सावळी सदोबा परिसरात बिनधास्त वाळू चोरी – अधिकाऱ्यांचा मूक संमतीचा ठसा?

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - जिल्ह्यातील सावळी सदोबा परिसरात दिवस रात्र वाळू तस्करी सुरू असून यामुळे नद्यांचे परिसंस्थान धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी महसूल, पोलीस, गौण खनिज विभाग, व पटवारी यांची सतत गस्त असूनही वाळूचे ट्रॅक्टर, टीपर्स मोठ्या प्रमाणात भर्राट्या मारताना दिसत आहेत. प्रश्न असा निर्माण होतो की, एवढ्या बंदोबस्तात ही चोरी कशी सुरू आहे?

ागरिकांनी उपस्थित केलेला हा प्रश्न आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळू तस्करांकडून संबंधित अधिकाऱ्यांना दरमहा ठराविक 'हप्ता' दिला जातो. ज्या ट्रॅक्टर अथवा वाहन चालकांनी हा हप्ता निश्चित केलेला नाही, त्यांच्यावर केवळ 'चिरीमिरी' साठी कार्यवाही केली जाते. ही कार्यवाही म्हणजे कायद्याची अंमलबजावणी नसून, पैसे वसुलीची सरकारी पद्धतच असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. फक्त ठराविक वाहनांवर कार्यवाही - उघड उघड पक्षपात केला जात असून प्रत्येक दिवशी शेकडो ट्रॅक्टर, डंपर वाळू उपसा करतांना दिसून येतात, पण कार्यवाही मात्र एखाद-दोन वाहनांवरच केली जाते. ही कारवाई सुद्धा केवळ 'गांधी' गोळा करण्यासाठी केली जाते, असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. कारवाईचे ढोल बडवले जात असले तरी, या ढोलामागे भ्रष्टाचाराचा ठेका लपलेला असल्याचे स्पष्ट होत आहे. या सर्व प्रकारात अधिकाऱ्यांचे वाहन खर्च, खाजगी खर्च, वसुली मोहिमा यासाठी लागणारा पैसा अप्रत्यक्षपणे जनतेच्याच खिशातून जात असल्याचे पाहायला मिळत आहे. परिणामी, वाळू तस्कर सुटतात, भ्रष्ट अधिकाऱ्यांची संपत्ती वाढते आणि सामान्य नागरिक महाग वाळू मिळवत असल्याने आर्थिक अडचणीत सापडतो. होणाऱ्या घाट लिलावात काय उरेल असा एकूण परिस्थितीतून दिसून येत आहे की आगामी काळात वाळू घाटांचे लिलाव होणार आहेत, पण त्यामध्ये घाटधारकाला वाळू उरणार का, हा प्रश्नच आहे. कारण वाळू आधीच मोठ्या प्रमाणात चोरीला जात असून, लिलावधारक घाट सुरू करण्यापूर्वीच रिकामा होतोय का असा अहवाल पुढे येत आहे. तसेच नैसर्गिक संतुलन बिघडणार आणि नद्यांमधील वाळू संपल्यास, पाण्याची पातळी कमी होणे, पूर परिस्थिती वाढणे, पर्यावरणीय नुकसान होणे हे गंभीर परिणाम जिल्ह्याला भोगावे लागतील.

### जनतेचा सवाल, कारवाई कोण करणार?

सामान्य नागरिक, गोरगरीब मजूर यांच्यावर रेती दरवाढीचा भार टाकणाऱ्या या भ्रष्ट वाळू साखळी कोण मोडनार? केवळ पत्रव्यवहाराने आणि कारवाईच्या नाटकाने नव्हे, तर ठोस आणि पारदर्शक पद्धतीने कारवाई झाली पाहिजे, हीच जनतेची एकमुखी मागणी आहे.

यामुळे हा विषय केवळ आर्थिक नव्हे, तर पर्यावरणीय संकटाचा आहे. अधिकाऱ्यांची बेहिशोब अमाप संपत्ती असून वरपासून पाठींबा असल्याने अधिकारी बेशिस्त झाले आहे. अनेक अधिकाऱ्यांच्या नावावर व त्यांच्या नातेवाइकांच्या नावावर अमाप बेनामी संपत्ती आढळून आल्याच्या तक्रारी आहेत. ही हिंमत त्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच मिळत असल्याचे बोलले जात आहे.

## महागाव येथील आठवडी बाजारात चोरीच्या उद्देशाने आलेल्या ४ महिलांवर कारवाई

महागाव - काल दिनांक 11/7/2024 रोजी दुपारी 4.00 वाजेच्या दरम्यान शुक्रवार आठवडी बाजार मध्ये पंचायत समिती गेट समोर 4 महिला चोरी करण्याच्या उद्देशाने संशयास्पद रित्या मिळून आल्याने त्यांच्याविरुद्ध बी एन एस एस कलम 128 प्रमाणे त्यांच्यावर तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार महागाव यांचे समक्ष त्यांनी कोणत्याही प्रकारची चोरी किंवा दखल पात्र गुन्हा करू नये व आळा बसावा याकरिता प्रस्ताव सादर करून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी त्यांचे चांगल्या वर्तणुकीचे बॉण्ड घेण्यात आले आहे. त्या महिलांची नावे खालील प्रमाणे आहेत. 1) छबिला नाना उबाळे वय 50 वर्ष राहणार नेताजी नगर यवतमाळ 2) काजल विजय लाडे वय 30 वर्ष रा. नेताजी नगर यवतमाळ 3) निशा मानचंद नाडे वय 32 वर्षे राहणार नेताजी नगर यवतमाळ 4) उज्वला देविदास नाळे वय 32 वर्ष राहणार नेताजी नगर यवतमाळ. सदर कारवाई पो. नि. धनराज निळे, सपोनी सरस्वती राठोड, पीएसआय कायंदे, पीएसआय राठोड, मपोशी विद्या राठोड, बीट जमलदार गजानन जाधव, पो कॉ सुशील जाधव, स्वप्निल रायवाडे, विवेक पारडकर यांनी केली आहे.

# बच्चु कडु यांची ७/१२ कोरा पदयात्रा १४ जुलैला महागाव तालुक्यातील अंबोडा इथे पोहचणार

### महागाव तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे जगदिश नरवाडे यांचे आवाहन

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - कर्जबाजारी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा यासह विविध मागण्या घेवुन शेतकरी नेते, तथा माजी मंत्री बच्चु कडु यांनी सात जुलै रोजी सातबारा कोरा यात्रा काढली असुन ही यात्रा १४जुलै रोजी ,अंबोडा (ता.महागाव) येथे दुपारी दोन वाजता पोहचणार असुन शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जगदिश नरवाडे यांनी केले आहे.

निसर्गाच्या अवकृपेमुळे सततची होणारी नापिकी,मिळणारे अल्प उत्पादन मालाला भाव त्यातून लागवड खर्च सुध्दा निघणे अवघड झाल्याने डोक्यावर कर्जाचा वाढता डोंगर यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा या विवंचनेत सापडून शेतकरी राजा आपले जीवन संपवत आहे. त्यामुळे निवडणुकीच्या अगोदर महायुती सरकारने शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमाफी करण्याचे आश्वासन देवून शेतकऱ्यांची मते आपल्या पदरात पाडून घेतली. परंतु सत्ता मिळताच शब्दाचा खेळ करून सरकारने कर्जमाफीचे आश्वासन पुर्ण करण्यास नकार दिल्याने शेतकऱ्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे या कर्जबाजारी शेतकऱ्यांचा आवाज बनुन महायुती सरकारला कर्ज माफीच्या आश्वासनांची आठवण करुन देण्यासाठी तसेच विविध मागण्या घेवुन माजी मंत्री बच्चु कडु यांनी दिनांक ७ जुलै पासुन पापळते चिलगव्हाण .सातबारा कोरा यात्रा आयोजित केली असुन ही यात्रा दिनांक१४जुलै रोजी महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथे पोहचून त्याठिकाणी शासन व्यवस्थेचा बळी ठरुन विदर्भातील पहिली शेतकरी आत्महत्या झालेल्या स्मृतीशेष साहेबराव पाटील करपे व त्यांच्या परिवारातील मृत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करुन ही यात्रा अंबोडा येथे पोहचणार असुन त्याठिकाणी दुपारी दोन वाजता समारोप होणार आहे. त्यानिमित्त आज शुक्रवार(११जुलै) रोजी अंबोडा येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्य सचिव बबलु जवंजाळ, जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे, शिवाजीराव देशमुख, अमृतराव देशमुख, दिपक आडे, दत्तराव कदम, डॉ. संदीप शिंदे, नारायण पतंगराव, हनवंतराव देशमुख, प्रविण ठाकरे,तात्या शिंदे, संदीप ठाकरे, अमोल आवटे यांच्या सह विविध पक्ष,सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. महागाव तालुक्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बच्चु कडु यांना पाठिंबा द्यावा असे आवाहन जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केले आहे.

# स्व. शेषराव पाटील जिनिंग प्रेसिंगची जागा वादाच्या भोवऱ्यात; संपूर्ण आर्थिक व्यवहाराची चौकशी होणार

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - शहरातील पुसद-कारला रोड लगत व महात्मा फुले चौक समोरील शेषराव पाटील जिनिंग प्रेसिंगची दहा एकर जमीन व इमारत मशनरी विक्री प्रक्रिया रद्द करून संस्थेची संपूर्ण मालमत्ता संस्थेला परत करणे बाबत संस्थेचे उपाध्यक्ष राजेश सोळंके व इतर तीन यांनी पणन महासंचालकाला दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ३० जून २०२५ सहकारी कायद्यातील कलम ८३ नुसार चौकशी करण्याचा आदेश पारित झाला आहे.पुसद जिनिंग प्रेसिंग १०० कोटी किमतीची १० एकर जमीनीला मिळालेल्या विक्री परवानगीच्या शर्ती व अटींचे पालन न करता वैयक्तिक सार्थ साधण्यासाठी आरसी प्लास्टो कंपनी नागपूर यांना केवळ ३५ कोटी १ लाख रुपयात विक्री केली आहे.

याच जिनिंग प्रेसिंग मधील मिशनरी भंगार केवळ ५५ लाखात ठराव न घेता बेकायदेशीर रित्या विक्री केली आहे. याबाबत संस्थेचे हित जोपासण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष राजेश सोळंके संजय लोंढे संचालक इकबाल खा मिर आलम खा माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब ठेंगे यांनी पणन महासंचालकाला तक्रार केली आहे या तक्रारीनुसार जिल्हा निबंधक यवतमाळ यांनी चौकशीमध्ये संबंधिताचे बयान नोंदविण्यात आलेले आहे जिनिंग प्रेसिंग विक्री केलेल्या दहा एकर खरेदी खतात मशनरी भंगार व इमारत विक्री केली व संचालक मंडळाची परवानगी ठराव न घेता जिनिंग चे अध्यक्ष विजयराव चव्हाण व संचालक सुभाष जाधव सय्यद नवाब राजाम बाजार यांनी संगनमत करून स्वताचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी ५५ लाखाच्या भंगार मशनरी विक्री परस्पर केली आहे.५५ लाख रुपयाची नोंद जिनिंगच्या रेकॉर्डला घेतलेली नाही दहा एकर जमीन विक्री करत असताना शासनाने दिलेल्या नियम व अटी चे पालन न केल्यामुळे मुंबई पणन संचालकाकडे रिविजन क्रमांक २५/२५ नुसार प्रलंबित आहे राजकीय दबावामुळे तोंडी मिळालेल्या स्टे थांबवण्यात आला आहे कलम ८३ ची चौकशी करण्यासाठी केटी. खराटे निबंधक घाटंजी यांची नियुक्ती केली असून दोन महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचा आदेश पारित झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष विजयराव चव्हाण यांचे आर्थिक गैरव्यवहार उपाध्यक्ष राजेश सोळंके,संजय लोंढे, संचालक इकबाल खा मीर आलमखा व माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब ठेंगे यांच्या तक्रारीवरून लवकरच जनतेसमोर येतील असे तक्रार कर्त्याचे खात्रीलायक मत आहे.

# शेख आयाज खुनातील फरार आरोपींना अटक करुन मोका अंतर्गत कारवाई करा

### खंडाळा व अमृत नगर गावकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - ६ जुलै २०२५ रोजी शेख आयाज शेख हारुन वय २१ या इसमाचा खंडाळा घाटातील जंगलात खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने प्रेताला दगड गोट्याने मातीने पुरुन ठेवले होते या खुणाच्या घटनेमधील तीन संशयित आरोपींना पोलीस प्रशासनाने तात्काळ अटक केली आहे.पन या खून प्रकरणी दि.११ जुलै २०२५ रोजी खंडाळा व अमृत नगर येथील ग्रामस्थांनी भेट उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गाठून निवेदनाद्वारे गावातील घडत असलेली आपबितीची माहिती दिली.

या गंभीर खून प्रकरणातील आरोपीला गंभीर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी यावेळी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. सदर आरोपींना मोका अंतर्गत कारवाई करून या गावातून तात्काळ गावाबाहेर काढण्यात यावे आणि या गुन्ह्यातील उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करावे उर्वरित आरोपी गावात येऊन जीव मारण्याच्या धमक्या गावकऱ्यांना देत असून गावात दहशत निर्माण झाली आहे.

यांच्यापासून इतर गावकऱ्यांना धोका निर्माण होऊ शकतो आरोपीच्या फेसबुक अकाउंटवर अनेक घातक शस्त्राचे फोटो आहेत त्यामुळे आरोपी हा शस्त्राचा वापर करून कोणतीही अनुचित घटना घडवून आणू शकतो असा आरोप देखील यावेळी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला आहे भविष्यात होणाऱ्या खुणाचा प्रकार टाळण्यासाठी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे निवेदन देताना खंडाळा अमृत नगर गट ग्रामपंचायतचे पोलीस पाटील सरपंच तंटामुक्ती अध्यक्ष तसेच गावातील महिला,पुरुष असा सातशे ते आठशे जनसमुदाय यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता पोलिसांनी गावकऱ्यांना दिलासा देत आरोपीकडल्या कोणत्याही व्यक्तीनी धमकी दिली तर तुम्ही ११२ वर फोन करा पोलीस तात्काळ पोहोचतील असे आश्वासन देऊन या ग्रामस्थांना परत पाठविले.

# कोणीही न मागता 'शक्तीपीठ महामार्ग 'का लादला जातोय?

### महागावातील शेतकऱ्यांची हायकोर्टात धाव

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - राज्य सरकारने राबविलेल्या 'शक्तीपीठ महामार्ग' प्रकल्पाला अनेक जिल्ह्यांमधून तीव्र विरोध होत आहे. विशेषत यवतमाळ जिल्ह्यातील महागाव आणि उमरखेड तालुक्यांतील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाविरोधात नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सुमारे बारा जिल्ह्यांतील २७,५०० एकर सुपीक जमीन या द्रुतगती महामार्गासाठी लागणार असून, या जमिनी पिढ्यानपिढ्या शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा आधार राहिल्या आहेत. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, या महामार्गाची कुणीही मागणी केलेली नाही, तरीही तो कंत्राटदारांच्या फायद्यासाठी जबरदस्तीने रेटला जातोय.

महामार्गामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीमध्ये हजारो झाडांची कत्तल, वनजमिनींचा ऱ्हास, नद्या-विहिरींच्या प्रवाहात बदल, भूगर्भ जलस्तरातील घट, पुराचा धोका अशा गंभीर बाबींचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात येणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या मार्गासाठी आधीपासूनच उपलब्ध असलेल्या इतर रस्त्यांचे पर्याय असताना, नवीन महामार्गाची आवश्यकता काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागपूर-तुळजापूर मार्ग आधीच अस्तित्वात आहे, तुळजापूर-पंढरपूरसाठी पुणे-सोलापूर महामार्ग आहे, पंढरपूर-कोल्हापूरसाठी सोलापूर-कोल्हापूर महामार्ग, तर कोल्हापूर-रत्नागिरी आणि गोव्यासाठी अन्य मार्ग उपलब्ध आहेत. मग शेत जमिनींमधूनच रस्ता का काढायचा? महागाव व उमरखेड तालुक्यात मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी सन्मानपूर्वक परत पाठवत, "मोबदला आधी जाहीर करा" अशी मागणी केली. शेतकऱ्यांचा रोष असा की, गरज नसलेल्या रस्त्यासाठी जमीन हिसकावून विकासाच्या नावाखाली त्यांच्या आयुष्यावर गदा आणली जात आहे. "विकास गरजेचा आहे, पण सुपीक जमिनी कधीच पुन्हा निर्माण करता येणार नाहीत. या जमिनीच पिढ्यांना पोसतात. आज जर त्या काँक्रिटखाली गाडल्या, तर उद्या आम्ही काय खायचं?"असा टोकाचा सवाल शेतकरी विचारत आहेत. तीन महिन्यांतच महायुती सरकारने शक्तीपीठ महामार्गाबाबत भूमिका पलटल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. सरकारने या प्रकल्पाचा फेरविचार करावा आणि शेतकऱ्यांच्या मताचा आदर करावा, अशी मागणी आता उग्र रूप धारण करत आहे. करीता सातबारा कोरा या पदयात्रेमध्ये महागाव तालुक्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्याग्रस्त आणि इतरही सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन बच्चु कडु यांना पाठिंबा द्यावा असे आवाहन जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी केले आहे.

# बच्चू कडू यांच्या 7/12 पदयात्रेचा तुपटाकळी गावात जल्लोषात स्वागत

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक व अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांनी सातबारा कोरा या पदयात्रेची सुरुवात भारताचे पहिले कृषिमंत्री स्वर्गीय पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावातून ७ जुलै ला सुरू केली.


अमरावती जिल्ह्यातील सुरू झालेली ही पदयात्रा आज यवतमाळ जिल्हा दिग्रस तालुक्यातील तुपटाकळी या गावी 11 जुलै ला पोहोचली. यावेळी तुपटाकळी येथील मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी, व महिला बचत गटांच्या वतीने यात्रेचे स्वागत मोठ्या थाटात केले. सातबारा कोरा हि पायी यात्रा सध्या दिग्रस तालुक्यातील संघर्ष मत प्रवास करणार आहे. शेतकरी, शेतमजूर, विधवा, अपंग, बेरोजगार तरुण ग्रामपंचायत कर्मचारी, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांचे हक्क शासनापर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने ही जन चळवळ उभी राहिली आहे. यात सर्वपक्षीय नेत्यांना व नागरिकांना सहभागी होण्याचे आव्हान माजी मंत्री बच्चू कडू यांनी केले आहे.

या पदयात्रेने दिग्रस तालुक्यातील तिवरी, चिरकुटा येथून तुपटाकळी या गावी प्रवेश केला आहे. इथे स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभागाने पदयात्रेचे जंगी स्वागत केले. ढोल ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजीच्या जल्लोषात यात्रेचे आगमन झाले. विविध संघटना, प्रहार संघटना, ग्रामपंचायत तुपटाकळी, पत्रकार संघटना, युवक मंडळे, श्रीराम मंदिर संस्थान तुपटाकळी च्या वतीने शाल, नारळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व परिसर.आला रे आला शेतकऱ्यांचा वाघ आला.. या घोषणाने परिसर दणाणला होता. पदयात्रा 11जुलै ला श्रीराम मंदिर संस्थान तुपटाकळी येथे मुक्काम थांबणार आहे. त्यानंतर 12 जुलै रोजी वसंत नगर मार्गे काळी दौलत पुसद तालुक्यात प्रवेश करेल आणि 14 जुलै रोजी महागाव तालुका अंबोडा येथे सांगता होणार आहे. दिग्रस तालुक्यातील दोन दिवसांचा हा प्रवास सामाजिक भरलेला असणार आहे.

शेतकरी, शेतमजूर, अपंग, मच्छीमार, मागासवर्गीय घटक यांच्या मागण्या मान्य झाल्या शिवाय, कितीही संकट आली तरी मागे हटणार नाही .138 किमी.चा हा प्रवास पूर्ण करणार. आणि 14 जुलै ला सर्व जाती धर्मातील शेतकरी बांधवांनी महागाव तालुक्यातील आंबोडा येथे मोठ्या संख्येने हजर राहावे असे आव्हान मा. मंत्री बच्चू कडू यांनी केले.

# को.दौ.विद्यालयात पालक शिक्षक कार्यशाळा संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथील कोषटवार दौलतखान विद्यालय व गोधाजीराव मुखरे कनिष्ठ महाविद्यालयात पालक शिक्षक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अडथळा निर्माण करणाऱ्या बाबींवर यावेळेस पालकांसोबत चर्चा करण्यात आली. कार्यशाळेकरीता इंझोरी कारंजा येथील शैक्षणिक समुपदेशक राजकुमार दिघडे, जनमुक्ती संघर्ष वाहिनीच्या कार्यकर्त्या शैला सावंत, मुख्याध्यापक गजानन वायकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजकुमार दिघडे यांनी ओघवत्या शैलीत मार्गदर्शन करताना शिक्षणात मातृभाषेचे महत्व विविध उदाहरणे देऊन सांगितले. प्राथमिक शिक्षण मराठी भाषेत दिल्यास बुद्धिविकासाची गती जास्त असल्याचे अनेक दाखले दिले. यावेळी त्यांनी मोबाईल वापर, वेळेचा अभाव अशा सद्यस्थितीतील अनेक समस्यांवर चर्चा केली. शैला सावंत यांनी पालकांकरिता अशा कार्यशाळा आवश्यक असल्याचे सांगताना विविध कौटुंबिक समस्या आणि घरातील वातावरण कसे असावे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी कार्यशाळेचा हेतू विशद करतांना पालक आणि शिक्षक यांच्यातील समन्वय आणि मराठी भाषेतील शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. यावेळी उपमुख्याध्यापक रैना बघेल आणि पर्यवेक्षक बलराम मुराडी उपस्थित होते. चंद्रकांत ठेंगे यांनी सूत्रसंचालन केले तर मनिष अनंतवार यांनी आभार मानले. यावेळी इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष


जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - तालुक्यातील बोरगांव येथे जिल्हा परिषद शाळा म्हटल की फक्त गोर-गरिबांच्या मुलांची शाळा असाच समज समजात निर्माण झाला आहे. त्यासाठी प्रशासनच जबाबदार आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना उपयुक्त असलेल्या सोई सुविधा मिळत नाही. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी जे योग्य वातावरण निर्माण करावे लागते ते करण्यासाठी शिक्षकांना त्रास होतो. जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी जात असते पहिली ते सातवी शाळेत मुलांना शाळेत येण्याची आवड निर्माण करावी लागेल.

शाळेची चांगली इमारत, शाळेच्या इमारतीवर बोलकी चित्रे शाळेला मैदान, खेळण्यासाठी खेळणी, पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था, शौचालय अशा इतर सुविधांकडे प्रशासनाने लक्ष द्यायला पाहिजे. अशा सुविधा उपलब्ध राहिल्या तर पालकांना आपल्या मुलांना जबरदस्तीने शाळेत पाठवायची गरज पडणार नाही. मुले आवडीने शाळेत जातील. परंतु केळापूर तालुक्यातील बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत याच्या उलटच चित्र आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष अश्विन ठाकरे यांनी बोरगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत भेट दिली असता त्यांच्या निदर्शनास आले आहे की शाळेकडे प्रशासनाचे बिलकुलच लक्ष नाही.शाळेच्या इमारतीत पाणी गळते. स्लॅब ची छपाई पडली आहे,व्हरांड्यातील टीनच्या शेडला असलेले फाटे मोडून आहे. मुलांना आणि मुलींना एकाच ठिकाणी शौचालय अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे तरी कसे ? याच कारणांनी तर पालक आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत न टाकण्याचा विचार करत नसेल? अशी अनेक प्रश्न निर्माण होत आहे.शाळा टिकवायची असेल तर शाळेचा दर्जा वाढवावा लागेल प्रशासनाने याकडे लक्ष द्यायला पाहिजे.

# उमरखेडमध्ये चरस-गांजा व ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदी आणावी युथ मुवमेन्टची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - शहरातील बायपास, खस्त मैदान, गव्हर्नमेंट हायस्कूल परिसर आणि इतर ठिकाणी चरस, गांजा व नायट्रोजन गोळ्यांची खुलेआम विक्री होत असल्याने तरुणाई नशेच्या गर्तेत अडकत असुन गँगवार व खुना च्या घटना घडत असल्याचे चित्र समोर येत आहे तसेच, ऑनलाईन गेम्सच्या वाढत्या व्यसनामुळे तरुणांचे मानसिक स्वास्थ्य ढासळत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक संघटन युथ मुव्हमेन्ट ऑफ महाराष्ट्र च्या कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्याकडे निवेदन सादर करून अंमली पदार्थांवर कठोर कारवाई व ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदीची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही ठिकाणी रात्रीच्या वेळेस तरुणांच्या जमावात खुलेआम नशा केली जाते. यामुळे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नसून अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. यापूर्वी पोलिस प्रशासनाला तक्रारी देऊनही कारवाई न झाल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली. चरस, गांजा व नायट्रोजन गोळ्यांच्या विक्रेत्यांविरुद्ध विशेष मोहिम राबवावी ,व्यसनाधीन तरुणांसाठी पुनर्वसन योजना कराव्या ,संवेदनशील भागात गस्त वाढवून जमावावर नियंत्रण घालावे ,ऑनलाईन गेम्सवर सरसकट बंदी आणि याबाबत शासन पातळीवर ठोस धोरण आखावे,शाळा -महाविद्यालयां मध्ये जनजागृती मोहीम सुरु करावी अश्या मागणी निवेदनाद्वारे करण्यात आल्या . निवेदन सादर करताना सोहल खान, साबीर नाईक, शाहीद खान, फैजान लाला, उमेर खान, अजीम अली, साकीब शेख, माजीद खान, जिदान शेख, अयान खान, सिबगत उल्ला आदी युवक उपस्थित होते.

## वेचक



### गंभीर अपघात झाल्यास जबाबदार कोण ? चीखलाने झाली घसरन, गंभीर अपघाताची भीती

आर्णी - वरूड भक्त येथील पुलाचे काम गेल्या कित्येक महिन्यांपासून कासव गतीने सुरू होते. अखेर कसे बसे काम केले मात्र त्यातही गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह आहे.पुलाच्या बाजूला चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.त्याकडे अधिकाऱ्यांचे व कंत्राटदाराचे दुर्लक्ष होत आहे. रस्त्यावरील दुचाकी वाहन चालकाला संकटाशी झुंज दिल्या प्रमाणे चिखल पार करावा लागत आहे.अजून किती दिवस सामान्य नागरिकांना जाणीव पूर्वक छळाल असा प्रश्न प्रखरपणे निर्माण होत आहे. रिमझिम पावसाच्या सरींनी चिखलातून पायदळ चालणेही कठीण होत आहे.मुरूम टाकून रस्ता सुरळीत करण्या येवजी तेथील बांधकामाची माती तिथेच पसरवून देऊन नागरिकांची मज्जा पाहत असल्याचे दिसते.तेथील निर्माण झालेल्या घासरानित गंभीर अपघात झाल्यास जबाबदार कोण ? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.



### निंबी ते गाजीपूर चिखलमय रस्ता कधीं पुर्ण होणार..? शालेय विद्यार्थ्यांसाठी हा रस्ता जीवघेणा

पुसद - मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत पुसद तालुक्यातील निंबी ते गाजीपुर रस्त्याचे काम सुरु आहे या रस्त्याने मुरूम व गिट्टी टाकून कामाला सुरुवात करण्यात आली पार्डी येथे रस्त्यावर माती मिश्रित मुरूम टाकल्याने रस्ता असा चिखलमय झाला आहे त्यामुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने या चिखलय रस्त्याने पायदळ जाणे ही कठीण झाली आहे अनेक वाहनधारकाचे छोटे-मोठे अपघातही झाले आहे शाळेकरी विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनाही शाळेत जाताना त्रास सहन करावा लागत आहे संबंधित विभागाने लक्ष देऊन या रस्त्यावर गिट्टी व चुरी टाकून तात्काळ रस्ता लेवल व दुरुस्त करावा अशी मागणी पार्डी,गणेशपुर, गोरेवाडी, गाजीपुर येथील नागरिक करीत आहे.

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा वर्धापन दिन साजरा

यवतमाळ - महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, यवतमाळ येथे महामंडळाचा ४७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा व्यवस्थापक मुकेश सोनकुसरे यांनी जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती दिली. यावेळी त्यांनी लाभार्थ्यांना वसूली विहीत मुदतीत भरणा करून सिबील रेकॉर्ड चांगले करण्याचे आवाहन केले. अन्यथा संबंधित लाभार्थ्यांना इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळणार नाही. तथापि कर्जाची नियमित परतफेड करून महामंडळाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोकांना महामंडळातील योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक मुकेश सोनकुसरे यांनी केले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### यश ने मिळवीले 'यश'

**अमरावती-** नुकत्याच लागलेल्या सि.ई.टी परिक्षेत पी.सी.एम ग्रुप मध्ये वलगाव येथील यश याने सर्वाचे अंदाज चुकवून मिळवीले मोठे यश. वलगाव येथील यश बाळु वानखडे याने घवघवीत ९७.७३ टक्के मार्क मिळवून यश संपादन केले. यश याने मिळवीलेल्या यशाचे कौतुक व अभिनंदन सर्व स्थरातुन होत आहे. यश हा वलगाव ग्रामीन भागातून मातंग समाजातुन आलेला व १० वी पर्यत मराठी माध्यम मध्ये शिकलेला विद्याथी माठे यश मिळवेल असा अंदाज नव्हता. परंतु यश ला मोठे 'यश' मिळेल याची खात्री होती. यश यांने हलाकीच्या परिस्थीला मात करुन यश मिळवीले. यशचे वडील बाळु वानखडे हे हातमजुरी करतात. बाळु वानखडे यांनी ॲड. बाबुराव बेलसरे यांच्या समवेत विदर्भ दौ-यावर असलेले माजी खासदार समीर भुजबळ यांची यवतमाळ येथे भेट घेतली. समीर भुजबळ यांना यश बद्दल माहीती सागीतल्यावर भुजबळ यांनी यश चे कौतुक करुन अभिनंदन केले, भावी शैक्षणीक आयुष्या करीता भरभरुन शुभेच्छा दिल्या.



### डॉ. रा.गो चवरे यांचा सत्कार

**अमरावती-** परिवर्तन प्रबोधनीच्या दुसऱ्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष थोर साहित्यिक व विचारवंत प्राचार्य डॉ. रा गो चवरे यांचा डॉ. गोविंद कासट मित्रमंडळीने सत्कार केला. कांचन लॉन येथे आयोजितउद्घाटन सत्कार व पुस्तक प्रकाशित इत्यादी कार्यक्रमानंतर आजपासून ४०-४५ वर्षांपूर्वी साहित्यिक वक्ता कबड्डी प्रशिक्षक कथाकथनकार प्राचार्य डॉ. सतीश तराड सोबत भेटीगाठी झालेले डॉ. रा. गो चवरे सर यांच्या सोबतच्या जुन्या आठवणी ताज्या केल्या. डॉ. गोविंद कासट यांनी कार्यक्रमाचे आयोजक अनेक नवोदितांना साहित्य क्षेत्रात घडविणाऱ्या प्राचार्य वक्ता सामाजिक कार्यकर्ता लेखिका कवयित्री डॉ. शोभा रोकडे यांनी अनेकांना सोबत घेता या कार्यक्रमाचे आयोजक आयोजन केले व हा योग कार्यक्रमानंतर लगेच डॉ. गोविंद कासट यांनी साधला. मित्र मंडळातील सुदर्शन गांग प्रदीप जैन प्राचार्य डॉ. सुभाष गवई दीपक दारव्हेकर वा.पा जाधव निलेश ठाकरे संजीवनी काळे स्वतः शोभाताई रोकडे इतर मंडळी कार्यक्रमाला हजर होते सत्कार प्रसंगी अनेक साहित्यिक भगिनी हजर होत्या.

### 'आझाद खान' यांची महाराष्ट्र राज्य संघटकपदी नियुक्ती

**अमरावती-** अक्षर मानव ही संघटना साहित्य, समाज, कला, शिक्षण, पर्यावरण, उद्योग,श्रम, विज्ञान अश्या मानवी जगण्याच्या ९६ विषयात काम करते या सर्व विषयांच्या अनुषंगाने विविध संमेलने, शिबिरे, कार्यशाळा गप्पा, संवाद सहवास, माणूस संमेलन, साहित्य संमेलन, शिक्षण संमेलन, चित्रपट संमेलन अशा प्रकारचे उपक्रम महाराष्ट्रभर विविध भागात राबवते. अक्षर मानव संघटना ही जाती, धर्म, देव, वर्ग, वर्ण, लिंग, प्रदेश, भाषा याच्या पलीकडे जाऊन माणसाला एकत्रित आणणारी आंतरराष्ट्रीय माणसांची संघटना आहे. या संघटनेच्या राज्य संघटक पदी तिवस्याचे आझाद जमा खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आझाद खान यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांना राज्य संघटक म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली आली आहे.

## विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**अमरावती/का.प्र.**
क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेणा-या व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या उन्हाळी - २०२५ विद्यापीठीय पर्यायी परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागाकडून जाहीर करण्यात आले असून, २६ जुलै, २०२५ पासून सदर परीक्षा घेण्यात येणार आहेत. सर्वसंबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, अमरावती जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची परीक्षा ही विद्याभारती महाविद्यालय (केंद्र क्र.१२६), अकोला जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलडाणा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची विज्ञान महाविद्यालय, मलकापूर (३२२), यवतमाळ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (४०१) आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही त्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील नमूद परीक्षा



केंद्रांवर घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेशपत्र पर्यायी परीक्षेकरिता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रनिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी.

तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

### जखमी, आजारी, अनाथ आणि अपंग प्राण्यांना काळजी, उपचार आणि पुनर्वसन करणाऱ्या संस्थेची निवड

# 'वसा' ला २०२५ चा सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**
जखमी, आजारी, अनाथ आणि अपंग प्राण्यांना काळजी, उपचार आणि पुनर्वसन करणाऱ्या 'वसा' (वासा कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन अमरावती) या संस्थेची सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार-२०२५ साठी निवड करण्यात आली आहे. शिवसेनेचे नेते व आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाचे कर्तेधर्ते दिवंगत सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारी व्यक्ती वा सामाजिक संस्था वा संघटनेला दरवर्षी लोकगौरव पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या पुरस्काराचे वितरण होईल.

सोमेश्वर पुसतकर यांनी आपल्या हयातीत शेकडो गरजू लोकांना मदत केली. जात - पात, धर्म, विचारधारा, संघटना याचा विचार न करता त्यांनी समाजातील वेगवेगळ्या घटकांना कायम ताकत देण्याचे काम केले आहे . पुसतकर यांच्या कार्याचा वारसा चालत राहावा आणि त्यांच्यासारखं काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना बळ मिळावे ,यासाठी लोक फाऊंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान, आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ, न्यू आझाद हिंद गणेशोत्सव मंडळ व सोमेश्वर पुसतकर मित्रमंडळ या संस्थांच्या वतीने दरवर्षी पुसतकर यांच्या स्मृतीदिनी हा पुरस्कार देण्यात येतो.

सन २०२१ मध्ये 'नानक रोटी ट्रस्ट', २०२२ ला श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, २०२३ यावर्षी रक्तदान समिती, अमरावती तर २०२४ ला कुष्ठरोग्यांच्या आयुष्यात नवीन पहाट आणणाऱ्या ख्यातीप्राप्त 'तपोवन' या संस्थांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.

**वासा कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन अमरावती**
यावर्षीच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेली 'वसा' ही संस्था २००८ मध्ये शुभम सायंके, निखिल फुटाण, गणेश अकर्ते व भूषण सायंके या तरुणांनी संकटात सापडलेल्या प्राण्यांना वाचवण्याच्या उद्देशाने स्थापन केली. छत्री तलावाजवळ मंगलधाम कॉलनीत उभारण्यात आलेल्या श्री गोवर्धन पशुवैद्यकीय रुग्णालय व 'वसा' प्राणी बचाव केंद्रात जखमी, आजारी, अनाथ आणि अपंग प्राण्यांना काळजी, उपचार आणि पुनर्वसन केले जाते.

भटक्या आणि सोडून दिलेल्या प्राण्यांना सर्व प्रकारची आवश्यक वैद्यकीय मदत येथे दिली जाते. श्री गोरक्षण संस्था अमरावतीने या तरुणांना त्यांच्या कामासाठी मंगलधाम कॉलनीत जागा उपलब्ध करून दिली आहे. वसा संस्थेचे कार्यकर्ते दरवर्षी दरवर्षी हजारो भटक्या व अनाथ प्राण्यांना वाचवतात, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करतात आणि त्यांचे पुनर्वसनही करतात. प्राण्यांचे नियमित लसीकरणही येथे होते.

आतापर्यंत २५ हजारापेक्षा अधिक प्राणी व पक्ष्यांवर 'वसा' मध्ये उपचार व पुनर्वसन झाले आहे.

समाजातील प्राणी व पक्षी प्रेमी नागरिकांच्या मदतीने या तरुणांची ही धडपड सुरु आहे. विशेष म्हणजे यात काम करणारे सगळे तिशीच्या आतील तरुण आहेत. अतिशय समर्पित भावनेने हे तरुण ज्यांना बोलता येत नाही, ज्यांना आपली वेदना सांगता येत नाही अशा मूक प्राणी व पक्ष्यांसाठी काम करतात.

## मिशन आयएएसच्या कार्यक्रमात डॉ.गोविंद कासट यांची उपस्थिती

**अमरावती/का.प्र.**
मिशन आयएएस च्या माध्यमातून अनेकांचे शासकीय सेवेत अधिकारी बनण्याचे स्वप्न साकारणाऱ्या प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी मातोश्री कमलताई गवळी यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त वलगाव येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या दिवशी स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे सुद्धा आयोजन होते. मोहिनी खंडागळे व सुशांत गायकवाड या अनुक्रमे आयएएस झालेल्या व नागपूरचे आरएसपी अधिकारी यांच्यासह मातोश्री कमलताई गवई व इतर पाहुण्यांचे मार्गदर्शन लाभले. या



कार्यक्रमास आयएएस संचालक व स्पर्धा परीक्षा तज्ञ डॉ. नरेशचंद्र काठोळे अमेरिकेतील प्रकाश सिकची जुबीन सिकची प्रतिमा खंडारे प्रीती सोमाणी आरुषी सोमानी मोठ्या प्रमाणातील आयोजक शिक्षक मंडळी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट यांची उपस्थिती लाभली. डॉ. गोविंद कासट यांचा सत्कारही आयोजकांनी केला मिशन आयएएस चा असा उत्कृष्ट कार्यक्रम आवश्यक असा कार्यक्रम व भावी पिढी घडविणारा कार्यक्रम व यात उपस्थित राहण्याची संधी आपणास मिळाली. या डॉ. गोविंद कासट यांनी आयोजकाबद्दल अभिनंदन व आभार व्यक्त केले. डॉ. नरेशचंद्र काठोळे आयोजकांचे रिसॉर्टचे सर्वेसर्वा उद्योजक वलगाव या आपल्या जन्मभूमीचे पांग फेडणारे प्रेमकिशोरजी सीकची यांचे अभिनंदन केले.

## विभागीय आयुक्तालयात १४ जुलैला विभागीय लोकशाही दिन

**अमरावती/का.प्र.**
विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. १४ जुलै २०२५ रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail. com efkeâbkee dcg_amravati@rediffmail. com या ई-मेलवर विहित नमून्यात पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक म्हणजे 'जीवनदूत'

### प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांचे प्रतिपादन

**अमरावती/का.प्र.**
ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक हे केवळ प्रशिक्षण देणारे शिक्षक नसून, ते कुशल वाहनचालक घडवून अपघातांचे प्रमाण कमी करणारे 'जीवनदूत' आहेत, असे प्रतिपादन (RTO) प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा व शहरातील ड्रायव्हिंग स्कूल संचालकांसाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या वेळी प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विपिन लेदाडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवशंकर कातडे आणि सोहम हेमने उपस्थित होते. प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना वाहनाचे तांत्रिक ज्ञान, रस्त्यावरील



चिन्हांची माहिती, समृद्धी महामार्गासारख्या महामार्गांवर वाहन कसे चालवावे, वेग किती ठेवावा, घाट रस्ते व रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंगचे नियम याचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

'प्रत्येक प्रशिक्षकाने प्रशिक्षणाच्या वेळी ओळखपत्र बाळगावे. वाहन प्रशिक्षण काळात योग्य सूचना व मार्गदर्शन केल्यास अपघातांवर नियंत्रण मिळवता येईल,' असेही त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेत ड्रायव्हिंग स्कूल संचालकांच्या अडचणींवर चर्चा होऊन त्यांचे निराकरण करण्यात आले. हा उपक्रम प्रथमच राबविल्याबद्दल सर्व संचालकांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.

## पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात व्याख्यानमाला

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावतीच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाने आयइइइ (IEEE)पुणे सेक्शनच्या सहकार्याने अभ्यासक्रम समृद्धी कार्यक्रमांतर्गत (Curriculum Enrichment Program - CEP) एक तज्ज्ञ व्याख्यानमाला (Expert Lecture Series) सुरू केली आहे. या व्याख्यानमालेचा उद्देश प्राध्यापक व संशोधन विद्यार्थ्यांना अध्यापन नवकल्पना व विद्युत अभियांत्रिकीसह शैक्षणिक तंत्रज्ञानातील तांत्रिक प्रगतीबद्दल सखोल ज्ञान प्रदान करणे हा आहे. ही व्याख्यानमाला दर शनिवारी आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. एस. बी. वरकड (कार्यक्रम समन्वयक) व डॉ. ए.



एस. तेलंग (विभागप्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

तज्ज्ञ व्याख्याते व त्यांच्या विषयांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत डॉ. निधी मिश्रा, पुणे – नवोन्मेषी अध्यापनासाठी AI साधने, डॉ. अविनाश खरात, मेंटर, जेएसपिएम, पुणे– डिजिटल कंटेंट विकास, डॉ. अंजली वैद्य, वरिष्ठ सल्लागार, पुणे–इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम व इटीएपी, डॉ. प्रिया गोखले, विभागप्रमुख, जेएसपीएम, पुणे –अनुभवाधिष्ठित शिक्षण व मूल्यमापन साधने, डॉ. एस. एम. बकरे, माजी अधीक्षक अभियंता, पुणे–विद्युत प्रणालीतील औद्योगिक दृष्टिकोन व आधुनिक साधने या उपक्रमातून पीआरपीसीएम महाविद्यालयाचा सतत व्यावसायिक विकास, शैक्षणिक नवोन्मेष आणि आयइइइ सारख्या प्रतिष्ठित संस्थांशी सहयोग करण्याचा प्रयत्न अधोरेखित होतो. या व्याख्यानमालेमुळे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार असून, अकादमिक उत्कृष्टतेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. विद्युत अभियांत्रिकी विभागाकडून सर्व तज्ज्ञ व्याख्याते व आयइइइ पुणे सेक्शन यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात येत आहेत.

## निरज अर्बन को -ऑप निधी बँकेने दर्यापूरकरांना लाखो रुपयांनी गंडविले; खातेदारांची पोलिसांत तक्रार

**खल्लार** - चार वर्षांपूर्वी दर्यापूर शहरात मोठ्या थाटामाटात सुरू झालेल्या निरज अर्बन को ऑप निधी लि. या बँकेतील गुंतवणूकदारांची तब्बल ५० ते ६० लाखाने फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मागिल चार वर्षापासून निरज अर्बन निधी बँकेची शाखा दर्यापूर शहरात उघडण्यात आली होती. त्यामध्ये ग्राहकांना मोठ्या प्रमाणात आमिष दाखवून येथिल कर्मचाऱ्यांनी ठेवी ठेवण्यास सांगितले. मात्र गेल्या काही दिवसांपासून निरज अर्बन को




ऑप निधी ली चे कार्यालय काही महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे संबंधित खातेधारक व ठेवीधारक रोज बँकेत यायचे पण बँक ला कुलूप पाहून परत वापस जायचे बँक बंद असल्यामुळे ठेवीदार पूर्णपणे कमालीचे धास्तावले आहेत. दर्यापूर तालुक्यात बँकिंग तसेच सहकाराची उज्ज्वल परंपरा लाभलेली असून . अद्यापपर्यंत ग्राहकांची कोणीही आर्थिक फसवणूक केलेली नाही. त्यामुळे दर्यापूरकरांनी मोठ्या विश्वासाने निरज अर्बन को-ऑप. निधी लि. मध्ये पैसा गुंतविला होता. सुरुवातील बँकमध्ये सुरळीत व्यवहार सुरु होते नंतर ती बँक बंद असल्यामुळे, ठेवीदारांच्या मनात खूप मोठा संशय निर्माण झालेला आहे. दर्यापूर येथिल शाखा पूर्णता बंद करण्यात आली आहे. यापूर्वी ढोकेश्वर बँक नामक संस्थेने दर्यापूरकरांना अश्याच प्रकारे गंडविले होते. निरज बँकचे संचालक युवराज भगवान गिन्हे याच्या विरोधात चांदुर रेल्वे येथे गुन्हा दाखल आहे. दर्यापूर पोलिस स्टेशन मध्ये खातेदारांनी लेखी स्वरूपात तक्रार दिली असून पुढील कार्यवाही दर्यापूर पोलिस करीत आहेत.

## कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा

**अमरावती-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. सिकची रिसोर्ट वलगाव ता. जि. अमरावती येथे हा मेळावा होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी mahaswayam.gov.in यावेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित रहावे, मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.



**टाकरखेडा संभू : पेरणी झाल्यानंतर लगेच पावसाने गेल्या तीन ते चार दिवसापासून दमदार हजेरी लावल्यामुळे सर्व पिके निघाली. सगळीकडे हिरवे हिरवे रान दिसत आहे.**
**(छाया- संतोष शेंडे)**




# ‘ब्रिक्स’ परिषदेचे फलित

जागतिक पटलावर आजघडीला अस्तित्वात असणाऱ्या बहुराष्ट्रीय संघटनांमध्ये ‘ब्रिक्स’ या संघटनेला एक वेगळे स्थान आहे. अलीकडील काळात डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफसंदर्भात ब्रिक्स राष्ट्रांना दिलेल्या धमक्यांमुळे ही संघटना ठळकपणे चर्चेत आली आहे. यादरम्यान ब्राझीलमध्ये ‘ब्रिक्स’ची शिखर परिषद नुकतीच पार पडली. या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहिले; परंतु चिनी राष्ट्राध्यक्षांची अनुपस्थिती चर्चांना फोडणी देऊन गेली. या परिषदेत पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा करण्यात आलेला निषेध ही भारतासाठी मोठी उपलब्धी ठरली.

यंदाची ब्रिक्स शिखर परिषद भारतासाठी यशस्वी ठरली आहे. या परिषदेत एप्रिलमध्ये जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत केलेला निषेध भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे. यंदाच्या ब्रिक्स घोषणापत्रात सीमापार दहशतवादाचा स्पष्ट उल्लेख केला असून आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरोधातील व्यापक अधिवेशन (सीसीआयटी) या भारताच्या दीर्घकालीन प्रस्तावास ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी समर्थन दर्शविले. भारताने जागतिक स्तरावर दहशतवादाविरोधात एक सुसंगत आणि सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय करार व्हावा यासाठी आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी व्यापक परिषद म्हणजेच सीसीआयटीचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघासमोर १९९६ साली मांडला होता. या प्रस्तावाचे मूळ उद्दिष्ट म्हणजे दहशतवादाची एक स्पष्ट व्याख्या करणे, त्याविरोधात आंतरराष्ट्रीय कायदे सुसंगत करणे आणि सर्व देशांनी अशा कृतींना कोणत्याही राजकीय, धार्मिक किंवा वैचारिक कारणास्तव समर्थन न देणे याची हमी घेणे.

गेल्या अनेक दशकांत या प्रस्तावावर चर्चा झाली असली तरी काही देशांनी, विशेषतः अमेरिका, इस्लामिक राष्ट्रे आणि चीनने विविध कारणांनी त्यावर आक्षेप घेतल्यामुळे तो प्रस्ताव अद्याप ठरविण्यात आलेला नाही. भारताला हा विषय ब्रिक्ससारख्या बहुपक्षीय व्यासपीठांवर सातत्याने मांडावा लागतो. कारण यामध्ये सामील काही देश, विशेषतः चीन आणि रशिया, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमधील कायम सदस्य असल्यामुळे त्यांच्याशी एकमत आवश्यक असते. यावर्षी झालेल्या रिओ दि जिनेरो येथील ब्रिक्स परिषदेत भारताने दहशतवादविरोधी लढाईला केंद्रस्थानी आणले. यावेळी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात भारताने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा स्पष्टपणे निषेध करण्याचा मुद्दा समाविष्ट केला, तसेच दहशतवाद्यांच्या आंतरराष्ट्रीय हालचाली आणि त्यांच्या आर्थिक स्रोतांचा बंदोबस्त करण्याची गरज अधोरेखित केली. ब्रिक्सच्या नव्या सदस्यांमध्ये, विशेषतः इराण आणि इथिओपिया यांसारख्या देशांमधील अंतर्गत संघर्षांचा संदर्भ घेतल्यास, दहशतवादाच्या प्रश्नावर एकमत साधणे अधिक कठीण होते. तरीही भारताने संयम आणि दृढ भूमिका घेत ब्राझीलसह सहमती साधत दहशतवादाविरोधात निर्णायक भाष्य घडवून आणले. ब्रिक्सच्या मंचावर भारताच्या या भूमिकेला मिळालेले पाठबळ हे भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे लक्षण आहे.

केवळ दहशतवादच नव्हे, तर बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेची गरज, जागतिक संस्थांमध्ये सुधारणा आणि विकसनशील देशांच्या समावेशक प्रतिनिधित्वाची मागणीही भारताने ठामपणे मांडली आणि तिला सदस्य देशांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. अलीकडेच पार पडलेल्या शांघाय सहकार संघटना (एससीओ) परिषदेच्या घोषणापत्राच्या पार्श्वभूमीवर याचे महत्त्व अधिक आहे. कारण त्या घोषणापत्रात बलुचिस्तानमधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख व॰ला गेला होता. पण पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख जाणीवपूर्वक वगळण्यात आला होता. त्या तुलनेत ब्रिक्स परिषदेने भारताच्या चिंतेला स्पष्ट आणि निर्णायक स्वरूपाचे समर्थन दिले, हे निश्चितच उल्लेखनीय आहे.

या परिषदेमध्ये केवळ सुरक्षा आणि दहशतवादाचे मुद्दे नव्हते, तर भविष्यातील तंत्रज्ञान व सहकार्याचे दिशादर्शक विषयही उपस्थित करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर जबाबदारीने वापर करण्यासाठी एकत्रित धोरण तयार करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. भारताने गेल्या काही वर्षांत उभारलेली डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा ही वैश्विक आदर्श मानली गेली असून ब्रिक्सच्या परिषदेत तिचे खुले कौतुक झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात दहशतवादविरोधात शून्य सहिष्णुतेची (झिरो टॉलरन्सची) भूमिका घेतली पाहिजे, असे ठाम मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे गाझा पट्टीतील संघर्ष, इराण-इस्रायल तणाव यांसारख्या विषयांच्या पार्श्वभूमीवर संवाद व शांततेच्या माध्यमातून समस्यांचे समाधान शोधणे हीच योग्य दिशा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या बहुपक्षीय संस्थांमध्ये व्यापक सुधारणा करण्याची मागणी केली. त्यांनी विशेषत: हे सांगितले की, या जागतिक संस्थांमध्ये विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व आणि सहभाग निश्चित केला जावा, जेणेकरून जागतिक निर्णय प्रक्रियेत खऱ्या अर्थाने समता आणि न्याय सुनिश्चित केला जाऊ शकेल आणि ही निर्णयप्रक्रिया सर्वसमावेशक बनेल. याखेरीज पर्यावरण, हवामान बदल, जागतिक आरोग्य अशा महत्त्वाच्या विषयांवर बोलताना पंतप्रधानांनी भारतातील आयुष्मान भारत योजनेचा संदर्भ दिला आणि लोकांचे व पृथ्वीचे आरोग्य एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेले असल्याचे अधोरेखित केले. ही भूमिका पर्यावरण संवेदनशील धोरणांना समर्थन देणारी आणि सतत विकासाच्या मार्गावर नेणारी आहे.

या ब्रिक्स परिषदेला आणखी एक विशेष महत्त्वाचे परिप्रेक्ष्य लाभले ते म्हणजे चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या अनुपस्थितीचे. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदा ते ब्रिक्स शिखर परिषदेपासून दूर राहिले. हे नेमके का झाले, यावर विविध विश्लेषणे समोर आली आहेत. काही ठिकाणी तर जिनपिंग सत्ता हस्तांतरित करण्याच्या तयारीत असल्याचेही म्हटले गेले. मात्र हे अपप्रचार असण्याची शक्यता अधिक आहे. कारण चीनमधील सत्ताधारी व्यवस्थेची पारदर्शकता अत्यंत मर्यादित असते आणि सत्य माहिती सार्वजनिक होणे हे जवळजवळ अशक्य असते. आजचे वास्तव पाहता शी जिनपिंग यांचे चिनी सत्तेत अजूनही पूर्ण वर्चस्व आहे. पण त्यांच्या अनुपस्थितीमागे एक प्रमुख कारण म्हणून हे सांगितले जात आहे. एकंदरीत पाहता यावर्षीची ब्रिक्स परिषद भारतासाठी अत्यंत निर्णायक ठरली आहे.

**अनिल त्रिगुणायत,**
माजी राजदूत



# वैदर्भीय जलसंकट

पूर्व विदर्भात अनेक ठिकाणी काळी माती आहे. यात ‘माँट मोरीला नाइट’ नावाचे ‘क्ले पार्टिकल’ असते. हा तीस टक्के पाणी शोषतो. त्यामुळे जमिनीची सच्छिद्रता कमी होते. पाणी साचते, चिखल होतो. हा प्रकार पिकांसाठी धोकादायक असतो. मग दुबार पेरणी, ओला दुष्काळ अशी परिस्थिती ओढवते. या चक्रातून शेतकरी कधी सुटणार? आकाशातून थेंबही बरसत नसताना हवाहवासा वाटणारा पाऊस धो धो बरसायला लागताच नकोसा होऊन जातो. अवघ्या आठवडाभरापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात तो कोसळत होता. रस्ते जलमय होत होते. उखडून जात होते. पिके वाहून गेल्याने आणि वाहतूक बंद झाल्याने परिसरातील लोक हवालदिल होते. ‘आवर रे बाबा’ असा आर्त सूर त्यांच्याकडून उमटत होता. विदर्भातील शेतकरी त्यावेळी रखरखत्या उन्हाला कंटाळला होता. भरून येणाऱ्या, पण न कोसळणाऱ्या आभाळाला दोष देत होता. डोळ्यांत पाणी आणून पावसाची वाट बघत होता. पुढे आषाढीचा उपवास सुटला आणि पावसाचाही. त्यानंतर ७२ तास तो असा काही बरसला की, त्याने मोठे नदीनाले आणि छोटे ओढेही भरून टाकले. गोसेखुर्द धरणाचे ३३ दरवाजे उघडावे लागले. तेरा हजार क्युबिक मीटर प्रतिसेकंद या वेगाने पाणी वैनगंगा नदीत सोडावे लागले. प्राणहिता, गोदावरी, पाल आणि कठानी या नद्या तुडुंब भरल्या. त्यांनी शेती, गावे, रस्ते, पूल कवेत घेतले. एकट्या गडचिरोली जिल्ह्यातील २१ मार्ग बंद झाले. या पुराने नागपूर, गोंदिया जिल्ह्यांत प्रत्येकी दोन, वर्धा, भंडारा, यवतमाळ, गडचिरोली आणि अमरावतीत प्रत्येकी एक बळी घेतला. कुणी तुडुंब पूल ओलांडताना वाहून गेले. कुणाच्या गाडीवर झाड पडले. कुणाला विजेचा धक्का बसला, कुणाचे घर कोसळले. या पावसात किमान सहा हजार लोक अडकले. शेकडो नागरिकांचे विस्थापन करावे लागले. अनेक घरांची हानी झाली. किमान पाचशे हेक्टवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

पाऊस येतो, पूर घेऊन येतो. तो असतो तोवर त्याची चर्चा होते. तो ओसरला की चार-दोन दिवसांत चर्चाही थांबते आणि जगण्याचे रहाटगाडगे सुरू होते. हे दरवर्षीचेच. मात्र असे का होते, यावरील भक्कम तोडग्यासाठीची चर्चा कमी होते. प्रशासकीय आणि राजकीय दरबारातील चर्चेत औपचारिक प्रस्तावांची शिवाशिवी सुरू होते. पूर्व विदर्भातील या पुराला निसर्गही जबाबदार आहे. पूर्व विदर्भातील जमिनीचा उतार चार टक्के ते पंधरा टक्के या गटात येतो. त्यामुळे जेव्हा पाऊस येतो अथवा धरणातून विसर्ग होतो, त्यावेळी पाणी गतीने वाहून जात नाही. ते पसरते. या भागात वैनगंगा, गोदावरी यांसारख्या नद्या आहेत. त्यांच्या अनेक लहान उपनद्या आहेत. या लहान नद्या जेव्हा फुगतात आणि मोठ्या नदीला जाऊन मिळतात तेव्हा त्यांचा प्रवाह कुंठित होतो. पाणी वाहून जाण्याऐवजी पसरते आणि पूर येतो. या भागाची भौगोलिक रचना बघितली तर इथे काळा दगड आहे. अशा जमिनीवरून पाणी वेगाने पुढे फेकले जात नाही. पूर्व विदर्भात अनेक ठिकाणी काळी माती आहे. यात ‘माँट मोरीला नाइट’ नावाचे ‘क्ले पार्टिकल’ असते. हा तीस टक्के पाणी शोषतो. त्यामुळे जमिनीची सच्छिद्रता कमी होते. पाणी साचते, चिखल होतो. हा प्रकार पिकांसाठी धोकादायक असतो. मग दुबार पेरणी, ओला दुष्काळ अशी परिस्थिती ओढवते. या चक्रातून शेतकरी कधी सुटणार?

पुरामागील महत्त्वाचे कारण म्हणजे, धरणाचे दरवाजे अचानक उघडणे. धरण भरल्याने एकाच वेळी दरवाजे उघडले जातात. हजारो क्युसेक पाणी वेगाने बाहेर येते. त्यातून पुराची आणि नुकसानीची तीव्रता वाढते. हा सगळा प्रकार थांबवायचा झाला तर जलव्यवस्थापनाचे नवे तंत्र वापरायला हवे. दरवाजे उघडण्याचे व्यवस्थित नियोजन केले, तरच पूरबळींना अटकाव घालता येऊ शकेल. महानगरीय समस्या याहून भिन्न आहेत. वेगवान औद्योगिकीकरणामुळे गावखेड्यातील लोंढे शहरात येतात. शहरालगत वसतात. तिथे ना रस्ते असतात, ना नाले. नागपूर शहराच्या ५८ टक्के भागात पावसाळी जलवाहिन्या नाहीत. तिथे पाणी साचणार नाही तर काय? शहरातील पावसाचे पाणी नाग नदी बाहेर नेऊन सोडते, मात्र तिच्या पात्रात जागोजागी अतिक्रमण आहे. कुठे घराच्या भिंती आहेत, तर कुठे सुरक्षा भिंती. काही ठिकाणी झोपड्यांमुळे प्रवाह अडतो. घराघरांत पाणी शिरते. अतिक्रमणे हटत नाहीत.

नाग नदी सौंदर्यीकरणाचा प्रकल्प मार्गी लावण्याची इच्छाशक्ती ठेवून कुणाला तरी पुढे यावे लागेल. पात्रातील अतिक्रमणे हटवावी लागतील. लोकांच्या नजरेत खलनायक व्हावे लागेल. आज खलनायक झालात तर उद्याची पिढी तुमचा नायक म्हणून उदोउदो करील. निवडणुका आणि मतांच्या दुष्टचक्रात पाण्याचे घोंगडे भिजत राहिले, तर मतांचा पूर येईल, पाण्याचा मात्र ओसरणार नाही. हे तथ्य ओळखून उद्याचा विचार करावा, हाच विदर्भातील पूरस्थितीचा सांगावा आहे.

**किशोरी तेलकर**

# बिहार निवडणूक मतदार पडताळणी...

निवडणूक आयोग, निवडणुका नि:पक्ष आणि पारदर्शक व्हाव्यात यासाठी, मतदार याद्यांमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याच्या उद्देशाने मतदार यादी पडताळणी मोहीम हाती घेत असते. या मोहिमेत मतदारांची माहिती अद्ययावत करणे तसेच मतदान यादीतील एकाच मतदाराचे दोनदा आलेले नाव वगळणे, रोजगारासाठी इतरत्र स्थलांतरित झालेल्या मतदारांची यादीतील नावे कमी करणे इत्यादी साठी व्यापक मतदार पडताळणी मोहीम घेत असते याचा मुख्य उद्देश इतर देशातील नागरिकांना मतदानाचा हक्क प्राप्त होऊ नये. निवडणूक आयोगाने बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी व्यापक मतदार यादी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला विरोधी पक्षांतर्फे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल) सह इतर याचिका कर्त्या आहेत. विशेष म्हणजे यात महाराष्ट्रातील शिवसेना उद्धव, राष्ट्रवादी शरद यांनी सुद्धा या विरोधात आपल्या याचिका दाखल केल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जय माल्या बागची खंडपीठासमोर प्रकरणाची सुनावणी झाली. या सगळ्या याचिका कर्त्या तर्फे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल न्यायालयात उपस्थित होते. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या पक्षांचे म्हणणे आहे की या पडताळणी प्रक्रियेमुळे मतदारांना अनावश्यक त्रास होऊ शकतो किंवा काही पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे त्यांच्या मतदानाच्या अधिकारावर गदा येऊ शकते. याचिकाकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या या निर्णयाच्या घटनात्मक वैधतेवर आणि प्रक्रियेच्या योग्यतेवर सुद्धा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या आधी २००३ मध्ये देशात, विशेषतः बिहारमध्ये मतदार यादीची व्यापक पडताळणी झाली होती (Special Intensive Revision of Electoral Rolls) झाली होती. त्यामुळे १ जानेवारी २००३ ही अर्हता दिनांक म्हणून विचारात घेतली गेली होती. सध्या बिहारमध्ये सुरू असलेल्या मतदार यादी पडताळणी मोहिमेच्या संदर्भात, निवडणूक आयोगाने असे नमूद केले आहे की, २००३ ची मतदार यादी पडताळणी मोठी होती आणि त्यामुळे त्या यादीत ज्यांची नावे आहेत, त्यांना काही नवीन कागदपत्रे ज्या मध्ये नागरिकत्व सिद्ध होईल अशी सादर करण्याची आवश्यकता नाही.




२००३ नंतर मतदार यादीत समाविष्ट झालेल्या मतदाराला मात्र त्याचा नागरिकत्वाचा पुरावा सादर करावा लागेल या साठी घरोघरी जाऊन पडताळणी चालू आहे. या मध्ये नागरिकांना एक फॉर्म भरावयाचा असुन निवडणूक आयोगाने अकरा कागद पत्रे जाहीर केले आहेत त्यापैकी एक या सोबत जोडायचे आहे. या मध्ये निवडणूक आयोगाने मतदाराने त्याच्या पालकांचे दोन हजार तीन आधीचे मतदान कार्ड जोडले तरी चालेल असे म्हटले आहे. मतदान यादीत नावनोंदणी करण्यासाठी नियमानुसार १८ वर्षे अधिक तसेच तो भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याला फॉर्म नंबर ६ भरणे आवश्यक असते. हा फॉर्म ओळख पत्रा साठी सुद्धा चालत असतो. त्यामुळे आधारकार्ड हा नागरिकत्व सिद्ध करण्यास सहायक होत नाही.

मागील दहा वर्षात बिहारच्या सीमांचल भागातील जनता मोठ्या संख्येने इतरत्र स्थलांतरित झालीत. तर बांगलादेश लगतच्या मधील जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रोहिंग्या तसेच बांगलादेशातील लोक बेकायदेशीररित्या भारतात स्थायिक झाली आहेत असे बोलले जाते. घुसखोरी करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना आपल्या देशाच्या मतदानाचा हक्क मिळू नये. यासाठी खर तर मतदार यादीची व्यापक पडताळणी कार्यक्रमा द्वारा यादीची पडताळणी होत असेल तर याला खर देशातील काँग्रेस, राजद, राष्ट्रवादी शरद, तसेच शिवसेना उद्धव कडून निवडणूक आयोगाचे स्वागत व्हायला हवे होते.

निवडणुक आयोगाच्या यादीत फॉर्म सोबत जे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सांगितले आहे त्या मध्ये आधार कार्डचा समावेश नाही. या भागातील एका जिल्ह्यात लोकसंख्या पेक्षा आधारकार्ड जास्त असल्याचे बोलले जाते. निवडणूक आयोगाच्या नुसार आधार कार्ड नागरिकत्वाचा पुरावा होऊ शकत नाही. जेंव्हा तुमच्या जवळ आधार कार्ड आहे म्हणजे इतर आवश्यक लागणारे कागद पत्रे आहे. तुम्ही आधार कार्ड काढताना आवश्यक कागद पत्रे देतात मग आताच त्याला विरोध का? असा प्रश्न पडतो. या सुनावणीत उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निवडणूक आयोगाला मतदान यादी पडताळणी करण्याचा पूर्ण अधिकार संविधानाने दिला असल्याचे मान्य केले. विरोधकांच्या पडताळणीला स्थगिती देण्याच्या मागणीला पूर्णपणे खंडपीठाने नकार देत नागरिकत्व सिद्ध करण्याच्या यादीत आधार कार्डचा समावेश करण्याबाबत विचार करण्यास सांगितले आहे. निवडणूक आयोग न्यायालयाच्या या म्हणण्यावर आपल्या प्रतिज्ञा पत्रात काय उत्तर देते तसेच माननीय न्यायालयाचा येणाऱ्या २८ जुलैला काय निकाल येतो हे पाहणे आवश्यक आहे. आज तरी विरोधकांच्या आधार कार्डच्या मागणीला न्यायालयाकडून आधार मिळाला नाही.

**अविनाश देशपांडे**

# मातृत्व आणि नेतृत्वाचा संगम

## डॉ.कमलताई गवई यांचा कर्तुत्व संपन्न जीवनप्रवास

काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, की त्यांचे कार्य केवळ त्यांच्या अधिकारपदांपुरते मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या संवेदनशीलतेतून, समर्पणातून आणि नि:स्वार्थ वृत्तीमधून एका व्यापक समाजाला दिशा देणारे ठरते. डॉ. कमलताई गवई यांचे संपूर्ण जीवन हे अशाच एका आदर्श समाजमातृत्वाचे उदाहरण आहे. त्यांनी जिथे कार्य केले, तिथे केवळ संस्था उभ्या राहिल्या नाहीत, तर माणसे घडली, मूल्ये रुजली आणि सेवा ही नेहमी केंद्रस्थानी राहिली.



त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या नेहमी मागे राहून काम करतात, पण त्यांच्या अस्तित्वाने कार्य पुढे नेले जाते. त्या माजी राज्यपाल आणि व्यापक लोकमान्यतेचे नेतृत्व लाभलेले स्मृतीशेष. दादासाहेब गवई यांच्या अर्धांगिनी आणि भारताचे

**वाढदिवसानिमित्त**

विद्यमान सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्या मातोश्री असल्या तरी त्यांची ओळख ही केवळ या नात्यांपुरती मर्यादित राहत नाही. कारण त्या स्वतःमध्ये एक स्वतंत्र, कर्तबगार आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून आजवर ठामपणे उभ्या आहेत.

मी स्वतः त्यांच्या शिक्षण संस्थेमध्ये अनेक वर्षे कार्यरत असून, या काळात त्यांच्यातील कार्यक्षमतेचा, संवेदनशीलतेचा आणि शिस्तप्रियतेचा अनुभव वारंवार घेतला आहे. त्या संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्याशी, विद्यार्थ्यांशी, पालकांशी केवळ औपचारिक नाते ठेवत नाहीत, तर त्या माणसांशी जिव्हाळ्याने, समजुतीने जोडलेल्या असतात. त्यांच्या दृष्टिकोनात नम्रता आहे, पण निर्णयक्षमतेत ठामपणा आहे. त्या जेव्हा कोणत्याही समस्येसमोर उभ्या राहतात, तेव्हा त्या केवळ विचार करत नाहीत, तर कृतीला मूळ मान देतात. श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी शिक्षण, आरोग्य, अध्यात्म आणि ग्रामीण विकास या सर्वच क्षेत्रांत उल्लेखनीय काम केले आहे. स्मृतीशेष दादासाहेब गवईंचे जन्मस्थान असलेल्या दारापूर येथे बी.ए., बी.कॉम. नंतर बी.एस्सी. अभ्यासक्रम, तसेच पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, आयटीआय, इंग्रजी माध्यमातील शाळा आणि शिक्षणशास्त्र शाखा सुरू करून त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक नवी दृष्टी उघडली. त्यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्थांमधून आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन प्रगतीच्या वाटेवर आहेत. या कार्यात त्यांच्या कन्या सौ. कीर्तीताई अर्जुन या आज विद्यमान अध्यक्ष म्हणून सक्रिय असून, त्यांनीही आपल्या मातोश्रींच्या मार्गदर्शनाचे सुस्पष्ट अनुकरण करत स्वतःचा एक आधुनिक आणि स्पष्ट दृष्टिकोन ठेवून संस्थेचा कारभार अत्यंत यशस्वीपणे सांभाळलेला आहे.

डॉ. कमलताई गवई या केवळ संस्थात्मक प्रमुख नाहीत, तर त्या एक उच्चविद्याभूशीत आहेत. त्या स्वतः पीएच.डी. पदवीधारक असून, आजही विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घटनाक्रम, समस्या, सामाजिक प्रश्न यांच्या संदर्भात त्या सतत अपडेट राहतात. एखाद्या विषयाची माहिती घ्यायची असेल, तर त्या तो विषय संपूर्ण समजून घेतात, विचार करतात आणि त्यानंतर अत्यंत मुद्देसूद आणि सुसंगत भूमिका मांडतात. त्यांची ही बौद्धिक सजगता त्यांना केवळ नेतृत्वातच नव्हे, तर संवादातसुद्धा एक प्रभावी व्यक्तिमत्त्व बनवते.

त्यांचे योगदान संकटकाळातही ठळकपणे जाणवते. कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो किंवा सामाजिक अडचण, त्या वेळोवेळी त्या स्वतः त्या ठिकाणी पोहोचलेल्या आहेत. अनेकदा अशा घटनांचे केंद्र हे अमरावती जिल्ह्याबाहेर असले तरी त्यांनी तिथे जाऊन प्रत्यक्ष मदत पोहोचवलेली आहे. मदतीच्या हातांची गरज असते तेथे त्या प्रथम उपस्थित राहतात. मदत फक्त निधीची किंवा वस्तूंची नसते, तर त्या स्वतः माणसांच्या व्यथेला समजून घेऊन मानसिक आधारही देतात.

त्यांची समाजकार्याची सुरुवात ही यशोधरा महिला विकास संस्था’च्या माध्यमातून झाली. त्या काळात त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, ग्रामीण भागातील शिक्षणविकासासाठी आणि सामाजिक जाणीवा जागृत करण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले. पुढे श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन झाल्यानंतर त्यांनी त्या कार्याला एक व्यापक दृष्टी दिली. आज या संस्थेमुळे अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि मूल्यसंस्कार यांचा पाया अधिक भक्कम झाला आहे. अध्यात्म हे त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचे अधिष्ठान राहिले आहे. त्यांनी विपश्यना साधनेचा अभ्यास करून ‘आचार्य’ ही पदवी प्राप्त केली असून, मोगरा येथे एक विपश्यना केंद्र स्थापन केले आहे. हे केंद्र केवळ धार्मिक नव्हे, तर मानसिक आरोग्य आणि आत्मविकासासाठी कार्यरत आहे. ग्रामीण भागातील अनेक स्त्री-पुरुषांनी इथे आत्मशोध केला असून, मानसिक शांती अनुभवल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्या आजही सकाळी सहा वाजता आपला दिनक्रम सुरू करतात. कार्यक्रमांचे नियोजन, लोकांचे आदरातिथ्य व पाहुणचार, संस्थेच्या सभा आणि ग्रामीण कार्य तेवढ्याच जोमाने हाताळतात.

त्यांचे जीवन हे नेतृत्वाच्या पारंपरिक चौकटीत बसणारे नाही. त्या समोर उभ्या राहत नाहीत, तर सहप्रवासी होतात. आदेश देत नाहीत, मार्ग दाखवतात. माणसं जोडतात, त्यांना उभं राहायला शिकवतात. त्यांच्या संवादात कृत्रिमतेचा लवलेशही नसतो, पण त्यात एक आत्मीय ताकद असते.

आज जेव्हा त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या साऱ्या गोष्टी आठवतात, तेव्हा हे लेखन केवळ स्तुतीगाथा नसून, त्यांच्या मूल्यांशी साधलेला एक आत्मिक संवाद आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेणं, त्यांच्या मार्गदर्शनाचा आदर करणं, आणि त्यांच्याचसारखी समाजाभिमुखता जोपासणं हेच खऱ्या अर्थाने त्यांच्यासाठी शुभेच्छा ठरतील. त्या जिथे सहभागी असतील, तिथे आशा निर्माण करतात, आणि त्यांच्या उपस्थितीने समाजाला नेहमी दिशा मिळते. हीच एक मोठी कमाई आहे.

**डॉ. मल्लू ए. पडवाल**
प्राचार्य, तक्षशिला महाविद्यालय, दारापूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# कावड पालखी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने केली कावड मार्गाची पाहणी

## आवश्यक त्या सुविधा पुरविण्याबाबत लवकरच प्रशासनाला पाठपुरावा



■ प्रतिनिधी | अकोला ■

**आगामी श्रावण महिन्याच्या दृष्टीने अकोल्यात होणाऱ्या ऐतिहासिक अशा कावड यात्रेच्या अनुषंगाने महानगर काँग्रेस कमिटीच्या वतीने अकोला ते गांधीग्राम या कावड मार्गाची पाहणी शनिवारी दुपारी करण्यात आली. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांच्या निर्देशानुसार ही पाहणी करण्यात आली असल्याची माहिती यावेळी काँग्रेसच्या उपस्थित पदाधिकारी वर्गाने दिली.**

अकोल्यातील कावड महोत्सव हा संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. गेल्या काही वर्षांपासून या मार्गाचे काम सुरू असल्याने राज राजेश्वर भक्तांना, कावड मंडळांना कावड पालखी आणण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. आता सदर मार्गाचे काम पूर्ण झाले असले तरी मात्र या मार्गावर कावड पूर्वी विद्युत रोषणाई व्यवस्था करावी, कावड भक्तांसाठी आरोग्य सुविधा या मार्गावर शेवटच्या श्रावण सोमवारी परिपूर्ण असावी असे निर्देश पूर्वीच अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी प्रशासनाला दिले होते. तर आता श्रावण सोमवार सुरू होण्यापूर्वी या मार्गावर आणखीन कोणत्या सुविधा अपुऱ्या आहेत, रस्त्याची परिस्थिती काय याबाबतचा संपूर्ण आढावा घेण्याच्या अनुषंगाने पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांच्या निर्देशानुसार काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गाची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान अनेक असुविधा शिष्टमंडळाला आढळून आल्या. त्याबाबत प्रशासनाला रीतसर सूचना आ. साजिद खान पठाण करतील अशी माहिती महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील वानखडे यांनी पाहणीदरम्यान दिली.

यावेळी महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील वानखडे, कपिल रावदेव, आकाश कवडे, पराग कांबळे, सागर कावरे, अंकुश तायडे, अभिजित तवर, प्रशांत प्रधान व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

**शिवलिंग परिसराची केली सफाई :** गांधीग्राम येथील मार्गाची पाहणी करण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना सदर ठिकाणी शिवलिंग दिसले. मात्र सदर शिवलिंगाला लागूनच याठिकाणी झाडे - झुडुपे आणि गवत वेली मोठ्या प्रमाणात वेढा घातलेल्या होत्या, विशेष म्हणजे ती सर्व सफाईचे काम यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी स्वतःच पुढाकार घेत केले. तर यावेळी उपस्थित कर्मचारी वर्गाला याठिकाणी पुन्हा असा प्रकार निर्माण होऊ नये, वेळीच सफाई करून घ्यावी असे निर्देश दिले.



# कावड - पालखी यात्रेच्या पूर्वतयारीला गती

## आ. सावरकर सह भाजपा पदाधिकाऱ्यांनी केली मार्गाची पाहणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

**महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक कावड यात्रा अकोल्यातील राजराजेश्वर मंदिरात दर सोमवारी पार पडते. १९ किमी पायी प्रवास करून पूर्णामाईच्या जलाभिषेकाने ग्रामदैवत राजराजेश्वरास अभिषेक करण्याची ही परंपरा असून, लाखो शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. यात्रेच्या पार्श्वभूमीवर कोणतीही अडचण उद्भवू नये म्हणून भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे व भाजपा नेत्यांनी संयुक्त पाहणी केली.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेसाठी आवश्यक निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे आश्वासन आ. रणधीर सावरकर यांनी दिले.

यात्रेच्या तयारीचा आढावा घेताना, रस्ते, वीज व्यवस्था, स्वच्छता, अतिक्रमण हटवणे आदी विषयांवर सखोल चर्चा झाली. अकोट फाईल ते पाचमोरी मार्गावरील अतिक्रमण आणि कचरा हटवण्याचे स्पष्ट निर्देश मनपा अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच गांधीग्राम येथील रस्ता २४ जुलैपूर्वी रहदारीस योग्य करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.राष्ट्रीय महामार्ग, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसह विविध विभागांनी उपस्थित राहून पाहणी केली. या वेळी कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, मनपा अभियंता अजय गुजर, राष्ट्रीय महामार्गाचे बागुल, विठ्ठल देवकाते, मृणाली धंगारे आदी अधिकारी उपस्थित होते. शिवभक्तांच्या सूचना लक्षात घेऊन बाभळेश्वर, डाबकी रोड, राजराजेश्वर परिसर, खोलेश्वर अनिकट, नटेश्वर इत्यादी ठिकाणी तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

या पाहणी दौऱ्यात भाजपा नेते विजय अग्रवाल, जयंत मसने, अमोल डोईफोडे, अनिल बिडवे, दिनोडे, मिश्रा, टापरे, श्रीकांत माणिकराव, गजानन घुंगे, तसेच विविध शिवभक्त मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये संतोष पांडे, अमोल गीते, नितीन राऊत, संदीप पवार, विवेक भरणे, गणेश माने, राजेश करिहार, डॉ. किरण ठाकरे, वसंत सोनटक्के, टोनी जयराज आदींचा समावेश होता.

अकोल्याची ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा जोपासण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व भक्तगण एकत्र येऊन भक्कम तयारी करत असून, कावड यात्रेला कोणत्याही अडचणी न येता भक्तीपूर्ण वातावरणात पार पडण्याचे चित्र दिसून येत आहे.

# गुरुपौर्णिमा निमित्त बुलडाणा अर्बन हिवरखेड तर्फे वृक्षारोपण

**हिवरखेड :** सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या बुलडाणा अर्बन शाखा हिवरखेड येथे भाईजींच्या प्रेरणेने, बुलढाणा अर्बन चे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर साहेब यांच्या संकल्पनेतून व पालक संचालक डॉ. किशोरजी केला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विभागीय व्यवस्थापक दळवी साहेब यांच्या मार्गदर्शनात बुलडाणा अर्बन शाखा हिवरखेड च्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त गिऱ्हे सर यांच्या हस्ते श्री. स्वामी समर्थ केंद्र , श्री. महादेव संस्थान, बुलडाणा अर्बन वेअर हाऊस इत्यादी ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रम यशस्वितेकरिता शाखा व्यवस्थापक रामदास भालेराव, सहा.शाखा व्यवस्थापक नितिन तिव्हाने, कर्मचारी विकास जाणे, किरण नाईक, सौ.प्रिती गिऱ्हे, शुभम टवळकर, ऋषभ चोरे, संतोष वाणे, अरुण सेंगर, शिपाई नरेश जैस्वाल, विनोद तळोका आदींनी अथक परिश्रम घेतले.

# अकोला 'एसडीओ' कार्यालय नव्या इमारतीत

**अकोला :** अकोला येथील उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय आता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून नविन इमारतीत स्थलांतरित झाले आहे.

नव्या जागेत सोमवार, दि. १४ जुलै २०२५ रोजी नियमित कामकाज सुरू होईल. कार्यालयाचा पत्ता उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय, पंचायत समितीजवळ, महापालिकेची मागील बाजू, गांधी रस्ता, अकोला असा आहे, असे उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांनी कळवले आहे.

# चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनच्या बालकांची वृक्षारोपण मोहीम

■ प्रतिनिधी | अकोला ■

जमाते इस्लामी हिंदची बालक शाखा असणारी चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन संपूर्ण देशभर पर्यावरण पूरक अभियान राबवित असून देशभरात या संस्थेचे बालके एक लाख झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणार असल्याची माहिती चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनच्या बालकांच्या वतीने शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. 'हात मातीत, मन देशासोबत'या संकल्पनेवर आधारित हे पर्यावरण बचाव अभियान देशभरातील बालकांनी २५ जून पासून प्रारंभ केले असून ते २६ जुलै पर्यंत राबविल्या जाणार आहे. बालकांमध्ये निसर्गप्रेम, जबाबदारी व सेवाभाव निर्माण व्हावा, वृक्षांप्रती आवड निर्माण व्हावी, मोठ्या प्रमाणात देशभरात वृक्षारोपण अभियान राबवावे व या माध्यमातून देशसेवा मुलांच्या अंगी बिंबवल्या जावी या उदात्त हेतूने हे अभियान साकारण्यातआले असल्याचे बालक, बालकांनी हिंदी, इंग्लिश, उर्दू,मराठी या भाषेतून यावेळी सांगितले.ग्लोबल वार्मिंग विश्वभरात मोठ्या प्रमाणात होत असून झाडांची संख्या कमी होत आहे. हवेची गुणवत्ता या दृष्टीने खालावत आहे कोणत्याही अभियानात लहान मुलं हे महत्त्वाचे भूमिका बजावू शकता जेव्हा एखाद्या मूल झाड लावते आणि त्याचे काळजी घेते तेव्हा ते केवळ पूर्तीचेच नाही तर स्वतःच्या भविष्याचे देखील एक सकारात्मक पाऊल असल्याचे यावेळी सांगण्यात आले अकोला महानगरात २५००० बालक व बालिका अनेक शाळा मदरचे मज्जित सोसायटी पार घरे व वस्त्यांमध्ये हे वृक्षारोपण अभियान चालवत असेल याला उस्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले या अभियाना समवेत बालक बालिका हरित प्रतिज्ञा निसर्ग संवर्धनावर आधारित प्रवचने नेचर बॉक्स व अभ्यास दौरे चित्रकला कविता कथाकथन स्पर्धा व्हिडिओ आधी पण या एक महिन्याच्या कालावधीत साकार करण्यात आले.

## Change In Name

I HAVE CHANGE MY NAME
MY OLD NAME
**(MOHAMMAD RAFIQUE)**
AND MY CORRECT NAME
**(MOHAMMAD RAFIQUE FAKIR MOHAMMAD)**
PASSPORT NUMBER:
N1571114
FILE NUMBER:
NG1079074085215

## जाहीर नोटीस

### वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, अकोला

गैरअर्जदार / गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस. ( वाचा : आदेश ४१ नियम १४ )

एम. जे. सी. नं. ३५३/२०२५ — प्रोसेस नं.१८९२/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ — दिनांक : ०९/०७/२०२५

**अर्जदार :** 1) Smt. Meera Wd / o Kishor Baiskar, 2) Atharva S/o. Kishor Baiskar, 3) Om S/o Kishor Baiskar, All R/o Kalane Pura, At Post Ugwa, Tq. & Dist. Akola

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी हया न्यायालयामध्ये

"APPLICATION U/S 8 OF HINDU & MINORITY& GUARDIANSHIP ACT 1956 FOR GRANTING PERMISSION TO SALE THE PROPERTY IN WHICH UNDIVIDED INTEREST OF MINOR RISE' नुसार अर्ज दाखल केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख ०८/०८/२०२५ ठेवलेली आहे. त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः, आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येतील. आज दिनांक ०९ माहे जूलै सन २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला
दिनांक - ०९/०७/२०२५ (शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११६०/२०२५ — प्रोसेस नं.१०७३२/२०२५
चौ.ता. १४/०८/२०२५ — दिनांक : ०७/०७/२०२५

**अर्जदार :** १. लक्ष्मी नंदकिशोर चव्हाण २. लिलाबाई अजाबराव चव्हाण ३. हरिष नंदकिशोर चव्हाण ४. योगेश नंदकिशोर चव्हाण अर्जदार १ ते ४ रा. दहिगांव गावंडे, ता. जि. अकोला. ५. हर्षा सुनिल सोळंके रा. गजानन वाटिका जवळ, व्दारका नगरी, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नंदकिशोर अजाबराव चव्हाण
**पत्ता :-** रा. दहिगांव गावंडे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नंदकिशोर अजाबराव चव्हाण यांचे दि. २०/०४/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११ १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११८१/२०२५ — प्रोसेस नं.१०३५४/२०२५
चौ.ता. १८/०८/२०२५ — दिनांक : ०३/०७/२०२५

**अर्जदार :** 1 Sairabi wd/o Syed Nazrioddin R/o. Infront of Adv R.K. Deshpande, Agarves, Akola. Tq & Dist Akola 2. Arefabi Vasimoddin R/o. Peth Pura, At Post Hiwarkhed, Tq. Telhara, Dist Akola 3. Aasefa Parveen Syed Saleem R/o. Mujawar Pura, Patur, Tq Patur, Dist Akola 4. Syed Wasim Syed Naziruddin R/o. Near Dildar Vakil House, Agar Bes, Old city, Akola, Tq & Dist Akola 5. Sajeda Parveen Syed Ashfaque R/o. Mujawarpura, Patur, Tq. Patur, Dist Akola 6. Syed Azizuddin Syed Naziruddin R/o. Ganga Niwas, Near Vitthal Mandir, Agarbes, Old city, Akola. Tq & Dist Akola 7. Samina Bee Shekh Salim R/o. 336, Masjid wali Galli, Near Karim Floor Mill, Khajrana, Indore, Tq & dist Indore. M. P. 8. Shabana Bee Mohd Afsar Ali R/o. 94/1, South Toda, Indore, tq & Dist Indore, MP 9. Farzana Parveen Ansar Ahmed Sheikh R/o. Sontakke Plot, Near Usman Babu House, June Shahar, Akola Tq & Dist Akola .

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सयद नझिरूद्दीन सयद मुनीरूद्दीन
**पत्ता :-** रा. अगर बेस, दिलदार खान वकीलांच्या घरासमोर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला ४४४००१

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सयद नझिरूद्दीन सयद मुनीरूद्दीन यांचे दि.११/०४/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११८०/२०२५ — प्रोसेस नं.१०६३८/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ — दिनांक : ०७/०७/२०२५

**अर्जदार :** १. कलावती सिताराम पतीदार रा. घर नं. १९८, वार्ड नं. १५, ग्राम बडगांव माळी, ता. खांडवा, जि. निमर मध्यप्रदेश ४५० ००१ २. भगतलाल मानिकचंद पटेल मयत तर्फे वारस २ अ. चंद्ररेखा भगतलाल पटेल २ ब. दीपक भगतलाल पटेल २ अ व २ ब रा. घोगरदा, पो, सातेगांव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती २ क. सरिता लक्ष्मीनारायण पतीदार (लग्नानंतरचे नाव) रा. घर क. ४३, वार्ड नं १५ ग्राम बडगांव माळी, ता. खांडवा, जि. निमर मध्यप्रदेश ४५०००१ २ ड. अमर भगतलाल पटेल रा. हनुमान मंदिराजवळ, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर. जि. अकोला. ३. मनुबाई रसिकलाल पटेल ४. ललिताबाई हिरालाल पटेल ५. पुष्पा रामलाल पटेल ३ ते ५ रा. उगवा, ता. जि. अकोला ६. संजय मानिकचंद पटेल मयत तर्फे वारस ६ अ. उर्मिला संजय पटेल ६ ब. राम संजय पटेल ६ क. शाम संजय पटेल ६ अ ते ६ क रा. उगवा ता. जि. अकोला ७. रविंद्र मानिकचंद पटेल रा. उगवा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मानिकचंद नारायण गुजराथी (पटेल) २. लीलावती मानिकचंद गुजराथी (पटेल)
**पत्ता :-** रा. दोन्ही रा. उगवा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मानिकचंद नारायण गुजराथी (पटेल) यांचे दि. २७/०७/१९८५ रोजी उगवा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत लीलावती मानिकचंद गुजराथी (पटेल) यांचे दि. ०३/०९/१९७० रोजी उगवा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस 'प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ११.१२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १११६/२०२५ — प्रोसेस नं.१०५१८/२०२५
चौ.ता. १३/०८/२०२५ — दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** श्रीमती शोभा छत्रपती ठाकरे रा. गुरूदेव नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सचिन छत्रपती ठाकरे
**पत्ता :-** रा. गुरूदेव नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थउपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सचिन छत्रपती ठाकरे यांचे दि. १६/०४/२०२५ रोजी राहत्या घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांना अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०८३/२०२५ — प्रोसेस नं.१०१६०/२०२५
चौ.ता. ०१/०८/२०२५ — दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** 1. Smt. Kanchanben Wa/o Shantilal Mehta R/o Near Vinart Press, Ramdas Peth, Akola. Tq and Dist Akola. Through POA Holder Mr. Vijay Shailesh Mehta R/o. 120 Birla Colony, Tapadiya nagar, Akola. Tq and Dist Akola, 2. Smt. Kiran Wo Shailesh Mehta R/o. Ramdas Peth, Station Road, Near Jasnagra Hotel, Infront of RCC carwash, Akola. Tq and Dist Akola. Through POA Holder Mr. Yash Shailesh Mehta, R/o. Near Jasnagra Hotel, Ramdas Peth, Akola. Tq and Dist akola. 3. Mrs. Radhika W/o. Dhaval Dave (Radhika D/o Shailesh Mehta) R/o Sahajanand, Ramnagar, Near Nutn School Gondia, Ty and Dist Akola. Through POA Holder Mr. Yash Shailesh Mehta R/o. Near Jasnagra Hotel, Ramdas Peth, Akola Tq and Dist akola. 4. Mr. Yash Shailesh Mehta R/o. Near Jasnagra Hotel, Ramdas Peth, Akola. Tq and Dist akola.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** Nil
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री. शैलेश शांतीलाल मेहता
**पत्ता :-** रा. गोकुळ कॉलनी, शिव मंदिराजवळ, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. शैलेश शांतीलाल मेहता यांचे दि. २५/०९/२०११ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २०७/२०२५ — प्रोसेस नं.२३३३/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ — दिनांक : ०८/०७/२०२५

**अर्जदार :** १. सुशिला सत्यनारायण सोनी, वय ६९ वर्ष. २.पुजा मनोज सोनी, वय ३१ वर्ष, ३. नंदीनी मनोज सोनी, वय - १२ वर्ष, तर्फे अ.पा.क. आई पुजा मनोज सोनी ४. आर्यन मनोज सोनी, वय ९ वर्ष, तर्फे अ.पा.क. आई पुजा मनोज सोनी सर्व रा. मु.पो. कुटासा, ता. अकोट, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वर नमूद पत्यावरील कायम रहिवासी आहेत. अर्जदार क्र. १ चा मुलगा अर्जदार क. २ चे पती व अर्जदार क. ३ व ४ चे वडील नामे मनोज सत्यनारायण सोनी हे पोस्ट कुटासा, ता. अकोट, जि. अकोला येथील कायम रहिवासी होते, ते दि. २७/१०/२०२३ रोजी कुटासा ता. अकोट जि. अकोला येथे मरण पावले, मयत मनोज सत्यनारायण सोनी यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदर अर्जासंबंधी इतर कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोट

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०८२/२०२५ — प्रोसेस नं.१०३४४/२०२५
चौ.ता. ३०/०७/२०२५ — दिनांक : ०३/०७/२०२५

**अर्जदार :** Smt. Kanchanben Shantilal Mehta R/o. Near Vinart Press, Ramdas Peth, Akola, Tq and Dist Akola Through POA Holder Mr. Vijay Shailesh Mehta, R/o. 120 Birla Colony, Tapadiya Nagar, Akola. Tq and Dist Akola.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : निरंजन शांतीलाल मेहता
**पत्ता :-** रा. ५३-अ, रेल्वे स्ओशन जवळ, रामदास पेठ, लाइन नं. १, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निरंजन शांतीलाल मेहता यांचे दि.१०/ ११ / २०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११८९/२०२५ — प्रोसेस नं.१०९७७/२०२५
चौ.ता. १९/०८/२०२५ — दिनांक : १०/०७/२०२५

**अर्जदार :** १. मुमताज बी शेख कलीम २. शेख अयान शेख कलीम ३. मोहम्मद फेजान शेख कलीम क. २ व ३. अ.पा.क. तर्फे आई सही करणार मुमताज बी शेख कलीम सर्व रा. नाजीर टेलर के घर के पास, हबीब नगर, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शेख कलीम शेख बब्बु
**पत्ता :-** रा. नाजीर टेलर के घर के पास, हबीब नगर, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेख कलीम शेख बब्बु यांचे दि. ०१/ ०१ / २०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १९/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११६६/२०२५ — प्रोसेस नं.१०८१७/२०२५
चौ.ता. १४/०८/२०२५ — दिनांक : ०८/०७/२०२५

**अर्जदार :** १. मीराबाई नवलकिशोर गोयनका २. गोविंद नवलकिशोर गोयनका ३. राहुल नवलकिशोर गोयनका सर्व रा. दहिहांडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नवलकिशोर मनकलाल गोयनका
**पत्ता :-** रा. दहिहांडा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नवलकिशोर मनकलाल गोयनका यांचे दि. ०५/१२/२०२४ रोजी दहिहांडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक: १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# घरकुल बांधकाम म्हणजे कर्जबाजारी होणे !

## शासनाचा निधी पडतो अपुरा ; शासनाचे स्वस्त रेती धोरण कागदावर



**वर्धा/जनमाध्यम**

केंद्र शासनाकडून प्रत्येक गरीब बेघरांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल देण्याचा शासनाचा उद्देश आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात घरकुल योजना सुरू आहेत आणि घरकुल लाभार्थ्यांना जवळपास दीड ते दोन लाख रुपये मिळतात. या शासनाच्या निधीतून आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्य कुटुंबाला घरकुल बांधणे अवघड झाले आहे, घरकुलाचे काम शासनाच्या निधीतून पूर्ण होत नसल्याने इतर कामासाठी खाजगी सावकाराकडून कर्ज काढून घर काम करत असताना अनेक वेळा निधी अपुरा पडत आहे, तर अनेक घरकुल लाभधारक मात्र आज रोजी वेळेवर निधी मिळत नसल्याने कर्जबाजारी झाले आहेत.

शासनाच्या योजनेतून मिळणाऱ्या लाभाच्या घरकुलासाठी आजच्या जीवघेण्या महागाईच्या काळात १ लक्ष ५० हजार ही अगदी तुटपुंजी रक्कम होत आहे. त्यामुळे गरीब लाभार्थ्यांना एवढ्याशा रकमेत घरकुल बांधणे कठीण होऊन बसले असून तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना अनेक पतसंस्था, फायनान्स बँक आदीकडून कर्ज काढून घराचे बांधकाम पूर्ण करावे लागत असून अनेक घरकुलधारक कर्जबाजारी झाले आहे.

घरकुलाचे बांधकाम करत आसतांना लाभार्थ्यांना वीट, रेती, सिमेट, मुरूम, मिस्त्री, मजूर आदींच्या वाढत्या किमतीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शासनाचे स्वस्तात रेती मिळवून देण्याचे उद्दिष्ट होते; परंतु गेवराईची तहसीलदार खोमणे यांच्या आडमुठे धोरणा मुळे त्याचा लाभ सर्वांना मिळालेला नसल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागात दिसून येत आहे. त्यामुळे घरकुलधारकांना शासनाचे रेती धोरण केवळ कागदावर असल्याचे दिसून येत आहे तसेच लाभार्थ्यांना रेती वाढीव दराने विकत घ्यावी लागत आहे.परिणामी आज प्रत्येक गरीब घरकुल लाभार्थी कर्जबाजारी झाला असल्याचे चित्र आहे.

### कर्जासाठी भटकंती

तालुक्यात मोठ्या प्रमाणात घरकूल मंजूर करण्यात आले आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतींना उद्दिष्टानुसार घरकूल मंजूर करण्यात आल्याने लाभार्थीही मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. महागाई वाढली घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना घर बांधणीसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साहित्यांच्या किंमती मध्ये प्रचंड वाढ झाली आहे. परिणामी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शेती असेल तर त्यांच्या शेतीचा काही भाग विकावा लागतो. नाही तर कर्जासाती इकडे-तिकडे भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे अनेक लाभार्थी कर्जबाजारी होत आहे

### घरकुलाच्या निधीत वाढ करण्याची मागणी

सद्यास्थितीत शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आरटी आवास योजना अंमलात आहेत या सर्व घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना प्रशासनाकडून जो निधी देण्यात येतो ही रकम ३ ते ४ हप्त्यां मध्ये दिली जाते. प्रशासनाकडे बिल काढत असताना प्रत्येक वेळी जवळचे पैसे खर्च करावे लागत आहे, अशा परिस्थितीत कमी निधीतून लाभार्थ्यांना घरकुलाचे बाधकाम करणे म्हणजे फार कसरतीचे काम झाले आहे. त्यामुळे घरकुलाच्या निधीमध्ये वाढ करण्याची मागणी होत आहे.

# अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या घरांना भरपाई मिळवून देणार-राज्यमंत्री डॉ.भोयर



**वर्धा/जनमाध्यम**

पवनार येथे ८ आणि ९ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या घरांना शासकीय निकषानुसार भरपाई मिळवून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पवनार भेटी दरम्यान सांगितले वर्धा येथे नियोजित दौऱ्यासाठी येत असताना आज सकाळी त्यांनी ज्ञानेश्वर येरूनकर यांचे बाधित घराची पाहणी केली. यादरम्यान शेतकरी विकास मंच चे अध्यक्ष सुरेश इखार यांनी पावणाऱ्येथील शेत शिवाराला सौर कुंपण योजनेचे अर्थसहाय्य मिळवून देण्याची विनंती केली.

सदर प्रकरण हे मुंबई येथे सचिव स्तरावर मंजुरी साठी असल्याचे इखार यांनी सांगितले.लवकरच मंजुरी मिळवून देण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले.तसेच पवनार येथे शिव स्मारकाची निर्मिती करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या दौऱ्या मध्ये उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे,तहसीलदार. संदीप पुंडेकर, मंडळ अधिकारी प्रवीण हाडे,ग्राम महसूल अधिकारी संजय भोयर,ग्राम विकास अधिकारी अजिनाथ डमाळे, माजी सरपंच शालिनी आदमाने,अजय गांडोळे,राहुल पाटणकर,राजू बावणे,सुरेश इखार,वासुदेव सावरकर,पिंपरी चे सरपंच अजय गौळकार,अजय वरटकर,प्रशांत भोयर, दिलीप ठोंबरे, हजर होते,

# मत्स्यव्यवसाय कार्यालयात राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिन साजरा



**वर्धा/जनमाध्यम**

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय व जिल्हा मत्स्यव्यवसाय सहकारी संघ मर्यादित वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने मत्स्यव्यवसाय कार्यालयात मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१० जुलै रोजी राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा मच्छिमार संघाचे अध्यक्ष कमलेश मारबडे, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी राहुल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील उपलब्ध संधी व विविध मत्स्यव्यवसाय विषयक शासकीय उपक्रमांची माहिती जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील भागधारकांना मिळण्यासाठी राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिन साजरा करण्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी स्वप्नील वालदे यांनी राष्ट्रीय मत्स्य शेतकरी दिनाचे महत्व व पार्श्वभूमी सांगून मत्स्यव्यवसायासंबंधी नवीन तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, तांत्रिक बाबी, उपलब्ध संधीचा शोध विविध शासकीय योजना, रोजगार निर्मिती, बाजाराची उपलब्धता आदी विषयावर मार्गदर्शन केले. तर कमलेश मारबडे यांनी जिल्ह्यातील मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी उपाययोजने बाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार राहुल जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे पदाधिकारी व खाजगी मासेविक्रेते उपस्थित होते.

# संक्षिप्त

## घरासमोरील दुचाकी लंपास

**वर्धा :** रात्री परिसरात कुणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरासमोरील दुचाकी चोरून नेली. ही घटना स्थानिक स्टेशनफैल येथे शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. विक्रांत दहाट (३५) रा. स्टेशनफैल यांनी त्यांची एमएच ३२ एसी १०२४ क्रमांकाची दुचाकी घरासमोर उभी केली. ही दुचाकी परिसरात कुणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने चोरून नेली. शोध घेवूनही दुचाकी न मिळाल्याने अखेर विक्रांत यांनी वर्धा शहर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे दहाट यांचे २५ हजारांचे नुकसान झाले आहे.

## महिलेच्या बॅगमधून ५० हजारांची रोख पळविली

**वर्धा :** वर्धा येथून सोनेगाव (स्टे.) येथे ट्रॅव्हल्सने जात असलेल्या महिलेच्या बॅगला चिरा मारुन दोन अज्ञात महिलांनी ५० हजारांची रोख पळविल्याची घटना घडली. छाया निळकंठ कांबळे (५२) रा. सोनेगाव (स्टे.) यांनी बचतगटाचे ५० हजार रोख युनियन बँक, वर्धा येथून काढले. त्यानंतर त्या सोनेगाव (स्टे.) येथे जाण्यासाठी वर्धा येथून ट्रॅव्हल्समध्ये बसल्या. प्रवासादरम्यान त्यांच्या बाजूला अज्ञात दोन महिला बसून होत्या. त्या महिलांनी छाया कांबळे यांच्याकडील बॅगला चिरा मारुन त्यातील ५० हजार घेऊन पोबारा केला. ही घटना सोनेगाव येथे लक्षात येताच त्यांनी शोधाशोध केली. पण त्या अज्ञात महिला मिळून आल्या नाही. त्यांनी घटनेची तक्रार अल्लीपूर पोलीस ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून, अज्ञात महिलांचा शोध सुरू आहे. शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरट्यांचा धुडघूस सुरू आहे. प्रवासादरम्यान महिला व पुरुषांना भुरळ पाडून पैशावर हात साफ केल्या जात असल्याचे दिसून येते.

## सेवानिवृत्ताच्या पिशवीमधून १४ हजार लंपास

**वर्धा :** बँकेतून काढलेले १४ हजार रुपये पिशवीत ठेऊन ऑटोने प्रवास करीत असताना दोन अनोळखी महिलांनी पिशवीला चिरा मारुन रक्कम लंपास केल्याची घटना आर्वी शहरात घडली. वनविभागातून सेवानिवृत्त झालेले मधुकर महादेवराव बोधने (७५) रा. खरडी वॉर्ड, आर्वी यांनी गुरुवारी दुपारी महाराष्ट्र बँक, आर्वी येथून आपल्या पेन्शनचे १४ हजार रुपये रोख विड्रॉल केले. ते पैसे व पासबुक नायलॉन पिशवीत ठेऊन ते ऑटोने घराकडे निघाले. प्रवासादरम्यान त्यांच्यासोबत दोन महिला तोंडाला बांधून असलेल्या दोन महिलासुद्धा ऑटोत बसल्या. काही अंतरावर त्या उतरल्या. यादरम्यान त्यांनी हातचलाखी करीत पिशवीला चिरा मारुन त्यातील रोख १४ हजार व पासबुक लंपास केले. ही बाब मधुकर बोधाने हे घरी गेल्यानंतर उघडकीस आली. याप्रकरणी आर्वी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्याने पोलिसांनी गुन्हा नोंद केला. पुढील तपास सुरू आहे.

# पोलीस अधीक्षक साहेब.. माझ्या मुलाची आई मिळून द्या हो..!

## रवींद्र फुलसे यांची पोलीस अधीक्षकांना निवेदनातून केली मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

पवनार येथील रवींद्र फुलसे यांच्या पत्नीला गावातीलच युवकाने पळून नेल्याने त्याचा दीड वर्षाच्या मुलाचा तडफडा पाहून गावातील सर्वांचे मन हालावून गेले आहे.

पवनार येथील तीस वर्षे युवक सतीश सुरेश हजारे या युवकाने गावातीलच रवींद्र फुलसे यांच्या पत्नीला दिनांक ७ जुलैच्या मध्यरात्री पळून नेले सोबत रवींद्र फुलसे यांनी गटामधून कर्ज स्वरूपात उचललेले ७० हजार रुपये सुद्धा नेले. या घटनेची तक्रार रवींद्र फुलशे यांनी ७ जुलै रोजी सेवाग्राम पोलीस स्टेशन येथे केली आहे. परंतु अजून पर्यंत पत्नीचा कुठलाच पत्ता लागलेला नाही आणि मुलाचा सततचा तडफडा पाहून रहावले जात नाही. यामुळे सेवाग्राम स्टेशनच्या अधिकाऱ्यांना रविंद्र फुलसे यांनी सतत विनवणी केली परंतु कुठलाच मार्ग निघाला नसल्याने शुक्रवारी रवींद्र फुलसे यांनी पोलीस अधीक्षक वर्धा यांना निवेदन देऊन माझ्या मुलाची आई मिळून द्या अशी मागणी केली आहे. आता मागील महिन्यातच माझी दोन वर्षाची मुलगी मृत पावली तिच्या मृत्यूच्या धक्क्यातून मी अजून पर्यंत सावरलो नाही. सात जुलै रोजी माझ्या पत्नीला सतीश हजारे यांनी पळून नेऊन मला खूप मोठा धक्का दिला आहे. आणि आता माझ्या लहान मुलांच सतत सुरू असलेला तडफडा यामुळे मला जीवन जगाव की मरावे काहीही सुचत नसून माझ्या मुलाची आई त्या मुलाला मिळून द्यावी अशी मागणी एका निवेदनातून रवींद्र फुलसे यांनी पोलीस अधीक्षकांना केली आहे.

# पाऊस थांबला,शेती कामाला सुरुवात

## परिसरात बरसला समाधानकारक पाऊस; शेतकरी आनंदी

**साहूर/जनमाध्यम**

आषाढी एकादशी पासून परिसरात दमदार पावसाला सुरुवात झाली सलग चार दिवस पावसाने परिसरासह तालुक्यात दमदार हजेरी लावली होती त्यामुळे नदी नाले वाहते झाले आहे दोन दिवस तर ढगफुटी सदृश्य पाऊस बरसला त्यामुळे चार-पाच दिवस शेतीचे कामे पूर्णपणे ठप्प होते मात्र १० जुलैपासून पावसाने विश्रांती घेतली असून आता सूर्याचे हलके किरण पडू लागले आहे त्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांच्या शेती कामाला गती आली असल्याचे परिसरात चित्र दिसून येत आहे.



परिसरात चार ते पाच दिवस सारखा पाऊस सुरू असल्याने मुख्य रस्त्यासह सर्व वर्दळीचे ठिकाणे बंद दिसून येत होती गावातील चौक बसस्थानक परिसर व मुख्य रस्ते निर्मणुष्य दिसून येत होते त्यामुळे चार ते पाच दिवस नागरिकांचीही कामे ठप्प होती मात्र १० जुलैपासून पावसाने उघडीप देताच शेतकऱ्यासह नागरिक कामाला लागले असून परिस्थिती पूर्वस्थितीत आली असल्याचे दिसून येत आहे एकंदरीत पावसाने दमदार हजेरी लावल्याचा व शेती कामासाठी पावसाने पुन्हा विश्रांती दिल्याचा आनंद शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर दिसून येत असून परिसरातील शेतकऱ्यासह नागरिक सुखावले आहेत.

परिसरात सारखा चार ते पाच दिवस दमदार पाऊस झाला असला तरी मात्र पावसामुळे व नदी नाल्यामुळे कुठेही शेतकऱ्याचे नुकसान झाले नसल्याचे शेतकऱ्याकडून सांगण्यात येते.

यावर्षी रोहिणी व मृग नक्षत्रात पुरेसा पाऊस झाला नाही अदामधात आलेल्या अकाली पावसावरच काही शेतकऱ्यांनी पेरणी केली होती मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने नुकत्याच उगवलेल्या छोट्या छोट्या नाजूक पिकांना पाण्याची नितांत गरज होती त्यामुळे शेतकरी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत होते अशातच दिनांक ६ जुलैपासून सुरू झालेल्या दमदार पावसाने पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकरी आनंदी व उत्साही दिसून येत आहे, तसेच पिके सुद्धा तजेलदार झाली आहे, तेव्हा पावसाने अदामदात अशीच दमदार हजेरी लावावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांसह नागरिकाकडून व्यक्त करण्यात येत आहे,

# लॉयन्स क्लब वर्धा लीजेंड्सचा वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

## वृक्ष संवर्धन मोहीम सक्रिय करणे गरजेचे- जया अंभोरे



**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक पातळीवर ग्लोबल वार्मीग ही एक अत्यंत गंभीर समस्या निमार्ण झाली आहे. यावर एकमेव उपाय म्हणजे अधिकाधिक वृक्षारोपण करणे असून वृक्षसंवर्धन मोहिम सक्रीय करणे गरजेचे आहे या दृष्टीने लॉयन्स कॅल्ब वर्धा लीजेंड्सचा हा उपक्रम प्रशंसनिय आहे. असे प्रतिपादन नागपुर येथील निर्मिक ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्थेच्या अध्यक्ष जया अंभोरे यांनी व्यक्त केले.

त्या १० जुलाई रोजी लॉयन्स क्लब लीजेंड्सच्या वतीने एम.आय.डी.सी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. या प्रसंगी प्रमुख अथिती म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, ज्येष्ठ समाजसेवी इमरान राही, गोकुलराम पांडे, लॉयन्स क्लब वर्धा लीजेंड्सचे अध्यक्ष वरूण पांडे, डिस्ट्रिक्ट पर्यावरण अध्यक्ष शुभदा रूद्रकार, लॉ.प्रशांत पांडे, आशिष मेश्राम, शशांक चतारे, अब्दुल गणी, रोहित वानखेडे, विश्वभुषण तिवारी, रोहीत मिश्रा आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. सतीश अंभोरे म्हणाले की, वृक्ष पृथ्वीचा अलंकार असून वृक्ष वाचले तर आपण वाचणार म्हणूनच या कार्यात सहभागी होणे आपली जबाबदारी आहे. इमरान राही म्हणाले की, सातत्याने वाढत असलेले तापमान रोखण्यासाठी वृक्ष लागवड आणि सवंर्धन गरजेचे आहे. वरून पांडे म्हणाले पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी सर्वाचीच आहे. हे बिंबविणे महत्वाचे असून याकरिता लॉयन्स क्लब वर्धा लीजेंड्सचा वसा इतरांनी अंगिकारण्याची गरज आहे. कार्यक्रम यशस्वी करण्या करीता अमोल कठाणे, संदीप विधानी, शुभम राऊत,खुशबु पांडे, करिश्मा पाटील, सुरज राईकवार, रवि संगतानी,रक्षा राऊत, नेहा विधानी, हर्षा राईकवार आदींनी अथक परिश्रम घेतले. परिसरात पाहुण्याच्या हस्ते मोठया प्रमाणात वृक्षरोपण करण्यात आले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २२८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ओबीसी महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील ओबीसी प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी बहुजन कल्याण विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्यावतीने २० टक्के बिज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना अशा विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

२० टक्के बीज भांडवल योजना- हि योजना राष्ट्रीयकृत बँक, ग्रामिण बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत राबविली जाते यामध्ये महामंडळाचा सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के व लाभार्थ्यांचा ५ टक्के सहभाग असतो. योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ५ वर्ष कालावधीच्या परतफेडीसाठी ५ लाख रुपयापर्यंत कर्ज उपलब्ध होते.

थेट कर्ज योजना - हि योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत असून योजनेंतर्गत शेतीला पूरक किंवा इतर छोट्या व्यवसायाकरिता कर्ज दिले जाते. यामध्ये जास्तीत जास्त १ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येते परतफेडीचा कालावधी ४ वर्षे असून नियमित परतफेड केल्यास व्याज आकारले जात नाही, परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर वार्षिक ४ टक्के दराने व्याज आकारण्यात येते.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना – हि योजना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत तसेच सहकारी बँकेमार्फत राबविली जात असून गरजू व कुशल व्यक्तींना नवीन व्यवसाय सुरु करण्याकरिता तसेच व्यवसाय वृद्धीकारिता मागणीनुसार १५ लाख रुपया पर्यंत कर्ज बँकेमार्फत देण्यात येते. बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत जास्तीतजास्त १२ टक्के व्याज दराने परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येतो.

गृह कर्ज व्याज परतावा योजना – ही योजना बँकेमार्फत राबविण्यात येत असून महामंडळाच्या निकषानुसार वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांचे बचतगट, भागीयदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी अशा शासन प्रणीत संस्थांना बँकेतर्फे दिलेल्या कर्जावर महामंडळाच्यावतीने व्याज परतावा देण्यात येतो.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना – या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता देशांतर्गत अभ्याक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता १० लाख रुपयापर्यंत तसेच परदेशी अभ्याक्रमासाठी २० लाख रुपये इतके कर्ज बँकेमार्फत दिले जाते. बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२ टक्के व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येतो.

महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना – हि योजना इतर मागासवर्ग प्रवर्गातील गरीब व होतकरू महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच राज्यातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रक्रिया व मूल्य आधारित उद्योगांकरिता बँकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या ५ ते १० लाख रुपयापर्यंतच्या कर्ज रक्कमेवरील १२ टक्के दराने व्याज परतावा उपलब्ध करून देण्यात येतो.

सदर योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालीत साधन केंद्र (CMRC) च्या सहाय्याने राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्याच्या महिला इतर मागास प्रवर्गातील व महाराष्ट्राच्या रहिवासी असाव्यात, बचत गटाची नोंदणी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्रामध्ये (एशेंण) केलेली असावी.

कौशल्य विकास प्रशिक्षण योजना – राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या पात्र व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. यासाठी पात्र व्यक्ती १८ ते ५० वर्ष वयोगटातील असावा.

योजनांचा लाभ घेण्याकरिता इच्छुकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ वर्धा यांचे कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, लक्ष्मीनगर, सेवाग्राम स्टेशन रोड, वर्धा, ७१५२-२३२८८१ या दुरध्वनी क्रमांकावर किंवा ८३२९९८३८७०, ९८३४७ २४६०६ ७९७२०२९१५० या भ्रमणध्वनी क्रमांकावर तसेच संकेतस्थळ www. msobcfdc.in येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नती स्तर कमी करा-राज्य शासनाकडे मागणी

**अमरावती/ प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद लिपिकवर्गीय गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नती स्तर कमी करून समान पदनाम व पदोन्नती संधी मिळाव्यात, यासाठी राज्य शासनाकडे जोरदार मागणी करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने २३ एप्रिल २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे पदोन्नती टप्पे कमी करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही, ही बाब लक्षात घेता जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेकडून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



संघटनेच्या मागणीनुसार, कनिष्ठ सहाय्यक व वरिष्ठ सहाय्यक या पदांचे एकत्रीकरण करून त्याचे नामकरण 'विकास अधिकारी' करावे व वेतनश्रेणी एस-१४ (३८,६०० - १,२२,८००) निश्चित करावी.

कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी ही पदे एकत्र करून त्याचे नामकरण 'प्रशासन अधिकारी' करावे व वेतनश्रेणी एस-१५ (४१,८०० - १,३२,३००) निश्चित करावी.

संघटनेच्या मते, वरील एकत्रीकरणामुळे कार्यप्रवाहात सुसूत्रता येईल, पदोन्नतीच्या संधी वाढतील व कर्मचाऱ्यांमध्ये न्यायसंगतता नांदेल. विशेषतः लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे समान काम असूनही त्यांच्यात पदोन्नतीत असमानता आहे, हे अन्यायकारक असून यावर त्वरित तोडगा निघणे गरजेचे आहे, अशी स्पष्ट भूमिका संघटनेने घेतली आहे.सदर व निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांच्यामार्फत जयकुमार गोरे मंत्री ग्राम विकास विभाग व प्रधान सचिव ग्रामविकास विभाग मुंबई यांना देण्याकरिता निलेश पालन सहाय्यक प्रशासन अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अमरावती यांना देण्यात आले. यावेळी पंकज गुल्हाने अध्यक्ष जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटना व हेमंत कुमार यावले राज्य प्रसिद्धीप्रमुख, श्रीकांत मेश्राम कोषाध्यक्ष,सतीश पवार, राजीव गाडे, राहुल रायबोले, निशांत तायडे, विजय कावळे,समक्ष चांदुरे,आदित्य तायडे, आनंद टेटू, रजनी मस्के, शिल्पा ठाकरे,अर्पणा आत्राम, गायत्री लाचुरे, वनिता बुगडे, राहुल खेडकर, अविनाश गावंडे, परमेश्वर राठोड,प्रशिक्षित बाराहाते, अमोल गाडेकर, यश माहुलकर, अमर ठाकरे, दिनेश तांबडे,सुजित गावंडे, सतीश पवार निवेदन देताना उपस्थित होते.

## आता विद्यार्थ्यांना भौगोलिक घटनेची मिळेल माहिती

# तक्षशिला महाविद्यालय व मराठी विज्ञान परिषदेत सामंजस्य करार

**अमरावती/ प्रतिनिधीः-** दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित तक्षशिला महाविद्याल व मराठी विद्यान परिषद अमरावती यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार आता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी तसेच भौगोलिक घटनेची माहिती, मार्गदर्शन आदी मिळणार आहे.



यावेळी दादासाहेब गवई दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस, तक्षशिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधुरी फुले, महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रितेश पाटील, समन्वयक डॉ. संदीप हाडोळे यांच्यासह मराठी विज्ञान परिषदचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने, सुशीलदत्त बागळे उपस्थित होते.

दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून संस्थेच्या विविध शाळा, महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबतच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येते. तक्षशिला महाविद्यालय व मराठी विद्यान परिषद यांच्यात झालेल्या करारामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी सखोल माहिती, भौगोलिक घटनेची माहिती, रिसर्च, करियर गायडन्स, विज्ञानाच्या अभ्यासासाठी प्रेरित करणे, पेटंट संदर्भात माहिती, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयी कुतूहल निर्माण करणे, आदी उपक्रम आगामी काळात घेण्यात येणार आहे. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले यांनी सांगितले की, तक्षशिला महाविद्यालयाने मराठी विज्ञान परिषदेशी केलेल्या करारामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयी जिव्हाळा निर्माण होईल. सोबतच विद्यार्थ्यांना भौगोलिक घटनेविषयी माहितीही मिळेल. असेही तसेच संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस यांनीही यावेळी समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयाने या अंतर्गत विविध उपक्रम राबवावे. असेही आश्वासित केले.

# वस्तीमधील खड्डा कचऱ्याने बुजविल्याने रोगराईला आमंत्रण प्रदुषण नियंत्रण मंडळाने नगरपरिषद प्रशासनाला दिली तंबी

## नविन बसस्थानक परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात, रस्त्यांवर दुर्गंधी

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषद कडून नविन बसस्थानकावरील बांधकाम व्यवसायीकाचा खड्डा तक्रारीनंतर घनकच-याने बुजविल्याने भरवस्तीमधील या खड्ड्यात साचलेल्या पाण्यामुळे ऐन पावसाळ्यात रोगराई पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांचे तक्रारीनंतर पालीकेने तो खड्डा चक्क गावातील उचलेला घान कच-याने बुजविला.आता त्यात पाणी साचल्याने परीसरात दुर्गंधी पसरली असून डासांच्या प्रादुर्भावाने मलेरिया, डेंगूसारख्या आजारांचा धोका वाढला आहे.



अंजनगाव सुर्जी शहरातील रहिवासी संख्या झपाट्याने वाढत आहे. अशातच दररोज हजारो टन कचरा निर्माण होत असून, नगरपरिषद कचरा वर्गीकरण तसेच विल्हेवाट लावण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनासाठी वर्षाकाठी कोटी रुपये खर्च करते. मात्र स्थानिक प्रशासन नियोजन योग्यरीत्या राबवित नसल्याने कोटी रुपये खर्चून व्यर्थ जात आहेत.शहरातील नवीन बसस्थानक परिसरातील एका खाजगी जागेवर मार्केट चे बांधकाम करण्यासाठी १६४० चौरस फुट बाय २० फुटाचा खड्डा खोदण्यात आला होता. काही कारणास्तव ते बांधकाम गेल्या तीन वर्षापासुन बंद पडल्याने खोदलेल्या खड्ड्यामधे पाणी साचल्याने तलावाचे स्वरूप घेतले असून आजूबाजूला घरांना तडे पडल्याने काही घरे व दुकाने पडण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाला खड्ड्यातील पाणी काढून खड्डा बुजवून देण्याची मागणी केली होती. परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार नगरपरिषद प्रशासनाने अकलेचे तारे तोडुन तथा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांना बगल देऊन शहरातील घनकचरा त्या भल्यामोठ्या खड्ड्यात टाकून बुजविण्याचे प्रयत्न केला. रोगराईला निमंत्रित देऊन नागरिकांना एक प्रकारे स्थानिक प्रशासनाने मारण्याचा कट रचला काय असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन तथा जिल्हाधिकारी नगर विकास शाखे मार्फत पालीकेला या प्रकरणात नियमानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब कळविण्यात यावे.

तसेच, सदर प्रकरणाचा अनुपालन अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायाबरोबर आवश्यक त्या कागदपत्रासह प्रथम प्राधान्याने न चुकता सादर करण्याचे फर्मावण्यात आले आहे. नगरपरीषद या नियमबाह्य व पर्यावरणीय कायदे तुडविण्याचे प्रकरणात काय खुलासे करते व पालीकेवर संबंधीत प्रकरणात ही प्राधीकरणे काय कारवाई करतात याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

# नांदगावात शेतकऱ्यांची निदर्शने, देशव्यापी संपाला दिला पाठींबा

**नांदगांव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** संयुक्त कामगार संघटना व संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आयोजित देशव्यापी संपाला पाठींबा दर्शवित शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या नेतृत्वात नांदगांव खंडेश्वर येथे राज्य व केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. देश पातळीवरील कामगार व किसान संघटनांनी भाजपच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकारांच्या जनविरोधी धोरणा विरोधात आज ९ जुलै रोजी देशव्यापी औदयोगिक व ग्रामीण बंद ची हाक दिली होती. त्याला पाठिंबा देत आंदोलन करण्यात आले.नव्या शैक्षणिक धोरणाच्या नावाखाली प्राथमिक



शिक्षणामध्ये तिसऱ्या भाषेची सक्ती करून निवडणूक जाहीर नाम्यामध्ये शेतकऱ्यांचे कर्जमाफीचे आश्वासन देऊन सुद्धा फडणवीस सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास टाळाटाळ करीत आहे. सरकारच्या या जनविरोधी धोरणाचा विरोध करण्यासाठी आजचे आंदोलन करण्यात आले होते . यावेळी स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करा.शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी किमान हमीभावाचा (MSP) कायदा करा.५० टक्के नफा ग्राह्य धरून शेतमालाला हमीभाव द्या. मनरेगाची प्रभावी अंमलबजावणी करा, सर्व शेती कामाचा समावेश मनरेगा मध्ये करा.शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी त्वरीत करा.चार कामगार संहिता रद्द करून पूर्वीचे कामगार कायदे लागू करा.पिक विमा क्षेत्रामध्ये सरकारी पिक विमा कंपन्या स्थापन करा.शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई द्या. त्रिसूत्री भाषा धोरणासहित संपूर्ण नवीन शैक्षणिक धोरण रद्द करा .हिंदी भाषेची सक्ती रद्द करा.जनविरोधी जन सुरक्षा विधेयक रद्द करा. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण रद्द करा.

वाढत्या बेरोजगारीला आळा घाल.इत्यादी मागण्याचे निवेदन तहसिलदार यांचे मार्फत पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. यावेळी कॉ.सुनिल मेटकर, संतोष सुरजुसे, जया मंडवधरे, विनोद तरेक,ओमप्रकाश सावळे,अंजू दायदार ,सचिन मेटकर,वासुदेव चौधरी, योगेश अवझाडे ,माधव ढोके , उदय चरपे ,प्रज्वल ढोके ,हनुमान शिंदे, उमेश गावनेर इत्यादींची उपस्थिती होती.

# तारखेड जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके वाटप

**तिवसा/ प्रतिनिधीः-** तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा तारखेड येथे इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या मुलांचे शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागत करीत पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आली. शाळेत येताच मुलांची गावातून मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रमेश लांडगे, सविता बोंद्रे,अनिस,गिरीधर उईके व ईतर पालक तसेच मुख्याध्यापक विनायक पवार, सहाय्यक शिक्षक सुनील निंघोट आदी उपस्थित होते.



# शिवारखेड-असदपूर रस्त्याची दैनावस्था

**खल्लार/ प्रतिनिधीः** नजिकच्या शिवारखेड असदपूर या रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाली आहे.

यामुळे या दोन्ही गावातील नागरिकांना शेतीची कामे करण्यासाठी मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत. प्रशासनाने या समस्येची तत्काळ दखल घ्यावी,अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



# लूटपाट करणारे दोघे गजाआड

**अमरावती/ प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलिसांनी लूटपाट करणाऱ्या दोघा आरोपींना अटक करत ६४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ऑक्सिजन पार्क परिसरात एका महिलेकडून मोबाईल आणि दुसऱ्या व्यक्तीकडून रोख ३ हजार रुपये हिसकावून पळ काढणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. अटक आरोपींची नावे आकाश भिकू भोयर (वय ३१) व कुलदीप राजेंद्र करिहार (वय ३१, दोघेही रा. तिलक नगर, जुनी वस्ती, बडनेरा) अशी आहेत.

५ जुलै रोजी सकाळी १०.१५ वाजता रेश्मा संदीप तायडे (वय ३०, रा. आदर्श नगर) ही महिला आपल्या मुलासोबत गणेशदास राठी शाळेकडे जात असताना, जोग स्टेडियमजवळ पांढऱ्या रंगाच्या मोपेडवर आलेल्या दोन अज्ञात इसमांनी तिच्या हातातून ओप्पो कंपनीचा ७ हजारांचा मोबाईल हिसकावून नेला. या घटनेनंतर काही वेळातच फ्रेजरपुरा येथील हसन गुल्लू नंदावाले यांच्याकडून ३ हजार रुपये रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावल्याची तक्रारही पोलिसांना मिळाली.या तक्रारींनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून आसपासचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच गुप्त माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवून आकाश भोयर आणि कुलदीप करिहार यांना अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून २ मोबाईल, १७५० रुपये रोख, मोपेड दुचाकी असा एकूण ६४,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, गुन्हे निरीक्षक निलेश गावंडे, डीबी पथक प्रमुख पो.उ.नि. राहुल महाजन, पो.स.उ.नि. योगेश श्रीवास, हरीश चौधरी, शशिकांत गवई, सूरज यादव, जयेश परिवाले, रोषण वर्हाडे, सायबर सेलचे निखील माहुरे व चालक अमोल राठोड यांनी केली.

# रोजगार हमीची देयके वेळेत अदा करा

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**अमरावती/ प्रतिनिधीः-** महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत विविध कामे करण्यात येतात. यातील देयक अदा करण्याची कार्यवाही समाधानकारक नाही. कामांची देयके सात दिवसांच्या आत अदा करण्यासाठी तालुकास्तरीय यंत्रणांनी कार्यवाही करावी. येत्या काळात रोजगार हमीची देयके वेळेत अदा करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगा अंतर्गत सर्व यंत्रणांची कामकाजविषयक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, उपवनसंरक्षक धैर्यशिल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक कासोदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, मनरेगामध्ये मस्टर दिल्यानंतर रोजगार सेवकांकडून सात दिवसांच्या आत मस्टर जमा करण्यात यावे. यासाठी रोजगार सेवकांची तालुकास्तरावर बैठक घेण्यात यावी.

यात मस्टर जमा करण्यासाठी समन्वय साधण्यात यावा. प्राप्त झालेली मस्टर अपलोड करण्याची कार्यवाही तातडीने करावी. सात दिवसांचे देयक तातडीने अदा करण्यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच देयक जमा करण्यासाठी आधारबाबत येणाऱ्या अडचणी तातडीने सोडविण्यात याव्यात. सध्या मनरेगा अंतर्गत घरकुलांचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे ही कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा.

मनरेगामध्ये अकुशलचा निधी प्राप्त होत आहे. मात्र कुशलचा निधी प्राप्त होण्यास वेळ लागत आहे. कुशलचा निधी प्राप्त झाल्यानंतर कामे पूर्ण करून त्याचा अहवाल तातडीने देण्यात यावा. सध्या पावसाळा सुरू असल्याने मनरेगा अंतर्गत गाळ काढणे, रस्त्याची कामे घेऊ नये. विविध यंत्रणांनी केलेली कामे तपासण्यात येत आहे. केवळ कुशलच्या निधीअभावी कामे राहणे अपेक्षित आहे. काही यंत्रणांची गेल्या कालावधीचीही कामे पूर्ण झालेली नाही, ही कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी वन, कृषी, सामाजिक वनीकरण आदी यंत्रणांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

# खरीप हंगामासाठी राज्यस्तरीय पीकस्पर्धा जाहीर

## - शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**अमरावती/ प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने खरीप हंगाम २०२५ साठी राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे आयोजन केले असून, या माध्यमातून प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन राज्याच्या कृषी उत्पादकतेत वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ प्रमुख पिकांचा समावेश आहे. मूग आणि उडीदसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ असून, इतर पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदत आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटाला प्रति पीक ३०० रुपये तर आदिवासी गटाला १५० रुपये प्रवेश शुल्क आकारले जाईल. शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आणि ती तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. भात पिकासाठी किमान २० आर आणि इतर पिकांसाठी ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे बंधनकारक आहे.

ही स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित केली जाईल आणि विजेत्यांना राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर आकर्षक रोख बक्षिसे दिली जातील. तालुका पातळीवर ५००० रुपये, जिल्हा पातळीवर १०,००० रुपये, तर राज्य पातळीवर ५०,००० रुपयांपर्यंतचे पहिले बक्षीस मिळेल. इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिकाच्या क्षेत्राचा नकाशा आणि बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत या कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी, कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

सृजन हॉस्पिटल
ड्रायव्हर पाहिजे

पत्ता- रघुवीर सोसायटी, साईनगर, मेन रोड, अमरावती
फोन नं.- ०७२१-२५११५२२
मो.नं.- ९११२०५४१५०
भेटण्याची वेळ
सकाळी - ११ ते १२
संध्याकाळी - ६ ते ७

## सायटेशन/जाहीरनामा

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.४४६/२०२५ ने.ता.१२/०८/२०२५

अर्जदार -
१. **श्री दिलीप किसन हरदे,** वय ५२ वर्षे, धंदा - शेती
२. **श्री राजु किसन हरदे,** वय ५० वर्षे, धंदा - शेती
३. **श्री संजय किसन हरदे,** वय ४८ वर्षे, धंदा - शेती
४. **सुशिला माणिकराव बोमने,** वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.खानापूर, ता.मोर्शी , जि.अमरावती
५. **इंदिराबाई फुलचंद बकसरे,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
६. **पार्वताबाई बलचंद्र मोहने,** वय ६२ वर्षे, धंदा - घरकाम
दोघेही रा.राजुरा, ता.अकोट, जि.अकोला
७. **पंचफुला नारायण सोनारे,** वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.वडगांव, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडिल **किसनराव रंगराव हळदे हे दिनांक ०७/१२/२०१९ रोजी खानापुर,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झाले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- ११.०७.२०२५**

शिक्का

आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **सौम्या कपिल बत्रा व कपिल विजय बत्रा, रा.अमरावती ता.जि. अमरावती** हे मौजे जेवड, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.४८/१ मधील प्लॉट नं.३२-ए पार्ट ( दक्षिणेकडील भाग) ज्याचे क्षेत्रफळ ११२.३९ चौ.मी.हा **पलाश सुरेंद्र नानवानी** यांचे कडून विकत घेत आहे.

पलाश सुरेंद्र नानवानी यांनी सदर प्लॉट दि.१५/१२/२०२३ रोजी खरेदी दस्त अ.क्र.४८५४ नुसार विकत घेतलेला आहे. याप्रमाणे दि.१५/१२/२०२३ रोजी खरेदी दस्त अ.क्र.४८५४ ची मुळ दस्त यांच्याकडे आहे. परंतु सदर प्लॉटची यापूर्वीची खरेदी दस्त, दि.२९/११/२००७ रोजी दस्त अ.क्र.१८८६, **चे मुळ दस्त माझे पक्षकार** चे विक्रेते यांचेकडून गहाळ झालेली आहेत व इतर मुळ दस्त यांच्याकडे आहे.

तरी माझे वरील नामे पक्षकार सौम्या कपिल बत्रा व कपिल विजय बत्रा यांना सदर प्लॉट खरेदी करुन गहाण करावयाचा आहे, तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन ७ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक ११/०७/२०२५
अमरावती.

**स्वाक्षरी/-**
**ॲडव्होकेट**
**राहुल व्ही.मोहोड**
**प्रेरणा कॉलनी, राधा नगर,**
**अमरावती- ४४४६०३**
**मो.क्र.९०९६४६०६७०**

# सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पांना निधी देणार का ? -आ. संजय खोडके

**मुंबई -** शेती , उद्योग आणि पाणीपुरठा योजना अशा शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या वतीने सिंचन प्रकल्प निर्मिती व विकासावर जोर दिला जात असतांना अमरावती विभागात सिंचनाचा मोठा अनुशेष वाढला आहे. वर्ष २००७ साली स्थापन झालेले सिंचन प्रकल्प अजूनही पूर्णत्वास न आल्याने अमरावती भागात मोठ्या प्रमाणात मागासलेपण दिसून येते. याबाबत राज्य विधिमंडळात कारणमीमांसा करतांना आ.संजय खोडके यांनी अमरावती भागातील सिंचन प्रकल्प पूर्णत्वास आणण्यासाठी प्रभावी मनुष्यबळ उपलब्ध करण्यासह प्रकल्पाच्या रखडलेल्या कामांना टप्याटप्याने निधी न देता भरीव निधी देण्याची मागणी अधिवेशनात केली. राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५ रोजी वरिष्ठ सभागृहातील कामकाजा दरम्यान प्रशोत्तराच्या तासामध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजनात्मक बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले कि. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे सिंचनाचे प्रकल्प पुढे जात नाही. सिंचन प्रकल्पांवर अनेक तांत्रिक बाबीतून काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे नव्याने प्रत्येक जिल्ह्याच्या बाबतीत कर्मचाऱ्यांना आकृतिबंध तयार करण्याची गरज असल्याने अमरावती विभागातील आकृतीबंधामध्ये बदल करणार का ? असा प्रश्न आ. संजय खोडके यांनी उपस्थित केला. तसेच अमरावती जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प निधी अभावी



रखडले असल्याचे त्यांनी सांगतांना याबाबत सभागृहाला विस्तृत माहिती दिली. अमरावती जिल्ह्यातील पांढरी, वासनी, लोअर पेढी, बोर्डीनाला प्रकल्प , पेढी बॅरेज अशा प्रकल्पांचे काम जवळपास वर्षे २००७ पासून सुरु आहे.मात्र या प्रकल्पांच्या कामांना तुकड्या -तुकड्यात निधी मिळत असल्याने प्रकल्पांची कामे पूर्ण झाली नाहीत, अनेक प्रकल्प रखडले असल्याने आता एका-एका प्रकल्पाला भरीव निधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे रखडलेल्या सिंचन प्रकल्पासाठी एक पूर्ण प्रकल्प गृहीत धरून निधी देणार का ? असा प्रश्न उपस्थित करून आ. संजय खोडके यांनी विधानपरिषदेचे ध्यानाकर्षण केले. तसेच मुख्यत्वे नदी जोड प्रकल्पातून अमरावती विभागात सिंचनाची भरपूर सोय होणार असल्याने अमरावती विभागातील दुष्काळी अवर्षणग्रस्त जिल्ह्यामंध्ये पाण्याचे समसमान नियोजन करण्याची त्यांनी सभागृहाला सूचना केली. तसेच नदीजोड प्रकल्पाचे पाणी नागपूर विभागात जास्त प्रमाणात जात आहे का ? या बाबत सर्व्हेक्षण करण्यात यावे. नदी जोड प्रकल्प हा अमरावती विभागासाठी असल्याने अमरावती विभागाला जास्तीत जास्त हिस्सा देण्यात यावा, अशी मागणी सुद्धा आमदार संजय खोडके यांनी विधिमंडळातून केली आहे..

यावर उत्तर देतांना राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले कि, मनुष्यबळाबाबतीत नोकरभरतीचा विषय आहे. त्यामुळे याबाबतचा आकृतिबंध अंतिम टप्प्यात असून चार महिन्यापर्यंत आकृतिबंध पूर्ण झाल्यावर नोकरभरती घेण्यात येणार असल्याचे ना. गिरीश महाजन म्हणाले. तसेच दुष्काळी भागात सिंचनाची सोय व्हावी म्हणून राज्यशासनाने नदी जोड प्रकल्प हाती घेतला आहे. प्रकल्पाची आखणी करतांनाच सिंचनासाठी मुबलक पाणी देण्याचे धोरण आहे. त्यामुळे विदर्भातील सर्वच दुष्काळी अवर्षणग्रस्त जिल्ह्यांमध्ये मुबलक पाणी देऊ असे स्पष्टीकरण सुद्धा मंत्रीमहोदयांच्या वतीने देण्यात आले. त्याचबरोबर अमरावती जिल्ह्यातील सर्व रखडलेले सिंचन प्रकल्प आगामी २०२७ पर्यंत पूर्णत्वास आणण्याचा शासनाचा प्रयत्न असून सिंचन प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यासाठी कुठलाही निधी कमी पडू देणार नाही. जिथे निधीची आवश्यकता आहे तिथे निधी देऊ , असे सुद्धा जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांनी सभागृहात उत्तर देतांना सांगितले.

## येवदा प्रा.आ.केंद्राची जागा ग्रामीण रुग्णालय बांधकामासाठी हस्तांतरीत

### झेडपी सीईओकडून मंजुरी

**दर्यापूर / वार्ताहर**

तालुक्यातील येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा ग्रामीण रुग्णालय बांधकामासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे. तसे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना जारी केले आहेत. त्यामुळे येवदा ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाला आता वेग येणार आहे. खा.डॉ. बोंडे यांचा रुग्णालय निर्मानासाठी आरोग्यमंत्र्यांकडे गतीने पाठपुरावा सुरू आहे, त्यानिमित्ताने प्रयत्नांना यश आले आहे. येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून शासनाने अलीकडेच या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर केले आहे. ३० खटांचे ग्रामीण रुग्णालय विशेष बाब म्हणून शासनाकडून मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना हस्तांतरित करणे गरजेचे होते. जेणेकरून इमारत बांधकाम, पदभरती, वैद्यकीय उपकरणे कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय अशा विविध बाबी या ठिकाणी विकसित करता येतील. ही बाब

## प्लास्टिक जप्तीची कारवाई

**अमरावती / का.प्र.**

शासनाच्या निर्देशानुसार व आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव यांच्या आदेशानुसार, 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत दक्षिण झोन क्र. ४, प्रभाग क्रमांक २२ अंतर्गत बडनेरा बस स्टँड रोड परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली १० जुलै २०२५ रोजी रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फळ, भाजीपाला व नाश्ता विक्रेत्यांकडून सिंगल युज प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या.

गुरुदेवनगर व मोझरी येथे

## विद्यार्थ्यांकडून फोडर ट्रीटमेंटचे प्रभावी प्रात्यक्षिक

**तिवसा -**स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय, तिवसा येथील अंतिम वर्षातील कृषी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी (Rural Agricult ural Work Experience) उपक्रमांतर्गत गुरुदेव नगर, मोझरी येथे फोडर ट्रीटमेंटवर सुसंगत प्रात्यक्षिक राबवले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष चारा प्रक्रिया करत शेतकऱ्यांना युरिया ट्रीटमेंट, एनसिलेज व जैविक पद्धतींचा वापर करून जनावरांसाठी पोषणमूल्य वाढवणारा चारा कसा तयार करावा हे समजावले. विद्यार्थ्यांमध्ये साक्षी कनोजे, ओमकार वैद्य, मधुरा लंगडे, सूरज सुरजुसे आणि सोनाक्षी सरदार यांचा समावेश होता. शेतकऱ्यांमध्ये लक्ष्मीकांत पाचघरे, कपिल उमप, सागर बायस्कर, मंगेश बायस्कर आणि सुबाष खांडेकर यांनी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिकात उत्साहाने सहभाग घेतला.

त्यांनी सांगितले की या पद्धतींमुळे पशुखाद्याच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली आहे.यासाठी आर. जी. देशमुख कृषि महाविद्यालय चे प्राचार्य तथा अभियांत्रिकी प्रा.अरूण डहाके,रावे समन्वयक प्रा. सावंत राठी आणि विषय तज्ञ रूबी कटरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे क्षेत्रज्ञान वाढले व शेतकऱ्यांनी या उपक्रमाला भरपूर प्रतिसाद दिला.

## रात्र निवारा मोहिमेस यश

### पाच बेघर नागरिकांना मिळाला सुरक्षित निवारा



**अमरावती -** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या संयुक्त शोधमोहीमेद्वारे शहरातील पाच बेघर नागरिकांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यात आला. ही मोहिम राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग व अतिक्रमण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आली.

दिनांक १० जुलै रोजी रात्री ८:३० ते १२:०० या वेळेत मुख्य रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, मंदिर परिसर अशा ठिकाणी उघड्यावर झोपणाऱ्या नागरिकांचा शोध घेण्यात आला. मोहिमेदरम्यान एकूण ५ बेघर नागरिक आढळून आले. या सर्वांना तत्काळ 'रात्र निवारा केंद्र – बडनेरा' येथे हलविण्यात आले. संबंधित केंद्रात त्यांना अन्न, पाणी, वैद्यकीय सुविधा तसेच सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यात आला. अमरावती महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारच्या मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असून, कोणताही नागरिक उघड्यावर झोपू नये यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार आहेत. शहरात बेघर स्थितीत राहणारे नागरिक आढळल्यास अथवा अशा व्यक्तींना मदतीची आवश्यकता वाटल्यास, नागरिकांनी तात्काळ महानगरपालिकेच्या NULM विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

# विद्युत वितरण कंपनीची हुकुमशाही

### बिलाची वसुली करताना महिला व पुरुष ग्राहकांचे असलेल्या अवस्थेत घेतले फोटो

### फोटो काढण्याचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर होताहेत कारवाईची मागणी होत

**अंजनगाव सुर्जी / का.प्र.**

अंजनगाव विद्युत वितरण कंपनी कार्यालयाकडून थकबाकी दारांकडून वीजबिल वसूल करण्यासाठी एक नवीन शक्कल लढवली आहे. अंजनगाव विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून सद्या थकीत असलेली वीज बिलांची गावोगावी वसुली सुरू असताना एक नविनच प्रकार ग्राहकांचे फोटो काढण्याचा उघडकीस आला आहे. सविस्तर माहिती अशी की अंजनगाव शहर व तालुक्यात कर्मचारी वीज बिलाची वसुली करत आहे. वीज बिलाची वसुली करत असताना वीज ग्राहकांचे मोबाईलव्दारे फोटो घेत आहेत. विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी ग्राहकांचे फोटो घेत असल्याने ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली आहे. वीज वितरण कंपनीचे कर्मचारी वीज बिलाची वसुली करत असताना ग्राहक ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत ग्राहकांचे फोटो घेत असुन ते फोटो एका कार्यालयीन वॉटशॉप ग्रुपवर वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवुन कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत असे या वॉटशॉप ग्रुपवरून निर्दशनास येत आहे.




याबाबत काही कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता आमच्या वरिष्ठांनी फोटो काढण्याचे आदेश दिले असे सांगितले. हा कोणता प्रकार आहे वीज वसुली करण्याचा असा प्रश्न वीज ग्राहक उपस्थित करत आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत वीज बिलांचे पैसे घरातील महिला मंडळी जवळ ठेवून देतात तर शहरातील पुरुष मंडळी व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असताना बहुतांश फोटो काढण्याचा प्रकार महिला व मुलींन सोबत होत आहे. कोणत्याही महिला व मुलींनचे त्या व्यक्तीची परवानगी न घेता फोटो काढणे हा गुन्हा असुन ज्या विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याने असे फोटो काढण्याचे आदेश दिले असेल त्यां अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी वीज ग्राहकांकडून होत आहे. अंजनगाव सुर्जी विद्युत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता तुषार गांजरे यांच्याशी संपर्क साधला असता ग्राहकांचे फोटो काढण्याचे आदेश सर्व जिल्ह्यांना आहे असे सांगितले.

**माहिती तंत्रज्ञान कायदा काय म्हणतो...**

कोणत्याही महिलांचे फोटो तिच्या परवानगीशिवाय काढल्यास, तिच्या गोपनीयतेचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो.तसेच तो फोटो सोशल मीडियावर किंवा इतर कोणत्याही माध्यमांवर व्हायरल केला, तर माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो असे असताना सुद्धा कोणतीही ग्राहकांची परवानगी न घेता फोटो काढल्यामुळे आयटी कायद्या अंतर्गत आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी होत आहे.




**दिनविशेष - १४- जुलै- संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय ९४८ मि. १७-जुलै -कालाष्टमी**

**ग्रहयोग- गुरु-मिथुन, शुक्र, हर्बल हृषभ, रवि, बुध - कर्क, शनि-मीन, राहु कुंभ, मंगळ, केतु- सिंह**

**चंद्रभ्रमण - मकर, कुंभ, मीन, मेष**

**प्राचार्य डॉ.अनिल श्री.खांडेकर**
**श्रीपुष्प २४, सच्चिदानंद कॉलनी, दस्तुरनगर, अमरावती.**
**मो.९४२२९१५६६६**

### समस्या त्रस्त करतील




**मेष-**राशीस्वामी मंगळ द्वितियात, गुरू तृतीयात, शुक्र द्वितियात लाभात राहु या सप्ताहात शनि वक्री होऊन बुधवारी रवि-चतुर्थात प्रवेश करील, त्यायोगे जबाबदारी वाढेल, पुर्वार्ध यशदायी ठरेल. निर्णय विचाराने त्या क्रोधावर नियंत्रण ठेवा. सकारात्मकच वागावे लागेल गर्भवती स्त्रियांनी वेळीच काळजी घ्या संततीचे प्रश्न चिघळतील, व्यावसायीक समस्या सुरतील सप्ताह अखेर दिलासा मिळेल.रक्तदाब, विकार मंडळींना काळजी घ्या. दि १३ ते १५

### आग्रही भुमिका टाळा



**वृषभ -** राशीस्वामी शुक्र राशीवर, लाभात शनि, शुक्र द्वितियात रविवारी शनि वक्री होवून बुधवारी रवि तृतीयात प्रवेश करील, त्यायोगे महत्वाची उसाती घ्यावी लागेल निर्णय प्रक्रिया राबवाल एखादा महत्वाचा पत्र व्यवहार होईल. चंद्रभ्रमण चढत्या क्रमाने यश, प्रतिभा मिळवून देईल, इतरांन पासुन अपेक्षा करू नका, घरगुती प्रश्न चिघळतील ज्योवळीची काळजी घ्या. वाहविवाद वेळीच थोबवा स्वावर प्रश्न तुतीम यौवना व्यक्तिमत्वान्वी झाप पडेल. दि. १३ ते१७

### अतिघाई समस्या उपस्थित कराल



**मिथुन-** राशीस्वामी बुध द्वितियात रवि सोबत दशमात शनि सप्ताहात वक्री होईल. राशीवर गुरु, तृतीयात मंगळ असल्याने व्यावसायीक व्यापारात सरशी राहाल देव-घेव करू शकाल. वसुली होईल कामकाजात अडचण येतील. परिश्रमाशिवाय पर्याय नाही,उणीवा ठेवू नका चंद्रभ्रमणाची जोड लाभून कार्यात वाढता प्रभाव दिसेल भावंडासोबत मतभेद दिसुन येतील, टोकाची भुमिका होवु नका भाग्याची जोड मिळणार नाही. दि. १५ ते १९

### शब्द जपुन वापरा



**कर्क -**राशीस्वामी चंद्र सप्तमात असुन दशमात प्रवेश करील. भाग्यात शनि राशीवर रवि बुध असुन रविवारी शनि वक्री होईल त्यायोगे भाग्याची जोड अपेक्षीत लाभणार नाही. घरगुती प्रश्न तीव्र होतील. आर्थीक व्यवहारात शब्द देवू नका, हितसंबंध तयार होतील परिचयातुन कामे होतील, सप्ताहाची सुरुवात दमदार राहील उत्तरार्धा अनुकूल राहुन अधिकाराचा परिपूर्ण वापर कराल व्यावहारिक पध्दतीने प्रश्न सोडवू शकाल.१८ ते १९

### जुने विकार वर येतील



**सिंह-** राशीस्वामी रवि बुधवारी व्ययात बुधा सोबत दशमात शुक्र, लाभात गुरु सप्तमात राहु, या सप्ताहात शनि वक्री होईल. त्यायोगे स्वास्था संबंधीत वेळीच काळजी घ्यावी लागेल प्रवास लाभदायी होवून सोमवार, मंगळवार व्यावसायीक प्रश्न निकालात काढली जाणारी ठरेल. सप्ताहअखेर स्थिती स्थिरावेल. धार्मीक स्थळीभेटी दयाल,तडकाफडकी निर्णय घेवु नये. दि. १४,१५,१९

### विचारांचा गोंधळ उडेल



**कन्या -** राशीस्वामी बुध लाभात बुधवारी रविचे आगमन होईल भाग्यात शुक्र, सप्तमात शनि, दशमात गुरू, या सप्ताहात शनि वक्री होईल, त्यायोगे भागीदारीतील समस्यांचे प्रश्न निर्माण होईल अधिकारी वर्गाची साथ मिळून सरकारी दरबारात वाढता प्रभाव राहील, व्यवसायातील देवघेव करू शका एजन्ट, एजन्सी, दलाल वर्गांना समाधानी दिसतील. सप्ताहाची सुरूवात दमदार राहुन बुधवार, गुरुवार टप्पा गाठील स्वास्थ्य सांभाळा. दि. १३,१६,१७

### अस्थितरता वाढेल



**तुळ-** राशीस्वामी शुक्र अष्टमात, भाग्यात शुक, दशमात बुध असुन रविचे बुधवारी आगमन होईल त्यायोगे सामाजीक क्षेत्रात माननीय राहाल महत्वाची कामे हातावेगळी करू शकाल.भाग्याची ओड मिळून सोमवार, मंगळवार दिलासा देणारा बाडामोडी काडतील शुक्रवार, शनिवार बाजारपेठेत वर्चस्व स्थापन करून वारसा हकाळी कामे हातावेगळी सहज पणे कराल गर्भवती स्तियोनी वेळीच काळजी घ्या. दि. १४,१५, १८, १९

### निर्णय तपासून घ्यावा



**वृश्चीक-** राशीस्वामी मंगळ दशमात, सप्तमात शुक्र, या सप्ताहात शनि वक्री होईल. तर बुधवारी रवि भाष्यात प्रवेश करील त्याभोजे लीनचे प्रवास होऊन धार्मीक ठिकाणी होतील.देवदर्शन घडेल रविवार संपर्कातुन यशदायी ठरेल तर बुधवार, गुरुवार समस्यांचे समाधान होईल जोडीदाराची साथ मोलाची राहून वेळीच पथ्ये बाळगा .ज्येष्ठ नागरीकांनी दक्षता घ्या. दि. १३,१६,१७

### विचलित करणा-या घटना घडतील



**धनु-** राशीस्वामी शुक्र सप्तमात, भाग्यात मंगळ, या सप्ताहात शनि वक्री होवुन रवि अष्टमात प्रवेश करील, सप्ताहाची सुरुवात दमदार राहील, उद्दीष्ट गाठाल संपर्कात व्यत्यय येवुन ननरिकांसोबत विचार जुळणार नाही धावपळीचा परिणाम कार्यक्षमतेवर जाणवेल, उष्णतेचे विकार उद्भवतील सप्ताह अखेर समस्यांचे समाधान मिळून अतिआत्मविश्वास दाखवू तका, खर्चाचे प्रश्न उद्भवतील. दि. १३ ते १५, १८,१९

### सामजंस्य आवश्यक



**मकर -**राशीस्वामी शनि तृतीयात, पंचमात शुक्र, द्वितियात राहू सप्ताहात शनि वक्री होवून तर बुधवारी रवि करील प्रवासात संधी मिळेल व्यावसायिक प्रश्न सुटतील स्थैर्य लाभेल जोडीदाराची साथ लाभेल. सप्तहाची सुरूवात चंद्रभ्रमणाची उत्तम जोड मिळून कार्यात वाढता प्रभाव राहून आरोग्याबाबत पथ्य पाळा, संततीने प्रश्न संपुष्टात येतील. घाईगर्दी टाळा. दि. १३ ते १७

### देवाण- घेवाण तपासुन पहा



**कुंभ -**राशीस्वामी शनि द्वितियात, राहु राशीवर असुन गुरू पंचमात या सप्ताहात शनि वक्री होईल तर बुधवारी रवि षष्टात प्रवेश करील तर त्यायोगे येनारा काळात सामाजीक प्रभाव पडून विरोधकांवर मात करू शकाल. शैक्षणीक संधी चोलुन येतील, भागीदारीत मतभेद होतांना दिसेल निर्णय विचार पुर्वक घ्या टोकाची भुमिका टाळा, कोर्ट कचेरी विषय तुर्तास टाळा.जोडीदाराबाबत समन्वय ठेवा. दि. १५ ते १९

### वैचारिक ताण वाढेल



**मीन -** राशीस्वामी शुक चतुर्थात पंचमात रवि प्रवेश करील. शुक्र तृतीयात या सप्ताहात शनि वक्री होईल त्यायोगे मानसिक ताण वाढेल विरोधासाठी विरोध टाळा, समस्या त्रस्तग्रस्त करतील, खर्च, आजार याची वेळीच काळजी घ्या. बंधुभावंडाकडून अपेक्षा बाळगु नका उत्तरार्ध अनुकुल राहुन व्यापार, कमीशन, दलाल, एजन्सी वर्माना प्रगती कारक यश मिळेल. निर्णय कर विचारपूर्वक घ्या.दि.१३,१७ ते ९

# क्षुल्लक वादातून मित्राचा चाकूने भोसकून खून



## -रहाटगाव येथील एस.ए.इंपेरियल बार समोर मध्यरात्री रक्तरंजित थरार

## -आरोपी फरार, पोलिसांची शोधमोहीम सुरू

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** रहाटगाव येथील एस.ए. इंपेरियल बार अँड रेस्टॉरंटसमोर शनिवारी मध्यरात्री ३:३० वाजता क्षुल्लक वादातून दोघांनी मिळून आपल्या मित्राचा चाकूने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.राजकुमार तहलराम सुंदरानी (वय ५२, रा. साई मंदिराजवळ,रामपुरी कॅम्प अमरावती ) असे घटनेतील मृत इसमाचे नाव आहे.घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहे.



घटनेची हकीकत अशी की, राजकुमार सुंदरानी हे घरी असतांना शुक्रवारी सायंकाळी ७:३० वाजता त्यांचे मित्र शिवा फुलवानी (वय ४२,रा.रामपुरी कॅम्प, अमरावती,) बंटी पवार (३०,लोहार लाईन,विलास नगर,अमरावती) हे दोघेही दुचाकी वाहनाने आले आणि नंतर राजकुमार सुंदरानी यांना घेऊन बाहेर गेले.त्यानंतर काही वेळाने ते रहाटगाव येथील एस.ए.इंपेरियल बार अँड रेस्टोरेन्ट मध्ये गेले. त्यावेळी आणखी दोन मित्र रवी तेजानी, अजय मेटानी (दोघेही रा.रामपुरी कॅम्प) हे सुद्धा सोबत गेले आणि त्याठिकाणी सर्वांनी मद्यप्राशन व जेवण केले. रात्री दीड ते दोन वाजताच्या सुमारास राजकुमार सुंदरानी तसेच सर्व मित्र बाहेर आले.मध्यरात्री ३:३० वाजताच्या दरम्यान राजकुमार सुंदरानी आणि शिवा फुलवानी ☞(पान २ वर)

### ■ नेत्यांच्या बार ला रात्रभर मुभा

एस.ए. इंपेरियल बार अँड रेस्टोरेन्ट हे नेत्याचे असून या बार ला रात्री तीन ते चार वाजेपर्यंत ग्राहकांची वर्दळ असते. नेत्यांच्या या बार ला शासनाचे कोणतेही नियम लागू नसून पोलीस देखील कोणतीही कार्यवाही करत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.महामार्गावर रात्रभर बार अँड रेस्टोरेन्ट सुरू असल्यामुळे अश्या गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक याठिकाणी येतात आणि त्यानंतर खुनासारख्या गंभीर घटना घडतात.पोलीस प्रशासनाने या गंभीर प्रकारावर लक्ष देण्याची गरज आहे.

# दारुची वाहतूक करणाऱ्या वाहनाचा अपघात, चालकाचा मृत्यू

**वर्धा/प्रतिनिधीः-** अवैध मार्गाने दारुची भरधाव वेगाने वाहतूक करताना चारचाकी वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि थेट वाहनाने पलटी घेतली.या भीषण अपघातात वाहन चालकाचा मृत्यू झाला आहे, तर दोघे जखमी आहेत. ही घटना वर्धा-पुलगाव मार्गावरील धोत्रा जवळ पहाटेच्या सुमारास घडली.





अमरावती जिल्ह्यातील एका बार मधून अवैध पद्धतीने दारुची वाहतूक एम एक ४९ ए टी ०४५३ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनामधून वाहन चालक योगेश दिवाकर पेटकर (वय३०) रा. सावंगी मेघे व त्याचे दोन सहकारी रोशन व इम्रान हे दोघे होते. शनिवारी पहाटे ३.१५ वाजताच्या सुमारास भरधाव वेगाने वाहन चालवीत असताना, योगेशचे वाहना वरील नियंत्रण सुटले आणि थेट वाहनाने पलटी घेतली. या अपघातात चालक योगेशचा घटनास्थळी मृत्यू झाला तर दोघे किरकोळ जखमी झाले. हा अपघात धोत्रा येथील कृष्णागिरी मंदिर जवळ घडला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतकाचे दोन्ही सहकारी घटनास्थळा वरून पसार झाले होते.याप्रकरणी सावंगी पोलीस ठाण्यात ☞(पान २ वर)

# शहरात रात्रभर पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन

## २६ कारवाई, अनेक ठिकाणी धाड

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस मुख्यालय अंतर्गत येणाऱ्या दहा पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवारी रात्री अचानक कोबिंग ऑपरेशन चालविण्यात याले. ऑपरेशन






दरम्यान मोठ्या प्रमाणात दारू आणि शस्त्र जप्त करण्यात आले. पोलिसांनी तब्बल २६ कारवाया केल्या आणि अनेक ठिकाणा ☞(पान २ वर)

# पिसाळलेल्या माकडाच्या हल्ल्यात मादी माकडाचा मृत्यू

## -वाठोडा शुक्लेश्वर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर येथे पिसाळलेल्या माकडाच्या हल्ल्यात मादी माकडाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारीं (दि.११) सायंकाळी उघडकीस आली. पिसाळलेल्या माकडाने एका तरुण मुलावर देखील हल्ला केला. या पिसाळलेल्या माकडाचा तात्काळ



बंदोबस्त करण्यात यावा या मागणीचे निवेदन ग्रामपंचायत सरपंच मोहम्मद रिजवान यांनी दिले आहे.तसेच मादी माकडाचा मृत्यू झाल्याचे बघून आईला उठवण्यासाठी तिचे पिल्लू अथक प्रयत्न करत होते. हा संपूर्ण थरार बघण्यासाठी ☞(पान २ वर)

# ऑटोमधून बॅटऱ्या चोरून नेणारे दोघे ताब्यात

## राजापेठ पोलिसांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- महानगर पालिका झोन क्र. २ कार्यालयाजवळून कचरा उचलणाऱ्या दोन ऑटोमधील बॅटऱ्या चोरी प्रकरणी राजापेठ पोलिसांनी अवघ्या काही तासांत ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत दोन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई गुप्त माहितीनुसार करण्यात आली. फिर्यादी कुलदीप किशोर चावरे (वय ४४, रा. दरोगा प्लॉट), जे मनपा झोन क्र. २ येथे प्रभाग क्र. १३ चे सुपरवायझर म्हणून



कार्यरत आहेत, त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे दररोजप्रमाणे ११ जुलै रोजी सकाळी ७ वाजता झोन कार्यालयात आले असता, कचरा उचलणाऱ्या दोन ऑटो चालकांनी चावी ☞(पान २ वर)

# बोरनदी दरोड्यातील सहा आरोपी जेरबंद

## -नांदगावपेठ पोलिसांची कामगिरी, -चार आरोपी अद्याप फरार, शोध सुरू

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** गत एक महिनापूर्वी दि.६ जून रोजी बोरनदी धरणावर फिरायला गेलेल्या एका युवकाला आणि त्याच्या मैत्रिणीला अज्ञात दरोडेखोरांनी मारहाण करून त्यांच्याजवळील सोनसाखळी आणि रोकड पळविली होती.याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून या घटनेतील चार आरोपी अद्याप फरार आहेत. पोलीस यंत्रणेसमोर गुन्हा उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान असतांना पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे प्रशंसनीय कामगिरी केली.

फिर्यादी सिद्धांत सतीशराव राऊत (वय २८, सिव्हिल इंजिनीयर, रा. फ्रेजरपुरा अमरावती) हा युवक त्यांच्या मैत्रीणीसह



बोरनदी धरण येथे गेले असता, सायंकाळी ७ वाजता घराकडे परत निघतांना तीन दुचाकींवर आलेल्या दहा अनोळखी युवकांनी त्यांना अडवले. त्यांना मारहाण करून त्यांच्याजवळील ४,५०० रुपये रोख आणि मैत्रीणीच्या गळ्यातील सुमारे ४५,००० रुपये किमतीची दहा ग्रॅम सोनसाखळी जबरदस्तीने लुटण्यात ☞(पान २ वर)

# अखेर मालखेड रेल्वे येथील अंडरब्रिजचा प्रश्न निकाली

### खा.बळवंत वानखडे यांची रेल्वे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक

### अंडरब्रिज खालील पाणी ४ पंप लावून तत्काळ काढणे सुरु

### रेल्वे प्रशानाचे ४ कर्मचारी अंडरब्रिजवर हजर राहणार

अमरावती/प्रतिनिधीः- सततच्या पावसाने उतखेड, पार्डी, वडगाव जिरे , मालखेड , लालखेड या गावांना मालखेड परिसरातील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मुंबई नागपूर या मुख्य रेल्वे लाईनवरील मालखेड रेल्वे येथील नवीन रेल्वे अंडरब्रिज पाण्याने तुडुंब भरला होता. त्यामुळे वाहतुकीसाठी मुख्य असलेल्या या रेल्वे अंडरब्रिज मधून जाताना नागरिकांना जीव धोक्यात टाकून येणे जावे करावे लागत होते. यात प्रामुख्याने



रुग्ण, विद्यार्थी, शेतकरी , शेतमजूर , कामगार व सर्वसामान्य नागरिक यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. याबाबत पार्डी , वडगाव जिरे , मालखेड , येथील स्थानिक नागरीकांनी खा. बळवंत वानखडे यांचेकडे याबाबत दि.१० जुलै २०२५ रोजी तक्रार दिली होती. खासदार बळवंत वानखडे यांनी ११ जुलै २०२५ रोजी मालखेड येथे स्वतः अंडरब्रिजची पाहणी करून रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यासमवेत भ्रमणध्वनीवर चर्चा करून ☞(पान २ वर)

# जन्म-मृत्यू दाखल्यांचे वितरण पुन्हा सुरू करण्याचे आदेश

## अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाचा आदेश जारी

### ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना मिळणार दिलासा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून थांबलेली जन्म व मृत्यू दाखले देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे. यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्याकडून सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना पत्र जारी करून तात्काळ प्रभावाने जन्म व मृत्यू दाखले जारी करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. यामुळ अचलपूरसह संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.खरेतर, माजी खासदार ☞(पान २ वर)

### ■ जिल्हाधिकारी कार्यालयाचा स्पष्ट आदेश

'जन्म व मृत्यू दाखल्यांची प्रक्रिया विलंब न करता सुरू करावी, नियमांचे पालन करून तात्काळ दाखले वितरित करावेत.' असे स्पष्ट आदेश आहेत. मात्र, सध्या ही प्रक्रिया संथगतीने सुरू असून नागरिकांनी या प्रक्रियेला वेग देण्याची मागणी केली आहे.

# अपुऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांचे हाल

## शिक्षणाचा खेळ खंडोबा

**काटपुर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील अनेक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. काही शाळांमध्ये वर्गशिक्षक नसल्यामुळे एकाच शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी आहे. यामुळे शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला असून दर्जेदार शिक्षणावर परिणाम होत आहे. शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अनेक शाळांमध्ये विषय शिक्षकच नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.तात्पुरत्या उपाययोजना करून वर्ग चालवले जातात, पण दर्जेदार शिक्षणाला बाधा पोहचते.ग्रामीण भागात ही समस्या अधिक गंभीर आहे. वरील सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम अपूर्ण राहतो.स्पर्धा परीक्षांमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना मागे पडावे लागते.शिक्षकांवर अतिरिक्त ताण येतो, ☞(पान २ वर)

# अमरावती महानगरपालिका क्षेत्रात ६.८० लाख मतदार

## निवडणूक आयोगासोबत आयुक्त सौम्या शर्मांची बैठक

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनपा





प्रशासनाद्वारे करण्यात आलेल्या तयारीचा शुक्रवार ११ जुलै रोजी निवडणूक आयोगाने मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे आढावा घेतला. या निवडणुकीमध्ये १ जुलैपर्यंत नोंदणी करणाऱ्या मतदारांना राष्ट्रीय कर्तव्य अदा करता येणार ☞(पान २ वर)

### ■ डिसेंबर नंतर निवडणुकीची शक्यता

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, डिसेंबर नंतर तीन टप्प्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात उत्तर व दक्षिण महाराष्ट्र, दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा तथा तिसऱ्या टप्प्यात मुंबई, ठाणे व कोकण येथे निवडणूक होणार आहे. निवडणुकीसाठी राजकिय पक्षांनी तयारी सुरू केली आहे.

## लोतवाडा-मुंडगाव मार्गावर

# शेतकऱ्यांच्या अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद

**खल्लार/प्रतिनिधीः-** लोतवाडा, कुटासा, मुंडगाव या शेती मार्गावर शेतकऱ्यांनीच अतिक्रमण केल्यामुळे हा रस्ता अरुंद झाला आहे.

सदर रस्ता शेतीचा असून या रस्त्याने ९० टक्के शेतकऱ्यांची शेती आहे. रस्त्यालगतच काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण करुण पेरणीही केली. काही शेतकऱ्यांनी तर मोरी खोदून माती ☞(पान २ वर)



# जिल्ह्यातील ३५० परमिट रूम व रेस्टॉरंट सोमवारी राहणार बंद

### इर्विन चौकातून निघणार विशाल मोर्चा

## परवाना दर आणि वॅट वाढीचा असोसिएशनने केला विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या वतीने विदेशी दारूवर दिड पट वाढ आणि परवाना वार्षिक दरांवर १५ टक्के आणि वॅट पाच टक्के वाढवला आहे. या दरवाढीचा परमिट रूम असोसिएशनच्या वतीने विरोध करण्यात आलेला आहे. शासनाला हा निर्णय परत घेण्याची मागणी संचालकांनी केली आहे. या संदर्भात असोसिएशन च्या वतीने सोमवार १४ जुलै रोजी परमिट रूम बंद



ठेवून मोर्चा काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३५० परमिट बार आणि रेस्टॉरंट सोमवारी बंद राहणार असल्याची माहिती आज शनिवारी १२ जुलै रोजी पत्रकार परिषदेमध्ये परमिट रूम असोसिएशनचे अध्यक्ष नितीन मोहोड यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, सोमवारी परमिट रूम बंद करून सकाळी ११ वाजता इरवीन चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. राज्यभरातून असोसिएशनच्या या निर्णयाला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सोमवारी राज्यभरातील परमिट रूम ☞(पान २ वर)

# कुंभारवाडात तरुणाने घेतला गळफास

अमरावती/प्रतिनिधीः- एका २८ वर्षीय तरुणाने आपल्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुंभारवाडा परिसरात आज शनिवारीं १२ जुलै रोजी सकाळी उघडाकीस आली. या प्रकरणात पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. उमेश किशोर टेटवार (वय २८, कुंभारवाडा) असे मृतक तरुणाचे नाव आहे.

माहितीनुसार मृतक उमेश आपला मोठा भाऊ सतिश किशोर टेटवार (वय ३३) सोबत मूर्ती बनविण्याचे काम करत होता. उमेश आपल्या मोठ्या भावाला कोणतीही मदत कामात करीत



नव्हता. त्यामुळे आई त्याला नेहमी कामासाठी बोलत होती. तो नेहमी आईला कामासाठी पुणे येथे जायचे आहे असे सांगायचा. काही दिवसापासून तो कोणतेही काम करीत नव्हता. शुक्रवारच्या रात्री घरातील सर्वजण जेवण करून झोपले. ☞(पान २ वर)

# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, १३ जुलै २०२५ ❑ E-paper - www.janmadhyam.com


## चारोळी

यशाचे मूल्य त्याग असते
त्यागाचे मूल्य प्रेम असते
प्रेमाचे मूल्य जीवन असते
जीवनाचे मूल्य अमूल्य असते...

पौर्णिमेचा चंद्र आज
फारच जवळ आला
माझ्या प्रियेचा मुखडा
त्यात मला दिसला...

मी पोहचत नाही
माझी बदनामी पोहचते
मला लोकांच्या नजरेत
रोज मोठ करते...

तू दिलेल्या जखमेवरील
खपली काढायला हवी
ती काढणारी आता
मला शोधायला हवी ...

# नव्या क्रीडाधोरणाने काय साधणार ?

आपला देश समृद्ध राष्ट्र म्हणून उदयास येत असताना, आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी ऑलिंपिकसह सर्व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त पदके मिळवणे आवश्यक ठरते. माझ्या मते, क्रीडाक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शाळा आणि ग्रामीण भागांतील पायाभूत सुविधांवर अधिक खर्च करणे अत्यावश्यक आहे. ओडिशा हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. सर्वात आवश्यक बाब म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करणे; यामुळेच चांगले खेळाडू तयार होतील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होण्याची संधी मिळेल.


आपल्याला प्रतिभाशोधनाच्या प्रक्रियेमध्येही बदल घडवून आणण्याची गरज आहे. सध्या सर्व खेळाडू प्रामुख्याने क्रीडा अकादमींमधूनच तयार होतात. त्यामुळे अशा अकादमी संस्कृतीला प्रोत्साहन देण्याची



आवश्यकता आहे. त्यांना आर्थिक संरक्षण देणे, प्रभावी देखरेख करणे हे अत्यावश्यक आहे. यासाठी निश्चितच निधी लागणार आहे. त्याअनुषंगाने सरकारने क्रीडाक्षेत्रासाठीची तरतूद वाढवणे गरजेचे आहे.

जरी आजचे क्रीडा बजेट पूर्वीच्या तुलनेत खूप जास्त असले तरीही ते वाढवणे आवश्यक आहे. आज खेळाडूंना अनेक सुविधा मिळत आहेत, स्पर्धा जिंकल्यावर बक्षिसे मिळतात. तरीही, सरकारला अधिक गुंतवणूक करावीच लागेल.

एक अजून महत्त्वाची बाब म्हणजे देशातील अनेक क्रीडा संघटना (स्पोर्ट्स असोसिएशन्स) स्वतःला स्वायत्त संस्था




▪ मीर रंजन नेगी,
क्रीडा प्रशिक्षक, माजी राष्ट्रीय हॉकीपटू


मानतात, पण त्या सरकारकडून पैसा घेतात, सरकारी जागांचा वापर करतात आणि तरीही मनमानी कारभार करतात. अशा संघटनांवर सरकारचा अंकुश असणे खूप गरजेचे आहे. नव्या क्रीडा धोरणामुळे क्रीडाक्षेत्रात पारदर्शकता वाढेल. सार्वजनिक-खासगी भागीदारी व कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत निधी संकलनाचाही प्रस्ताव यामध्ये आहे.

यात लक्षात ठेवायला हवे की सीएसआर अंतर्गत खेळाडूंवर किंवा क्रीडा क्षेत्रावर जो निधी खर्च होतो, त्यात काही प्रकारचा गैरव्यवहार कंपन्यांनी करू नये. अनेक कंपन्या या निधीत गडबड करतात. धोरणामध्ये आलेले हे बदल पारदर्शकता घेऊन येतील.

या धोरणात स्टार्टअप आणि क्रीडा-उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्याचा समावेश असून तो उल्लेखनीय आहे. आपल्या देशात क्रीडाक्षेत्र अशा टप्प्यावर आहे की तो एक व्यवसाय किंवा करियर म्हणूनही स्वीकारला जात आहे. देशात असे अनेक लोक आहेत जे क्रीडाक्षेत्रात स्टार्टअप आणि उद्यमशीलता घडवून आणत आहेत. सरकार जेव्हा अशा गोष्टींना प्रोत्साहन देते, तेव्हा अजून अनेक लोक पुढे येतात आणि एक चांगला क्रीडा पर्यावरण निर्माण होते. तथापि, यासाठी सरकारला लालफीतशाहीवर नियंत्रण ठेवावे लागेल. सरकारने धोरणात आणखी एक महत्त्वपूर्ण बाब समाविष्ट केली आहे, ती म्हणजे देशात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न. सरकारच्या या पावलामुळे देशातील क्रीडाक्षेत्राला मोठी उभारी मिळेल. जेव्हा देशात अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा होतात, तेव्हा खेळाडूंना जागतिक पातळीवर खेळण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, अनुभव आणि आत्मविश्वास प्राप्त होतो. नवीन पिढीत क्रीडाविषयी उत्साह वाढतो. परदेशी खेळाडूंबरोबर खेळताना आपल्या खेळाडूंची तयारी उंचावते. ज्यावेळी हॉकी इंडिया लीग भारतात सुरु झाली होती, त्यावेळी परदेशी खेळाडूंनी त्यात भाग घेतला होता आणि त्याच लीग सामन्यांनी आपल्या देशासाठी ऑलिंपिक पदक जिंकण्याचा मार्ग तयार केला. नव्या धोरणात सामाजिक समावेशावरही भर दिला गेला आहे. यामुळे सर्व समाजघटकांतील आणि सर्व क्षेत्रांतील लोकांना खेळात भाग घेण्याची संधी मिळेल.

> नव्या क्रीडा धोरणातील खेळांना शिक्षणाशी जोडण्याची बाबही अतिशय महत्त्वाची आहे. जेव्हा खेळ शिक्षणाशी जोडला जाईल, तेव्हा विद्यार्थी फक्त शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही सशक्त बनतील. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल. मात्र त्यासाठी गरज आहे की सरकारच्या धोरणाचा शिक्षणव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात योग्यरीत्या समावेश केला जावा. सरकारने हा नियम केवळ सरकारीच नव्हे तर खाजगी शाळांसाठीही लागू करावा. ज्यांच्याकडे क्रीडांगण आहे, उत्तम क्रीडा सुविधा आहेत अशाच खासगी शाळांना मान्यता मिळावी.

मी इथे एक बाब अधिक स्पष्ट करू इच्छितो की, देशातील बहुतांश खेळाडू ग्रामीण भागांतूनच पुढे येतात. कारण त्यांच्यात काहीतरी सिद्ध करण्याची तीव्र इच्छा असते. त्यांच्या डोळ्यांत खेळात चांगले प्रदर्शन केले तर त्यांना चांगली नोकरी मिळेल, हे स्वप्न असते. यातील काही खेळाडू जेव्हा देशासाठी खेळतात व जिंकतात, तेव्हा त्यांना भरपूर आर्थिक लाभ मिळतो, चांगली नोकरी मिळते आणि ते संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान बनतात. त्यांच्याकडे पाहून इतर लोकही खेळाकडे वळतात. अशा प्रतिभावान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची गरज आहे. या नव्या क्रीडा धोरणात ती ताकद आहे.

याखेरीज खेळाडूंना आर्थिक सुरक्षितता देणेही अत्यावश्यक आहे. यासाठी क्रीडा संस्थांमध्ये, खेळाशी संबंधित उपक्रमांमध्ये खेळाडूंना प्राधान्य देणे गरजेचे आहे. भारताने पुढील काळात आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अधिकाधिक पदके जिंकावीत हे आपले उद्दिष्ट आहे. यासाठी हे नवे क्रीडा धोरण मैलाचा दगड ठरेल. वर्ष २०४७ पर्यंत भारताने जगातील पाच किंवा सहा प्रमुख क्रीडा राष्ट्रांमध्ये सामील व्हायचे असेल तर ही वाटचाल इथूनच सुरू होईल. तथापि, यासाठी सरकारला आणखी एक पाऊल उचलावे लागेल, ते म्हणजे ऑलिंपिकमध्ये सर्व प्रकारच्या क्रीडा प्रकारात आणि स्पर्धात भारतीय खेळाडूंनी सहभाग घ्यायला हवा. ऑलिंपिकमध्ये एकूण ३२ खेळ आणि ३२९ स्पर्धा असतात, त्यापैकी भारत केवळ १६ खेळांतील ६९ स्पर्धांमध्ये भाग घेतो. भारताने आपली पदकसंख्या वाढवायची असल्यास, अधिकाधिक खेळ व स्पर्धांमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने भारत सध्या भाग घेत नाही अशा खेळांचा प्रचार करणे गरजेचे आहे.




**जागतिक पटलावर आजघडीला अस्तित्वात असणाऱ्या बहुराष्ट्रीय संघटनांमध्ये ब्रिक्स या संघटनेला एक वेगळे स्थान आहे. अलीकडील काळात डोनाल्ड ट्रम्प यांनी टेरीफसंदर्भात ब्रिक्स राष्ट्रांना दिलेल्या धमक्यांमुळे ही संघटना ठळकपणाने चर्चेत आली आहे. यादरम्यान ब्राझीलमध्ये ब्रिक्सची शिखर परिषद नुकतीच पार पडली. या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहिले; परंतु चीनी राष्ट्राध्यक्षांची अनुपस्थिती चर्चांना फोडणी देऊन गेली. या परिषदेत पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा करण्यात आलेला निषेध ही भारतासाठी मोठी उपलब्धी ठरली. शांघाय सहकार्य संघटनेच्या अलीकडच्या परिषदेत या हल्ल्याचा उल्लेख टाळण्याचा जो प्रकार घडला त्या पार्श्वभूमीवर ही घडामोड भारताचा पाकपुरस्कृत दहशतवादविरोधी दावा भक्कम करणारी ठरणार आहे.**

# फलित ‘ब्रिक्स’ परिषदेचे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच पार पडलेल्या ऐतिहासिक परदेश दौऱ्यांमध्ये ब्राझीलमध्ये रिओ दी जेनेरो येथे पार पडलेल्या ब्रिक्स देशांच्या शिखर परिषदेचा समावेश होता. ‘ब्रिक्स’ यंदाची ब्रिक्स शिखर परिषद भारतासाठी अत्यंत यशस्वी ठरली आहे. या परिषदेमध्ये एप्रिल महिन्यात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत करण्यात आलेला निषेध भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे. यंदाच्या ब्रिक्स घोषणापत्रात सीमापार दहशतवादाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधातील व्यापक अधिवेशन (सीसीआयटी) या भारताच्या दीर्घकालीन प्रस्तावास ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी समर्थन दर्शविले.

> **▪ सीसीआयटी म्हणजे काय?**
>
> भारताने जागतिक स्तरावर दहशतवादाविरोधात एक सुसंगत आणि सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय करार व्हावा यासाठी आंतरराष्ट्रीय दहशतवादविरोधी व्यापक परिषद म्हणजेच सीसीआयटीचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघासमोर १९९६ साली मांडला होता. या प्रस्तावाचे मूळ उद्दिष्ट म्हणजे दहशतवादाची एक स्पष्ट व्याख्या करणे, त्याविरोधात आंतरराष्ट्रीय कायदे सुसंगत करणे आणि सर्व देशांनी अशा कृतींना कोणत्याही राजकीय, धार्मिक किंवा वैचारिक कारणास्तव समर्थन न देणे याची हमी घेणे. गेल्या अनेक दशकांत या प्रस्तावावर चर्चा झाली असली तरी काही देशांनी, विशेषतः अमेरिका, इस्लामिक राष्ट्रे आणि चीनने विविध कारणांनी त्यावर आक्षेप घेतल्यामुळे तो प्रस्ताव अद्याप ठरविण्यात आलेला नाही.

भारताला हा विषय ब्रिक्ससारख्या बहुपक्षीय व्यासपीठांवर सातत्याने मांडावा लागतो, कारण यामध्ये सामील काही देश, विशेषतः चीन आणि रशिया, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेम धील कायम सदस्य असल्यामुळे त्यांच्याशी एकमत आवश्यक असते.

यावर्षी झालेल्या येथील ब्रिक्स परिषदेत भारताने दहशतवादविरोधी लढाईला केंद्रस्थानी आणले. या वेळी स्वलेल्या संयुक्त निवेदनात भारताने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा स्पष्टपणे निषेध करण्याचा मुद्दा समाविष्ट केला, तसेच दहशतवाद्यांच्या आंतरराष्ट्रीय हालचाली आणि त्यांच्या आर्थिक स्रोतांचा बंदोबस्त करण्याची गरज अधोरेखित केली. ब्रिक्सच्या नव्या सदस्यांमध्ये, विशेषतः इराण आणि इथिओपिया यांसारख्या देशांमधील अंतर्गत संघर्षांचा संदर्भ घेतल्यास, दहशतवादाच्या प्रश्नावर एकमत साधणे अधिक कठीण होते. तरीही, भारताने संयम आणि दृढ भूमिका घेत, ब्राझीलसह सहमती साधत दहशतवादाविरोधात निर्णायक भाष्य घडवून आणले. ब्रिक्सच्या मंचावर भारताच्या या भूमिकेला मिळालेले पाठबळ हे भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे लक्षण आहे.

फक्त दहशतवादच नव्हे, तर बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेची गरज, जागतिक संस्थांमध्ये सुधारणा आणि विकसनशील देशांच्या समावेशक प्रतिनिधित्वाची मागणीही भारताने ठामपणे मांडली आणि तिला सदस्य देशांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. अलीकडेच पार पडलेल्या शांघाय सहकार संघटना (एससीओ) परिषदेच्या घोषणापत्राच्या पार्श्वभूमीवर याचे महत्त्व अधिक आहे. कारण त्या घोषणापत्रात बलुचिस्तानमधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख केला गेला होता, पण पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख जाणीवपूर्वक वगळण्यात आला होता. त्या तुलनेत ब्रिक्स परिषदेने भारताच्या चिंतेला स्पष्ट आणि निर्णायक स्वरूपाचे समर्थन दिले, हे निश्चितच उल्लेखनीय आहे.

या परिषदेमध्ये केवळ सुरक्षा आणि दहशतवादाचे मुद्दे नव्हते, तर भविष्यातील तंत्रज्ञान व सहकार्याचे दिशादर्शक विषयही उपस्थित करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर जबाबदारीने वापर करण्यासाठी एकत्रित धोरण तयार करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. भारताने गेल्या काही वर्षांत उभारलेली डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा ही वैश्विक आदर्श मानली गेली असून ब्रिक्सच्या परिषदेत तिचे खुले कौतुक झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात दहशतवादविरोधात शून्य सहिष्णुतेची (झिरो टॉलरन्सची) भूमिका घेतली पाहिजे असे ठाम मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे, गाझा पट्टीतील संघर्ष, इराण-इस्राईल तणाव यांसारख्या विषयांच्या पार्श्वभूमीवर संवाद व शांततेच्या माध्यम तून समस्यांचे समाधान शोधणे हीच योग्य दिशा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




» रविवार विशेष
अनिल त्रिगुणायत
माजी राजदूत


पंतप्रधानांनी आपल्या भाषणात संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या बहुपक्षीय संस्थांमध्ये व्यापक सुधारणा करण्याची मागणी केली. त्यांनी विशेषतः हे सांगितले की, या जागतिक संस्थांमध्ये विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व आणि सहभाग निश्चित केला जावा, जेणेकरून जागतिक निर्णय प्रक्रियेत खऱ्या अर्थाने समता आणि न्याय सुनिश्चित केला जाऊ शकेल आणि ही निर्णयप्रक्रिया सर्वसमावेशक बनेल.

याखेरीज पर्यावरण, हवामान बदल, जागतिक आरोग्य अशा महत्त्वाच्या विषयांवर बोलताना पंतप्रधानांनी भारतातील आयुष्मान भारत योजनेचा संदर्भ दिला आणि लोकांचे व पृथ्वीचे आरोग्य एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेले असल्याचे अधोरेखित केले. ही भूमिका पर्यावरण-संवेदनशील धोरणांना समर्थन देणारी आणि सतत विकासाच्या मार्गावर नेणारी आहे.

या ब्रिक्स परिषदेला आणखी एक विशेष महत्त्वाचे परिप्रेक्ष्य लाभले ते म्हणजे चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या अनुपस्थितीचे. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदा ते ब्रिक्स शिखर परिषदेपासून दूर राहिले. हे नेमके का झाले, यावर विविध विश्लेषणे समोर आली आहेत. काही ठिकाणी तर झिनपिंग सत्ता हस्तांतरित करण्याच्या तयारीत असल्याचेही म्हटले गेले, मात्र हे अपप्रचार असण्याची शक्यता अधिक आहे. कारण चीनमधील सत्ताधारी व्यवस्थेची पारदर्शकता अत्यंत मर्यादित असते, आणि सत्य माहिती सार्वजनिक होणे हे जवळजवळ अशक्य असते. आजचे वास्तव पाहता, शी जिनपिंग यांचे चिनी सत्तेत अजूनही पूर्ण वर्चस्व आहे. पण त्यांच्या अनुपस्थितीमागे एक प्रमुख कारण म्हणून हे सांगितले जात आहे.

ब्राझीलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सन्मान करण्यात आला. मोदी केवळ ब्रिक्स परिषदेसाठी ब्राझीलला गेलेले नव्हते; तर तो ब्राझीलचा अधिकृत राजकीय दौरा होता. रियो द जिनेरो येथे परिषदेत सहभागी झाल्यानंतर मोदी ब्रासीलियामध्ये द्विपक्षीय चर्चेसाठी गेले. जिथे ब्राझीलचे अध्यक्ष लुईस लुला द सिल्वा यांनी त्यांच्या सन्मानार्थ विशेष रात्रभोजन आयोजित केले.स्वतःला ‘सर्वोच्च आणि केंद्रस्थानी असलेला जागतिक नेता’ मानणाऱ्या शी जिनपिंग यांना ही प्रतिष्ठा असह्य झाली असावी, असे विश्लेषक म्हणतात. त्यामुळेच कदाचित त्यांनी या परिषदेपासून स्वतःला अलिप्त ठेवले. अर्थात हेही खरे आहे की, चीन सध्या आर्थिक, सामाजिक आणि भू-राजकीय अशा अनेक समस्यांशी झगडत आहे. त्यामुळेही त्यांनी प्रवास टाळला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. फक्त शी जिनपिंगच नव्हे तर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन हेही यावेळी परिषदेला उपस्थित नव्हते. यामागे त्यांच्याविरोधात निघालेला आंतरराष्ट्रीय अटक वॉरंट आणि युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यांची अनुपस्थिती अपेक्षित होती.

एकंदरीत पाहता, यावर्षीची ब्रिक्स परिषद भारतासाठी अत्यंत निर्णायक ठरली आहे. भारताने केवळ आपले राष्ट्रीय हित जोपासले नाही, तर जगाच्या दक्षिण गोलार्धातील विकसनशील राष्ट्रांचे मुद्दे, आकांक्षा आणि चिंताही प्रभावीपणे मांडल्या. यामुळे भारत ‘ग्लोबल साउथ’चा नैसर्गिक प्रतिनिधी आणि विश्वसनीय भागीदार म्हणून पुन्हा एकदा समोर आला आहे.

# मेघामृताची बरसात



पहिला पावलावर उन्हाला सावरणारा असा हा पाऊस! ग्रीष्माची तलखी मिटवणारा पाऊस! बळीराजाच्या डोळ्यांना शांतवणारा पाऊस! आकाशाच्या हृदयाच्या तळापासूनचा जिव्हाळ ओलावा असणारा पाऊस! प्रियकराच्या अनुरागासारखं चहूअंगांनी आलिंगित करणारा, गात्रागात्रात तृप्तीचा गारवा भिनवणारा पाऊस! किती त्याचं वर्णन करावं...? शब्द तोकडे पडतील. अनुभव कधीच जुना न होवू देणारा पाऊस! दरवर्षी त्याच्या वेल्हाळपणावर जीव जडावयाला भाग पाडणारा पाऊस...! कालिदासाच्या आरोपी, शिक्षा भोगत असलेल्या यक्षाला, आपल्या प्रेयसीला मेघाला दूत करावयास प्रवृत्त करावयाला लावणारा पाऊस! आणि एका सुंदर आणि मनोज्ञ महाकाव्याला, मेघदूताला जन्माला आणण्यास कारण ठरलेला पावूस! कालिदासाच्या काव्यप्रतिभेला उत्तुंगावर नेणारा पाऊस!

त्याचं काय वर्णन करावं? किती त्याची वाट बघणं! डोळ्यात पाणी आणून शरीराला, धात्रीला गारवा दे अशी विनवणी करून घेणारा पाऊस! देवाच्या देण्यातलं एक सुंदर, ओलतं, हिरवं देखणं शिल्प म्हणजे पाऊस! त्याचे प्रकार किती! त्याची रुपं तरी किती! कधी अलवार, तर कधी नाचरा, कधी अबोध बालकासारखा! कधी मुजोर ! तर कधी प्रलयकारी शिवासारखा... कोणत्याही उपायानं शांत न होणारा! कधी रानातला, मोकाट सुटलेल्या वासरासारखा! तर गरत्याबाई सारखा निमुटपणे पडणारा! कधी नुस्ताच आरडाओरडा करीत ‘येणार येणार’ करत वाजतगाजत येणाऱ्या नवरदेवासारखा! तर कधी दिवसेंदिवस दडी मारून लपलेल्या मुलासारखा! पण तो हवासाच असतो.

कुठेतरी दूर रानात पडला तरी आपल्या आगमनाची तो मृद्गंधानं वार्ताही देणारच! मुकाटपणे तो येत नाहीच. ताशावाजंत्री ही वाजणारच. काय सुंदर देखावा असतो त्याच्या आगमनापूर्वीचा... निळंभोर आकाश उदी रंगाचं होतं...पांढरे शुभ्र बगळे अधिकच शुभ्र दिसू लागतात... हिरवी झाडं अधिकच हिरवी आणि आतूर होतात... घरावरील काचेची तावदानं चंदेरी रंगानं चमकू लागतात. उघड्या माळरानावर धुळीचे लोट आकाशाला गवसणी घालू पाहतात. जणू आपल्या धूळभरल्या हातानं ते पावसाला कवेत घेवू पाहतात. रस्त्यावर मुलांचा, खेळाचा डाव रंगू लागतो. ऑफिसातली कृत्रिम गारव्याची साधनं आपोआपच बंद करून सारं ऑफिस टेरेसवर गोळा होवू लागतं... घरातले आजोबा आजी आपआपल्या खुर्च्या एकमेकांच्या नजरा चुकवत व्हऱ्हांड्यात आणतात. जुन्या आठवणींचं गाठोडं त्यांच्याही नकळत हळूच त्यांच्या पायाशी टेकतं... मध्यमवयीन मुलगा आईबाबांची लगबग बघून आपलीही खुर्ची बाहेर आणतो आणि स्वयंपाकघराचा कानोसा घेत बाबांना कांदा भजी खायची आहेत, करतेस का ? असं प्रेमानं विचारतो. आजचा मौसम आणि व्हऱ्हांड्यातील जमलेली मैफिल पाहून स्वयंपाकघर कांदा चिरायला घेतं ! अशी सगळी तयारी पाहून आकाशातला पावूस धरतीवर उतरायचं ठरवतो आणि मग तो येतो सर्वांना चिंब चिंब करतो.... कोणाला किती थेंब वाटायचे ते ठरवतो. कुणाला किती आणि कसं भिजवायचं ते ठरवितो. आजीच्या उरल्या सुरल्या पांढऱ्या केसातील अवखळ बटेत एक पावसाचा टप्पोरा थेंब अलगद ठेवतो... आणि त्या थेंबांच्यासह आजी-आजोबांना पार तारुण्यात घेऊन जातो. सुरकुतलेल्या हातांवर आठवणीच्या हृदयाची थरथरती कवडी ठेवून जातो. कानाभोवतालचे मफलर अधिकच घट्ट करीत आजोबा आजीची आठवणीच्या वादळानं उडणारी तारांबळ बघत राहतात. त्यांची ही गम्मत बघत पाऊस अधिकचं कोसळू लागतो. अंगणात नातवंडाचा खेळ बघत आपलं गेलेलं वय आठवत आजीआजोबा निवांत होतात. अगदी अरसिक माणूस देखील त्याच्या पहिल्या वहिल्या स्पर्शानं सुखावतो! ही निसर्गाची अवर्णनीय देणगी दरवर्षी आपण भोगतो.




▪ अरुणा सरनाईक


> तारुण्याचं आणि पावसाचं तर अगदी जीवाभावाचं नातं ! तो ते आर्वजून निभावतो. प्रत्येक प्रेमात पडलेल्यांना, आपली ती अगदी मधुबाला वाटते. पाऊस आणि मधुबालाचं नातं जन्मजन्मांतरीचं आहे. वर्ष उलटलीत पण ओलेती मधुबाला तशीच राहीली. देवाची ही एक अक्षय कलाकृतीच मानावी लागेल. तिच्या नैसर्गिक सौंदर्याला पावसानं जणू चारचाँद लावलेले आहे.



तसे सगळेच ऋतु आपले आवडीचे. पण त्यांचा येणारा क्रम देवानं ठरविलेला आहे. आधी येणारा तो उन्हाळा चैत्रपाडव्यापासून तो सुरु होतो. त्यावेळी मन त्याचं आनंदानं स्वागत करतो. हळूहळू उष्मा वाढीला लागतो. त्यावेळी देखील वळवाच्या पावसाची एखादी अवखळ सर मनाला शरीराला गारवा देऊनच देते.

अगदी ऐन थंडीत सुद्धा क्वचित हजेरी लावणारा पावूस सर्वांनाच आवडतो. कारण मुळातच त्याच्यावर सर्वांचा फार जीव असतो. त्याचं अपार आकर्षण आहे. तो वेड लावणारा घननीळ आहे. निळ्याकाळ्या मेघातले ते अमृत आहे. पाऊस न आवडणारा विरळाच कोणी असावा. असं वाटतं हिरव्या वनराईतला त्याचा नूर वेगळा... पर्वतशिखरावरचा तोरा वेगळा.... सागराच्या उदरात रिता होणारा समर्पित पाऊस वेगळा आणि नदीच्या अवखळ नाचऱ्या प्रवाहात भोवरे फिरवणारा निरागस पाऊस वेगळा. किती त्याच्या रुपाची अपूर्वाई वर्णावी!

कवीच्या कवितांचा तो तर कायम महत्त्वाचा विषय ठरलेला असतो. कधी तो त्यांचा सखासाजण, तर कधी बेदर्द, जालीम रसिया असतो. कधी प्रियकराचा संदेश घेऊन येणारा मित्र असतो. लोकगीतात ह्या सगळ्या भावभावनांचा सुंदर आविष्कार बघायला मिळतो. अगदी प्राचीन कवींपासून. आजचे कवी तर सगळेच पावसाच्या प्रेमात आकंठ आहेत. देवानं अनेक नजराणे आपल्याला दिलेत. ते आपण कसे स्विकारतो ते आपल्या मनोवृत्तीवर अवलंबून असतं. त्यात अपार भाव नसतो. हा माझा, हा परका असा फरक नसतो. तो एकदिलानं सर्वांना सारखं देतो. पावूस तर उघडं सत्य आहे तो किंचित निलाजरा आहे. तो कुणालाही कसाही कुठेही भिजवतो. तसाच तो सर्वसमावेशक आहे. आपल्या बरसण्यात अनेकांचं दुःख वाहून नेतो. त्यांना हलकं करतो. म्हणून म्हणावसं वाटतं...

तुझं, रे बरं असतं
दाटून आलं की मोकळं होणं !
कोणाच्याही संमतीची तुला गरज भासत नाही, मोठ्या अधिकारानं तर, कधी बळजबरीनं तू, आपल्या रंगात भिजवून टाकतोस. अगदी नखशिखांत!
मी मात्र, माझं- याचं,
हवं-नकोच्या संभ्रमांत बंदिस्त!
मनात आलेलं मनातच जिरवत!
कधी उठेल गदारोळ!

# लघुउद्योगांना हवे संरक्षण

एमएसएमई क्षेत्र देशाच्या उत्पादन, निर्यात आणि रोजगार निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावते. एमएसएमई मंत्रालयाच्या उद्यम पोर्टलवर मार्च २०२५ अखेरपर्यंत नोंदणीकृत सुमारे ६.२ कोटी एमएसएमई आहेत, जे २५.९५ कोटी लोकांना रोजगार देत आहेत. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) एमएसएमईचा वाटा सुमारे ३० टक्के आहे.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योगदान**

एमएसएमई क्षेत्राकडून वर्ष २०२४-२५ मध्ये सुमारे १२.३९ लाख कोटी रुपयांचा निर्यात व्यवसाय झालेला आहे. देशातून निर्यात होणाऱ्या एकूण उत्पादनांपैकी सुमारे ४६ टक्के उत्पादने एमएसएमई क्षेत्रातून येतात. २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात एमएसएमई क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने बहुआयामी उपाययोजनांची एक मालिका सादर केली आहे. यामध्ये आर्थिक सहाय्य, खरेदी धोरण, क्षमता निर्माण, आणि बाजार एकत्रीकरण यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे. मुख्य योजनांमध्ये 'उद्योग नोंदणी पोर्टल', 'पंतप्रधान विश्वकर्मा योजना', 'पीएमईजीपी', 'स्फूर्ती' व 'एमएसई सार्वजनिक खरेदी धोरण' यांचा समावेश होतो. त्यामागचा उद्देश उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, रोजगार वाढवणे आणि असंघटित क्षेत्रांना औपचारिक अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे हा आहे.



एमएसएमई वर्गीकरणासाठी गुंतवणूक व उलाढाल मर्यादा वाढवण्यात आल्या आहेत. यामुळे उद्योग विस्तार व कार्यक्षमतेत सुधारणा करण्यास हातभार लागणार आहे. निश्चितच निर्यातदारांना पाठबळ देण्यासाठी सरकारचे ही पावले स्तुत्य आहेत. परंतु भविष्यात उद्यास येणाऱ्या संधींचा पुरेपूर लाभ मिळवण्यासाठी एमएसएमईना सर्व शक्य उपायांनी सक्षम बनवणे अत्यावश्यक आहे.

**वर्तमानातील चिंता**

सध्या देशात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम (एमएसएमई) क्षेत्राशी संबंधित अहवालांमध्ये एमएसएमई क्षेत्रावरील वाढत्या अडचणींबाबत चिंता व्यक्त करण्यात येत आहे आणि या क्षेत्राला वाढत्या आव्हानांपासून वाचविण्याची गरज अधोरेखित केली जात आहे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या सिडबीच्या अहवालानुसार, सध्या एमएसएमईसाठी सुलभ कर्जप्राप्ती ही एक मोठी समस्या बनलेली आहे. एमएसएमईच्या कर्ज मागणी आणि पूर्ततेमध्ये सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे अंतर आहे. जर मागणीनुसार कर्ज मिळाले, तर एमएसएमई क्षेत्रात सुमारे ५ कोटी नवीन रोजगार निर्मिती होऊ शकते. नीती आयोगाच्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, छोट्या उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार कर्ज, तांत्रिक कौशल्य, संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात योग्य मदत मिळाल्यास एमएसएमई रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासाचे एक मोठे माध्यम ठरू शकते.

**नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी...**

भारताने अलीकडेच इंग्लंडसोबत मुक्त व्यापार करार (एफटीए) केला आहे. अमेरिका व्यतिरिक्त अन्य अनेक महत्त्वाच्या देशांसोबत द्विपक्षीय व्यापार करार पूर्ण झाल्यास एमएसएमईची भूमिका निर्णायक ठरेल. त्यामुळे, नव्या संधींचा लाभ घेण्यासाठी एमएसएमईला प्रोत्साहन देऊन त्यांना बळकट करणे अत्यावश्यक आहे.



▪ जयंतीलाल भंडारी
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

तथापि, अमेरिकेच्या टॅरिफच्या आव्हानाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिका सरकारने भारतावर लावलेला २६ टक्के टॅरिफ ९० दिवसांसाठी स्थगित केल्यामुळे एमएसएमईला काहीसा दिलासा मिळाला आहे. पण अमेरिकी बाजारावर अवलंबून असलेल्या अनेक एमएसएमई निर्यातदारांना अमेरिकन खरेदीदारांकडून सवलतीची नव्याने मागणी, करारांची नव्याने चर्चा, तसेच देयकांमध्ये होणाऱ्या विलंब यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे, आणि अशा परिस्थितीत सरकारच्या रणनीतिक सहकार्याची त्यांना नितांत गरज आहे.

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिल्लीच्या विज्ञान भवनात राष्ट्रीय नागरी सेवा दिनाच्या कार्यक्रमात केलेल्या भाषणात सांगितले होते की, नव्या व्यापार युगातील बदलांच्या काळात भारतातील एमएसएमईसमोर आव्हानांमध्येही संधी दडलेल्या आहेत आणि हे उद्योग जागतिक पुरवठा साखळीत स्पर्धात्मक बनू शकतात.

**टॅरिफ युद्ध आणि एमएसएमई**

टॅरिफ युद्धामुळे एमएसएमई क्षेत्राला जे धक्के बसत आहेत, त्यातून या क्षेत्राला सावरण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करून निर्यातदारांना आधार देणे आवश्यक आहे. त्याच वेळी या क्षेत्रातील उद्योजक आणि निर्यातदारांनी नव्या आव्हानांसाठी स्वतःला सज्ज करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारने निर्यातदारांना सहकार्य करण्यासाठी २२५० कोटी रुपयांच्या निर्यात प्रोत्साहन मिशनची अंमलबजावणी वेगाने करण्याचे आणि विनातारण कर्ज देण्याच्या योजनांची आखणी केली आहे. २०२५-२६ मध्ये एमएसएमईना दिले जाणारे कर्ज हे गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे २० टक्क्यांनी वाढवून १७.५ लाख कोटी रुपये करण्यात आले आहे. एमएसएमई क्षेत्रही नवोपक्रम, स्पर्धात्मकता, क्षमता विकास आणि संशोधनाच्या दिशेने पुढे जाण्याची तयारी करत आहे. मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास, अधिक लॉजिस्टिक सोयी, कमी व्याजदरात कर्ज, व्याज समतुल्य योजना पुन: सुरू करणे, आणि कर्ज हमी कार्यक्रम विस्तारण्यासारख्या उपायांनी एमएसएमईला आर्थिक स्थैर्य मिळू शकते.

## जीएसटी प्रणाली सुलभ व्हावी

- सरकारने एमएसएमईना जीएसटी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचा विचार करून जीएसटी प्रणाली सुलभ करावी लागेल.
- एमएसएमईच्या हितासाठी उत्पादनाशी संलग्न प्रोत्साहन योजनांचा विस्तार केल्यास विशेषतः निर्याताभिमुख एमएसएमईना फायदा होईल.
- भारतातील एमएसएमईनी दर्जासोबत समकालीन डिजिटल तंत्रज्ञान आत्मसात करून अमेरिका सहित जागतिक बाजारपेठेत आपली स्पर्धात्मक क्षमता धोरणात्मक पद्धतीने वाढवावी, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
- अशा विविध उपाययोजनांमुळे भारत नव्या आव्हानांना एमएसएमईसाठी नव्या संधींमध्ये रूपांतरित करू शकतो.

# दोन अंश पर्यावरणासाठी...

*वातानुकुलित यंत्रांमुळे वीजेच्या मागणीवर वाढणारा दबाव आणि पर्यावरणाची होणारी हानी विचारात घेऊन केंद्र सरकार लवकरच नवी नियमावली जाहीर करणार आहे. यांनुसार, बाजारात येणाऱ्या सर्व नव्या एअर कंडिशनरमध्ये तापमान २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी करण्याची आणि २८ डिग्री सेल्सियसपेक्षा अधिक ठेवण्याची सुविधाच असणार नाहीये. म्हणजेच, वापरकर्त्याला केवळ या मर्यादित तापमानाच्या श्रेणीमध्येच वातानुकूलन करता येईल. या नियमानुसार, सार्वजनिक इमारती, कार्यालये, मॉल्स, हॉटेल्स, शासकीय विभाग, वाहने आणि भविष्यात घरगुती उपकरणेसुद्धा या मर्यादित येतील. ही नवी नियमावली काटेकोरपणे अंमलात आणली गेली, तर २०३५ पर्यंत वीजेच्या कमाल मागणीत ६० गीगावॅटपर्यंत बचत होऊ शकते. तसेच नवीन वीज प्रकल्प आणि ग्रिडसाठीच अंदाजे ८८ अब्ज डॉलर्स इतक्या गुंतवणुकीची गरजही टळू शकते.*

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात उन्हाळ्याचे दिवस म्हणजे जणू सजीव सृष्टीसाठी एक परीक्षा असते. ४० ते ४५ अंश सेल्सियसच्या तापमानात श्वास घेणेसुद्धा कठीण होते. या उष्णतेपासून संरक्षणासाठी एअर कंडिशनरचा (वातानुकूलक) वापर करण्याचे प्रमाण गेल्या दोन दशकांमध्ये वाढले आहे. तथापि, एसींचा अनियंत्रित वापर हा निसर्गासाठी गंभीर संकट निर्माण करणारा आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ज्ञांकडून एसीचा वापर कमी करण्याबाबत सातत्याने जनप्रबोधन केले जाते. आता केंद्र सरकारकडून एसीच्या तापमानावर मर्यादा घालण्यासाठी काही मानके ठरवण्यात येणार आहेत. हा निर्णय पर्यावरण व आरोग्यदृष्ट्याही दूरगामी परिणाम घडवणारा निर्णय आहे.



**नवा नियम काय सांगतो?**

सध्या विचाराधीन असणाऱ्या या प्रस्तावातील नियमांनुसार, बाजारात येणाऱ्या सर्व नव्या एअर कंडिशनरमध्ये तापमान २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी करण्याची आणि २८ डिग्री सेल्सियसपेक्षा अधिक ठेवण्याची सुविधाच असणार नाहीये. म्हणजेच, वापरकर्त्याला केवळ या मर्यादित तापमानाच्या श्रेणीमध्येच वातानुकूलन करता येईल. या नियमानुसार, सार्वजनिक इमारती, कार्यालये, मॉल्स, हॉटेल्स, शासकीय विभाग, वाहने आणि भविष्यात घरगुती उपकरणेसुद्धा या मर्यादेत येतील. आजघडीला घरातील जुन्या एसींसाठी सध्या नियम बंधनकारक नसला तरी येणाऱ्या काळात त्यावरही धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊ शकतो.

**ही गरज का निर्माण झाली?**

✔ **ऊर्जेचा अपव्यय :** गेल्या काही वर्षांत देशात वातानुकूलन यंत्रांचा वापर प्रचंड वाढला आहे. एसीच्या अतिवापरामुळे उन्हाळ्यात वीजेची मागणी अक्षरशः गगनाला भिडते. एका आकडेवारीनुसार, एक एसी सरासरी १.५ ते २ युनिट वीज प्रति तास वापरतो. याचाच अर्थ हे उपकरण सतत चालू ठेवणे म्हणजे हजारो कोटी युनिट वीजेचा अपव्यय.

✔ **कार्बन उत्सर्जनाचा धोका :** भारतात बहुसंख्य वीजनिर्मिती अजूनही कोळसा, डिझेल व नैसर्गिक वायू या जीवाश्म इंधनांवर आधारित आहे. अशा स्थितीत वीजेचा वापर वाढवणे म्हणजे जीवाश्म इंधनाच्या ज्वलनाला गती देणे होय. यामुळे तापमान खाली आणण्यासाठी वापरले जाणारे एसी प्रत्यक्षात वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायू वाढवत असून ते हवामान बदलाचे मूळ कारण ठरते.

✔ **आरोग्याला धोका :** तज्ज्ञांच्या मते, २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी तापमान हे सर्दी, खोकला, श्वसनाचे त्रास, सांधेदुखी, त्वचेचे विकार आणि शरीरातील उष्णतेच्या संतुलनाचा बिघाड यांसारख्या अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण करू शकते. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींसाठी हे अत्यंत हानिकारक ठरते.

✔ **सामाजिक विषमता :** शहरांतील उच्चभ्रू वर्ग, अतिश्रीमंत वर्ग हा एसीचा आनंद लुटत ऐन उन्हाळ्यातही गारव्याचा अनुभव घेत असतो; मात्र त्याच वेळी ग्रामीण भाग किंवा शहरी झोपडपट्ट्यांतील लोक उकाड्याचा सामना करतात. ही बाब सामाजिक विषमता, ऊर्जाविषमता वाढवणारी आहे. त्यादृष्टीनेही या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

**फायदे काय होतील?**

**वीजेची बचत :** सरकारच्या अंदाजानुसार, जर सर्व एसी २४ डिग्री सेल्सियसच्या आसपासच ठेवले गेले, तर दरवर्षी सुमारे २४० कोटी युनिट वीज वाचवता येईल. याचा अर्थ हजारो कोटींचा वीजखर्च कमी होईल, आणि त्यामुळे ऊर्जा क्षेत्रातील ताण कमी होईल. ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार, एसीच्या तापमानात केवळ १ अंश सेल्सियस वाढ केली, तर वीजेची खपत सुमारे ६ टक्क्यांनी घटते. जर देशभरातील नागरिकांनी एकत्रितपणे आपले एसी फक्त १ अंश जास्त तापमानावर चालवले, तर पीक अवर्समध्ये (सर्वाधिक वीज वापराच्या काळात) सुमारे ३ गीगावॅट वीज वाचवता येईल. ही बचत अनेक शहरांच्या एकूण वीज मागणीइतकी आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कलेच्या एका अभ्यासानुसार, भारतात जर ही नवी नियमावली काटेकोरपणे अंमलात आणली गेली, तर २०३५ पर्यंत वीजेच्या कमाल मागणीत ६० गीगावॅटपर्यंत बचत होऊ शकते. ही आकडेवारी केवळ वीजबचतीपुरती मर्यादित नाही, तर यामुळे नवीन वीज प्रकल्प आणि ग्रिडसाठी आवश्यक ७.५ ट्रिलियन रुपयांपर्यंत (अंदाजे ८८ अब्ज डॉलर्स) इतक्या गुंतवणुकीची गरजही टळू शकते. या आर्थिक बचतीचा उपयोग आरोग्य, शिक्षण, जलव्यवस्थापन किंवा इतर आवश्यक क्षेत्रांत होऊ शकतो.



▪ रंगनाथ कोकणे
पर्यावरण अभ्यासक

**पर्यावरणस्नेही विकास :** कार्बन उत्सर्जन कमी झाल्यास हवामान बदलाचे परिणाम काही प्रमाणात नियंत्रित करता येतील. भारताने २०७० पर्यंत नेट झिरो कार्बन उत्सर्जन साध्य करण्याचा संकल्प केला आहे. या दिशेने हा एक सकारात्मक पाऊल आहे.

**आरोग्य लाभ :** वातानुकूलित वातावरणात राहणे म्हणजे एक प्रकारचा कृत्रिम हवामान अनुभव. अति थंड वातावरणाने शरीराच्या नैसर्गिक उष्मता संतुलनात बिघाड होतो. २४ ते २६ डिग्री सेल्सियस हा आदर्श तापमान मापदंड असल्याचे जागतिक आरोग्य संघटना सांगते.

**आर्थिक फायदा :** मध्यमवर्गीयांसाठी हा निर्णय वीज बिल कमी होण्याचा एक मार्ग ठरेल. कमी तापमानासाठी एसीला अधिक ऊर्जा लागते, त्यामुळे तापमानाचे नियंत्रण म्हणजे सरळ सरळ बिलात बचत.

### अंमलबजावणीतील अडथळे

कोणतेही धोरण किंवा नियम यशस्वी होण्यासाठी त्याची अंमलबजावणी सक्षम असावी लागते. याअनुषंगाने सरकारकडून पुढील गोष्टींची गरज आहे: एसी उत्पादक कंपन्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे व तांत्रिक निर्देश स्पष्टपणे जारी करणे, बाजारात जुन्या यंत्रांची विक्री रोखणे किंवा कालांतराने त्यांच्या वापरावर नियंत्रण आणणे, जनजागृती मोहिमा राबवून लोकांना पर्यावरणपूरक वापराचे महत्त्व समजवणे आणि सरकारी व खासगी कार्यालयांमध्ये ऊर्जा-प्रभावी धोरणांचे सक्तीने पालन करणे या गोष्टी प्राधान्याने केल्या गेल्या पाहिजेत. एसीचा योग्य वापर हा केवळ सरकारच्या धोरणांवर अवलंबून नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून ऊर्जा बचतीच्या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे.
तापमानाच्या या मर्यादेमुळे भारत ऊर्जा बचत, पर्यावरण रक्षण, आरोग्य आणि आर्थिक संतुलन यामध्ये महत्त्वाचे यश साधू शकतो.

### इतर देश काय करतात?

भारत सरकारचा निर्णय आंतरराष्ट्रीय निकषांनुसार अगदी योग्य दिशेने आहे. जपानमध्ये सरकारी इमारतींमध्ये २६ डिग्री सेल्सियस, तर इटली, स्पेनसारख्या पश्चिम युरोपियन देशांमध्ये २३ ते २७ डिग्री सेल्सियसची मर्यादा बंधनकारक आहे. दक्षिण कोरियासारख्या देशांनीही यासंबंधी स्पष्ट नियम लागू केले आहेत. याचाच अर्थ हा निर्णय एकट्या पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून नाही, तर राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेचा भाग म्हणूनही महत्त्वाचा आहे.

# कॅमेरा इथे, डेटा तिथे!

*तुमच्या घरावर, दुकानावर किंवा ऑफिसवर लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा सुरक्षिततेसाठी असला, तरी त्या माध्यमातून तुमच्यावर कुणीतरी लक्ष ठेवत असण्याची शक्यता आहे. याचे कारण भारतात अनेक ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे थेट चीनमधील सर्व्हरला जोडले गेलेले आहेत आणि हीच बाब देशाच्या सुरक्षेसाठी मोठा धोका ठरली आहे. चीनमधील हिकव्हिजन, दहुआ यांसारख्या कंपन्यांचे कॅमेरे सहजपणे डेटा गोळा करून बाह्य सर्व्हरवर प्रसारित करू शकतात आणि त्यांचा थेट संबंध चीन सरकारशी आहे. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून भारताच्या अंतर्गत हालचाली आणि संवेदनशील माहिती चीनला पोहोचण्याचा धोका आहे. यातून मिळणाऱ्या डेटाचा वापर गुप्तहेरगिरी आणि माहिती युद्धात केला जातो.*




एकविसाव्या शतकात संरक्षण आणि गुप्तचर तंत्रज्ञान हे केवळ रणांगणापुरते मर्यादित न राहता सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातही शिरकाव करत आहे. यामध्ये सुरक्षा कॅमेरे विशेषतः सीसीटीव्ही – महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारतात विविध ठिकाणी बसवण्यात येणारे हजारो कॅमेरे हे चीनमध्ये उत्पादित असल्याची बाब गंभीर चिंतेचा विषय बनली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारतात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे.



किंबहुना, सुरक्षेसंदर्भातील उपाययोजनांचा विषय निघाला की सीसीटीव्ही बसवण्याचा मुद्दा जणू हुकमी एक्का म्हणून वापरला जातो. पण यामुळे मिळणाऱ्या सुरक्षेची दुसरी बाजू फारशी विचारात घेतली जात नाही. ती आहे हेरगिरीची आणि आपल्या सर्व हालचालींवर अदृश्य शक्तींकडून ठेवल्या जाणाऱ्या पाळतीची.

व्हिडीओ सर्व्हिलन्स व्यवसायात हिकव्हिजन किंवा डाहुआ या दोन चीनी कंपन्यांचे वर्चस्व आहे. आयडीसी या बाजार संशोधन संस्थेच्या ताज्या आकडेवारीनुसार, अंदाजे ३५ अब्ज डॉलर्सच्या व्हिडीओ सर्व्हिलन्स उपकरणांच्या जागतिक बाजारात एक तृतीयांश हिस्सा हिकव्हिजन आणि डाहुआ या दोन कंपन्यांचा आहे. या दोन्ही महाकाय कंपन्यांचे उपकरणे जगभरातील विमानतळे, रेल्वे स्थानके आणि अगदी सरकारी इमारतींमध्ये लावले गेले आहेत. भारत सरकारने सर्व सीसीटीव्ही व अन्य सुरक्षा कॅमेऱ्यांचे तपासणी करण्यासाठी नवीन आणि अधिक कठोर नियम लागू केले आहेत. यामागे चीनकडून होणाऱ्या गुप्तहेरगिरीच्या संभाव्य धोक्याचा उल्लेख करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, कॅमेरा उत्पादक कंपन्यांना त्यांचे हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि सोर्स कोड सरकारी प्रयोगशाळांमध्ये चाचणीसाठी सादर करावे लागतील. ही माहिती सरकारी दस्तऐवजांमधून आणि कंपन्यांच्या ईमेल संवादातून समोर आली आहे. सुरक्षेसंबंधी उपकरणे बनवणाऱ्या जागतिक कंपन्या आणि भारत सरकार यांच्यात गेल्या काही आठवड्यांमध्ये या सुरक्षाविषयक नव्या धोरणांवरून मतभेद झाले आहेत, कारण या नव्या नियमांमुळे पुरवठा साखळी (सप्लाय चेन) मध्ये अडथळे येऊ शकतात. त्यामुळे मोदी सरकार आणि परदेशी कंपन्यांमधील आधीपासून असलेले धोरणात्मक मतभेद अधिक तीव्र होऊ शकतात.

### सरकारी संस्थांमध्ये चिनी कंपन्यांचे १० लाख कॅमेरे

भारताची ही भूमिका मुख्यत्वे चीनच्या प्रगत निगराणी क्षमतांमुळे घेतली गेली आहे. एका अंदाजानुसार, आजघडीला सरकारी संस्थांमध्ये एकूण १० लाखांहून अधिक कॅमेरे चिनी कंपन्यांचे आहेत आणि यांच्याशी संबंधित माहिती विदेशी सर्व्हरवर पाठवली जात आहे. साहजिकच ही बाब राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे वैशिष्ट्य असे की, यामधील सर्व डेटा थेट क्लाउडवर अपलोड होतो. अनेक वेळा चिनी सर्व्हरवर डेटा पोहचतो, आणि तो व्हिडीओ नंतर मनाप्रमाणे एडिट करणे किंवा फेक व्हिडीओ तयार करणे शक्य होते. त्यामुळे हे केवळ निरीक्षणाचे माध्यम राहत नाही, तर त्याचा वापर गुप्तहेरगिरी आणि माहिती युद्धात केला जातो.

एप्रिलपासून लागू करण्यात आलेल्या नवीन धोरणातील नियमांनुसार, चीनच्या हिकव्हिजन, श्याओमी आणि डाहुआ, दक्षिण कोरियाच्या हानवा आणि अमेरिकेच्या मोटोरोला सोल्युशन्स यांसारख्या कंपन्यांना त्यांचे कॅमेरे भारतात विकण्यापूर्वी भारतीय सरकारी प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी सादर करावे लागतील. हे नियम ९ एप्रिलपासून सर्व इंटरनेटशी जोडलेल्या सीसीटीव्ही मॉडेल्सवर लागू करण्यात आले आहेत.

सायबरसुरक्षा तज्ज्ञांच्या मते, गुप्तहेरगिरीचा धोका कायम असतो. कोणतेही इंटरनेटशी जोडलेले कॅमेरे दूरवरून नियंत्रित करता येतात. त्यामुळे ही सिस्टीम मजबूत व सुरक्षित असणे आवश्यक आहे. दोन महिन्यांपूर्वी भारतीय अधिकाऱ्यांनी १७ देशी आणि परदेशी कॅमेरा उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली होती. बहुतेक कंपन्यांनी या बैठकीत सांगितले की, त्या या नियमांची पूर्तता करण्यास अद्याप तयार नाहीत आणि त्यांना यासाठी अतिरिक्त वेळ हवा आहे; मात्र सरकारने ही मागणी फेटाळून लावली. सरकारच्या अधिकृत नोंदीत नमूद करण्यात आले आहे की, ही धोरणात्मक आवश्यकता राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे आणि त्यामुळे त्याची अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

डिसेंबर महिन्यात भारत सरकारने स्पष्ट केले होते की हे नियम कोणत्याही विशिष्ट देशासाठी नाहीत, तर देशात सुरक्षाव्यवस्था व सायबर सुरक्षेची गुणवत्ता वाढवण्यासाठी ही पावले उचलण्यात आली आहेत. गेल्या वर्षी एका अहवालात म्हटले होते की एका चिनी कंपनीने भारत सरकारचीच गुप्तहेरगिरी केली होती.

गेल्या काही वर्षांत भारतातील शहरांमध्ये,



▪ महेश कोळी
संगणक अभियंता

कार्यालयांमध्ये आणि निवासी संकुलांमध्ये लाखो सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, फक्त दिल्ली शहरातच २.१५ लाखांहून अधिक कॅमेरे बसवले गेले आहेत.

**सात अब्ज डॉलर्सचा बाजार**

काउंटरपॉइंट रिसर्च या संस्थेच्या म्हणण्यानुसार, भारतातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची बाजारपेठ २०३० पर्यंत ७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. गेल्या वर्षी हा आकडा ३.१५ अब्ज डॉलर्स इतका होता. आता या बाजारात चीनच्या हिकव्हिजन आणि डाहुआचा ३० टक्के हिस्सा आहे, तर भारतीय कंपनी सीपी प्लसचा ४८ टक्के हिस्सा आहे. मात्र ८० टक्क्यांहून अधिक घटक उपकरणे चीनमधून आयात केली जातात. कंपन्यांचे म्हणणे आहे की, तपासणी व नवीन नियमांमुळे त्यांच्या अनेक उत्पादनांना अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

चीनच्या कॅमेऱ्यांची चिंता केवळ भारतीय कंपन्यांनाच नाहीये; २०२३ मध्ये ब्रिटननेही तेथील चीनी कॅमेरे हटवण्याचा निर्णय घेतला होता. २०२२ मध्ये अमेरिकेने हिकव्हिजन आणि डाहुआवर राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे सांगत बंदी घातली होती. ऑस्ट्रेलियानेही अशा चिनी उपकरणांवर निर्बंध घातले आहेत. जर्मनीने गेल्या वर्षी चीनच्या ५जी डिव्हाइसेस पुरवणाऱ्या कंपन्यांवर बंदी घातली होती. या पार्श्वभूमीवर आपल्याला पाहावे लागेल की या उपकरणांमध्ये नक्की काय वापरले गेले आहे, कोणते चिप्स वापरले गेले आहेत.

चीनचा राष्ट्रीय सुरक्षा कायदा तिथल्या कंपन्यांना गुप्तचर कामात सहकार्य करण्यास बाध्य करतो. मे महिन्यात रॉयटर्सने अहवाल दिला होता की काही चिनी सोलर इन्व्हर्टरमध्ये संशयास्पद संवाद उपकरणे आढळली होती. २०२० मध्ये भारत-चीन सीमेवरील संघर्षानंतर भारताने टिकटॉकसह अनेक चिनी ॲप्सवर बंदी घातली होती आणि विदेशी गुंतवणूक धोरण अधिक कठोर केले होते. गेल्या वर्षी लेबनॉनमध्ये पेजरमध्ये दूरस्थ स्फोट घडवण्याच्या घटनेने भारतातही तंत्रज्ञानाच्या गैरवापराची भीती वाढवली आहे. जरी या नवीन नियमांमध्ये चीनसह सीमा सामायिक करणाऱ्या देशांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी श्याओमीने एप्रिलमध्ये नमूद केले की, जेव्हा त्यांनी सीसीटीव्ही डिव्हाईसच्या चाचणीसाठी अर्ज केला, तेव्हा त्यांना चीनस्थित दोन कंत्राटी उत्पादकांची माहिती द्यावी लागली.

- सीसीटीव्ही उपकरणांच्या तपासणीची जबाबदारी आयटी मंत्रालयाच्या स्टँडर्डायझेशन टेस्टिंग ॲण्ड क्वालिटी सर्टिफिकेशन डायरेक्टोरेट (एसटीक्यूसी) कडे आहे. त्यांच्याकडे १५ प्रयोगशाळा आहेत ज्या एकाच वेळी २८ अर्जांची तपासणी करू शकतात. प्रत्येक अर्जात १० मॉडेल्सची चाचणी केली जाऊ शकते.
- काउंटरपॉइंटनुसार, सार्वजनिक क्षेत्रातील मागणी फक्त २७ टक्के आहे, तर उर्वरित ७३ टक्के मागणी उद्योग, हॉटेल्स व घरांकडून आहे. चिनी कॅमेरे केवळ शासकीय वापरापुरतेच मर्यादित नाहीत, तर खासगी कंपन्या, दुकाने, गृहनिर्माण संस्था सुद्धा मोठ्या प्रमाणात हे उपकरणे वापरतात. त्यामुळे साधा नागरिकही सायबर हेरगिरीचा बळी ठरू शकतो. हिकव्हिजन, डाहुआ आणि सीपी प्लसचे कॅमेरे अजूनही विक्रीस उपलब्ध आहेत.

भारतात सार्वजनिक आणि खाजगी संस्थांमध्ये लावले जाणारे १० पैकी ८ कॅमेरे चिनी बनावटीचे आहेत. सीसीटीव्ही तंत्रज्ञान हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असले, तरी चीनसारख्या देशांकडून येणाऱ्या उपकरणांची अंधपणे खरेदी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी दीर्घकालीन धोका बनू शकतो. यासाठी सजग धोरणे, स्थानिक उत्पादनांचा वापर, आणि नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता वाढवणे हे काळाची गरज आहे. फक्त आर्थिक कारणांसाठी परकीय, विशेषतः शत्रुत्व ठेवणाऱ्या देशांचे उत्पादन स्वीकारणे, हे भविष्यात मोठी किंमत मोजणारे ठरू शकते.



# अमेरिकेसोबतचा करार आणि भारतीय शेती



रविवार विशेष

● डॉ. शैलेंद्र देवळाणकर
परराष्ट्र धोरण विश्लेषक

भारत आणि अमेरिका यांच्यातील बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित व्यापार करार सध्या देशभरात चर्चेत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टेरीफसंदर्भात भारतासह अन्य राष्ट्रांना दिलेली ९० दिवसांची मुदत ९ जुलैवरुन वाढवून १ ऑगस्ट केली आहे. मध्यंतरीच्या काळात, ट्रम्प यांनी अमेरिका भारतासोबत एक मोठा व्यापार करार करणार असून या करारामुळे भारतीय बाजारपेठांमध्ये अमेरिकेला मोठ्या संधी उपलब्ध होणार असल्याची घोषणा केली होती. या घोषणेमुळे आजवर भारताची जी क्षेत्रे अमेरिकन वस्तूंसाठी खुली झालेली नव्हती, ती आता खुली करण्यात येतील का असा प्रश्न विचारला जात असून त्यामुळे काहीसे चिंतेचे वातावरणही पसरले आहे.

या करारामध्ये सर्वांत कळीचा मुद्दा आहे तो म्हणजे अमेरिकेतून आयात होणाऱ्या कृषीउत्पादनांवर आणि डेअरी प्रॉडक्टस्‌वर आकारण्यात येणाऱ्या करांचा. जगामध्ये कृषीक्षेत्रात आकारल्या जाणाऱ्या आयात शुल्कामध्ये भारत अग्रस्थानी आहे. युरोपियन देशांमधून आयात होणाऱ्या कृषीउत्पादनांवर ३९ टक्के आयात शुल्क आकारले जाते; तर युरोपियन देश भारतातून आयात करणाऱ्या वस्तूंवर ११ टक्के आयात शुल्क आकारतात. असाच प्रकार हा अमेरिकेसोबत दिसून येतो. पण अमेरिकेने भारताइतके शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला तर ते भारतासाठी समस्या वाढवणारे ठरणार आहे.

नव्वदीच्या दशकात आलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या लाटेनंतरही भारतात कृषीक्षेत्र संरक्षित ठेवण्यात आले. यासाठी अनुदान देणे आणि आयात शुल्क वाढवणे या दोन प्रमुख मार्गांचा अवलंब केला गेला. स्पर्धात्मक बाजारपेठेत आपल्याकडील गरीब व मध्यम गटातील शेतकऱ्यांचा टिकाव लागावा यासाठी धोरणात्मक दृष्ट्या हा निर्णय घेण्यात आला. काही वर्षांपूर्वी 'आरसेप' या १६ देशांनी मिळून केलेल्या करारामध्ये भारताने सहभागी होण्यास नकार देण्यामागेही हेच कारण होते. भारतातील शेतीमाल, फिशरीज आणि डेअरी उत्पादने यांना संरक्षण देणे हीच भूमिका होती. आता एक मतप्रवाह असाही आहे की, आपण किती काळ अशा प्रकारचे संरक्षणात्मक कवच आपल्या शेतकऱ्यांना द्यायचे? भारताला ज्याप्रमाणे इतर देशांच्या बाजारपेठांमध्ये आपला कृषीमाल आणि अन्य वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी सवलत हवी आहे, तशाच प्रकारे अन्य देशांनाही भारतीय बाजारपेठेत शिरकाव करायचा आहे. इतर देशांनी आयात शुल्क लावू नये अशी मागणी आपण करतो, तेव्हा भारतानेही ते लावता कामा नये अशी या देशांची इच्छा असते. अशा प्रकारचे रेसिप्रोकल टेरीफचे तत्व आज जगामध्ये बऱ्यापैकी मान्य झालेले आहे. याचे कारण पूर्वी बहुसंख्य देश हे गरीब होते. आता अनेक देश गरीबीतून विकसनशील, विकसित होण्याच्या टप्प्यावर आले आहेत. परिणामी, श्रीमंत देशांनी गरीब राष्ट्रांना व्यापार सवलती द्याव्यात, ही वसाहतवादी काळापासूनची पद्धती आता कालबाह्य झाली आहे असे अनेक देशांना वाटू लागले आहे. दुसरीकडे, मुक्त व्यापार कराराचा प्रवाह सध्या जोर धरत आहे.

भारतही अनेक देशांसोबत मुक्त व्यापार करार करत आहे. इंग्लंडनंतर आता युरोपियन महासंघासोबत भारत मुक्त व्यापार करार करणार आहे. ज्या-ज्यावेळी हे करार होतील त्या-त्या वेळी कृषीउत्पादनांवरील आयात शुल्काचा मुद्दा प्रकर्षाने पुढे येणार आहे. कारण जगभरातील देशांची भारताच्या बाजारपेठेवर आहे. भारत हा लोकसंख्येबाबत जगातील अग्रणी देश आहे. आपल्याकडे जीडीपीमध्ये खासगी उपभोगाचा (प्रायव्हेट कंझम्प्शन) वाटा मोठा आहे. त्यामुळे प्रगत राष्ट्रांसह सर्वच देशांना भारताच्या बाजारपेठेत प्रवेश करायचा आहे.

अमेरिकेचा विचार करता त्यांना सोयाबीन, मका, इथेनॉल, डेअरी प्रॉडक्टस, जिम इंडस्ट्रीमध्ये वापरले जाणारे व्हे प्रोटीन या गोष्टी भारतात विकायच्या आहेत. तथापि, अमेरिकेमध्ये बहुतांश कृषीपीके ही जनुकिय सुधारीत म्हणजेच जीएम क्रॉप आहेत. या बियाणांच्या माध्यमातून प्रचंड मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. मका आणि सोयाबीन या जीएम श्रेणीतील पिकांना प्रचंड अनुदान दिले जात असल्याने ती अतिशय स्वस्तही आहेत. त्या दरात ते भारतीय बाजारपेठेत विकले जाऊ लागले तर आपल्याकडील शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. कारण ग्राहक अंतिमतः दरांचे अर्थगणित पाहून खरेदीचा निर्णय घेत असतो. मागे श्रीलंकेकडून आयात केल्या जाणाऱ्या चहावरील आयात शुल्क मोठ्या प्रमाणावर कमी केल्याने श्रीलंकेचा चहा भारतात स्वस्त दरात मिळू लागला. साहजिकच ग्राहकांनीही त्याला पसंती दिली. इंडोनेशिया आणि मलेशियाकडून भारत रबराची आयात करत होता. त्यावरचे आयात शुल्क कमी करण्यात आले. खाद्यतेलाबाबतही तेच घडले.

अमेरिका हा जगातील सर्वाधिक इथेनॉल उत्पादन करणारा देश आहे. भारतात अलीकडील काळात पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण केले जाते. हे इथेनॉल साखर कारखान्यांमध्ये निर्माण केले जाते. यासाठी मोलॅसिसचा वापर केला जातो. अमेरिकेत इथेनॉल हे मक्यापासून बनवले जाते. ते इथेनॉल भारतात आल्यास इथल्या साखर कारखान्यांना फटका बसू शकतो. तोच प्रकार दुग्धजन्य उत्पादनांबाबत आहे.

मध्यंतरी भारताने दुधाच्या भुकटीच्या आयातीवर शुल्क वाढवले होते. या सर्वांवरील आयात शुल्क कमी केल्यास अमेरिकन सफरचंद, आक्रोड, बदाम, इथेनॉल, चीज, व्हे प्रोटीन भारतात स्वस्त दरात आणि मोठ्या प्रमाणात विकले जाईल. तसे झाल्यास भारतातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो.

भारत आणि अमेरिकेतील मूळ समस्या व्यापारतूट ही असून ती भारताच्या बाजूने आहे. ती कमी करण्याचे अनेक मार्ग आहेत. यासाठी कृषीउत्पादनांवरील आयात शुल्कच कमी केले पाहिजे असे नाही. अमेरिकेकडून कच्च्या तेलाची आयात भारत करत असून ती वाढवून ही तूट कमी करता येऊ शकेल. तसेच अमेरिकेकडून आधुनिक शस्रास्रांची खरेदीही करता येईल. कारण कृषीउत्पादनांचा संबंध थेट गरीब शेतकऱ्यांशी आहे. त्यामुळे अमेरिकेसोबतचा व्यापार करार कृषीक्षेत्राशी संबंधित मुद्दयांचे, तसेच औषधउद्योगाशी संबंधित मुद्दयांचे निराकरण झाल्याशिवाय पूर्णत्वाला जाणार नाही. सबब या करारासाठी वेळ लागण्याची शक्यता आहे. शेतीक्षेत्र खुले करायचे झाल्यास भारताला कृषीप्रक्रिया उद्योगांना चालना देणे, कृषीनिर्यात वाढवणे यासाठी काही सुधारणा कराव्या लागणार आहेत. ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. हे लक्षात घेता भारत जेम्स अँड ज्वेलरीसारख्या इतर क्षेत्रामध्ये आयात करात कपात करुन शेतीक्षेत्राचे सुरक्षाकवच कायम ठेवू शकतो. ●●●

भारताकडून तांदुळ, फिशरीज, फळे-भाजीपाला यांची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. ट्रम्प यांच्या मागणीनुसार, अमेरिकन कृषीमालावर आकारण्यात येणारे ३५ ते ४० टक्के आयात शुल्क सुमारे १० टक्क्यांवर आणावे. तसे झाल्याचे याचे परिणाम काय होतील? हे जाणून घेण्यासाठी आधी भारत आणि अमेरिका या दोन्ही देशातील शेतीमधील गुणात्मक फरक लक्षात घेतले पाहिजेत.

१) भारतामध्ये आजही शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ४५ ते ५० टक्के इतके आहे. अमेरिकेमध्ये हे प्रमाण २ टक्केच आहे.

२) भारतातील बहुसंख्य शेतकरी हे अल्पभूधारक आणि मध्यम भूधारक आहेत. मोठ्या प्रमाणात जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या फार कमी आहे. अमेरिकेमध्ये अल्पभूधारक किंवा मध्यमभूधारक हा प्रकारच दिसून येत नाही. तेथील शेतकऱ्यांचे हजारो एकरचे फार्म आहेत.

३) भारतात दिल्या जाणाऱ्या कृषीअनुदानांपेक्षा किती तरी अधिक पटींनी अनुदान अमेरिकेतील शेतकऱ्यांना दिले जाते. त्यामुळे तेथील शेतकरी संरक्षित आहेत. मका, सोयाबीन यांसारख्या पीकांसाठी भरमसाठ अनुदान अमेरिका शेतकऱ्यांना देते.

४) अमेरिकेत कृषीक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बहुराष्ट्रीय कंपन्या कार्यरत आहेत. भारतात अशी स्थिती नाहीये.

PASSKEY

# पासवर्डचे युग संपणार




लहानपणी आपल्यापैकी प्रत्येकाने अलीबाबा आणि चाळीस चोर ही कथा ऐकली असेल. यामध्ये 'खुल जा सिमसिम' असे म्हटल्यानंतर गुहेचा दरवाजा उघडतो आणि दरोडेखोरांच्या टोळीतील सरदार आतमध्ये जाऊन दागिन्यांनी भरलेली गोणी ठेवतो. या कथेतील भावार्थ 'लोभाचा अंत विनाशात होतो' असा होता. हा भावार्थ जसा आजच्या काळातही समर्पक ठरणारा आहे, तशाच पद्धतीने त्यातील 'खुल जा सिमसिम' ही आज्ञाही आजच्या डिजिटल युगात सर्वाधिक महत्त्वाची ठरणारी संकल्पना आहे.

संगणक आणि इंटरनेट युगात ही आज्ञा 'पासवर्ड' नावाने रुढ झाली. ईमेल, एटीएम, मोबाईलवरील ॲप्स, आताच्या काळात सर्वाधिक वापरली जाणारी पेमेंट वॉलेटस्, क्रेडिट कार्डस् यांसह असंख्य डिजिटल साधने ही आज पासवर्ड या संकल्पनेमुळे सुरक्षित आहेत. परंतु ही सुरक्षितताही अभेद्य नाहीये. मागील दशकभरात झालेले डेटा गळती, हॅकिंग आणि फिशिंग हल्ले यांनी पासवर्ड हे संरक्षणाचे पहिले अंग न राहता आता धोका ठरू लागले आहे.

**सार्वजनिक की क्रिप्टोग्राफी १९७० च्या दशकात उदयास आली. १९९० मध्ये नेटस्केपने 'एसएसएल' तंत्रज्ञान तयार केले जे संकेतस्थळांची ओळख पडताळून वापरकर्त्यांचे गोपनीयतेचे रक्षण करत असे. आजही हे तंत्र वापरले जाते. पास-की याच संकल्पनेवर आधारित आहे. फक्त संकेतस्थळाऐवजी, यामध्ये व्यक्तीची ओळख पडताळली जाते. पास-की केवळ वापरकर्त्याच्या उपकरणावर असते; संकेतस्थळ फक्त इतकेच पडताळते की हे उपकरण तुमच्याच हातात आहे. परंतु वापरकर्त्याची पास-की कधीच सर्व्हरकडे जात नाही. त्यामुळे ती अधिक सुरक्षित मानली जाते. सार्वजनिक क्रिप्टोग्राफीसाठी संगणकीय क्षमता गरजेची असते. २०१० पर्यंत लोकांकडे अशा क्षमतेचे स्मार्टफोन नव्हते. आज स्मार्टफोन म्हणजे खिशातील संगणक आहेत आणि हेच आता पासकी-च्या माध्यमातून सुरक्षेचे महत्त्वाचे साधन ठरणार आहेत.**

## सर्वांत मोठी पासवर्ड गळती!

अलीकडेच ॲपल, गुगल, फेसबुक आणि टेलिग्राम या कंपन्यांच्या लाखो वापरकर्त्यांची माहिती लीक झाल्याचे समोर आले आहे. सायबर सुरक्षेतील तज्ज्ञांच्या मते ही घटना आतापर्यंतच्या सर्वांत मोठ्या डेटा गळतींपैकी एक आहे. या गळतीमध्ये सुमारे १६०० कोटी पासवर्ड इंटरनेटवर लीक झाले आहेत.

या पासवर्डस्‌चा वापर करून सायबर गुन्हेगार वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती, छायाचित्रे, व्हिडिओ तसेच अन्य संवेदनशील गोष्टी चोरण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांचा धोका अधिक वाढला आहे.

▪ शहाजी शिंदे
संगणकप्रणाली तज्ज्ञ



फोर्ब्स या प्रसिद्ध माध्यमाने आपल्या अहवालात नमूद केले आहे की ऑनलाईन लीक झालेले लॉगिन तपशील केवळ सरकारी संकेतस्थळांचेच नाहीत, तर ॲपल, फेसबुक, गुगल, गिटहब आणि टेलिग्राम यांसारख्या मोठ्या कंपन्यांच्या वापरकर्त्यांचेही आहेत. संशोधकांनी १८४ दशलक्ष नोंदी असलेला एक गोपनीय डेटाबेस शोधून काढले असून तो सुरक्षारहित वेब सर्व्हरवर अपलोड करण्यात आला होता. यामुळे सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संशोधकांचे म्हणणे आहे की लीक झालेला हा डेटा अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे आणि सामान्य नाही.

## पास-कीची संकल्पना

दुसरीकडे पासवर्ड लक्षात ठेवणे आणि वारंवार बदलणे ही बाब सामान्य माणसासाठी जिकीरीचे ठरत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर तंत्रज्ञान क्षेत्रात आता एक नवी आणि अधिक सुरक्षित प्रणाली पुढे येत आहे, पास- की ! पासकी ही एक अनोखी ओळखपद्धती असून ती पारंपरिक संकेतशब्दांशिवायही वापरकर्त्याची खात्री करते.

ही एक प्रकारची गुप्त संकेतयंत्रणा असून ती दोन भागांवर आधारित असते. एक भाग सार्वजनिक असतो आणि दुसरा पूर्णतः खासगी आणि वापरकर्त्यांच्या उपकरणात सुरक्षित ठेवलेला असतो. जेव्हा वापरकर्ता एखाद्या संकेतस्थळावर प्रवेश करतो, तेव्हा त्याच्या उपकरणातील खासगी संकेत दुसऱ्या भागाशी जुळवला जातो. या प्रक्रियेत वापरकर्त्याला केवळ आपली बोटाची ओळख, चेहऱ्याची ओळख किंवा उपकरणाचा गुप्त क्रमांक वापरावा लागतो. कुठलाही शब्द लक्षात ठेवण्याची गरज राहत नाही. येणाऱ्या काळात पास-की ही महत्त्वाची ठरणार आहे.

मायक्रोसॉफ्टचे वेळापत्रक

मायक्रोसॉफ्ट ही तंत्रज्ञानाच्या विश्वातील दादा कंपनी जुलै २०२५ पासून पासवर्ड पद्धती बंद करणार आहे. मायक्रोसॉफ्टशी संबंधित सर्व ॲप्समध्ये आता फक्त पास-की वापरूनच लॉगिन करता येईल. यामुळे 'पासवर्डचे युग संपत चाललं आहे' अशी चर्चा सुरू असली तरी दोन वर्षांपूर्वीच तंत्रज्ञानाच्या जगात 'पास-की' नावाचं एक फीचर दाखल झाले, तेव्हाच या प्रक्रियेची सुरुवात झाली होती. मे २०२३ मध्ये गूगलने म्हटलं होतं "पासवर्डच्या शेवट सुरू झाला आहे." म्हणजे पासवर्डच्या वापराचा काळ आता हळूहळू मागे सरत जाणार आहे. मायक्रोसॉफ्टने यासाठी वेळापत्रकही जाहीर केलं आहे. जून २०२५ पासून तुम्ही मायक्रोसॉफ्टच्या ऑथेंटिकेटर ॲपमध्ये नवीन पासवर्ड ठेवू शकणार नाही. जुलै २०२५ मध्ये ऑथेंटिकेटर ॲपमधून ऑटोफिल फिचर वापरणे थांबवले जाईल. ऑगस्ट २०२५ नंतर, ऑथेंटिकेटरमध्ये आधीपासून सेव केलेले पासवर्ड तुम्हाला दिसणार नाहीत किंवा वापरता येणार नाहीत.

## ऑटोफिलला अलविदा

आजवर जेव्हा आपण एखाद्या वेबसाइट, ॲप किंवा ईमेलमध्ये लॉगिन करतो, तेव्हा आपल्याला पासवर्ड टाकावा लागतो. अनेकदा तो पासवर्ड आपोआप ब्राउझरमध्ये (जसं की गूगल क्रोम) सेव्ह होतो. पुढच्या वेळेस आपल्याला पासवर्ड टाकायची गरज लागत नाही. तांत्रिक भाषेत या प्रक्रियेला ऑटोफिल असे म्हणतात. यासोबतच ऑथेंटिकेटर ॲप देखील वापरले जाते. हे ॲप गूगल, मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्या तयार करतात. यात आपण आपल्या इतर ॲप्सचे खाते जोडतो. उदाहरणार्थ गूगल ॲपमध्ये इन्स्टाग्राम, मायक्रोसॉफ्टचे खाते, किंवा मायक्रोसॉफ्ट ॲपमध्ये गूगलचे खाते जोडतो.

## पास की म्हणजे काय?

जेव्हा पासवर्डसोबत एक कोडही नोंदवावा लागतो (एसएमएस शिवाय), तेव्हा ऑथेंटिकेटर ॲपमधून तो कोड मिळतो. प्रत्येक ॲपसाठी कोड सतत बदलत असल्याने तो खूप सुरक्षित मानला जातो. पण आता मायक्रोसॉफ्ट पासवर्ड आणि ऑथेंटिकेटर या दोन्ही सुविधांना अलविदा करणार आहे. म्हणजेच मायक्रोसॉफ्टशी संबंधित आउटलुकसारख्या ॲपमध्ये लॉगिनसाठी फक्त पास-कीच वापरता येणार आहे.

आज आपण प्रत्येक ॲप आणि वेबसाइटसाठी वेगळा पासवर्ड ठेवतो. पण नवीन पद्धतीमध्ये तुमच्या फोनचे लॉक (जसं की फिंगरप्रिन्ट, फेस अनलॉक किंवा पिन) हाच तुमचा पासवर्ड असेल. म्हणजेच, फोन उघडण्याचा पासवर्डच सर्व खात्यांमध्ये वापरता येईल. जर तुम्ही फक्त ४ अंकी पिन वापरत असाल, तर तोच तुमचा सर्व ठिकाणी पासवर्ड होईल. या पद्धतीला एक प्रकारे यूनिव्हर्सल पासवर्डही म्हणता येईल.

येणाऱ्या काळात तंत्रज्ञानातील सर्वच ॲप्लिकेशन्स लवकरच पास-कीकडे वळणार आहेत. मायक्रोसॉफ्टने केवळ याची सुरुवात केली आहे. पण उद्याच्या भविष्यात इतर कंपन्याही लवकरच त्याच मार्गाने जाणार आहेत. तुम्हालाही हळूहळू तुमची सिस्टीम या नव्या तंत्रज्ञानासाठी सज्ज करावी लागेल. ●●●



# दंश सुडाच्या राजकारणाचा

लोकशाहीची जननी असणाऱ्या भारतात दीड-दोन दशकांपूर्वीपर्यंत राजकीय सौहार्द-सलोखा, विरोधी मतांचा आदर करण्याची संस्कृती, विचारसरणीवर आधारीत विरोध राजकारणापुरता मर्यादित ठेवण्याचा शिरस्ता यांवर आधारीत वातावरण दिसत असे. परंतु आज टोकाची कटूता, आक्रमकपणा, विरोधी मतांना तुच्छ लेखण्याचा उद्दामपणा आणि त्याहून भयावह म्हणजे विजयाचा अतिउन्माद यांसारख्या अवगुणांनी ओतप्रोत भरलेलं वातावरण सर्वदूर दिसू लागलं आहे. पश्चिम बंगालसारख्या राज्यामध्ये तर राजकीय वैमनस्य इतक्या पराकोटीला गेले आहे की, दिवसाढवळ्या विरोधकांच्या घरांवर हल्ले करण्यापासून मतदारांनाही मारझोड करण्याचे प्रकार घडताहेत. राजकीय हिंसाचार हे पश्चिम बंगालचे आजचे प्राक्तन बनले आहे.

अलीकडेच नदिया जिल्ह्यातील कलिगंज विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या निकालादिवशी घडलेली घटना केवळ या राज्यालाच नव्हे तर संबंध देशाला धक्का देणारी आणि कोणत्या भयंकराच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत, याची जाणीव करुन देणारी ठरली. तमन्ना खातून नावाची चौथी इयत्तेत शिकणारी एक अल्पवयीन मुलगी तृणमूल काँग्रेसच्या विजय मिरवणुकीदरम्यान त्यांच्या कार्यकर्त्यांनी सीपीआय (एम)ला समर्थन देणाऱ्या मतदारांच्या घरावर फेकलेल्या एका क्रूड बॉम्बच्या स्फोटात मृत्युमुखी पडली. या मृत्यूमुळे पुन्हा एकदा बंगालच्या राजकारणातील तृणमूल काँग्रेसचा उन्माद आणि हिंसक चेहरा उघड झाला आहे.

ही घटना केवळ एक अपघात नव्हती, तर ती निवडणुकीच्या निमित्ताने निर्माण झालेल्या राजकीय शत्रुत्वाचे आणि सूडाच्या भावना पोसणाऱ्या संस्कृतीचे एक विदारक उदाहरण होती. तमन्नाच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे कुटुंब सीपीआय(एम)ला मतदान करते. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी येथील जागेवर विजय मिळवल्यानंतर मोठी मिरवणूक काढली होती. यादरम्यान सीपीआय (एम) समर्थकांच्या घरांवर क्रूड बॉम्ब फेकण्यात आले. या हिंसाचारात आमच्या घराच्या ओसरीवर असणारी तमन्नाचा मृत्यू झाला. तिच्या या वक्तव्याने प्रकरण आणखीनच गंभीर झालं. यातून पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रिया आणि तिच्याशी निगडित हिंसाचाराचे भयावह वास्तव समोर येते.

सीपीआय(एम) च्या राज्य सचिवांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त करत विजय मिरवणुकीमध्ये मिठाई नाही, तर बॉम्ब वाटले गेले, असा आरोप करत याची तुलना दहशतवादी हल्ल्याशी केली आहे. भाजपनेसुद्धा या घटनेचा तीव्र निषेध करत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर राजकीय हिंसेला खतपाणी घालण्याचा आरोप केला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त करून पोलिसांना कारवाईचे आदेश दिल्यानंतर काही वेळातच पोलिसांनी अदर शेख, मनोवर शेख, कालू शेख आणि अन्वर शेख या चार संशयितांना अटक केली.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी ' द बॅलेट इज स्ट्राँगर दॅन द बुलेट' म्हणजेच मतदान हे बंदुकीपेक्षा श्रेष्ठ आहे असे म्हटले होते. या विधानाची आठवण होण्याचे कारण म्हणजे पश्चिम बंगालमधील कलिगंज विधानसभेच्या पोटनिवडणुकांचा निकाल लागल्यानंतर घडून आलेला हिंसाचार. या निवडणुकीत विजयी झालेल्या तृणमूल काँग्रेसच्या उमेदवाराची विजयी मिरवणूक सुरू असताना सीपीआय(एम) समर्थकांच्या घरावर क्रूड बॉम्ब फेकण्यात आले. यामध्ये तमन्ना नावाची चार वर्षांची मुलगी मरण पावली. ही घटना केवळ दुर्दैवी आणि उद्वेगजनक नसून सडलेल्या राजकीय व्यवस्थेने निर्माण केलेल्या हिंसक संस्कृतीचे निदर्शक आहे.



▪ पोपट नाईकनवरे
राज्यशास्त्र अभ्यासक

मात्र, या प्रकरणाची चौकशी किती प्रामाणिकपणाने होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे. निवडणूक आयोगाने देखील या घटनेवर गंभीर दखल घेतली असून सविस्तर अहवाल मागवला आहे. पण ही घटना फक्त स्थानिक पातळीवरील संघर्षाची नसून संपूर्ण राज्यव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा एक प्रसंग होता.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने हिंदू मतांची मोजणी सादर करत या विषयाला एक नवीन आयाम दिला आहे. बंगालमधील भाजपाचे नेते सुवेंदु अधिकारी यांनी सांगितले की कलिगंजमधील सुमारे १.१० लाख हिंदू मतदारांपैकी ७२,६०० मतदारांनी मतदान केले आणि त्यापैकी ५२,७१० मते भाजपला मिळाली. त्यांनी हेही सांगितले की भाजपने १०६ पैकी १०५ हिंदूबहुल बूथवर विजय मिळवला. हे हिंदू मतांचे अभूतपूर्व संख्यात्मक एकत्रीकरण असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र तृणमूलने हे दावे फेटाळले आहेत. त्यांनी सांगितले की कलिगंजमध्ये हिंदू लोकसंख्या फक्त ४२-४४ टक्के असून, त्यातील एकट्या भाजपने ५२,७१० मते मिळवणं अशक्य आहे. त्यामुळे या आकड्यांचा हेतुपुरस्सर गैरवापर झाल्याचा आरोप टीएमसीने केला.

या आकडेमोडीतील सत्य-असत्य काहीही असेल; पण यातून एक गोष्ट स्पष्ट होते की बंगालमधील निवडणुकीचा फोकस मतांपेक्षाही धर्म, पक्षीय निष्ठा, विरोधी मतांचे दमन व सत्तेच्या दहशतीच्या माध्यमातून मांडला जातो.

कलिगंजमधील पोटनिवडणूक ही एका अर्थाने महत्त्वाची होती. माजी आमदार नासिरुद्दीन अहमद यांच्या निधनानंतर त्यांची कन्या, आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या अलीफा अहमद, टीएमसीकडून उभ्या राहिल्या होत्या. या निवडणुकीत त्यांनी ९१,००० मतांनी विजय मिळवला. या निवडणुकीत भाजपाचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर तर काँग्रेस-डाव आघाडीचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर राहिला. टीएमसीला ५५% मते मिळाली, भाजपला २८% तर काँग्रेसला १५ टक्के मते या निवडणुकीत मिळाली. या आकड्यांवरून हे स्पष्ट होतं की तृणमूल काँग्रेस अजूनही ग्रामीण आणि अल्पसंख्याक भागांमध्ये बळकट आहे. दुसरीकडे भाजपच्या जोरदार प्रचारानेही फारसा परिणाम झालेला नाही. मात्र कोणत्याही विजयाचा अर्थ विरोधात मतदान करणाऱ्यांचा गळा घोटणे, त्यांच्यावर हल्ले करणे असा होत नाही. लोकशाहीला तर ही बाब बिलकूल अभिप्रेत नाही. पण बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे राजकीय अभय आणि वरदहस्त लाभल्याने टीएमसी कार्यकर्त्यांची अरेरावी पराकोटीला गेल्याचे मागील १० वर्षांमध्ये सातत्याने दिसून आले आहे. दर निवडणुकीनंतर रक्त सांडणे, बॉम्बस्फोट, घरांची तोडफोड आणि हल्ले हे प्रकार घडताना दिसतात. सामान्य नागरिक, विशेषतः महिला व लहान मुले, या हिंसेत होरपळून जातात. तमन्ना खातूनचा मृत्यू हे त्याचं हृदयद्रावक उदाहरण आहे.

या घटनेवर सर्व राजकीय पक्षांनी केवळ टीका किंवा सहवेदना व्यक्त करण्यापलीकडे जाऊन आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तमन्ना ही केवळ एक हिंसाचारातील बळी म्हणून करावयाची नोंद नव्हती. शाळेत जाणारी, खेळणारी-बागडणारी, आई-वडिलांची लाडकी मुलगी होती. कदाचित उद्या ती डॉक्टर, शिक्षक किंवा काहीतरी बनली असती. तिचा मृत्यू केवळ एका स्फोटात झाला नाही, तर तो एका सडलेल्या राजकीय व्यवस्थेने निर्माण केलेल्या हिंसक संस्कृतीत झाला. त्यामुळे तमन्नाच्या मृत्यूवर फक्त दुःख व्यक्त करण्याने काहीही हाशिल होणार नाही. जबाबदारी स्वीकारणं, दोषींवर कठोर कारवाई करणं आणि राजकारणात माणुसकी, मानवता या मूल्यांची पुनर्स्थापना करणे हाच खरा मार्ग आहे. ●●●

# भारताच्या वाढत्या प्रभुत्वाची साक्ष

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्रिनिदाद-टोबॅगो भेट उभय राष्ट्रांतील संबंधांना नवी गती देणारी आणि नव्या उंचीवर घेऊन जाणारी ठरली आहे. दोन्ही देशांतील सांस्कृतिक संबंधांना एक नवा उजाळा प्राप्त झाला आहे तसेच उभय राष्ट्रांतील संबंधांमुळे कॅरिबियन क्षेत्रात शांतता व स्थैर्याची नवी पहाट उगवणार आहे. कॅरिबियन राष्ट्रांची परिषद पुढील वर्षी नवी दिल्लीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भूराजनैतिक दृष्टीने विचार करता भारत आणि त्रिनिदाद यांच्यातील मैत्री भारत आणि लॅटिन अमेरिका या प्रदेशातील संबंधांना गती देण्यासाठी एक नवा सेतू म्हणून अधिक भक्कम ठरत आहे.**



कॅरिबियन सागर क्षेत्रातील त्रिनिदाद आणि टोबॅगो या देशाला भेट देणारे गेल्या २५ वर्षांतील पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. या भेटीदरम्यान त्यांना ऑर्डर ऑफ द रिपब्लिक ऑफ त्रिनिदाद अँड टोबॅगो हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. तेथील पंतप्रधान महामहीम नेत्या कमला प्रसाद बिसेसर यांनी पंतप्रधानांचे उत्स्फूर्त स्वागत केले. त्यांनी हा दौरा सामायिक अभिमानाचा आणि सखोल ऐतिहासिक संबंधांचा सुवर्णक्षण असल्याचे नमूद केले. कोविड-१९ साथीच्या दरम्यान माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मानवतावादी दृष्टीने औषधी व लस्सींचे योगदान देऊन महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांच्या प्रभावी राजकीय नेतृत्वाची ही एक वैश्विक साक्ष आहे. त्यांच्या भेटीदरम्यान उभय राष्ट्रांमध्ये सहा सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे दोन्ही देशांमध्ये सांस्कृतिक संबंध अधिक भक्कम झाले असून, भविष्यकालीन प्रगती आणि उत्कर्षाच्या नव्या योजनांना सोनेरी पंख फुटले आहेत. भूतकालीन इतिहास आणि वर्तमानातील आव्हानोंना समसमान दृष्टीने सामोरे जाण्यासाठी दोन्ही देश वचनबद्ध झाले आहेत. भारत आणि त्रिनिदाद हे दोन्ही देश या बेटावरील भारतीयांच्या आगमनाचे १८० वे वर्ष साजरे करीत आहेत. त्यावरून मैत्रीची २०० वर्षे अधोरेखित होतात.

## आठवणींची मोरपिसे

त्रिनिदाद -टोबॅगोमध्ये सुमारे ४५ टक्के लोकसंख्या भारतीय आहे आणि १८४५ मध्ये पहिल्यांदा भारतीयांचा पहिला समूह शेती करण्यासाठी त्रिनिदादला पोहोचला. आता ते तेथील लोकजीवनाशी एकरूप झाले आहेत. आता त्रिनिदादमध्ये भारतीयांची सहावी पिढी तेथील राष्ट्रजीवनाला आकार देण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करत आहे. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तेथील लोकांनी चौताल या भोजपुरी लोककलेच्या माध्यमातून उत्स्फूर्त स्वागत केले. तेथील भारतीय समुदायांनी केवळ विविध क्षेत्रांत यश मिळविले नाही, तर ते भारतीय संस्कृतीचे दूत झाले आहेत आणि त्यांनी या देशांना भारतीय संस्कृतीशी अभिन्नपणे जोडले आहे.



**प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर**

या देशांच्या विकास प्रवासाला ते समृद्ध करत आहेत. त्यांनी भारताशी आपले स्नेहसंबंध कायम ठेवले आहेत आणि भारतीय संस्कृतीबद्दल त्यांना असलेली आवड त्यांच्या नित्य जीवनशैलीतून प्रकट होत आहे. या प्रजासत्ताकाची राजधानी असलेल्या स्पोर्ट्स पेन या महानगरीतील अविस्मरणीय स्वागत समारंभ हा भारताविषयी त्यांना असलेल्या आदर व सद्भावनेचे प्रतीक म्हटला पाहिजे. 'भारताला जाणून घ्या' या मोहिमेस जगभरातील तरुणांनी जो प्रतिसाद दिला, तोही पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केला आहे.

भारताच्या वतीने या कॅरेबियन देशांना आजवर करण्यात आलेल्या सहाय्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून तेथील पंतप्रधान कमलाप्रसाद म्हणाल्या की, जेव्हा काही देश त्यांचे वैद्यकीय साहित्य आणि त्यांच्या लसींचा साठा करत होते, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्रिनिदाद आणि टोबॅगोसह जगातील छोट्या राष्ट्रांना देखील लसी मिळतील, याची खात्री केली. या कॅरेबियन देशासाठी आर्थिक सहाय्य, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मार्गदर्शन करण्यात भारताने घेतलेल्या पुढाकाराबद्दल तेथील पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली. उभय देशांतील सांस्कृतिक संबंधांचा सुवर्ण धागा दोन्ही देशांनी एखाद्या मोरपिसाप्रमाणे जपला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टी अँड टी च्या पंतप्रधानांना राम मंदिराची प्रतिकृती आणि महाकुंभातील पवित्र जल या वस्तू प्रतीकात्मक स्वरूपात भेट दिल्या.

## गंगेचा अखंड प्रवाह

भारत त्रिनिदाद आणि टोबॅगो या देशातील सांस्कृतिक संबंध गंगेच्या प्रवाहासारखे शुद्ध, सात्विक आणि पवित्र आहेत. उभय देशांतील संबंध सांस्कृतिक, आर्थिक आणि अध्यात्मिक सूत्रावर आधारलेले असल्याचे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथील लोकांना दिलेल्या भेटीत खेळ, सेवा आणि उबदार मैत्रीचा विशेष उल्लेख केला. आपण सर्वांनी या देशाच्या यशासाठी जे समर्पण केले, ते अजोड आणि अतुलनीय आहे, अशा शब्दात त्यांनी त्यांचा गौरव केला. कला, साहित्य, क्रीडा, संगीत या क्षेत्रांत या देशातील विभूतींनी बजावलेल्या कामगिरीचा त्यांनी विशेष उल्लेख केला. नवरात्र, महाशिवरात्र आणि जन्माष्टमी हे सण व उत्सव येथील लोक उत्साहाने साजरे करतात, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. तरुणांच्या डोळ्यात चमकणारे तेज आणि भावी आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब पाहून त्यांनी आपली मैत्री ही भूगोलाच्या पलीकडे आणि कालचक्राच्या पलीकडे इतिहास घडविणारी आहे, असा संदर्भ स्पष्ट केला. भोजपुरी भाषेत प्रभू रामचंद्रांच्या ऐतिहासिक कार्याचे वर्णन करून त्यांनी रामचरितमानस या ग्रंथातील महत्त्वपूर्ण कवने उद्धृत केली. अयोध्येतील शरयूचे पवित्र पाणी म्हणजे आस्थेचे अमृत आहे, असा उल्लेख करून त्यांनी भारत आणि त्रिनिदाद यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचा सुवर्ण धागा भक्कम करण्याचे आवाहन केले. तुम्ही त्रिनिदादमध्ये महत्त्वपूर्ण सांस्कृतिक भूमिका बजावणाऱ्या गिरमिटिया या समुदायाच्या इतिहास व परंपरेचा शोध आम्ही घेत आहोत. त्याचे जतन करण्यासाठी योजना तयार केली आहे, असेही त्यांनी नमूद केले. तुम्ही त्रिनिदादमध्ये राहणाऱ्या सहाव्या पिढीसाठी ओव्हरसीज इंडिया कार्ड प्रदान करण्याची घोषणा त्यांनी या संमेलनात केली.

## लोकशाही परंपरेचा दीपस्तंभ

टी अँड टी या देशाच्या संसदेस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले संबोधन अत्यंत उद्बोधक आणि अर्थपूर्ण असे होते. त्यांनी म्हटल्याप्रमाणे दोन्ही देशांनी आधुनिक जगात अभिमानास्पद लोकशाही परंपरा आणि ताकदीचे आधारस्तंभ म्हणून महत्वाची भूमिका पार पाडली आहे. भारतीय लोकशाही ही केवळ एक राजकीय व्यवस्था नाही, तर आमच्यासाठी ती एक जीवनशैली आहे असे सूत्र सांगून पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, या संसदेमध्ये असे अनेक प्रतिनिधी आहेत, ज्यांचे पूर्वज प्राचीन काळात भारतामध्ये बिहार या राज्यातील अनेक महाजनपदांचे म्हणजे प्रजासत्ताकाचे वारसदार आहेत.

आम्ही भारतीय विकासाला इतरांप्रती असलेली जबाबदारी या नात्याने पाहतो आणि आमचे प्राधान्य नेहमीच ग्लोबल साउथ म्हणजे सबंध दक्षिणेकडील लोकांचे कल्याण असे राहिले आहे. आधुनिक भारताच्या उभारणीसाठी आम्ही महिलांचे हात बळकट करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे त्यांनी यथार्थपणे नमूद केले.

पंतप्रधान कमला प्रसाद या बिहारच्या कन्या आहेत आणि २१ व्या शतकात जगाला नवे सामर्थ्य प्रदान करण्याचे कार्य बिहारमधील प्राचीन ज्ञान-परंपरा निश्चितपणे करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वर्तमान काळात भारत अशक्य ते शक्य करून दाखवीत आहे. भारताने चांद्रयान मोहीम यशस्वी केली आणि या मोहिमेद्वारे आम्ही विश्वातील तारकांपर्यंत पोहोचलो आहोत. आमच्या प्रगतीला आता आकाश ठेंगणे झाले आहे. भारताच्या चांद्रयान व गगनयान या मोहिमांमुळे लवकरच भारतीय माणूस चंद्रावर पोहोचेल. या अगोदरच आम्ही शिवशक्ती असे चंद्रावरील एका स्थानाचे नामकरण केले आहे. या सर्व वैज्ञानिक प्रगतीचा प्रत्येक भारतीयाला व अनिवासी भारतीयाला अभिमान वाटणे साहजिक आहे. भारत लवकरच जगातील तिसरी आर्थिक सत्ता बनत आहे आणि गरिबीला आम्ही हरवू शकतो. दारिद्र्य आम्ही दूर करू शकतो, हे जगात आम्ही सिद्ध केले आहे.


### सहा सामंजस्य करार

भारत आणि त्रिनिदाद दरम्यान महत्त्वपूर्ण सहा सामंजस्य करार झाले. या करारांमध्ये प्रामुख्याने औषध निर्मिती, जलद विकास, प्रभाव प्रकल्प, सांस्कृतिक देवाण-घेवाण, क्रीडा, प्रशिक्षण तसेच राजकीय प्रशिक्षण असे या कराराचे सहा महत्त्वाचे बिंदू आहेत. टी अँड टी देशातील तरुण वर्ग आणि महिलांना क्रिकेट प्रशिक्षण देण्यासाठी एक योजना पंतप्रधानांनी यावेळी मांडली आहे. जगात शांतता व स्थैर्य यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यवस्थेत सुधारणा होणे आवश्यक आहे. यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाले तसेच भविष्यकाळात जगाच्या कल्याणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या तसेच वैश्विक व्यवस्थांच्या रचना व कार्यपद्धतीत सुधारणा झाल्या पाहिजेत, असा दोन्ही देशांचा आग्रह आहे. दोन्ही देशांनी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा समितीत कायमस्वरूपी सदस्यांसाठी त्रिनिदाद आणि भारत एकमेकांना पाठिंबा देण्याचे निश्चित झाले आहे. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी परस्पर सहकार्य आणि वचनबद्धतेवर विश्वास प्रकट केला, ही बाब उभय राष्ट्रांच्या शांतता, स्थैर्य व विकासासाठी एक मौलिक योगदान म्हटली पाहिजे.

भारताने २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेबाहेर काढले आहे आणि जगासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे, हे जागतिक बँकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारत जगातील सर्वांत महत्त्वाचा तिसरा स्टार्टअप देश म्हणून उदयास आला आहे आणि त्यामध्ये अर्धे स्टार्टअप महिला संचलित आहेत, ही विशेष बाब होय. भारताने कृत्रिम प्रज्ञा क्षेत्रात एक मिशन म्हणून काम सुरू केले आहे. सेमी कंडक्टर क्षेत्रात भारताने दमदार पाऊल टाकले आहे. आणि यूपीआयद्वारे डिजिटल पेमेंट करून आम्ही जगापुढे एक नवा आदर्श किता प्रस्थापित केला आहे. कॅरिबियन क्षेत्रात यूपीआय सुविधा स्वीकारणारा त्रिनिदाद हा पहिला देश आहे, ही गोष्ट भुषणावह आहे. भारत हा नव्या जगात संधींचा देश आहे..

विशेषतः आम्ही मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात एक प्रभावी शक्ती म्हणून उदयास येत आहोत. जगामध्ये दुसऱ्या क्रमांकाचा स्मार्टफोन मोबाईल निर्मिती करणारा देश म्हणून भारताचे स्थान महत्वाचे आहे. आमच्या स्वतःच्या प्रगतीबरोबर जगाला स्थैर्य देण्याचा भारताचा प्रयत्न आहे. प्रत्येक त्रिनिदाद नागरिकांनी भारताला भेट द्यावी, आमच्या खेड्याला म्हणजे त्यांच्या जन्मगावी भेट द्यावी. आम्ही तुमचे नेहमी स्वागत करू. तुम्हाला एक कप चहा आणि जिलेबी सुद्धा देऊ, अशा शब्दात पंतप्रधानांनी आपल्या भाषणाचा गोड शेवट केला.

# जगण्याची ऊर्मी



*तिबेटचे अध्यात्मिक नेते आणि बौद्ध धर्मगुरु दलाई लामा यांनी त्यांच्या नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करताना पुढची ३०-४० वर्षे लोकांची सेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. लक्षात घ्या, जगात सर्वाधिक दीर्घायुषी व्यक्तीचं नाव जीन कॅलमेंट होतं. त्या १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगल्या होत्या. दलाई लामांनी व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता ९० आणि ४० म्हणजेच १३० वर्षे! ९० वय हाच मुळी माईलस्टोन आहे. अशात १३० वर्षे जगण्याची प्रकट इच्छा ही खरोखरच मोठी गोष्ट आहे. यामध्ये ना अहंकार आहे, ना बढाई, ना स्वतःची फसवणूक, ना लोभ, ना मृत्यूविषयी भीती. यामागे आहे अद्वितीय आत्मविश्वास आणि नितांत श्रद्धा. आपल्यामध्ये ही जगण्याची ऊर्मी हरपत चालली आहे का?*

**त**याला कोणतीही सीमा नसते. ना किमान, ना कमाल. जितके आयुष्य लाभते ते केवळ एक योगायोग असतो. अगदी विज्ञानालाही मानवी आयुष्याचं पूर्वानुमान अचूकपणाने सांगता आलेलं नाहीये. हे सगळं ठाऊक असूनसुद्धा आपण सर्वच जण रोजच्या आयुष्यात अमरत्व मिळाल्यासारखे किंवा मृत्यूच्या भयाला केराच्या टोपलीत टाकून जगत असतो. कारण प्रत्येकाला खूप जगायचं असतं, पण मनातली ही भावना कधीच ओठांवर येत नाही. मी अमुक वर्षं जगणार आहे, अशा प्रकारे कोणीही उघडपणे सांगताना दिसत नाही. पण मृत्यूची इच्छा जाहीर करण्याचे क्षण मात्र अनेकांच्या आयुष्यात बऱ्याच वेळा येतात.

अशा स्थितीत तिबेटचे अध्यात्मिक नेते आणि बौद्ध धर्मगुरु दलाई लामा यांनी त्यांच्या नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त एक अशी गोष्ट सांगितली की जी एक वेगळा दृष्टिकोन समोर आणणारी आहे. ती खूप काही विचार करायला भाग पाडणारी आहे. दलाई लामा यांनी त्यांच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त स्पष्ट सांगितले की त्यांना पुढची ३०-४० वर्षे लोकांची सेवा करायची आहे. लक्षात घ्या, जगात सर्वाधिक दीर्घायुषी व्यक्तिचं नाव जीन कॅलमेंट होतं. त्या १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगल्या होत्या.

दलाई लामांनी व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता ९० आणि ४० म्हणजेच १३० वर्षे! ९० वय हेच एक महत्त्वाचं मैलाचं दगड आहे, अशात १३० वर्षे जगण्याचं उद्दिष्ट आणि त्याची प्रकट इच्छा ही खरोखरच मोठी गोष्ट आहे. यामध्ये ना अहंकार आहे, ना बढाई, ना स्वतःची फसवणूक, ना लोभ, ना मृत्यूविषयी भीती. यामागे आहे अद्वितीय आत्मविश्वास आणि नितांत श्रद्धा.



**योगेश मिश्र**
ज्येष्ठ पत्रकार-लेखक-विश्लेषक

जगात इतर अनेक आध्यात्मिक नेते/धर्मगुरु झाले, पण असं आत्मविश्वासपूर्वक काही कोणी व्यक्त केलं का? कधीच नाही. अनेक बाबा, प्रवचक, धर्मनेते दिसतील, पण त्यांच्या तोंडून इतकी दीर्घायुषी जगण्याची इच्छा ऐकायला मिळाली नाही. अशा परिस्थितीत दलाई लामांसारखा आत्मविश्वास अनेकांच्या मनात एक प्रश्न उपस्थित करतो ' की आपण असा विचार का करत नाही? असं का आहे? कोणते अडथळे आहेत जे आपल्याला दलाई लामांसारखं आत्मविश्वासाने व्यक्त होण्यापासून थांबवतात? या प्रश्नाचं उत्तर प्रत्येकाचं वेगळं असू शकतं. पण काही बाबी निश्चितच सार्वत्रिक दृष्टिकोन देतात.

एक बाब आहे आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्टिकोनाची. आपण वय, मृत्यू यांसारख्या गोष्टींवर मोकळेपणाने बोलण्यास टाळाटाळ करतो. यामागे एक भीती असते नजर लागण्याची. किंवा स्वतःच्या तोंडून काही बोलल्यामुळे अनिष्ट घडण्याची. मला सव्वाशे वर्षं जगायचं आहे, असं आपण म्हणालो तर लोक आपल्याला काय म्हणतील याची भीती असते. तसेच कुणाची नजर लागू नये, आयुष्य चांगलं चाललेलं असताना उगाचच बाधा येऊ नये, अशा प्रकारच्या अनेक शंकाकुशंका आपल्या मनात असतात.

महात्मा गांधी यांनी स्वतः १२० वर्षं जगण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांनी अनेकदा म्हटलं होतं ' मला १२० वर्षं जगायचं आहे आणि त्यासाठी मी योग, उपवास, संतुलित आहार व सत्याचं पालन करीन. त्यासाठी त्यांनी मानसिक व आध्यात्मिक तयारीसुद्धा केली होती. पण सर्वात मोठा प्रश्न आहे तो म्हणजे, प्रत्यक्षात किती जण १००-१२५ वर्षं तर दूरच, पण ९० वर्षांपुढेही जगण्याची इच्छा बाळगतात?

सामान्य माणूस आधीच रोजच्या रहाटगाड्याने त्रस्त झालेला असतो. तो कसेतरी जीवन ओढत असतो, अशा परिस्थितीत कोण दीर्घ आयुष्याची इच्छा करेल? जर जीवन सुखद, समाधानी आणि उपयुक्त असेल तर माणूस कदाचित १०० वर्षं जगण्याची इच्छा बाळगेल.


पण आजूबाजूला कुटुंबात, नात्यात, शेजारी, समाजात ' वयोवृद्धांची अवस्था पाहून त्या अवस्थेत जाण्यास कोण इच्छुक असेल? आपल्याच माणसांत उपेक्षित, झिडकारलेले आणि एकटे पडलेले वृद्ध बघून कोणाला दीर्घायुष्याची प्रेरणा मिळेल? प्रत्येक दिवस संघर्षात जातो, प्रत्येक क्षण एक नवीन चिंता घेऊन येतो, भविष्याकडे पाहून चिंता आणि नैराश्य वाटतं, अशा वातावरणात उद्दिष्ट ठेवायची कशी? कधी रुग्णालयात जाण्याचा प्रसंग आला तर तेथील रुग्णांची, आजारांची अवस्था पाहून पायाखालची वाळू सरकते. भय दाटून येते. जीवनाबद्दल उत्साह निर्माण होण्याची शक्यताच संपून जाते.

मग दलाई लामा या सर्वांपासून अनभिज्ञ राहिले का? नाही. दलाई लामा अद्वितीय आहेत, पण त्यांनाही बालपणीच घर-देश सोडावा लागला होता. तेव्हापासून ते निर्वासित जीवन जगत आहेत. असे असूनही कधी त्यांच्याकडून नकारात्मकतेची एकही गोष्ट ऐकली का? प्रतिशोधाची भावना किंवा हिंसेची भाषा ऐकली का? नाही. केवळ शांती आणि सेवा याविषयीच ते आयुष्यभर बोलत राहिले. त्यांना दुःखं नाहीत? चिंता नाहीत? शेवटी तेही ' आपल्यासारखे माणूसच आहेत. पण त्यांनी एक विशिष्ट आध्यात्मिक शक्ती प्राप्त केली आहे. ते आजही साधेपणाने पारंपरिक तिबेटी जीवनशैली जगतात. डोंगरांच्या कुशीत, शांत आणि रम्य वातावरणात राहतात. त्यांचा देवावर अटूट विश्वास आहे. ते एक आध्यात्मिक ऊर्जा आहेत. ते प्रवचनं देत नाहीत. बनावट, पोकळ गोष्टी करत नाहीत. धार्मिक कर्मकांडाचा प्रचार करत नाहीत. ते केवळ एक आध्यात्मिक प्रकाशपुंज आहेत. कोणी म्हणेल, त्यांना खूप सुविधा आहेत. पण अशा सुविधा अनेकांना मिळालेल्या आहेत. काहींना तर पुढील सात पिढ्यांची काळजी करण्याची गरज नाही इतकी संपत्ती लाभली आहे. तरीही कोणी दलाई लामांसारखं बोलताना ऐकलंय का?

दलाई लामांनी जे सांगितलं, जसं ते जगतात ते आपल्यासाठी शिकण्यासारखं आहे, प्रेरणा घेण्यासारखं आहे, आत्मपरीक्षण करण्यासारखं आहे. ही कोणत्याही धर्माशी संबंधित गोष्ट नाही. दलाई लामांनी उच्चारलेलं एकच वाक्य अनेक विचारांचे दरवाजे उघडतं. आपणही त्या दरवाज्यांत डोकावून पाहूया.' कदाचित आपल्याला जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन सापडेल. हा दृष्टिकोनच आपल्याला जगण्याची खरी प्रेरणा देतो. प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याची उमेद देतो. आयुष्य दीर्घ आणि व्यापक बनवण्याची प्रेरणा देतो. अशा जीवनातच खरा अर्थ दडलेला आहे. आपण तो समजून घेणार आहोत का?

# डॉक्टरकीकडील ओढा आटतोय?

**ॲनालिटिक्स इंडिया मॅगझिनच्या अहवालानुसार तरुणांच्या करिअर पसंतीमध्ये डॉक्टरकी आता पाचव्या क्रमांकावर आहे. त्याआधी बँकिंग व आर्थिक सेवा, मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग आणि डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा क्रम लागतो. म्हणजेच आजची पिढी पारंपरिक पेशांऐवजी तांत्रिक व नवोपक्रमशील क्षेत्रांकडे झुकत आहे. भारतामधून दरवर्षी सुमारे ७ टक्के डॉक्टर परदेशात स्थायिक होतात. विशेषतः अमेरिका, कॅनडा, युरोप आणि ऑस्ट्रेलिया येथे हे डॉक्टर जाताहेत. या दोन्ही गोष्टी डॉक्टरी पेशाबाबत नवतरुणांच्या मानसिकतेतील बदलाचे दर्शन घडवणाऱ्या आहेत. यामागची कारणे काय आहेत?**



भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात डॉक्टरांची कमतरता ही कोणतीही नवी गोष्ट नाही. बहुतेक वेळा असे म्हटले जाते की देशाची लोकसंख्या इतकी मोठी आहे की, डॉक्टर कुठे पुरणार? पण ही समस्या केवळ लोकसंख्येमुळेच निर्माण झालेली नाही. आजचा युवक डॉक्टर होण्याच्या विचारानेच घाबरतो आहे. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये आधीपासून कोणीही डॉक्टर नाही, त्या घरांतील तरुण डॉक्टरीच्या दिशेने वाटचाल करायला धजावत नाहीत. हे चित्र केवळ वैयक्तिक नाही, तर एकूणच भारतातील आरोग्यव्यवस्थेवर खोल परिणाम करणारे आहे.

### डॉक्टरांची विद्यमान स्थिती

एक अनार, शंभर बिमार ही म्हण भारतात अगदी तंतोतंत लागू होते. केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी २०२४ मध्ये लोकसभेत सादर केलेल्या माहितीनुसार, भारतात सरासरी ८३४ नागरिकांमागे १ डॉक्टर आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दर १००० लोकसंख्येमागे १ डॉक्टर असावा, असा निकष आहे. तांत्रिकदृष्ट्या भारताचे प्रमाण या निकषापेक्षा थोडेसे चांगले आहे, पण वास्तव वेगळे सांगते. सरकारी रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या लांबच लांब प्रतीक्षा यादी असून, अनेक ठिकाणी डॉक्टरच उपलब्ध नाहीत. खाजगी क्षेत्रातील डॉक्टरांमुळेच हे प्रमाण चांगले दिसते, हे स्पष्ट आहे.

**कमलेश गिरी**

माध्यमिक शिक्षणानंतर डॉक्टर होण्यासाठी नीट परीक्षेत उत्तीर्ण होणे ही पहिली अडचण असते. ही परीक्षा अतिशय स्पर्धात्मक असते. उदाहरणार्थ, २०२५ मध्ये २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली, पण त्यातले १२ लाखांहून कमी विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झाल्यानंतर ५.५ वर्षांचा एमबीबीएस कोर्स, नंतर ३ वर्षांची पोस्ट ग्रॅज्युएशन (एमडी/एमएस) आणि त्यानंतर सुपर स्पेशलायझेशन केल्यास आणखी २-३ वर्षांचा काळ लागतो. म्हणजे १२वी नंतर किमान १२ ते १४ वर्षांची सततची शिक्षणयात्रा. एवढ्या वर्षांच्या कष्टानंतरही यशस्वी करिअर मिळेल की नाही, याची खात्री नाही. डॉक्टर झाल्यानंतर चांगली नोकरी मिळणेही सोपे नाही. सरकारी रुग्णालयांमध्ये काहीसे स्थैर्य असले तरी खाजगी रुग्णालयांमध्ये प्रारंभी कमी पगार, अपार श्रम आणि अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. स्वतःचं क्लिनिक सुरु करण्यासाठी भांडवल, जागा, विश्वास आणि वेळ लागतो. अनेक वेळा प्रॅक्टिस टिकेल की नाही, याची शंका असते. त्यामुळे अनेक तरुण दुसऱ्या, अधिक फायदेशीर व लवकर स्थैर्य देणाऱ्या करिअरकडे वळताहे. ज्या कुटुंबात आधीपासून डॉक्टर आहेत, तेथील मुलांना डॉक्टरीची माहिती, मार्गदर्शन, प्रॅक्टिससाठी प्लॅटफॉर्म मिळतो. पण ज्यांच्या घरी कोणी डॉक्टर नाही, त्यांना ही वाट अधिक धूसर आणि कठीण वाटते. स्पर्धा, खर्च, काळ, व्यवस्थेतील अडचणी आणि सामाजिक पाठबळाचा अभाव हे सगळे घटक मिळून डॉक्टरी पेशाकडे वळणाऱ्या नव्या पिढीची संख्या कमी करत आहेत.

भारतामधून दरवर्षी सुमारे ७ टक्के डॉक्टर परदेशात स्थायिक होतात. विशेषतः अमेरिका, कॅनडा, युरोप आणि ऑस्ट्रेलिया येथे हे डॉक्टर जातात. यामागची कारणे स्पष्ट आहेत ' तेथे अधिक वेतन मिळते, कामाचे वातावरण तुलनेने चांगले असते. तसेच आरामदायक जीवनशैली आणि पेशा म्हणून डॉक्टरांना मिळणारा आदरही सुखावणारा असतो. सध्या ७० हजारांहून अधिक भारतीय डॉक्टर परदेशात कार्यरत आहेत. याउलट दिल्लीतील एम्ससारख्या देशातील नामवंत रुग्णालयांमध्ये ३६ ते ७६ तासांची सलग ड्युटी रेसिडंट डॉक्टरला करावी लागते. अनेक सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये हीच परिस्थिती आहे. ग्रामीण भागात तर आवश्यक साधनसामग्री, स्वच्छता आणि सुरक्षा यांचा अभाव आहे. डॉक्टरांवरील शारीरिक व मानसिक ताण इतका असतो की त्यातून बर्नआऊट होण्याची शक्यता वाढते. ॲनालिटिक्स इंडिया मॅगझिनच्या २०२४च्या अहवालानुसार तरुणांच्या करिअर पसंतीमध्ये डॉक्टरकी आता पाचव्या क्रमांकावर आहे. त्याआधी बँकिंग व आर्थिक सेवा, मॅनेजमेंट, इंजिनिअरिंग आणि डेटा सायन्स/कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा क्रम लागतो. म्हणजेच आजची पिढी पारंपरिक पेशांऐवजी तांत्रिक व नवोपक्रमशील क्षेत्रांकडे झुकत आहे.

भारतामध्ये सध्या ७०६ वैद्यकीय महाविद्यालये आहेत आणि एक लाखांहून अधिक एमबीबीएस प्रवेशक्षमता उपलब्ध आहे. मागील दोन वर्षांत नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. जर सरकारकडून कामाचे स्वरूप सुसह्य करण्यात आले, न्याय्य वेतन दिले गेले आणि तरुण डॉक्टरांना स्थैर्य मिळाले, तर भारतात डॉक्टरांची संख्या वाढू शकते आणि परदेशगमन कमी होऊ शकते.

ही केवळ आरोग्यविषयक नाही, तर ती शिक्षणव्यवस्था, समाजरचना, सरकारी धोरणे आणि तरुणांच्या मनोवृत्तीशी निगडीत आहे. डॉक्टरी हा पेशा म्हणजे एक मिशन मानण्याची भावना आता हळूहळू कमी होत आहे. जर देशाला खऱ्या अर्थाने आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हायचे असेल, तर डॉक्टर होण्याची संपूर्ण प्रक्रिया सुलभ, न्याय्य आणि सन्मानजनक बनवावी लागेल. त्यासाठी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेलाच आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.